अणजूरकर नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास

•••

(इ स. ११२८–१९६४)

•••

लेखक

श्री. गजानन गोविंद तथा काका नाईक

(इनामदारांची माडी, अणजूर)

•••

मूल्य चार रुपये

"History is but a recalling of man's doings, his struggles, achievements and failures in the past that they might instruct his present and bear fruit in future."

'Brief Survey of the World' by **Prof. Sharma**

अणजूरकर नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास

[इ. स. ११२८–१९६४]

लेखक

श्री. गजानन गोविंद तथा काका नाईक

इनामदारांची माडी, अणजूर

मूल्य चार रुपये

प्रकाशक :
चिंतामण मुकुंद नाईक
अध्यक्ष, इतिहास कमिटी
इनामदारांची माडी, अणजूर, भिवंडी

●●●

श्री गणेश चतुर्थी, शके १८८६

दि. ९ सप्टेंबर १९६४

●●●

●●●

मुद्रक :
श्री. स. पां. जोशी,
श्री समर्थ प्रिंटींग प्रेस,
सुभाष रोड,
ठाणें.

स म र्प ण

गंगाजी, बुबाजी, मुरारजी,
शिवजी, नारायणजी ह्या
धीरोदात्त, त्यागी कर्मवीर
बंधुंच्या पुण्यस्मृतीची ही
त्यांचीच कहाणी त्यांच्याच
चरणी अत्यंत आदराने
व निस्सीम भक्तीने
अर्पण करीत आहे.

—लेखक

अनुक्रमणिका

शुद्धिपत्र

पान	ओळ	चूक	दुरुस्त
४	११	भागी	जागीं
४	१५	आह	आहे
४	२८	चौसिपी	चौसोपी
६	२५	त वढीव	ते वाढीव
८	७	जतन्नात्र	जतन्नाव
९	३०	राडोड	राठोड
१०	२६	विधापूर	विद्यापूर
१३	२५	६५	६६
१४	४	१३६	१३४

२१

शिवराम — पद्माकर

नारायण — जगन्नाथ, भगवान, सुरेश

(चूक)

शिवराम — नारायण

शिवराम — पद्माकर, जगन्नाथ, भगवान, सुरेश

(दुरुस्त)

पान	ओळ	चूक	दुरुस्त
२७	१४	गउळवार, गउळवार	गउळवाव, गउळवाव
४०	१३	जाते	जाले
७२	१८	चितळसर	उतळसर
७५	९	तली	तेली
७७	२५	इमाने	इनामे
७८	१३	माडा	वाडा
८२	१४	लोनाडें	लोनाड

९२	३	वळच्या	वेळच्या
९२	९	कर्वेच	कर्वेचे
१००	२७	म्रालण्यात की	घालण्यांत आले की
१०५	२	तालाठ्याच्या	तलाठ्यांचा
१०६	६	मुद्मा	मुद्दा
११६	३३	Canquest	Conquest
११८	५	जाई	गेले
१२२	२३	नज्राबाई	वज्राबाई
१२७	९	माखे	मास्त
१५२	१०	नामकरणे	नामकरण
१५५	२	हीद	होते

लेखकाचें निवेदन

इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. इ. सन १५३४ पासुन फिरंग्यानीं ह्या प्रदेशांतल्या प्रजेला छळण्यास प्रारंभ केला. अपार धर्मछल केला. कोणाचीही वतनें ठेविली नाहींत; लोक निराधार झाले; बाटवाबाटवीला सीमा राहिली नाही; प्रजा उपाशी दिवस काढू लागली; जमीनी वतने बाटग्याना देण्यांत आली; धंदे बसले. हा अमानुष छळ व ही विपन्नावस्था '**श्री देवास न सोसे**'. फिरंग्याना ह्या मूलखांतून हाकलणे हाच एक उपाय शिल्लक राहिला होता. प्रजेत कसलेही त्राण नव्हते. अन्नान्न दशेप्रत गेलेल्या प्रजेजवळ युद्धाची साधनें असणार कोठून ! प्रजा हवालदिल झाली होती. अर्भकांवर, स्त्रियांवर जुलुम व जबरदस्ती चालूच होती. समय कठिण होता. पण 'संभवामी युगेयुगे' ह्या श्रीकृष्णाचे आश्वासनाला अंकूर फुटून परमेश्वरानें एका 'धर्मराजास' साष्टीत जन्मास घातले. त्याचे नांव '**गंगाजी**'. सुप्रसिद्ध पाठारे क्षत्रीय ज्ञातीतल्या नाईक घरण्यांत या युगपुरुषाचा जन्म झाला. अणजूर येथें जन्मलेल्या गंगाजीनें संत्रस्त प्रजेस दिलासा दिला. त्यानें देवाचे अधिष्ठाणाकरितां अनुष्टान २१ दिवस निराहार मोरगावास केले. देवाचा आशीर्वाद व प्रसाद मिळविला. श्री समर्थांचे आज्ञेप्रमाणे 'पहिले परमार्थ विवरण । दुसरें ते राजकारण, तिसरें ते सावधपण केले पाहिजे' असे करण्याचें ठरविले. देवाचा प्रसाद मिळताच ह्या प्रान्तात एक मोठी संघटणा त्यानें निर्मिली. 'परिगुप्तरुपें' ह्या समर्थांच्या इशाऱ्यान्वयें त्यानें ही गुप्त संघटणा नियमीत केली. त्या संघटणेत अखीलजीव गुंतविले. सर्व जातीचे, सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे व पक्षाचे लोक त्या संघटणेत सामील झाले. 'संघे शक्तिः कलौ' ह्या सिद्धांतावर विसंबून निस्त्राण व असाह्य अशा लोकांनीं सहकार्यांने एक महान शक्ति उभी केली. इ स. १७१८ मध्यें ही संघटणा काम करूं लागली इ. स. १७३९ मध्यें ह्या प्रान्तांतून फिरंग्याचे उच्चाटण होईपर्यंत ह्या संघटणेंने अविश्रांत काम केले. आश्चर्य हें कीं ही संघटणा इतक्या दीर्घकालपर्यंत टिकून राहीली. ह्या संघटणेंत स्त्रियांनीही भाग घेतला होता. गंगाजीच्या ह्या संघटनेतला एकही मनुष्य फितुर झाला नाही कीं वारगळला नाहीं. गंगाजी नाईक व त्यांचे अनेक मित्र, सहकारी यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. त्यांतले काहींना समुद्रांत वा तेलाचे जळत्या कढईत आपले प्राण द्यावे लागले. अशा कष्टमय स्थितीत जिवाच्या धोक्यांत सतत वावरणाऱ्या जिवाना गंगाजीने खालील शब्दांत दिलासा दिला. 'जर मजला श्रीदेवाने अभय दिले आहे त्या भरंवशावर देवाचे अभय घेतो, तेव्हा तुम्हाकडे मनुष्य पाठवितो. तुम्ही मोरयाचे स्मरण करुन जे काम पडेल ते करा. मनांत कपट येऊ देऊ नका. **हा सेवाधर्म एकनिष्ठ करा. आपण बहुत काळाने सेवा पूर्वजामागे अंगिकारिली तरीही सेवा एकनिष्ठपणें करावी.** यामुळें बऱ्या वाईटाचे संकल्प देवापुढे ठेवावें. बरें झाले तर आपण आपली वतनें खाऊ आणि पुण्य परमार्थ वाढेल,

कीर्ती परमार्थ प्राप्त होईल. वाईट झाले तर ह्या महत् कार्याचा व आपले कुटुंबाचा संकल्प करावा. आपला संकेत ऐसा आहे. तुम्हास किंवा आम्हास दगा एखादे माणसास झाला म्हणजे आपण आपल्या कुटुंबा सुद्धा अग्निकाष्ट भक्षण करूं. ”

पांचा पांडवांनीं जुलमी दुर्योधनास मारून ती राजवट धुळीस मिळविली व प्रजेला दुःखमुक्त केले त्याप्रमाणें ह्या पाचा नाईकांनीं फिरंगी राजवट उधळून ह्या प्रांताले प्रजेची मुक्तता छळापासून व अन्यायापासून केली, प्रजा सुखी केली. असे हे त्यागी कर्मवीर व स्थितप्रज्ञ योगी ज्या अणजूरकर नाईक घराण्यांत जन्मले त्यांच्या घराण्याचा हा इतिहास मी त्यांच्याच प्रेरणेनें लिहिला आहे. ज्ञातीचा इतिहास, घराण्याचा इतिहास लिहिण्याचा संकल्प मी लहानपणीच केला होता. माझे वडील गोविंद विनायक नाईक यांच्या दप्तरांतील हस्तलिखित ‘ साष्टीची बखर ’ मी लहानपणीच वाचली होती. आपल्या देशाकरितां आपण कांहीं करावे अशी स्फूर्ती मला त्यावेळींच मिळाली होती. पूर्वजामागें आपण कांहीं करावें ही त्यावेळची इच्छा. इ. स. १९०५ त मी माझी स्वतंत्र अशी गुप्त संघटणा निर्मिली व राजकारणांत शिरलो. अनेक उचापती व उलाढाल्या केल्या पण कांहीं प्रत्यक्ष होण्याचे आधीच मी पकडलो गेलो. मी माझे मित्र भोरचे वैद्य व मावळातला एक मावळा अशा तिघेजणांना सरकारने तुरुंगांत पाठविले. सुटून आल्यानंतर १९१३ पासुन जनतेची विधायक कार्यात व कार्यानें सेवा आजवर करीत आहे.

इ. स. १९१५ साली प्रसिद्ध केले होते कीं लवकरच घराण्याचा इतिहास लिहून तो प्रसिद्ध करीन पण तें कार्य तसेंच पडून राहिले. इ. स. १९३८ मध्ये कै. कमळाकर जगन्नाथ नाईक व चिंतामण रावजी नाईक ह्यांच्या जोडसहीनें मी इतिहास संबधांत पत्रक प्रसिद्ध केले पण त्यावेळी हें कार्य अपुरे राहिले. त्यानंतर मी सांगावे व चिंतामण रावजी ह्यांनी लिहावे अशा रितीनें बराचसा मजकूर लिहून काढला गेला, पण त्यावेळीही हें काम पडून राहिले. इतिहासाचे बाबतीत मला कै. रामकृष्ण यशवंत नाईक व कै. चिंतामण रावजी नाईक वारंवार विचारीत. मी प्रत्येकवेळीं ‘ दुसऱ्या गणेश चतुर्थीस देतो ’ असे सांगत असे. ते अपुरे कार्य मी आज हातावेगळे करीत आहे त्यामुळे ह्या तीन परलोकवासीयांच्या आत्म्याना आनंद होईल असा मला भरवंसा आहे. हा सर्व ग्रंथ छापण्याचे कै. चिंतामण रावजी नाईक यानी त्यावेळीं मला आश्वासन दिले होतें.

गंगाजी नाईकांचें आत्मचरित्र अशी ‘ साष्टीची बखर ’ मी १९३५ त गोपचारच्या मदतीने प्रसिद्ध केली. ज्ञातीच्या इतिहासाचा पहिला खंड क्षात्रैक्य समाजाकरवी मी प्रसिद्ध केला आहे. ज्ञातीच्या इतिहासाचा माझा दुसरा खंड नुकताच प्रकाशीत झाला आहे.

ज्या नाईक घराण्याचा इतिहास मी लिहिला आहे ते घराणे बिंबराजाबरोबर ११६३ सनात बांद्रे येथे स्थाईक झाले. बिंवाने नाईकाना बांद्रे व अणजूर हीं दोन गांवे ईनाम

दिली होती. फिरंग्यांच्या जुलमाला कंटाळून नाईकांनी १५८० चे सुमारास वांद्र्याहून स्थल त्याग करून ते अणजूरास आले तेव्हांपासून हें अणजूरास राहात आहेत.

बिंबराजे यांचे मुख्य सरदार म्हणून हे अणजूरकर इतिहासांत निर्दीष्ट आहेत. ह्यांचे मूळ आडनांव राणे. कांही कर्तबगारीकरिता ह्या घराण्यांस नाईक हा हुद्दा बिंबकाली मिळाला तेव्हांपासून त्यांचे आडनांव नाईक पडले मालाडचे देसाई व वांद्रयाचे देश ह्या उभयतांवर बिंबाचा व बिंबराजाचा पूर्ण भरवंसा होता. हे देसाई व देशच सर्व राज्याचा कारभार पहात असत.

कै रामचंद्र-सखाराम नाईक यांनीं प्रथमतः क्षात्रैक्य समाजांत ठराव मांडून व स्वतः बिंबावर एक लहानसा स्फुटलेख लिहून व वाचून समाजांत इतिहासाची गोडी उत्पन्न केली. त्यांनीं साष्टीचे बखरीचा पूर्वार्ध मिळविला. त्यांतली अनेक प्रसंगाची टिपणें तयार केली. पण त्यांना त्यांतला गोंधळ उलगडता न आल्यामुळें वसाहतवाला विंब म्हणजे जाधवांचा विंब असा अपसमज त्यानी करून घेतला. क्षा. स. चे पहिल्या इतिहास कमेटीत ते संकलनकार व लेखक म्हणून प्रविष्ट झाले होते. त्यांचें नातू श्री. वसंतराव दत्तात्रय यांनीं दत्तात्रय याचे सांगण्यावरून तात्याजींचा तो पहिला लेख, बखर व कांहीं टिपणें दिलेली आजही मजजवळ आहेत. मतभिन्नतेमुळें मला त्या ठिकाणांचा कांहीं उपयोग झाला नाहीं ती मी ठेवून दिली आहेत. तात्याजी मोठे खटपटी व मरेपर्यंत उत्साही होते. त्यांनीं तुकाराम बाप्पाजीना इनाम जप्तीचे वेळीं फार मदत केली. ते एकवेळा अणजूरचे मुखत्यारही होते. मला ते नेहमी प्रोत्साहन देत असत. भरोडीच्या मारुतीच्या देवळाचा जीर्णोद्धार त्यांनीं केला. अंगांत ताप भरला असतांना त्या देवळाच्या कळसास त्यांनीं रंग दिला व चार दिवसांनीं दिवें स्टेशन येथें तें तापानें वारले.

कै. दिवाकर भाई उर्फ बापूसहिब नाईक यानीं अतिशय मेहनत घेऊन व पैसे खर्च करून कांहीं माहिती, हस्त लिखितें व ग्रंथ जमा केले आहेत. त्याना इतिहास लिहावयाचा होता परंतु तसे घडले नाहीं. त्याच्याकडे आलेल्या यदुनाथ सरकार, केशव आप्पा पाध्ये व गोविंदराव सरदेसाई ह्यानी त्यावेळीं हे कागदपत्र मला ध्यावे अशी त्यांना विनंति केली होती. आतां मी त्याच्या तीन सुविद्य व सुसंस्कृत मुलाना विनंति करीतो कीं, ती सर्व माहीती त्यानी प्रसिद्ध करावी म्हणजे बापुसाहेबांचे श्रमाचे व पैशाचे चीज होईल.

माझी साष्टीची बखर सन १९३५ मध्यें छापण्यांत आली त्याच वेळीं माझी वसईच्या युद्धाची पार्श्वभूमी व त्यांत पाठारे क्षत्रीय ज्ञातीने घेतलेला भाग ही पुस्तिका प्रसिद्ध झाली. त्याच्यानंतर गंगाजी नाईकाचे चरित्रही छापले गेले पण अगदीं प्रथमतः संकल्पीत केलेला घरण्याचा इतिहास मात्र मागें रहात गेला. आज हा फार पूर्वीचा संकल्प मी श्रीगणेशचतुर्थी भाद्रपद शुक्ल १८८६ रोजीं पुरा करीत आहे.

हा ग्रंथ मी अनेक मित्रांचे प्रोत्साहनाने पुरा केला आहे. समस्त इनामदारानीं सन १९६२ च्या माघ महिन्यांतल्या श्री गणेश जयन्तीचे दिवशी एक लहानशी इतिहास कमिटी छपाईकरितां स्थापन केली. त्या कमिटीनें हा ग्रंथ ९ महिने पर्यंत तपासला. कमेटीने तपासून कायम केलेला हा ग्रंथ आज रोजीं मी छापला आहे. ह्या कमिटीत कै. शामराव वामनराव नाईक चिटणीस, श्री. चिंतामण मुकुंद नाईक अध्यक्ष, वसंत दत्तात्रय नाईक, विनायक प्रभाकर नाईक व सुभाष रामकृष्ण नाईक असे पाच सभासद नियुक्त केले होते परंतु ता. २७-१०-६२ रोजीं शामराम नाईक मृत्यु पावले. त्यांचे जागी कमेटीने श्री. पुरुषोत्तम गजानन नाईक याना नियुक्त करून घेतले. कै. शामराव नाईक यांचे चिटणीसाचे काम श्री. सुभाष रामकृष्ण ह्यास नंतर देण्यांत आले. श्री. गजानन दिवाकर नाईक हे कमेटीचे सभासद नसतानाही ग्रंथाचे प्रत्येक वाचण्याचे वेळीं हजर राहून ग्रंथाचे परिक्षण करीत. त्यानी केलेल्या बऱ्याचशा सुचना मी मान्य केल्या. कांहीं शंकांचे समाधान केले व कांहीं मजरकूरही गाळला. त्यांच्या ह्या आपुलकीने केलेल्या परिक्षणाकरितां मी त्यांचा आभारी आहे. मला समाधान आहे कीं हा ग्रंथ कमिटी व गजानन नाईक ह्यांच्या परिक्षणानंतर मी छापला आहे. कमिटीनें अनेक दिवस प्रयत्न करून बऱ्याच देणग्या जमविल्या आहेत. ग्रंथाची पानें वाढल्यामुळें अंदाजाबाहेर छपाईचा खर्च वाढला आहे. मी खात्री बाळगतो कीं, कमिटी ही तूट भरण्याची व्यवस्था करीलच. कमिटीच्या सभासदांनीं आपले काम चोख व तत्परतेनें केले आहे. मी त्या कमिटीचे सभासदांचे हार्दिक आभार मानतो.

टाईम्स ऑफ इन्डीयाचे ठाणें येथील वार्ताहर श्री. श्री. म. सहस्त्रबुद्धे यानी ग्रंथातल्या इंग्रजी अवतरणाचें सुबोध मराठी भाषेत भाषांतर केले त्यांच्या ह्या लोभा-करिता मी त्यांचे आभार मानीत आहे.

श्री समर्थ प्रेसचे मालक श्री. स. पां. जोशी ह्यांनी हा ग्रंथ छापताना बरेच श्रम घेतले. त्यांनी बऱ्याच सवलती दिल्या आहेत. पुस्तक सुबक करण्यांत त्यानी कष्ट घेतले आहेत. ह्या त्यांच्या लोभाकरितां मी त्यांचा फार आभारी आहे.

त्यांचे स्टाफनेही अनेकदा न कंटाळता प्रुफे तपासणे, गॅली तयार करणें वगैरे कामे आपुलकीनी व तत्परतेने केली. त्यांच्या लोभाकरितां मी त्या स्टॉफचा आभारी आह.

श्री. जोशींच्या जुन्या स्नेहाचा फायदा घेऊन मी त्यांना वारंवार त्रास दिला हे मी विसरू शकत नाहीं.

श्री. यशवंतराव नरसिंह केळकर, प्रसिद्ध इतिहास संशोधक यानीं ह्या इतिहास ग्रंथास प्रस्तावना लिहून दिली आहे, माझी विनंती त्यानी त्वरित मान्य केली. त्यांच्या ह्या लोभाकरितां मी त्यांचा फार आभारी आहे.

देणग्या जमा करणाऱ्या व वंशावळीकरितां नांवें जमा करणाऱ्या ज्या व्यक्तींनीं मला मदत केली त्या सर्वांचा मी फार आभारी आहे. विशेषतः चि. सुरेश चिंतामण नाईक व चि. वामन गजानन नाईक ह्यानी उल्लेखनीय अशी मदत मला केली. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

कै. भाऊराम हरिश्चंद्र देसाई यांनी आपल्या उतार वयांत अणजूरचा प्रवास करून देवस्थानांची व देवांची छायाचित्रें घेतली. त्यांचा मी आभारी आहे.

ह्या ग्रंथांत मी अनेक ग्रंथांचा उपयोग केला आहे. त्या सर्व ग्रंथकारांचा मी आभारी आहे. ज्यांचे नांवाचा उल्लेख केला नाहीं अशा अनेक मित्रांचा मी ऋणी आहे. माझा हा जुना संकल्प परमेश्वरानें माझ्या हातून पुरा करून घेतला त्या श्रीसिद्धिविनायकाचे आराधन करून हें निवेदन पुरे करितों.

यदक्षरं पदभ्रष्टं मात्राहीनं तु यद्भवेत ।
तत्सर्वं क्षम्यतां देव नारायण नमोस्तुते ॥
यादृशं पुस्तकं दृष्ट्वा तादृशं लिखितं मया ।
यदि शुद्धमशुद्धवा मम दोषो न विद्यते ॥१॥

नम्र सेवक,
काका नाईक

श्रीगणेश चतुर्थी
भाद्रपद शुद्ध चतुर्थी
शके १८८६
अणजूरची इनामदारांची माडी.

कमेटीचे अध्यक्षांचे निवेदन

श्री. काका नाईक ह्यांनी नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास लिहीला तो तपासण्याकरीतां व छपाईची तरतूद करण्याकरितां एक लहानशी कमिटी समस्त ईनामदारानी नेमली. ह्या कमिटीनें सवडीअंती नऊ महिन्यांत इतिहास तपासून परिक्षण पूर्ण केले. व नंतर देणग्याही कमेटीने गोळा केल्या. ह्या कामी श्री. गजानन दिवाकर नाईक ह्यांनी आम्हांला काहीं इतिहासासंबधी व देवस्थानासंबधी माहिती पूरविली व उपयुक्त सुचना केल्या. ह्याबद्दल कमिटी त्यांचे आभार मानीत आहे. ह्या कमीटीच्या सभासदांनी उत्साहानें काम केले त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. तसेच हा इतिहास छापण्या करीतां ज्या ज्या लोकांनी आम्हांला सहकार्य दिले व देणग्या दिल्या त्यांचेही आम्ही आभारी आहोत. अनेक वर्षे परिश्रम करून श्री. काकानीं हा इतिहास लिहिला त्यांचे ही अभिनंदन आम्ही समस्त ईनामदाराचे वतीनें करीत आहो.

श्री. चिंतामण मुकुंद नाईक
अध्यक्ष, इतिहास कमिटी,
अणजूर.

प्रस्तावना

श्रीयुत गजानन गोविंद ऊर्फ काका अणजूरकर यांनीं, त्यांनीं लिहिलेल्या ' अणजूरकर नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास ' या आपल्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला लिहिलें, तेव्हां मला मोठा आनंद वाटला. आनंद अशा करतां कीं, सुमोरें २८ वर्षांपूर्वीं कांहीं एका योगायोगामुळें ज्या एका समान ध्येयासाठीं किंवा हेतूसाठीं आम्हीं दोघे एकत्र येऊन आम्हा उभयतांमध्यें स्नेहाचें नातें जडलें तें पुन्हां या प्रसंगानें दृढ होत आहे! १९३५--३६ सालीं मी स्वतंत्रपणें पेशवे दप्तरांतील कागदांचे संशोधन करून चिमाजी आप्पांच्या वसई मोहिमेचा इतिहास लिहित होतो. आणि त्याच वेळीं श्री. काका अणजूरकरहि स्वतंत्रपणें त्यांच्याच घराण्यांत लिहिल्या गेलेल्या व काव्येतिहाससंग्रहांत छापलेल्या 'साष्टीच्या बखरीचें' म्हणजेच वसई मोहिमे संबंधीच्या बखरीचें परिष्करण आणि पुनर्मुद्रण करण्यांत तन्मय झालेले होते. युरोपियन आरमारी सत्तेविरुद्ध सतत तीन वर्षें झगडा देऊन आणि अखेर उत्तर फिरंगणातून पोर्तुगीजांचे समूळ उच्चाटण करून तो मुलूख स्वराज्यांत आणला, हा पेशव्यांचा पराक्रम अभिमानाचें भरतें आणण्यासारखा ! ग्रँडडफ सारख्या परकीय इतिहासकारांनीहि त्याची मुक्तकंठानें वाहवा केलेली ! परंतु आपणाकडील मराठी इतिहाससाधनांत त्यासंबंधी कांहींच समकालीन पुरावे उपलब्ध झालेले नव्हते. एकच महत्त्वाचा पुरावा उपलब्ध होता आणि तो म्हणजे वर उल्लेखलेली 'ठाणें साष्टीची बखर.' ती 'बखर' असली तरी ती किती मोलाची आहे व त्या बखरींत पेशवे दप्तरांत उपलब्ध झालेल्या समकालीन कागदपत्रांतूनहि न आलेली कितीतरी बारीक सारीक तपशीलाची महत्वाची माहिती अंतर्भूत आहे याची जाणीव मला असल्यामुळें, काका अणजूरकर हे त्या बखरीचें संशोधन व पुनर्मुद्रण करीत आहेत असे ऐकल्यावर मी त्यांच्याशी सूत्र जोडण्यास आतुर होतो. उलटपक्षी काका अणजूरकरहि, " ही किती केलें तरी ती ' बखर ' च आहे. ती समकालीन पत्र-व्यवहाराच्या प्रत्यंतर पुराव्यानेंच खरी व विश्वसनीय आहे असें सिद्ध केलें पाहिजे" असे जाणून असल्यामुळें माझ्याशी संपर्क जोडण्यास सिद्ध झाले होते. आणि या समान भूमिकेमुळेंच आमची ओळख झाली व पुढें तिचें स्नेहांत रूपांतर झाले.

यानंतर आम्ही दोघांनीं मिळून वसई मोहिमेत आलेलीं स्थळें प्रत्यक्ष जातीनें जाऊन पाहिलीं व ठाण्यावरील स्वारीचे वेळीं ज्या मार्गानें सैन्यें गेलीं त्याच मार्गानें आम्ही मुद्दाम गेलो. अनेक स्थळें पाहिलीं व डोक्यांत भिरभिरणाऱ्या तेथील ऐतिहासिक घटनांशी एकरूप होऊन जणूं कांहीं आम्हीं दोघे त्या स्वारीतील पेशव्यांचे सैनिकच आहोत असा साक्षात्कार करून घेतला. माझा अणजूरचा मुक्काम आणि त्यानंतरचा

आमचा तो प्रवास चिरंतन स्मरणीय झालेला आहे. काकांचे चरित्र व चारित्र्य तेव्हां मला जें पहावयास सांपडलें त्यावरुन हा एक स्वदेशाभिमानी, आपल्या पराक्रमी पूर्वजांचा निस्सीम अभिमान बाळगणारा आणि त्या आपल्या पूर्वजाना शोभण्यासारखी कांहींतरी समाजोपयोगी कामगिरी आपल्या हातून सतत होत राहावी अशी श्रद्धा ठेऊन काम करणारा माणूस आहे अशी माझी खात्री पटली.

'Follow the river and you will find the Sea' अशी जी इग्रजी म्हण आहे ती बहुर्थ आहे. मनुष्यानें आपल्या परिसरांतील तुटपुंज्या साधनांचाहि संपूर्ण उपयोग करून घेण्याची दक्षता आणि कौशल्य दाखविलें तरीहि तें त्याचें काम, दुसऱ्या एकाद्या मोठ्या कामाचा दुवा बनून जातें. आणि याच दृष्टीनें एकाद्या व्यक्तीचा त्याच्या घराण्याचा किंवा त्याच्या कुलाचा इतिहास कोणी लिहिला तर व्यापक समाजेतिहासाच्या बांधणीतीलच एक आवश्यक काम त्यानें उरकलें, असेंच म्हणावें लागतें. आणि या दृष्टीनें प्रथम साष्टीच्या बखरीचे संशोधन आणि प्रसिद्धीकरण करुन, त्यानंतर पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाचे दोन खंड लिहून व आता या अणजूरकर नाईक घराण्याचा साद्यंत इतिहास लिहून काकांनी वाढत्या श्रेणीची कामगिरी केली आहे यांत शंका नाहीं.

काकांचा पिंडच देशभक्तांचा १९०८/०९ सालीं ते राष्ट्रीय शिक्षणासाठीं स्थापन झालेल्या समर्थ विद्यालयांत दाखल झाले होते आणि १९१२ सालीं गुप्त क्रांतिकारकांच्या एका संघटनेचे नेते म्हणून त्यांना दीड वर्षांची शिक्षा झालेली होती. येवढे सांगितले म्हणजे पुरे. तेथपासून आतापर्यंत त्यानीं समाजसेवेचेच कार्य सतत केलेले आहे. मग ते कार्य गणेशोत्सवाचे असो किंवा ज्ञातीतील दुफळया मोडून ऐक्य साधण्याचें असो किंवा शेतकऱ्यांची दाद लावण्याचें असो किंवा स्वतःच्या घराण्याचा वा ज्ञातीच्या इतिहाससंशोधनाचे असो. त्या सर्वात त्यांची स्वाभिमानाची व लोकहिताचीच दृष्टी प्रगट होते.

अणजूरकरांचे हें घराणें अतिप्राचीन, यादवकालीन. यादवांबरोबरच इकडे येऊन पुढें पराक्रमानें 'महिमानराव राणे' या पदवीने विभूषित झालेले. त्या जुन्या काळीं ठाणे माहीम प्रांताचा या घराण्यानें राजा सारखा उपभोग घेतला. कालांतरानें जगरहाटीनुसार इतिहास बदलला, नवीं राजघराणी उदयास आली, आक्रमणें झालीं आणि इतर अनेक ऐतिहासिक घराण्यांप्रमाणें याहि घराण्याला विपन्नावस्था आली. फिरंगी राजवटींत या घराण्याची वतनेहि नष्ट झाली आणि धर्मछळाचा कहर झाला! घराण्याच्या प्राचीन पराक्रमाची किंवा अधिकाराची साक्षात अशी कांहीही नांवनिशाणी उरली नाहीं. अशारीतीनें सर्वच नष्ट झाले होते तथापि हें घराणें आपला उज्वल इतिहास मात्र विसरले नव्हतें. आणि यामुळेंच अभिमानाचा स्फुल्लिंग त्याच्या दरश्वासागणिक त्याच्या हृदयांत सतत जिवंत जागता राहिला. आणि अखेर या घराण्यानें

विशेष पुढाकार घेऊन फिरंग्यांची परकीय राजवट उलथून उध्वस्त करण्याचें कामीं पेशव्यांना मनःपूर्वक सहाय्य केले. बुब्राजी प्रभृति बंधूंनीं पांडवांसारखे पराक्रम केले व ह्यापैकीं एक मुरारजी हा तर वसईच्या शेवटच्या एलगारांत गारद झाला ! त्या मुरारजीचेच काका अणजूरकर हे साक्षात् वंशज हें लक्षांत ठेवल्या नंतर आपल्या घराण्याच्या इतिहासाची साधनें मिळविण्यासाठीं त्यांनीं किती महत्प्रयत्न केले असतील त्याची कल्पना होईल व या ग्रंथाची विविध प्रकरणें पाहणाराला तो प्रत्यय प्रत्यक्षच येईल.

घराणें इतके प्राचीन व पराक्रमी. परंतु काळाची सर्वभक्षक प्रवृत्ति आणि घराण्यातील वंशजांचे अज्ञान, अनास्था आणि भाऊबंदकी यामुळे घराण्यातील अस्सल ऐतिहासिक साधनांचे ढीग संपूर्ण नष्ट झाले ! १९०७ सालीं राजवाडे, अणजूरकरांच्या घरी ऐतिहासीक पत्रें मिळविण्यासाठीं तहानभूक विसरून, कसे गेले होते, परंतु त्यांना कागद दाखविण्याच्या कामीं इनामदारांनी कसा अडथळा आणला आणि अखेर ते दोन पोतीं कागद दर्यागर्क कसे झाले, याची खेदकारक हकीकत काकांनी दिली आहे. तसेच गंगाजी अणजूरकरांचीं रोजकीर्द (म्हणजे डायऱ्या) रामचंद्र सखाराम नाईक यांचेकडे होती तीहि पुढें नाहीशी होऊन अव्वल दर्जाच्या मोठ्या इतिहाससाधनास महाराष्ट्र मुकला ! सारांश अशा स्थितींत मिळेल तो माहितीचा कणकण जमा करून काकांनी आपल्या घराण्याच्या यावत् शक्य इतिहास पुन्हा साकार करण्याची अभिनंदनीय कामगिरी केली आहे.


हें इतिहास संशोधनाचे व संकलनाचे काम किती बिकट व किचकट असतें हें त्यांत प्रत्यक्ष काम करणाराखेरीज इतरांना समजणें फार कठीण ! चिंचेच्या पानांची पत्रावळ लाऊन दाखविण्याइतके तें दुर्घट आहे असे म्हटले असता पुरे. आणि म्हणूनच काकांना त्यांच्या ज्ञाती पुरते त्यांच्या ज्ञातीचे छोटे राजवाडे किंवा खरे म्हणायलाहि कांही हरकत नाही. मात्र तसे गौरवानें म्हणत असताहि त्याच वेळी संशोधनातील शुद्धता, बारकावा, अनुमानें किंवा सिद्धांत काढतांना घ्यावयाची दक्षता किंवा साधनांवरून सुसंगत इतिहास सांगतांना कालानुक्रम सांभाळण्या विषयी घ्यावयाची काळजी या बाबीं ग्रंथात क्वचित कोठे सांभाळाव्या तितक्या सांभाळल्या गेल्या नाहीत असे नमूद करणेहि योग्य होईल. ही प्रस्तावना आहे परीक्षण नव्हे म्हणून त्याचा विस्तार येथे करीत नाहीं. तथापि अशा काही उणीवा नमूद करण्यानेहि काकांच्या मुख्य कार्याला कमीपणा येईल असे बिल्कूलच नाहीं. मुळांत जाग्यावर काहीच नव्हते तेथे त्यांनी हा साधनाचा ढीग रचून उभा केलेला आहे. व यथामति त्याचे संशोधन करून त्यावरून आपल्या ज्ञातीचा व घराण्याचा इतिहासहि लिहून दाखविला आहे. अर्थात त्यांत उणीवा असतील तर त्या 'न्यून ते करावे सरते' या

नात्यानें ज्ञातीतील अभ्यासक विद्वानांनीं अधिक अभ्यास करुन दूर कराव्या. त्यांनी नवी नवी साधनें शोधून काकानीं लिहिलेल्या या इतिहासाचा विस्तार करावा व त्यास पूर्णता आणावी अशी या प्रस्तावनच्या निमित्तानें माझी पाठारे क्षत्रिय बांधवास प्रेमाची सुचना आहे. हा ग्रंथ विकत घेऊन घरांत ठेव्यासारखा जतन करावा, हे प्रत्येक पाठारे क्षत्रिय ज्ञाति बांधवाचे कर्तव्य आहे व तें त्यानें करण्यानेंच काकां विषयीची कृतज्ञता समाजानें दाखविली असें होईल.

पुष्करणी, पुणें ४,
दि. १५-८-६४

य. न. केळकर

वसईच्या समराची स्फूर्ति देवता



श्री सिद्धी विनायक, अणजूर



कुलस्वामीनी श्री हरबाईदेवी, मठ

भाग पहिला

अणजूरचे भौगोलिक वर्णन व इतिहास

भिवडी तालुक्याचे दक्षिण टोंकास अणजूर गांव आहे. अलीमघर हें भूशीर आहे हा अणजूर विभाग द्विपकल्पाप्रमाणें आहे. भारताचे दक्षिणेचे भूशीर ज्याप्रमाणांत दक्षिण महासागरांत गेले आहे त्याचप्रमाणांत हे भिवंडीचे भूशीर कल्याण खाडींत खुपसलेले आहे. भारताचे भूशीरास कन्याकुमारी म्हणतात, भिवंडीच्या भूशीरास अलिमघर म्हणतात. कन्याकुमारी भूशीराप्रमाणें ह्या अलिमघर भूशीराचे शेवटी टोकांत मोठमोठ्या दगडी आहेत. दोघांची दिशा दक्षिण आहे. अलिमघर हा पाडा आहे. ही उल्हास नदीची खाडी ठाण्याच्या पासातून बाहेर पडते, कळव्यास येते पुढे आल्यावर दोन पाण्याजवळ ह्या खाडीस वसईची खाडी मिळते ह्या मिलाफानंतर ही उल्हासखाडी बनते व तेथून कल्याणास जाते. अलीमघरापासून सात फर्लांगवर अणजूर गांव बसलेले आहे. सुरई गांवच्या किनाऱ्याजवळच्या दगडाला अणजूर गावची हद्द खाडीतून भिडते ह्या हद्दीच्या आंत खाडीचे किनाऱ्याजवळ पश्चिम दिशेस भरोडी गांव आहे. अलीमघर व भरोडी हे दोन्ही गांव अणजूरचे पाडे आहेत. अणजूरची ही सरहद्द सुरईच्या दगडा-पासून निघते ती पश्चिमेस 'माण' ह्या गुरचणीस मिळते माणच्या उत्तरेस वेहळे गावच्या हद्दीला भिडून अणजूरची सरहद्द नथनांगराहून माथेरवारी पोटांत घेऊन विरेखाडीस भिडते व तशीच खाडीत पासात बोरभाटीस मिळते अशारितीनें पश्चिमेस आलेली सरहद्द अणजूरखार दिवेखार व निसरीखाडीवरुन अलीमघरास मिळते तेथून भरोडीच्या बाजूनें ही सरहद्द सुरईच्या दगडाला भिडते. अणजूर खोऱ्याचे पूर्वेस, दक्षिणेस व पश्चिमेस

खाडीचे वेष्टण आहे उत्तरेस जमीन आहे. अणजूर खोऱ्यांत जाणाऱ्याना व खोऱ्यांतून बाहेर पडणाऱ्याना हा एकत्र खुष्कीचा मार्ग भिवंडी बाजूस आहे. ठाणें, भिवंडी, कल्याण ह्या गांवी अणजूरचे लोक ह्याच जमीनीचे रस्त्यानीं जातात येतात. मुंबई आग्रा रोडचा एक फाटा छत्रींआंबा उर्फ अणजूर फाटा ह्या ठिकाणापासून निघतो. हा रस्ता थेट अलीमघरपर्यंत जातो हा अणजूर रस्ता ठाणें बोर्डानें खडीचा तयार केला आहे. ह्या रस्त्यावर एस. टी. च्या बसेस येतात व जातात. गांवचें क्षेत्रफळ ४३५१८३६॥ एकर आहे. आजची लोकसंख्या साडेचार हजारापर्यंत आहे. गांवांत पांच खाड्याचे पांच नाले आहेत. ह्या ठिकाणीं खाड्या म्हणजे खाऱ्या जमीनी. पहिली दिवेखाडी, २ री अणजूर खाडी, ३ री निसरची, ४ थी गांवखाडी, ५ वी भरोडीची खाडी. ह्या खाड्या म्हणजे पांच खाऱ्या जमीनीचे समूह होत. ह्या खाड्यांचे आंत पाणी जाण्याचे पाच मार्ग आहेत त्या पांच नाल्यांना पोवळी म्हणतात. ह्या गांव-खाड्या व्यतिरिक्त एक सहावी दिवे गांवचे उत्तरेस सुमारे ११४॥ एकरांची खाडी आहे तिला माथेखार म्हणतात. या खाडीत इनामदारांची सामुदायीक जमीन एकत्र आहे. इनामदाराव्यतिरिक्त ह्या एकत्र जमीनीत इतर कोणी नाही बाकीच्या पांच खाड्यांत सर्वांच्या जमीनी आहेत अणजूरच्या परिसरांत सहा तळीं आहेत. शिवाय दगड काढल्या-मुळें एक टाके अुत्पन्न झाले आहे. ह्याशिवाय पुष्करणीसारखें बांधलेले एक तळें आहे. त्याचे नांव मूलगय आहे ही पुष्करणी फिरंग्यानी वाडा बांधला त्याबरोबर बांधलेली आहे. हें मुलगय तळें इनामदारांचे खासगत आहे. अणजूर सडकेचा एक फाटा भेटणाचे बांधा-वरून दिवे गांवास नेला आहे. हा फाटा लोकलबोर्डानें तयार केला आहे. दिवे गांवाला 'मुंडोरा' नावाची एक स्वतंत्र खारीजमीन आहे. तसेच खोपरे नांवाचा एक स्वतंत्र जमीन समूह दिवे येथे आहे. तसेच 'माण' नांवाची मोटी गुरचरण आहे अलीमघर गांवाचे दक्षिणेस खाडीत एक जूं उर्फ बेट आहे. पण गांवचे पश्चिमेस ह्या बेटाचा फाटा गेला आहे. त्या ठिकाणीं त्या टोकास एक बेट आहे. ह्या बेटासही जूंच म्हणतात त्याचे पश्चिमेस दुसरे एक जूं आहे त्याला मोटें जूं म्हणतात. ही तीनंही बेटे अणजूरच्या सरहद्दींतील आहेत.

गांवाची रचना : ह्या क्षेत्राचे मध्यभागीं थोड्याशा उंचवट्यावर अणजूर गांव वसलेला आहे. अणजूरचे उत्तर कोनांत अणजूरचा पाडा दिवें गांव आहे. अणजूरचे थेट दक्षिणेस आलीमघर पाडा आहे. अणजूरचे पूर्वेस भरोडी पाडा आहे. शिवाय अणजूरचे पूर्व कोनात कोळीपाडा आहे, ही वसाहत फक्त कोळी लोकांची आहे. नंतर ५०-६० वर्षांपूर्वी आदिवासी वारली अणजूरास येऊन राहिले आहेत. त्यांची वसाहत अणजूरच्या पूर्वेस गुरचरणींत ओढ. ह्या भागास वारलीपाडा म्हणतात. येथें फक्त वारलीच

राहतात. अणजूर गांवाला लागूनच गांवठणांत अस्पृश्य समाजाची वसाहत आहे ह्या ठिकाणी प्रथम पुढेच महार (हल्लीचे नवबुद्ध) राहतात व त्यांच्या पूर्वेस पुढें चांभार राहतात. हल्ली महारवाड्याला बुद्धवाडा म्हणतात.

अणजूर हा गांव नाईक घराण्यांतील इनामदाराना शराकती इनाम दिलेला होता. ह्या गांवास निरनिराळ्या आळ्या आहेत. अणजूरांत उत्तर बाजूने शिरतांच सडकेच्या पश्चिमेस भोईर आळी दिसते व पूर्वेस कोळी आळी आढळते. पाड्यावरचे कोळी व कोळी आळींतले कोळी भिन्न जातीय आहेत. कोळी आळीच्या दक्षिणेस ठाकूर आळी आहे ह्या आळींत प्रथमचे ठाकूर व नाईकाचे बरोबर आलेले ठाकूर यांची वस्ती होती. ह्या गावांत आतां फक्त एकच घर नवीन आलेल्या ठाकूरांचे आहे. हे उभयता ठाकूर ' पाठारे क्षत्रीय ' आहत ठाकूरांचे घरांचे पूर्वेस आपले पूर्वापारचे उपाध्याय आचार्य रहात असत. पुढें त्यांच्या जागीं त्याचे अखत्यारी गुमास्ते, पंडित राहूं लागले. हल्लीं गावांत कोणीही नाहीं. सडकेच्या पश्चिमेस खुद नाईकांची वस्ती होती. माडींत व बाहेर घरें बांधून त्या ठिकाणी पाचहीभावांचे वंशज राहत असत. हल्ली मूळमाडी व इतर स्थळीं एकूण आठघरे आहेत, ह्या ठिकाणाला खालची आळी म्हणतात. त्या आळीच्य शेवटच्याभागाला उतवळी म्हणतात. त्या दोनही ठिकाणीं मूळच्या नाईकांची वस्ती होती. आता सर्वत्र घरटाणे पडले आहेत ह्या आळीचे पूर्वेस १००/१२५ कदमावर आळी आहे ह्या ठिकाणी शामजीचे वशंज राहत असत. त्या आळींत सर्व घरठाणे झाले आहेत एकच कुटुंब एका घरात ह्या ठिकाणीं रहात आह खालची आळी व वरची आळी ह्यांच्या मधल्या भागांत कोतवाल रहात असत आज त्यांचे एकही कुटुंब नाहीं ह्या भागास कोतवाल आळी म्हणतात वरच्या आळीचे दक्षिणेस डाक्याची आळी आहे. येथें डाकी राहतात डाक्याचें आळींतून खाली उतरल्यावर म्हणेऱ्यांची आळी लागते व ती आळी उतवळीपर्यंत आली आहे. ह्या आळीत म्हणेरे राहतात म्हणेऱ्यांची आळीचे दक्षिणेस तरे रहातात ह्या ठिकाणास तऱ्यांची आळी म्हणतात ह्या ठिकाणी तरे राहतात. तऱ्यांचें आळीचे पश्चिमेस मढवी रहातात. त्या भागास मढव्याची आळी म्हणतात मढव्याचे आळीला लागून पश्चिमेस घरतांची आळी आहे ह्या ठिकाणी घरत राहतात घरत आळीचे समोर पाटील, पाटील आळीत राहतात. पाटील आळीचे दुसरे नांव कोंबडआळी असेही आहे ह्या ठिकाणी वेहेळेकर राहतात. शंकराचे देवळाचे जवळ दोन घरें नवीन बांधलेली आहेत. त्यास लोक देवळाचा पाडा म्हणतात. डाक्यांच आळीपासून जे वर्णन आहे त्यांत आग्री मंडळी रहात असतात.

राम विठोबाचे देवळांत रामाचे बाजूला लक्ष्मणची मूर्ती आहे. त्यांतली सीतामाईची मूर्ती स्थानभ्रष्ट झाली होती. श्री. चिंतामण मुकुंद नाईक यांनीं नवीन मूर्ती विकत आणून

त्या मूर्तीची प्रतिष्ठापना देवघरात मोठ्या समारंभानें केली. सविस्तर हकीकत देवस्थान ह्या सदरांत देण्याचा विचार आहे. विठोबाचे देवघरांत विठोबा राई रखुमाई याच्या मूर्ती आहेत त्यांतली विठोबाची मूर्ती ३ वर्षांपूर्वी स्थानभ्रष्ट झाली होती. विठोबाची मूर्ती श्री. वसंत दत्तात्रय नाईक यानीं विकत आणून तिची प्रतिष्ठापना त्याचवेळीं मोठ्या समारंभाने केली हेही सविस्तर वर्णन देवस्थानाचे सदरांत वाचावयास मिळेल. देवळाचे उघड्या चौसोपी आवारांत एक वृंदावन आहे. ती कोणाची समाधी आहे कीं काय याची माहिती आज उपलब्ध नाहीं ह्या देवळाला चार सोपे आहेत व मध्यभागी उघडे आवार आहे पश्चिमेचे सोप्यात तीन देवघरात (१) रामाची मूर्ती (२) हनुमानजींची मूर्ती (३) विठोबाची मूर्ती अशा मूर्ती आहेत बाहेर सोप्यात गणपतीची मूर्ती हनुमानाची खोली विठोबाची खोली ह्याच्या मधल्या भागी आहे बाहेर एक मुंजोबाचा पार आहे देवळा-बाहेर झाडाखालीं म्हसोबा आहे.

गांवाचे दक्षिणेस श्री शंकराचे देऊळ आहे. देवळासमोर दीपमाळ आहे. देवळांत शंकराची पिंडी, पार्वतीची मूर्ती आहे बाहेर कासव व नंदी आहे व त्याचे जवळच श्रीराम विठोबाचे देऊळ आह.

गांवाचे पूर्वेस अंजूबाईचे देऊळ आहे. अंजूबाई ह्या देवीचे नांवावरून अंणजूर हे गांवाच नांव पडले असावे, अंजूबाईचे उत्तरेस देवळांत शीतला देवीची मूर्ती आहे व पूर्वेस वेताळाची मूर्ती देवळांत आहे.

देवळाचे समोर लांबवर कानकाई देवीचा थापा आहे. देवळाचे बाहेर तसाच एक थापा आहे. देवळाचे उत्तरेस महारवाड्यानजिक झोटींगाची मूर्ती आहे व त्याच्या जवळच बहिरीभवानीचा थापा आहे. ही बहिरीभवानी मूळच्या ठाकुराची आहे. गावाचे वेशीवर महारवाड्याजवळ एक महाराचे देवाचा थापा आहे तिकडेही एक ब्राह्मण देवाचा थापा आहे असें कांहीं म्हणतात पण ब्राह्मण देवाचा खराखुरा थापा बांधगावर गांवाचे वेशीवर आहे.

हे रामाचे मंदीर फार पुरातन म्हणजे अगदीं जुनाट असावे असें वाटते देवळाची रचना पाहतांना बांधणीवरून खात्री पटते कीं अगदी प्रथमारंभी हे देऊळ नक्षीदार खांबावर सोप्या सुद्धां बांधलेले असावें. नंतर त्या देवळाला दुसरे भाग जोडून हे देऊळ चौसोपी रचनेचे केले आहे ह्या भागास नक्षीचे लाकूडकाम नाही म्हणजे रामाचा सोपा व प्रवेशद्वारांची जागा ह्या एकावेळीं बांधलेल्या व विठोबाचा सोपा व पुढील भाग नंतर बांधलेला स्पष्ट दिसतो.

अगजूरच्या माडीचे पहिले द्वार माडीचे पश्चिमेस होते तसेंच माडीची बांधणी व संरक्षण भिंतीची बांधणी अगदी फिरंग्यांचे इतर ठिकाणच्या गढीच्या बांधणीप्रमाणें आहेत तेव्हां ही माडी फिरंग्यांचीच आहे येथें फिरंग्याचा एक डिव्हीजन रहात असे ह्या ठिकाणी फिरंग्यांचे वास्तव्य कधी कधीं असे. अनेकदा हा भाग मराठ्यांचेकडे जाई त्यामुळें फिरंग्यांनी ह्या भागाची नासधूस फारशी केली नाहीं.

फिरंग्याची माडी व तळे : इनामदारांची ही माडी फिरंग्यांनीं इ.स. १५३० च्या सुमारास बांधलेली असावी. तटाची भींतही त्याचवेळीं बांधलेली आहे. 'मुलगय' तळे त्याचवेळीं बांधलेले आहे. ही सर्व ठिकाणें पका चुना दगड यांनी बांधलेली आहेत. मूळ माडीची लांबी अंदाजे ६५ व रुंदी ५५ फूट इतकी आहे. ही मूळची माडी आज सुस्थितींत आहे. तटाची भींत अनेक ठिकाणीं तुटलेली व फुटलेली आहे पण आहे त्या स्थितीवरून खात्री पटते कीं, ही माडी अथवा हा वाडा बांधला त्यावेळीं त्याच्या संरक्षणासाठीं हा तट बांधलेला होता. तसेंच ह्या फिरंग्यांच्या वाड्याचे आजुबाजूचे अंगास झरोके आहेत ते संरक्षणाच्या दृष्टीनें ठेवलेले आहेत. त्या झरोक्यांतून अगांतुक शत्रुवर बंदुकीचा मारा करितां येणे शक्य आहे. ह्या वाड्याच्या चारही बाजूच्या भिंती एकाच रुंदीच्या असुन त्या चुना दगडांनीं बांधलेल्या आहेत. आंतील मुख्य भींतीही चुना दगडांच्याच आहेत. ह्या भींतीशिवाय ईनामदारांनीं आपापसांत वांटणी झाल्या-नंतर आपणांस सोईस्कर अशा भींती घालून कांहीं वाढीव भाग केलेले होते व आहेत ह्या वाड्याचे मुख्य द्वार पश्चिमेस होते पूर्व बाजूला पक्की भींत असून त्याठिकाणीं एकही द्वार नव्हते. इनामदार अणजूरास राहण्यास आले त्यावेळीं त्यांनीं कांहीं निराळ्या रचना केल्या मूळच्या तटबंदीच्या भिंतीचे रचनेवरून दिसते की ह्या मूळ वाड्याच्या उत्तरेस एक लहानसा कां होईना स्वतंत्र वाडा असावा. बाबूराव भालचंद्र नाईक यांच्या बाजूनें एक तटबंदीची भिंत पश्चिमेस जाते त्यामुळें ह्या तटबंदीचे दोन भाग असावेत असें दिसते. ह्याठिकाणी दुसरा वाडा असावा असें स्पष्ट दिसत आहे. ह्यास पुरावा आहे कीं, बाबूराव नाईकांच्या घराचे समोर एक पडका जुना बांधीव खांबाचा दरवाज्याचा अवशेष आहे त्या दरवाज्याच्या अर्गळाच्या खुणा आजहि दिसतात. इसवी सन १५८० च्या सुमारास इनामदार अणजूरास राहण्याकरितां आले नंतर त्यांनीं प्रथमतः तीन दरवाजे व तीन खिडक्या वाड्याच्या पूर्वदिशेच्या भिंतीला पाडल्या व ह्या पूर्व भागास वाड्याच्या लांबीइतका व सुमारें १५ फुट रुंदीचा ओटा बांधला. त्यावर मांडी देऊन वाड्याइतकी उंची सांधली ह्या वांढवलेल्या भागाची रचना, लाकूड काम हिंदुवास्तु पद्धतीचे आहे फिरंगी पद्धतीचे नाहीं व चूनाविटांचेच आहे. निरीक्षण केले असतांना दिसतें कीं; हा भाग निराळा आहे. फिरंग्याच्या मूळच्या

गढीतला नव्हे शिवाय माडीच्या लांबीइतकी व सुमारें ३०-४० फुट रुंदीची विटा-चुन्यांची बांधलेली तटबंदी आहे. त्यास पुढचे अंगण आहे. त्या तटबंदीला जुन्या पद्धतीचा दरवाजा आहे त्याची रुंदी सुमारें १० फुट आहे सर्व बांधणी आपल्या पद्धतीची व चूना विटांची आहे इथें एक लक्षांत असू देणे कीं; फिरंग्यांच्या सर्व बांधकामांत चूना व दगड वापरण्यांत येत व लाकूड काम थोडे असे ह्या एकंदर रचने-वरून ह्या तटबंदीच्या आत दोन वाडे होते. हल्लीं आहे हा एक वाडा व दुसरा वाडा बाबूराव याच्या समोर असलेल्या दिंडी दरवाजाचेसमोर पश्चिमेस बाबूरावाचे जागेवर असावा. त्या दुसऱ्या तटबंदीचें आतच श्री. चिंतामण मुकुंद ह्याचे घर आहे. मूळ वाड्याचे अंगणाबाहर एक पटांगण आहे. ह्या पटांगणांत होळी पेटविली जाते. ह्या चौकाचे नांव मुरारजी चौक असे अणजूर गणेश मंडळानें सन १९२४ मध्यें ठेविलें. पूर्वी दिलेल्या ह्या नूतन तटबंदीच्या आंगणाला दक्षिणेस एक दरवाजा होता व उत्तरेस एक खिडकी होती. दुसऱ्या वाड्याच्या आणखी कांही खुणा नाहीत.

माडीचे विभाग : मोठ्या माडींत तीन भाग आहेत. दक्षिणेचा भाग बुवाजीच्या वंशजाकडे होता व आहे. मधला भाग शिवजीच्या वंशजाकडे 'होता व आहे. उत्तरेचा भाग गंगाजी नाईकाचे वंशजाकडे होता व आहे. ह्या भागातल्या कांहीं खोल्या विकल्यामुळें थोडासा पालट झाला आहे. पण मूळ तीनच विभाग खरे. मुरारजी नाईक व नारायण नाईक ह्यांची सोय, आज अस्तित्वांत नसलेल्या पण वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या वाड्यांत झालेली असावी. वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या तटबंदीच्या आंत आजहि नारयणजींच्या वंशाचे घर आहे. मुरारजींचे वंशजाची सोय ह्याच वाड्यांत झालेली होती ह्या गोष्टीला स्वतंत्र पुरावा नसला तरी मूळ ह्याच वाड्यांत ते रहात होते असें एकंदर स्थितीवरून मानावे लागते. नारायणजींचे आजचे घर व मूळ माडी ह्या मधल्या जागेंत मुरारजीचे वंशज मूळ राहिलेले असावे. आज त्या जागेत गंगाजीच्या वंशातलें बाबूराव नाईक ह्यांचे घर आहे. ह्या मूळ वाड्याचे दक्षिणेस बुवाजीच्या वंशजांनीं वाड्याला लागूनच दुसरा वाडा उभारला होता. आज त वढीव घर अस्तित्वांत नाहीं. ह्या घरांत बुवाजीचे वंशज राहत होते. बुवाजीच्या वंशांत प्रजा जास्त झाल्यामुळें त्यांना हा वाडा वाढवावा लागला मूळ वाड्याचे व ह्या वाढीव भागाचे वरील आढे एकच केले होते. ३०-३५ वर्षांपूर्वीं हा भाग उपेक्षेमुळें हळूहळू कोसळू लागला. शेवटीं साफ कोसळला ह्या भागांतले लोक मुंबईस रहात असत. मी स्वतः ह्या भागातल्या आमचे हिश्यात माझ्या मावशीकडे राहिलेलो आहे. तळाचा भाग गोविंद विनायक, मदन दादाजी, वामन रणछोड याचा होता. त्यातल्या पूर्वेच्या भागांत वामन रणछोड, पंढरीनाथ रणछोड ह्याची उत्तर-दक्षिण अशी १५ फुट रुंदीची खोली

होती, त्याला लागून पश्चिमेस पाऱ्यापर्यंत गोविंद विनायक व मदन दादाजी यांची ओसरी होती. वामन रणछोड यांच्या जागेवर शामराव वामन व शिवराम पंढरीनाथ यांनीं दोन खोल्यांचे घर बांधलें आहे. त्यावेळीं वसंतराव पुरुषोत्तम ह्यांच्या आग्रहानें त्यांच्या घराला त्यांची जागा अपुरी पडल्यामुळें १० फुट रुंदीचा पट्टा आम्हीं दिलेला आहे आतां त्या परस्यावर गोविंद विनायक व मदन दादाजी ह्यांची मालकी आहे ही हरबाजीचे वंशजाची सोय झाली मोठ्या माडीचे पश्चिमेच्या अंगास बुवाजीच्या दुसऱ्या वंशजानी म्हणजे तुकाराम बापाजी, येसोबा बापाजी यांनी मूळमाडीचे पश्चिमेस अंदाजे ३०/४० फुट लांबीच्या जागेंत वाढावा करून आपली राहण्याची सोय केली होती त्याची खूण म्हणून पश्चिमकडेच एक भींत आज उभी आहे. त्याचप्रमाणें तेवढ्याच लांबीची जागा वाढवून शिवजीच्या वंशजांनीं तशीच राहण्याची सोय केली होती तो वाढीव भागही पडत आला होता पण दिवाकर भाई नाईक ह्यांनीं त्याची दुरुस्ती करून त्यावर एक लहानशी खोली तयार केली आहे. तसेंच भगवान निळाजी ह्यांनींही मूळ माडीचे उत्तरेस एक मोठी खोली व त्यावर माडी तयार केली आहे. शिवजीचे वंशजानीं व बुवाजीचे वंशजानी वाढविल्या जागेचे मध्यभागी एक सोपा तयार केला आहे. त्या सोप्यांत एक दगडी फरशी पुरातनची आहे ही जागा फिरंग्याच्या बैठकीची होती. असें लोक म्हणतात फिरंग्याचे ह्या वाड्याचे मूळचे द्वार पश्चिमेसच होते. ह्या द्वारा पासून ५० फुटांचे अंतरावर मुलगय तळे आहे. ह्या तलावाची बांधणी पुष्करणीगत आहे हे तळे फिरंग्याचे स्त्रियांचे जलक्रीडा स्थान असावे ह्या माडीचे मागे एक विहीर आहे त्या विहीरीवर नावाची एक खोदलेली पाटी होती तीची अक्षरे वाचता येत नव्हती म्हणून बांधणाऱ्याचें नांव देतां येत नाहीं मात्र माडींत राहणाऱ्या गंगाजी बुवाजी व शिवजीचे वंशज ह्या विहीरीवर पाणी भरीत असत त्यांच्या वापराची ही विहीर आहे. चिंतामण मुकुंद ह्यांचे घराचे मागे एक विहीर आहे त्या विहीरीचा वापर गंगाजीचे पहिले शाखेचे वंशज व नारायणजी नाइकांचे वंशज करीत असत.

दळणवळणाचा मार्ग : अणजूरापासुन उत्तरेस भिवंडी ६॥ मैलावर आहे. अणजूरचे लोक दिवे अणजूर तरीनें दिवा स्टेशनवर जातात व तेथून रेल्वेनें ठाणें येथें किंवा कल्याण येथें जातात. भिवंडीस जाणारे लोक अणजूर भिवंडी ह्या सडकावरून जातात पिंपळास कोनावरून पायी गेले तर कल्याण ९ मैलावर आहे व कशेळीच्या पुलावरून ठाणें येथें गेल्यास ते अंतर ९-१० मैल भरते अणजूर पारशीक तरीनें ठाणें २-३ मैलावर आहे. खाडीपलिकडे पारशीक येथें उत्तर साष्टी तालुक्याची सरहद्द लागते व स्टेशन दिवे येथें कल्याण तालुक्याची सरहद्द लागते.

गांवाचा थोडासा इतिहास : अणजूर हा गांव फार पुरातन आहे. बिंब-राज्याचे आधीच्या काळीं हा गांव भरभराटलेला होता. बिंबानें हा गांव इ. स. ११६३ सालीं अंकुशदेव राणेला दिला, त्यावेळीं अणजूर गांव सुभा होता. ह्या गांवांतून व्यापार होत असे. ह्या पट्टींतले इतर गांवांचा संबंध अणजूर गांवा बरोबर होता. ह्या टापूंत हा गांव प्रमुख होता. देवाळे तळयाच्या उंचवट्यावर हा गांव होता अशी लोकवार्ता आहे. त्या ठिकाणीं संतीचा टेप आहे. येथें जतबॉव आहे. फिरंग्यांनीं ह्या ठिकाणीं वसाहत केली त्यानंतर हा गांव हल्लीच्या ठिकाणीं वसलेला दिसत आहे. फिरंग्यांचे वाड्याचे आसपास गांव त्यावेळीं रचला गेला असे दिसते. अणजूरचे अनुशासन म्हणून एक शिलालेख हेमाद्रि ग्रंथांत छापलेला आहे. देवगिरीच्या रामदेवाचें आयुरारोग्य व ऐश्वर्य यांची वृद्धि व्हावी म्हणून कोंकणच्या श्रीकृष्ण देवानें अणजूर गांव (खाजण, वराडि, पल्लितुधा) निरनिराळ्या शाखेच्या व गोत्राचे ४० ब्राह्मणांस शके १२१२ (सन १२९०) विरोधिनाम संवत्स वैशाख शुक्ल १५ या दिवशीं दान दिला. ह्यावरून म्हणतां येते कीं, त्या कालांत अणजूर हें एक नामांकित व भरभराटलेले गांव होते. ह्या अनुशासनावरून मान्य करावें लागतें कीं, १०००/१५०० वर्षांपूर्वींचें हे गांव आहे. पूर्वीं हा गांव कल्याण सुभ्यांत होता. फिरंग्यांनीं त्यांच्या ताब्यांतले गांवांचे, प्राथमिक गांवें सब्डिव्हिजन, डिव्हीजन असे विभाग केले होते. त्यावेळीं अणजूर गांव डिव्हीजन होता, त्यावेळीं अणजूरला डिव्हीजन किंवा सब्डिव्हीजन राहात असे.

अणजूरच्या वाड्याची स्थिती व बांधणी पहाता ही गोष्ट पटते. वाड्याची रचना, भोवताल्ची तटबंदी, मागचा तलाव पहातां सहज ध्यानांत येतेकी कोणातरी मोठ्या हुद्यावरच्या अंमलदाराकरितां ही सोय केलेली आहे. ह्या सर्व मुलखाचा कारभार ह्या ठिकाणाहून तो अधिकारी पहात होता. कल्याणखाडीवर, भिवंडीखाडीवर परशिक, भिंवडी, ठाणें, कांबे, वराळें, बिरवाडी इत्यादि किनाऱ्याचेलगत व इतर ठिकाणीं लहान लहान तटबंदीच्या जागा म्हणजे कोट्या फिरग्यांनी बांधलेल्या आजही पडक्यास्थितीत पहावयास मिळतात. पहारेकरी, शिपाई, नाकेदार इत्यादी लोक ह्या ठिकाणीं विभागून राहिलेले असत. त्यांच्यावर देखरेख करणे व मुलखाचा कारभार चालविणे ही कामे हे डिव्हीजन करित असत. त्या सर्व जागा उंच टेकड्यावर किंवा खाडीच्या व नदीच्या किनाऱ्यावर असत. घोडबंदर येथें असेच एकठिकाण गायमूखावर होते. बिंबराजा सन ११६३ मध्यें मुंबईमाहीमास येऊन त्याने आपले राज्य ह्या प्रान्तात स्थापिले, त्यावेळीं हैवतराव अंकुशदेव राणे यास राहण्यास, व उत्पन्नाकरितां वांद्रे व अणजूर ही दोन गांवें दिली हे साष्टीच्या पूर्वंधांवरुन सिद्ध होत आहे त्यावेळी हे राणे घराणें, वांद्रे रांजण पाखाडी येथे राहत असे व तेथून अणजूरची व्यवस्था पहात असे. फिरंग्यांच्या

आगमापर्यंत राणे वांद्र्याहून कुठेही गेले नाहीत. फिरंग्यांचा जुलूम फारच वाढला यामुळें इ. स. १५८० च्या सुमारास राणे उर्फ नाईक वांद्र्याच्या रांजण पाखाडीतून अणजूरास बायका मुलांसुद्धा आले ते आजपर्यंत अणजूरास राहत आहेत. सरकार कागदपत्रांत, पेशव्यांच्या कागदपत्रांत, इंग्रजांच्या लिखाणांत अशा सर्व ठिकाणी ह्या घराण्याचा उल्लेख 'अणजूरकर नाईक' असाच सांपडतो नाईक अणजूरास आल्या-नंतर त्यांचा वांद्र्याबरोबरचा संबंध पार सुटलेला दिसतो. पाखाडी म्हणजे लहान गांव वांद्र्याची रांजणपाखाडी म्हणजे रांजणपाडा होय.

ह्या नाईकांना इ. स. १७२० मध्यें अणजूर सोडून मुलाबाळासुद्धां कल्याणास सन १७४१ पर्यंत राहण्यास जावे लागले. एवढा काळ वगळला तर इ. स. ११६३ पासून ते १९६३ पर्यंत अणजूरकर वांद्रेरांजणपाखाडी व अणजूर इथेच ८०० वर्षे राहत आले आहेत. अणजूरकर कल्याण येथें गावाचे मध्यभागीं रहात असत. ही जागा शिवाजी चौकांत आहे. त्याप्रमाणें लोनाड हें गांव रामचंद्रपंतानी नाईकांना उपजीविके-करितां त्यावेळीं इनाम दिले होते. लोनाडाबरोबर इताडे गांवही इनाम दिलेला होता. कल्याणास जाण्याचे अगोदर निंबनाईक व गंगाजी नाईक अणजूराहूनच राजकारण खेळत होते रामचंद्रपंतांचे आग्रहावरून फिरंग्याच्यापासून दूर रहावे म्हणून गंगाजी सहकुटुंब अणजूर सोडून गेले. एकवीस वर्षें गंगाजी नाईक अणजूरांत नव्हते पण सर्व राजकारण अणजूर व कल्याण येथें शिजत होते. ज्यानी फिरंग्याच्या अंमलाचा शेवट केला त्या पांचहि नरवीरांचा जन्म अणजूरांतलाच होय त्यावेळीं ह्या गांवास राजकारणाचे दृष्टिनें मोठे महत्व प्राप्त झाले होते इंग्रज अंमलाचे वेळीं ठाणें जिल्ह्यातला पहिला सशस्त्र क्रांतिकारक अणजूर गांवानेच दिला आहे. एकंदर पहाता राजकारण खेळण्याचे बाळकडू नाईक घराण्याला पूर्वापारचे आहे. बिंबकालांत ह्या अणजूरकरानी मोठीच कामगिरी केली, फिरंग्याच्या वेळींही तशीच कामगिरी केली आहे. फिरंग्यांचे वेळीं अणजूर हा परगणा (Division or Sub-division) होता.

सोरटी सोमनाथ : साष्टीच्या पूर्वार्धाच्या अनुरोधानें अणजूरकर नाईकांचा मूळपुरुष हैबतराव अंकुशदेव हा ठरतो. हा हैबतराव अंकुशदेव बिंब राजाबरोबर साष्टी प्रांतांत आला. पूर्वार्ध म्हणतो कीं हा अंकुशदेव, राजाचे (बिंबराजाचे) बाळगेस होता. हा हैबतराव म्हणजे बाळाराव सोरटीचा मुलगा; हा बाळाराम सोरटीहून पळून आलेल्या मुरारराज राठोडचा मुलगा म्हणजे हे घराणे मूळचे सौराष्ट्रातल्या राठोड वंशीय राजाचे ठरते. राठोड हे अस्सल रजपूत आहेत. बाळगे म्हणजे मित्रपरिवार. तेव्हां बिंबाचा हा लहानपणीचा मित्र हैबतराव राणे मूळचा राजपुत्र होय. बिंबाचा मित्र

असलेल्या ह्या हैबतरावाचा मुलगा कृपाळदेव, ह्याची मुलगी सगुणाबाई बिंबाचा नातू एकदेवराणा ह्याला स्वयंवरांत दिली होती. ह्या घराण्यास महिमानराऊ ही पदवी होती कारण (**सोरट देश**) **महीमानपुरचे ते राव** होते. राव हे या राणे घराण्याचे बिरुद होते. हे घराणे सूर्यवंशी आहे. ह्या घराण्यास सोळोंखी म्हणतात. ह्या घराण्यास देशनाडगौडी ही वृत्ती पहिल्यापासूनची मिळालेली होती म्हणून सर्वत्र हा घराण्याचा उल्लेख देश किंवा देसला असा केलेला बखरींत व इतरत्र आढळतो. देशनाडगौडीवृत्ती म्हणजे राज्याच्या उत्पन्नाच्या प्रत्येक शंभर रुपयातला तीन रुपयांचा हिस्सा सरकारकडून घेणेचा हक्क ही होय. कांहींचें मतें महिमानराई ही सरदेशमुखी, सरपाटीलकी सारखी एक वृत्ती होती.

वंशपीठीका : बिंबाख्यानाच्या एक वंश ह्या प्रकरणांत खालील माहिती दिली आहे. बिंबराजाबरोबर हैबतराव राणे हा कोंकणांत दक्षिण प्रांती आला. मुरारराज हा सोरट देशाचा राजा असतांना त्याच्यावर अल्लाउद्दीन घोरीनें स्वारी करून त्याचे राज्य घेतले. मुरारराजा कनोजच्या सम्राटाधिपती रामराजाच्या आश्रयास गेला. कांहीं वर्षांनीं ह्याच अल्लाउद्दीन घोरीनें कनोजवर स्वारी करून रामराजाचा पराभव केला. मुरारराज आधींच मेला असल्यामुळें त्याचा मुलगा बाळाराव ह्यांनं मोठा पराक्रम केला, पण रामराजाचा पराभव झाला. रामराजा आपल्या तीन पुत्रासह बाळारामाला घेऊन पट्टणीं (अहिनल वाडा पाटण) येऊन राहिला. बाळारामाला चंपानेरचे राज्य दिले कांहीं वर्षांनंतर पुनः त्याच अल्लाउद्दीनाने त्या पट्टणीवर स्वारी केली. बाळाराम लढाईत पडला. बिंब राजा, हेमा पंडित, बाळारामाचा मुलगा हैबतराव ह्याना व सासष्ट सरदारांना घेऊन चांपानेर पाटणाहून निघाला. तो गुजराथ काबीज करून ठाणें माहीमास आला. ह्या हैबतरावास बिंबानें वांद्रे व अणजूर ही दोन गांवें इनाम दिली. तेव्हांपासून हे राणे घराणें वांद्याचे रांजण पाखाडींत राहूं लागले. पूर्वार्धांतही आहे कीं वरील दोन गांवें बिंबाने अंकुशदेव राणे याला दिली. बिंबाख्यानांतला हैबतराव तोच अंकुशदेव राणे होय पूर्वार्धांत अंकुशदेव याचें नांव हैबतराव अंकुशदेव राणे असे आहे पूर्वार्धांत असेही आहे कीं, बिंबाचा पिता त्रिधापूर पाटणी राज्य करीत होता माहीमच्या बखरीत व इतरत्र लिहिले आहे कीं, बिंब हा चांपानेरहून निघाला होता म्हणजे बिंबाचे गुजराथेतून निघण्याचें ठिकाण चांपानेर पाटण सर्वांचे मतें ठरते. अहिनलवाड्यास पराभव पावल्यानंतर रामराजाचे पुत्र चांपानेरला आले होते. त्याच चांपानेरच्या बाळारामाचा मुलगा हैबतराव होय. वरील विवेचनावरून सिद्ध होत आहे कीं हैबतराव व अंकुशदेव हीं एकाच पुरुषाचीं नांवें होत किंवा हैबतराव हें अंकुशदेव राणेचे बिरुदही असावे. ह्या बाबतींत पूर्वार्धाची व बिंबाख्यानाची पुर्ण एकवाक्यता आहे. अणजूरचे घराण्याचा मूळपुरुष मुरारराज

होय; मूळ ठिकाण सौराष्ट्र होय; उपनांव राणे असें ठरतें. सतीची चाल, महीमानराऊ हें बिरुद, सोळोंखी हें घराण्याचें पद राठोड वंश हेंच सिद्ध करीत आहे. कीं हा मुरारराज मूळचा राजस्थानांतला रजपूत संस्थानिक होय. अर्थात् त्याचा नातू हैबतराव अंकुशदेव हा रजपूत क्षत्रिय ठरत आहे.

वंशावळ :– बिंबाख्यानांतली ह्या घराण्याची वंशावळ येथें सुरू होते–

मूळ पुरुष : मुरारराज राठोड (सौराष्ट्र देश)
|
बाळाराव राणा
|
हैबतराव अंकुशदेव राणा (ठिकाण वांद्रेरांजण पाखाडी)
|
कृपाळ देश राणा — ह्याची मुलगी सगुणाबाई बिंबराजाचे महिनंदनु मुलास दिली होती.
(ही वंशावळ पूर्वार्धात हैबतराव अंकुश देव राणे ह्यापासून सुरु होते.)
|
महादेव देश
|
गणपत देश (नांव नाईक मिळाले. ठाण्यास रहाण्यास गेला.
|
गणपत देसाई (नांव नाईक चालू केले)
|
गणपत नाईक देशनारगौडे (महिमानराऊपद चालू केले)
|
हरनाईक — लढाईत पडला कमळाईसे राणी सती गेली
|
माधव देश — ह्यावेळीं नागरशाचे गोराईसे राणीनें अग्निप्रवेश केला
|
राम नाईक — ह्याच सुमारास पहिले तुर्काण झाले १३७०)
|
रणछोड नाईक
|
विठ्ठल नाईक
|
पांडुरंग नाईक देशनाडगौडे
|
मुकुंद नाईक
|
हरनाईक
|
पाल ऊर्फ बाळनाईक | भिवनाईक | पोंस ऊर्फ ताननाईक

हे तिघे भाऊ १५८० चे सुमारास वांद्रे फिरंग्यांनीं बाटविल्यामुळें तेथून अणजूरास आले. त्यापैकीं बाळनाईकाचीच वंशावळ उपलब्ध आहे. भिवनाईक व पोस ऊर्फ ताननाईक ह्या दोघांच्या वंशावळी साष्टीचे बखरींत नाहींत.

बाळ नाईक
|
लक्ष्मण नाईक
|
अर्जुन नाईक
|
निंब नाईक
|
१) शामजी (पहिल्या पत्नीचा (२) गंगाजी (३) बुबाजी (४) मुरारजी (५) शिवजी (६) नारायणजी (दुसरे पत्नीचे)

कुलवृत्तांत : अणजूरास पूर्वी कोतवाल राहत असत. त्यांची आळीही स्वतंत्र होती. त्यांच्यापैकीं हल्ली कोणी राहत नाहीत. त्यांचीं घरटाणीं आहेत. त्यांचे व इतर इनामदारांचे केव्हांतरी एक कुटुंब होते कारण हल्ली त्यांच्यात व नाईकांत एकमेकांचे सोयरसुतक तीन दिवसांपर्यंत पाळण्याचा प्रघात आहे. कोतवाल नाईक ह्यांचीं गोत्रे देवी एकच आहेत. अर्थात हे पूर्वीचे नाईकच. त्यांना केव्हांतरी कोतवाल हा हुद्दा मिळाला. व त्यावरून त्यांचे आडनांव कोतवाल झालें भिवनाईक व पोस ऊर्फ ताननाईक ह्यांच्या वंशवेली साष्टीच्या बखरीत व इतरत्रही आढळत नाहींत. अलिबाग तालुक्यांत किहीम येथें, आसपास, अणजूरच्या नाईकांचे वंशज राहतात. त्यांचे देवी गोत्र हेच आहे असें समजते. आपण अणजूरकर नाईक आहोंत असें मजजवळ एका किहीमचे नाईकानी मागें सांगितले होय. ते तेथें केव्हां, कसे व कां गेले हे त्यांना ठाऊक नव्हते. त्यांचें नांव आर. आर. नाईक हे होय. माझा तर्क व अनुमान आहे कीं, बाळ नाईकाचा वंश मूळ नाईक म्हणून अणजूरास राहिला. भिव नाईक व पोस नाईक यांच्यापैकीं कोणता तरी एक वंश कोतवाल म्हणून अणजूरास राहिला व दुसरा वंश अलिबाग तालुक्यांत गेला अर्थात ह्या तीनही भावांचे वंशज आज हयात आहेत. मात्र बखरींत बाळ नाईकांचीच वंशावळ दिलेली आहे.

अणजूरकर नाईकांची बिरुदावली ही आहे. " सोरट देशच्या महिमानपुरचे राव, सोळोंखी, सूर्यवंशी, देशनाडगौडे, ज्ञातपाठारे ' त्यांचे गोत्र वगैरे खाली देत आहे ' गोत्र वसिष्ठ देवी कुलस्वामिनी हरबाई, स्थान मढ (वेसावे) प्रवर, त्रिप्रवर पहिली

वसाहत वांद्रे राजणपाखाडी, नंतर, अणजुर. अणजूरकरांना दिलेल्या सनदेत पेशवे म्हणतात ' गंगाजी नाईक, बुबाजी नाईक, जनार्दनजी विन मुरारजी नाईक व सीवजी नाईक व नारायणजी नाईक विन निंबाजी नाईक महिमानराऊ, कुळी, सोळंखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबें वानरे तर्फ मरोळ परगणें साष्टी " " जमीदार साळोखे रायापैकीं राणे कुळचे कार्य संमधि गंगाजी नाईक व गणेशजी नाईक " त्यावरून दिसतें कीं, नाईकाचे मूळ आडनांव राणे असून त्याना शौर्याकरितां बहुमानसूचक अशी मिळालेली ' नाईक ' पदवी त्यांचे आडनांव ठरली सोळोंखी म्हणजे चौलुक्य असे दिसते महिमान पुरचे राव म्हणून महिमानराऊ हे राजऐश्वर्यदर्शक पद नाईकांना मिळाले पुरातन कालापासून देशनाडगौडीची वृत्ति त्यांचेकडे असल्यामुळें 'देश अथवा देशनाडगौडी' हा बहुमान त्यांना मिळाला. मद्रास देवी हरबाईचे देऊळ आहे. त्याच ठिकाणीं हरडाई देवी आहे. अंगीरस, वृद्धरस, भगीरथ हे तीन प्रवर नाईकांचे आहेत.

बिंबाचा वृत्तांत : बिंबाबरोबर आलेल्या सासष्ट कुळांत राणेंचे कूळ होते. राजा बिंबाची ज्ञात पाठारे. हा सविता वंशांतला भूपति. रामराजा त्याचा पूर्वज. त्यांचे मूळ ठिकाण सिंही ग्रामांतील अरिशय विभांड हे होय. ह्या वंशावळींतला वंशीक रामराजा कनोजला राज्य करित होता. हा सम्राट होता ह्याचे साम्राज्य सौराष्ट्र गुजराथपर्यंत पसरलेले होते. मूळ पुरुष रामराजा संवत ५७४ सन ५१८ त सिंही ग्रामांत राज्य करीत होता. त्याचे गोत्र भारद्वाज, देवी प्रभावती, त्रिप्रवर, शाखा कात्यायनी. उपनांव राणे सूर्यवंशी असें होते. बिंबाचा बाप रामराजा इ. स. ११२८ मध्यें कनोजला राज्य करीत होता. त्याचेकडे सौराष्ट्राचा मुरारराज पराभव पावून आला. रामदेवाचा पराभव कनोज येथें अल्लाउद्दीन घोरीनें केला. त्यावेळीं रामदेवराजा, त्याचे तीन पुत्र, मुरारचा मुलगा बाळाराम हे अनहिलवाडा पाटण येथें आले. त्यांच्या बरोबर अनेक राजे उपराजे आले होते. हेमा पंडितही आला. अल्लाउद्दीन घोरीने रामदेवावर पाटण येथें हल्ला करून त्याचा पराभव केला. त्यानंतर बिंब राजानें अहिनलवाडयाहून निघून पूरपट्टण सालेरमारेल, दाहिटे नंदनबार केशवपूर वडनगरपावेतो मुलूख काबीज केला. नंतर बिंब ६५ क्षत्रिय कुळे माध्यन्दिन यजुर्वेदी व इतर ब्राह्मण व इतर लोकांसह दमण घेऊनच ठाण्यास आला. तेथें अनुरोध सोरटीचा पराभव करून माहीम मुंबई येथे राज्याची मुहूर्तमेढ रोवली. ह्या रितीने कोंकणात इ. स. ११६३ त बिंबदेव स्थिरावला. त्या बिंबदेवाबरोबर अणजूरकर नाईकांचे पूर्वज आले.

पूर्वार्धात ह्या घराण्याचा उल्लेख सर्वत्र 'देश' किंवा देसला' ह्या पदानें करण्यांत आला आहे. बिंबदेवाने सर्व देशाचे १४ महाल केले. ह्या राजवटीच्या समयी बिंबाने अंकुशदेव राणेला वांद्रे व अणजुर हे दोन गांव इनाम दिले; त्यावेळी परगणे

साष्टी प्रांत व वसई ता. आटगांव परगणे सायेवान यांचा कारभारही दिला. ह्यापैकीं प्रांत वसई सुभ्यांत तपे मालाड यांत ५६ गांवे तपे मरोल यांत ५२ गांवे व आटगांव सायेवान सुभ्यात तपे अणजूर यांत २६ गांवे दिली. एकूण १३६ गांवांचा कारभार अंकुशदेव राणे यांना बिंबाने दिला.

ह्या चवदा परगण्यांत सजणीचा कारभार अंकुशदेव राणे व भास्करराव देसाई यांनीं वंशपरंपरेनें करावा असें बिंबानें ठरविलें. त्यासाठीं ह्या चौदा परगण्यांत अंकुशदेव नाडगौडी व भास्करराव देसाई यांनी राजभागप्रमाणें शंभर दामास पांच दाम यथा विभाग घ्यावा तसेंच ह्या परगण्यात भात दर मुडी दोन फरे दोघांनी विभागून घ्यावा. याचा अर्थ हा कीं राज्याच्या सर्व उत्पन्नाची जबाबदारी ह्या दोघांवर बिंबानें टाकली. राज्याचा कारभार दोघे करूं लागले. हीच व्यवस्था राज्याचे अंतापर्यंत चालू होती. लढाई, संकटें, न्याय अशा सर्व वेळीं 'देश व देसाई' यांचाच नामनिर्देश आढळतो. महिनंदनु राजाने चौदा परगण्यांचा सिधाव केला. त्यावेळीं 'देशावर व देसायावर' सर्व निरोधिले.

महिनंदनूचा पुत्र एकेदेवराणे यास कृपाळदेश नाडगौडी यांची कन्या सगुणाबाई लग्नांत दिली. एकेदेवाचे राज्यांत चांचे आले तेव्हा त्यावेळी लढाईत कृपाळदेश पडला. कृपाळदेशाचा महादेवदेश यांनी मढास हरबा देवीचे देवळास काम लाविले. जयदेवराणे माहीम सोडून ठाण्यास आले तेव्हा सर्वांबरोबर गणपतदेशही ठाण्यास आले. जयदेवाचा मुलगा सोमेश्वर राणा मेल्यानंतर जान नाईक प्रधानाने कमाईसे राणीबद्दल कुबुद्धी धरली. ती राणी देशास व देसायास शरण गेली. "बहुत विश्वास आपले देशाचा व सासष्टपैकीं सरदारांचा" गणपतदेश यांने दिधीपालीचे राऊतास व सर्व देशास बोलाविले. जान नाईक मारला गेला.

देवगिरीचे जसगदेवानें केशवदेव राण्यावर चाल केली. बदलापुरास झुंझ झाले. त्यांत गणपतदेश नाडगौडे पडला. म्हशा दुर्गांचे लढाईत व वेढ्यांत गणपतीराव देशनाडगौडे भारेसहीत घावितला. गड पडला. चांद्रेकरास नाईक नांव दिघले पुढें केशवदेव राणे यानें लघुयाग आरंभिला. ह्यावेळी सर्व कारभार गणपतीदेश, वीर म्हात्रे, व दिधीपालीचे राऊतास सांगितला होता. आलेल्या सर्व राजांचे स्वागत गणपतीने केले. माहोलीच्या युद्धानंतर इतरांबरोबर लढाईचे वेळीं केलेल्या कामगिरीबद्दल गणपती नाईक देशनाडगौडे यास महिमानराव नांव दिले.

पहिल्या हरनाईकानंतरचा वृत्तांत : महीमानराव गणपत देशयाचा पणजा महादेवदेश राणा यास संतान होत नव्हते. त्याचा कुळदेव श्री सिद्धीविनायक. त्याचें आराधन केले. पुत्र झाला. त्याचें नांव गणपती ठेविले. त्यापासून एकामागे एक गणपत नांवाचे पांच पुत्र वशांत वर्तले नंतरच्या गणपतेदेशाचा पुत्र हरनाईक देश झाला. हे नाडगौडे मूळचे राणे नांवाचे क्षत्रिय होत. ते सौराष्ट्राचे राजे व महिमानपुरगावचे 'राव' होते पुढें माहेमानराव हे त्याचें विरुदच ठरलें. हरनाईकाचे वेळीं केशवदेव मरून त्याच्या प्रधानाचा मुलगा नागरशा गादीवर आला. ह्या राजवटीच्या काळीं गुजराथेंत सुलतानांचा अंमल सुरू झाला होता. अल्लाउद्दीन खिलजी बादशहा राज्ये काबीज करीत दक्षिणेंत आला. हा काळ सन १२८८ ते १२९४ मधील होय. सुलतान बादशाहाचा वजीर निका मलीक यांचे बरोबर प्रतापपुरी युद्ध झाले. हरनाईकदेश पडला. शिवचे बंदर, माहिम घेतले गेलें. त्या युद्धांत नागरशहाचा पुत्र त्रिपूरकर पडला. भायखळ्याच्या युद्धांत नागरशा पडला. तुर्काण झाले. राजपत्नी गोराईसे राणी व हरनाईक देश याची पत्नी कमळाइसे व पुत्र माधवरावदेश मालाडास आले. ह्या दोन सतीना घेऊन माधवदेश भौमावर गेले. अग्निकुंडे सिद्ध केली, दोघींही सती गेल्या.

दुसरा हरनाईक : मुकुंदचा पुत्र हरनाईक यांनीं गणपतच्या घरी जाऊन वृद्धापकाळामुळें गणपतीस देशलीक दिली. स्वतः देशलीचा टिळा हरनाईकांनीं त्याचे कपाळीं लाविला पण शिरादमलीकाकडे कुंडपुरोनें फिर्याद दिली ती फिर्याद ठाण्यास काझी-कडे आली. वंशावळ पाहतां कुंडपुरो हरनाईकाचा भाऊबंद न ठरल्यामुळें गणपतीच देश राहिला.

हरनाईक याचे आम्ही भाऊबंद आहोत अशी दुसरी फिर्याद गोपाळ नाईक व हरनाईक यांनीं आगा मुन्हाकडे दिली. वांद्रेकरांची वंशावळ उचारली ती वांद्र्यास गेली. नंतर गोपाळ नाईकांची वंशावळ उच्चारली ती वेसावे येथें गेली. गोपाळ नाईक हरनाईकांचे भाऊबंद ठरले नाहीत. हरनाईक सोळोंखीपैकीं व गोपाळ नाईक माहीमकर म्हातान्यापैकीं ठरले.

फिरंगी राजवट : फिरंगी राजवटीनें सुलतान बादशहास समुद्रांत बुडविले. त्यानंतर त्यांचा अंमल ह्या प्रान्तावर चालू राहिला. प्रथमतः सर्व ठीक होते. पुढें फिरंग्यांनी ह्या प्रान्तातले वतनदारास व वृत्तिवाल्यास फिरंग्यांचे नोकर होण्यास सांगितले. ते लोकांनीं, वतनदारांनी सर्वांनीं नाकारले "फिरंग्यानें कुडाभाव धरिलाः. देशासी व देसायासी कधिला लाविला" मग बाल नाईक देश व पाल ठाकूर देसाई भांडले.

खटला मोठा झाला मग फिरंग्यानें जमाव केला. प्रथम वांद्रे धरले नाडगौडीयाचे घर धरले, वेढिले. सतराशे माणूस लहान मोठी मिळोन. त्यांत तिघे भाऊ बाळनाईक भिवनाईक व पोसनाईक आपले हत्यारे धरून निघाले. वांद्रयाहून कळव्यास आले कळव्याहून अणजूरास आले. गांवीं येकथडी येऊन लपून राहिले. येकथडीच्या मुलखांस उपद्रव नव्हता.

फिरंग्यांनी केलेला छळ : वडील भाऊ बाळनाईक याची वंशवृद्धि वाढली. बाळ नाईकाचा पुत्र लक्ष्मण नाईक, लक्ष्मणचा पुत्र अर्जुन, अर्जुनचा पुत्र निंबनाईक. बाळनाईक १५८०· च्या सुमारास अणजूरास आला. निंबनाईकापर्यंत कांहीं विशेष घडल्याची नोंद नाहीं. मात्र साष्टींत फिरंग्यांनी छळाचा कहर केला होता. सरांस बाटवाबाटवी चालू होती. त्याचा वृत्तांत साष्टीचे बखरींत दिला आहे. त्यांतला कांहीं भाग पुढें देत आहे. "गांवचा गांव धरून बाटविला. किरिस्ताव केले. सासष्टगांव व आगरवसईचे बहुतेक लोक धरून बाट-विले. बाप मेला म्हणेज घरांत प्रेत असता त्याची पोरें जी असतील ती नेऊन बाटवावी. ऐसा उपद्रव महाराष्ट्राशीं मांडिला. मग लोक कष्टि जाहले. पलोन कोण्ही कोण्ही दक्षिण प्रान्ती जाऊन राहिले. क्रियाकर्में लोप जाहला. देवधर्म बुडाला. प्रांताचीं तीर्थक्षेत्रें लोपली. देव देवालयें फोडतोड केली. आपले देवळे फिरंगी यानीं बांधिली. फिरंगी धर्म चालवावयास लागले. मुलकात ब्राह्मण फिरता कामा नये. कोण्ही गृहस्थानें कांहीं कार्य होम उद्यापनें आरंभिली म्हणजे गृहस्थाचे घर अवघें धरावे शेजारी पाजारी त्या गृहांत सांपडले त्यासहि धरून न्यावें बंदी कष्टी करावें बंदीखानीयांत कुजवावें असा अनर्थ माडिला. त्या मुलकाचे ब्राह्मण षेदे होऊन फिरावयास लागले. महाराष्ट्रधर्माचे कर्म अवघेच राहिलें. मुल्कांत कोणीयेक गांवावर शेंदुराचा दगड धोंडा, सुपारीएवढा सांपडला म्हणजे तो गांव धरून नेऊन बाटवावा. हर कोणी दुस्मनगिरीनें च्यार साहीदी उभे करावें. दुसमान पाद्रयाजवळ जाऊन येखाद्यानें बालं(ट) घयावे आणि ते शाहीदी नेऊन शाहीदी देवावी. म्हणजे त्या गृहस्थाचे घर नेऊन बाटवावे. न्याय अन्याय पाहावयाचा दर्कार नाहीं. त्यामध्यें पाठारे ज्ञातीचे मराठा लोक त्यांची पाठ हात धुवून घेतली. या ज्ञातीचे लोक बहुत बाटविले. वरकड शेणवी व प्रभू आणि वाणी उदमी यांस उपद्रव थोडा. पाठारे ज्ञातीला फार केला तो श्री देवास न सोसे" वरील जुलमाला कंटाळून वर लिहिल्याप्रमाणें वांद्याहून बाळनाईक, भिवनाईक, पोस उर्फ तान नाईक अणजूरास आले.

इ. स. १५८० ते १६८० पर्यंत विशेष कांहीं घडले नाहीं. मात्र फिरंग्यांच्या जुल्माची तीव्रता सिमेबाहेर वाढली होती. ह्या परिस्थितीतून सुटण्याकरिता नाईक-

बंधूनी देशत्याग केला होता. ह्या कहराला मोठी मदत कोंडो रामजी प्रभू ह्यांनी फिरंग्यास पुरविली तोच सर्व फितवा करी. बिंबापासून देस व देसाई हीच दोन घराणी सर्व बाबतीत आघाडीला असत हें दिसून येते. म्हणून वर लिहिल्याप्रमाणें 'देश' घराण्यानें देशत्याग केला. हेतु हा कीं फिरंग्याच्या राज्याचे सीमापार राहून आपणास जनतेकरितां जें करिता येईल ते करावे हे कुटुंब फार मोठें होते. त्यामुळे निघून आल्यानंतर राहिलेल्या सर्व जणांना फिरंग्यांनी बाटविले. त्या एका दिवशी वांद्रे येथे ४००० चार हजार लोक बाटविले गेले. ह्याप्रमाणे सन १६८० पर्यंत १०० वर्षांचा काळ कांहीं प्रतिकार न होता गेला.

निंबाजी नाईकांचे प्रयत्न : इ. स. १६८० च्या आंत बाहेर निंबनाईकांनी ह्या संकटाचा विचार केला. त्यांनी फिरंग्यांना घालविण्याचा निश्चय केला. निंबराजाने प्रल्हाद जोशी नावाचा इसम छत्रपति संभाजी महाराजांकडे पाठविला. राजे संभाजी यांनी इ. स. १६८३ मध्ये अणजूरास ५०० सैनिक पाठविले. त्यांनीं परशिकच्या गढीवरून उतरून अणजूरच्या रोखाने येणाऱ्या फिरंगी सैनिकावर हल्ला करून त्यापैकीं १९ जणांना मारून बाकीच्यास पळविले. (वेंद्रे यानी लिहिलेले संभाजीचे चरित्र पहा) पण पुढें संभाजी महाराजाकडून जास्त कांहीं झाल्याची नोंद नाहीं. गोवा, अवरंगजेब, सिद्धी ह्यांच्याकडील घालमेलीना संभाजीला तोंड देताना फारच कष्ट झाले. त्याला परत अणजूर, साष्टीकडे वळता आले नाहीं. त्यामुळें निंबाजीच्या पैगामास यश आलें नाहीं एखादी मोठी राजसत्ता पाठीशी असल्याशिवाय फिरंग्यांचे बरोबर मुकाबला करितां येणार नाहीं हें निंबाजीनें अचूक हेरलें होते व त्याप्रमाणें त्यांचे यत्न चालू होते.

गंगाजीचे राजकारण : निंबनाईकाचे प्रयत्नांना यश आलें नाहीं पण त्याच्या पांच सुपुत्रांनीं तें यश गंगाजीच्या नेतृत्वाखालीं मिळविलें. इ. स. १७१८ मध्यें निंबनाईक कालवश झाले. त्याच वर्षी गंगाजी नाईक मोरगावास गेले. त्याच सालात गंगाजीने आपले चार भाऊ जमवून त्यांना हा प्रान्त फिरंग्यापासुन सोडविण्याची योजना समजावून दिली. निंबाजी नाईकांनीं संभाजी छत्रपतीच्या करवी हें फिरंगाण सोडविण्याचा प्रयत्न केला होता. आज शाहू महाराजांचे राज्य आहे तेव्हां 'आपण हें कर्म आचरूं आपले पूर्वजीं पराक्रम उत्तम संपादिला. आपण त्यांचे वंशी जन्म घेतला आहे. जर साधले तर पुण्य पुरुषार्थ अर्थ आणि कीर्त न साधे तर येकला मृत सत्यभृत. तो सर्वांस आहे. परंतु कीर्ती विरळा वाट्यास आली. ह्या निश्चयानें गंगाजीनें आपल्या भावांना कार्यप्रवृत्त केले. त्यावेळीं चार भावांनीं उच्चार केला कीं 'उत्तम देहास यावे तर कांहीं किर्त्ती राहे ही गोष्ट करावी. नरदेही येऊन व्यर्थ मरू नये' श्रीमत् भगवद्गीतेत म्हटले आहे. "हतो

वा प्राप्स्यसि स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम् " पाचाजणांनी हें व्रत घेतले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु तेथें भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ' ह्या समर्थोक्तीला अनुसरून देवाचा आशीर्वाद असावा ह्या हेतूने कुलस्वामी श्री सिद्धिविनायकाचे दर्शनाकरितां मोरेश्वरास (मोरगाव) जाण्यास ह्याच साली गंगाजी निघाले. देहाचा संकल्प करून गंगाजी पायीच देवास निघाले. एक जुना शेला, एक जुनें धोतर व जुने मुंडासे आणि अर्धा रुपया घेऊन निघाले. वाटेत दमाजी थोराताचे बेरडानीं त्यांना लुटले. पुढे एका महारानें रस्ता दाखविला. मोरगांवास गेले. देवाचे द्वारी अनुष्ठानास बसले. वाटेत ७ सात दिवस व ठिकाणीं १४ चौदा दिवस एकूण २१ दिवस निराहार वृत्तीनें अनुष्ठान केले. स्वप्नांत देवानें दर्शन दिले. देवाचे आज्ञेने गंगाजी नाईक चिंचवडास गेले. चिंतामणी देवाने त्याना अनुग्रह दिला. मोरया गोसावी यांचे लहानपणीच्या वेळच्या रोजच्या पूजेतला देव दिला. वस्त्रें दिली. एक तरवार दिली. गंगाजी घरीं आल्यावर पांचही भावांनी विचार करून संघटनेस सुरवात केली. १) नामाजी देसाई मालाडकर मेहुणे २) मायाजी राऊत कळवेकर मामा ३) नारायणजी सुतार वसईकर जांवई ४) लाडकोजी हैबतराव भाईंदरकर व्याही ५) बेंडजी देसाई मालाडकर मेहुणे हे प्रथमतः ह्या संघटनेस मिळाले ह्या सर्वांचे युद्धमंडळ बनविले गेले. इ. स. १७१८ पासून संघटनेचे कार्यास आरंभ झाला.

घरची मंडळी : निंबनाईकास दोन बायका होत्या. पहिलीचा शामजी नांवाचा एकच मुलगा होता. दुसऱ्या बायकोपासून निंबाजीस पांच पुत्रांची प्राप्ति झाली. दीपावती नांवाची एक कन्या झाली होती. पहिला गंगाजी, दुसरा बुवाजी किंवा बुबाजी, तिसरा मुरारजी, चवथा शिवजी, पांचवा नारायणजी हे पांच मुलगे होते. ह्याचे आईचे नांव देवकी असावे. गंगाजी नाईकानीं आंभो-भूज गांवीं कल्याण तालुक्यांत सन १७४१/४२ मध्यें एक चिरेबंदी तळें बांधले. त्याचें नांव देकाळे ठेवले होते. त्यावरून गंगाजीच्या आईचें नांव देवकी असावें असें माझें अनुमान आहे. शामजी नाईक हा प्रथमपासून विभक्त होता. त्यानें राजकारणांत भाग घेतल्याची नोंद आढळत नाहीं. कृष्णाजी नाईक अणजूरकर ह्यांला रामाजी महादेवाबरोवर मालाडास ठेवलें होते. मदनाजी अणजूरकर ह्याला श्रीवर्धनगडाचा गडकरी नेमला होता. तिसरा भिकाजी नाईक यास गंगाजीबरोबर नेमले होते. हे तिघेही शामजीचे चिरंजीव होत. एका जुन्या वंशावळीत शामजीचे दोन पुत्र दाखविले आहेत तें चूक आहे.

ठाकूर व कोतवाल : अणजूरास नाईकांनीं स्थलांतर केले त्यावेळीं त्याचे बरोबर ठाकुराचे एक घराणे अणजूरास आले. हे ठाकूर अणजूरकराचे संबंधी होते रजपूत राजांबरोबर ठाकूर त्यांचे शरीरसंरक्षणाकरिता असत. त्याप्रमाणें हे ठाकूर अणजूर

करांचे बरोबर असावेत असें दिसते. ह्या ठाकुरापैकीं अणजूरास हल्ली एक कुटुंब आहे. ह्या ठाकुराव्यतिरिक्त मूळचे अणजूरास राहणारे ठाकूर ह्याच आळींत रहात होते. त्यांच्यापैकीं एकही कुटुंब आज अणजूरास नाहीं. ह्या ठाकुराचा व त्या ठाकुराचा कोणताही इतर संबंध नाही. याचप्रमाणे कोतवालही अणजूरकराचे बरोबर इथे आले आहेत. मागें सांगितल्या प्रमाणे हे कोतवाल मूळचे नायकाच्या कोणत्यातरी शाखेंतले असावेत. नाईक हे मूळचे रजपूत होते. रजपूतांचे प्रथेप्रमाणे हे ठाकूर त्यांच्या जवळ रहात असावेत व म्हणून अणजूरकराबरोबर ते इकडे आले असावेत ह्या एका कुटुंबाशिवाय ठाकुराचे व कोतवालाचे कोणीही अणजूरास नाहींत.

उपाध्याय :

आचार्य : अणजूरकराचे मूळचे उपाध्याय आचार्य होत. हे आचार्य बिंबकाला पासून नाईकाचे उपाध्याय होते म्हणून हे अणजूरकर नाईकाचे बरोबर अणजूरास आले. ठाकूर आळीचे पूर्वेस हे राहात असत. अन्यव्यवसायाकरितां आचार्य अणजूर सोडून भिवंडीस गेले त्यावेळी त्यानी पंडित यांना अणजूरकराचे उपाध्यायाचे ठिकाणी गुमास्ता नेमले. हे पंडित, आचार्यांच्या जागेत राहू लागले. हल्ली तेथे घरटाणे आहेत तीनही पंडीतापैकीं एकही कुटुंब अणजूरास आज नाहीं. आचार्य हे माध्यंदिन यजुर्वेदीय ब्राह्मण होत. बिंबराजाबरोबर पुष्कळसे यजुर्वेदीय ब्राह्मण आले. आचार्यांनी कै. रावजी पंडित यांना गुमास्ते नेमले. ह्या पंडिताच्या तीन शाखा त्यावेळीं इथें आल्या. एक रावजी पंडित दुसरे भास्कर पंडित व तिसरे गंगाधर पंडित. हे नाईकाची उपाध्यायगिरी करीत. इनामदारांची सर्व कामे ह्यानाच करावी लागत. इकडील गावकरांचे मूळचे उपाध्याय बाळकृष्ण भटजीचे पूर्वज होते. ह्यांचे नांव मोगरे होते. बाळकृष्ण भटजीना पुढे पुढे वृद्धापकाळामुळें गांवे सांभाळली जात नव्हती त्यावेळी स्वतःकरिता आठ गांवे ठेवून त्यांनीं बाकीची २४ गांवे तीन पंडिताना तिजाईने दिली. भास्कर भटजी हा ह्या बाळकृष्ण भटजीचा जावई होय. तोही आठ गांवें चालवीत असे. पुढे त्याची मुलगी वारु जगन्नाथ पंडिताच्या अनंताला दिल्यामुळे ती गांवे अनंत पंडीत चालवू लागला. बाळकृष्ण भटजीचे मुलीचे नांव सखु व तिच्या मुलीचे नांव वारुबाई. आचार्यांनी पंडिताना अणजूरकराचे गुमास्ते नेमले होते. पण अनेक मोठ्या कार्याकरिता आचार्य अणजूरास येत व आपला अर्धा हिस्सा पंडितापासून नेत असत. पुढे आचार्यांनी येण्याचे वर्ज केले. आचार्यांचा मूळचा दुसरा दुय्यम धंदा वैद्यकीचा होता. त्या घराण्यांत पेशव्याकडून संगमरवरी दगडाचा खलबत्ता बक्षीस मिळालेला आहे. हल्ली वारुचा मुलगा रामकृष्ण एकटाच गावांत आहे व वरील २४ गावातल्या काहीं गावांत वृत्ति चालवितो.

जाधव : जाधव हे शिंधखेडचे राहणारे. मुंगीपैठण वगैरे जागी ह्यांची फार मोठी वस्ती आहे. दुष्काळाचे आपत्तीमुळे हे घराणे अणजूरास आले व हरबाजी नाईकाजवळ त्यांचे शिपाई म्हणून राहिले हे जातीने मराठे होत. अणजूर येथें ह्यांचा पूर्वज नागोजी हा आला. ह्या कुटुंबाचे इसम नाईकांचे शिपाई म्हणवून घेण्यांत मोठा आनंद मानीत असत. अनाजी जाधव हा माझ्या वडिलाचा शिपाई असे स्वतःस म्हणवीत असे. अनाजीना माझे वडील गोविंद विनायक ह्यांनीं मानाची खूण म्हणुन दिलेले शेत आजही कुंडलीग लावीत आहे. ठाकूर आळीचे दक्षिणेस त्याचे घर आहे. त्यांतच ते राहात आहेत. रामाचे उत्सवाचे वेळी व पालखीच्या वेळीं शिपायाचा पोषाक करुन आता आतापर्यंत मुकुंद फिरत असे नवमीचे कीर्तनातही शिपाई म्हणून उभा राही

सोनार : अणजूर येथें एका दैवज्ञ ब्राह्मणाचे (सोनाराचे) कुटुंब वरच्या आळीत स्वतःचे घरात राहत असे. रामशेट हे प्रथमतः अणजूरास आले, ह्यांचा धंदा सोनाराचा होता. ह्यांचे स्वतःचे आडनांव त्यांना माहीत नाही. ते स्वतःला अणजूरकर म्हणवतात. हल्ली त्याची वस्ती ठाणें जांभळी नाका येथे आहे. त्यांची इस्टेट अणजूर येथे आहे. गणपत शेठ यांनी ठाण्यास घर बांधले. राम जांभळी नाक्यावर राहतो.

प्रधान : ह्याशिवाय वरच्या आळीत प्रधान राहत असत. ते अणजूरकराचे आश्रित होते. त्यांना अणजूरकराचे इनामांतून काही रक्कम मिळत असे पांडुरंग यानी ठाणें येथें घर बांधले आहे. ह्या प्रधानाचे काम म्हणजे कीर्तन पुराणाचें वेळीं बुक्का लावणें हे असे. कीर्तनपुराणाची वर्दीही तेच इनामदार व त्यांच्या आसेष्टान देत. तसेंच इनामदारांच्या मुलीलेकीना तें आणीत पोहोंचवीत असत. त्यांना इनामदारांनीं काहीं जमीन भोगवट्यास दिलेली होती. शिवाय त्याना पोट इनामदार म्हणून कांहीं नक्त रक्कम तक्त्यांत खर्ची टाकून दिली जाई. त्यांना आज मुलगा वारस नाहीं. शेवटच्या प्रधानांची मुलगी मालती राजाराम ठाणे येथे चरईत स्वतःच्या घरात राहते.

बलुतेदार नाव्ही : अणजूर येथे एक नाव्ह्याचे घर आहे. तो इनामदारांचा आश्रितच होय. या कुटुंबाला इनामदारानीं सुमार दोन एकर जमीन बक्षीस दिली होती. शिवाय त्याला इनामदाराच्या इनाम तक्त्यातून नगदी रक्कम पोट इनामदार म्हणून मिळत असे. मूळ रक्कम १३-९-० ही होती. शिवाय तो गावचा बलुतेदार म्हणून गावच्या लोकांची हजामत करी. त्याला त्याबाबत मोठ्या माणसाचे हजामतीबद्दल वर्षास ८ अधोली भात मिळे व लहान मुलांचेबद्दल त्याला ४ अधोली भात मिळे. अणजूर व त्याचे ४ पाडे या ठिकाणचा हा बलुतेदार होय. इनामदाराच्या हजामती किंवा त्यांच्या नोकरांच्या व पाहुण्यांच्या हजामती त्याला घरोघर जाऊन वरील मोबदल्यांत कराव्या लागत.

अणजूर येथें नरक चतुर्दशीचे दिवशीं पहाटेस तो बुवाजीच्या मोठ्या शाखेतल्या इसमाचे घरी जाई व प्रमुख माणसास तेल उटणे लावून नंतर तो गंगाजीचे वंशजाकडे जाई. त्यानंतर तो इतर सर्व इनामदारांचेकडे जई. ह्या सर्व ठिकाणी तो तेल उटणे लावी. त्याचप्रमाणे बळीपाडव्याचे दिवशी तो असाच पहाटे आरसा घेऊन जाई व त्यांना आरसा दाखवी त्याबद्दल त्याला रोख बिदागी मिळे. माझी कल्पना आहे कीं हें घराणे आपल्या पूर्वजांचे बरोबर आले असावे. मात्र ह्या घराण्याचा वंशवेल अगदी त्रोटक मिळाला आहे. हल्ली गणपत व त्याचा मुलगा नारायण आहे. आडनांव खेडाकळे होय.

पंडीतांची वंशावळ व वरील आश्रितांचे वंशवेल त्रोटक सांपडल आहेत.

वंशावळ पंडीतांची
मूळपुरुष
केशव व अनंत
केशव – बापु – गंगाधर – जगन्नाथ – अनंत
अनंत – बाबाजी, रावजी
बाबाजी – दिनकर – मधुसुदन – विठ्ठल
रावजी – नारायण – गजानन – मनोहर, अनंत
मनोहर – नरेंद्र
अनंत – प्रदीप
बालकृष्ण रामकृष्ण वामन मोहन

वंशावळ जाधवांची
मूळपुरुष
नागोजी – हिरोजी – अनाजी
अनाजी – मुकुंद, मस्त्या, लक्ष्मण
मुकुंद – कुंडलीक, गणपत, पुरुषोत्तम, नारायण
गणपत – सुभाष, मनोहर
पुरुषोत्तम – हेमंत

वंशावळ सोनाराची
मूळपुरुष
रामशेट – गणपतशेट – बाबू शेट – रामशेट – मदन

वंशावळ नाव्ह्याची
मूळपुरुष
नथू – कोंड्या, शंकर
शंकर – गणपत – नारायण

वंशावळ कोतवालाची
मूळपुरुष
१) हरीश्चंद्र – गणपत – ३) अनंतराव – यशवंत
२) आत्माराम – जयराम – ४) काशिनाथ – मोरेश्वर

बरोबर आलेल्या ठाकूरांची वंशावळ
मूळपुरुष
रघुनाथ व आबाजी
रघुनाथ – नारायण – शिवराम – पद्माकर
आबाजी – गंगाधर, बाबाजी
गंगाधर – नारायण, गजानन
बाबाजी – जगन्नाथ, भगवान, सुरेश

ठाकूर मूळचे वंशावळ
मूळपुरुष
परशराम व अनंत
परशराम – गणपत – काशिनाथ, दिनानाथ
अनंत – वसंत, नानाभाई, रोहीदास

फिरंग्यांविरुद्ध गंगाजीच्या कारवाया : पूर्वपीठिकेत वर्णन केल्याप्रमाणे निंबनाईकानीं आपले प्रयत्न संभाजी महाराजांचे साहाय्यानें केले ते अपुरे पडले. संभाजी छत्रपतीने वारदेशसाष्टीत फिरंग्यांवर गदारोळ फिरवीत आणला होता पण मोंगल बादशहाच्या दक्षिणेतील आगमनामुळे तसाच तो प्रयत्न तहकूब करून छत्रपतींना परत फिरावे लागले. १६८३ तला वसई साष्टीतला प्रयोगही असाच अर्धवट सोडून संभाजीला जावें लागले. त्याच्यापूर्वी फिरंग्यांना हाकलण्याकरिता शिवाजी महाराजांनीं आरमार उभे केले, खांदेरी उंदेरीसारखी मोक्याची दर्यातली बेटे घेतली व बांधली पण त्यावेळी शिवाजींचा मृत्यु ओढवल्यामुळे तोही प्रयोग अर्धवट राहिला. कोकणाच्या बरगडीत खुपसलेली ही फिरंग्यांची तरवार काढणें आवश्यक आहे. हें सत्य दोन्ही छत्रपतींनीं ओळखिले होते. सिद्दीसाताचे अथवा इंग्रजांचे मदतीने फिरंग्यांनीं वसईस बळकटी आणण्याचा जोराचा उपक्रम सुरू ठेविला होता. गोव्याहून वारंवार मदत आणली जाई. दीव दमण ते चेऊल रेवदंड्यापर्यंत पसरलेल्या त्यांच्या राज्याला खंबीरपणा आणण्याचे प्रयत्न हे फिरंगी अंमलदार सतत करीत होते. त्यांची जास्त भिस्त खिस्तीकरणावर होती. प्रजा खिस्ती झाली म्हणजे त्यांना त्यांच्या राजवटीची आस्था वाटेल ही त्यांची कल्पना होती. त्याकरितां त्यांनी धर्मछळाचा व बाटवाबाटवीचा कहर मांडला होता. पाद्रीलोकांनी लोकांचे मतपरिवर्तन करण्याचे कसून प्रयत्न चालविले होते त्यामुळें खरे तत्त्वज्ञान लोपले गेले. फिरंग्यांच्या ह्या प्रयत्नाना आळा बसला नाहीं तर लवकरच सर्व साष्टी व वसई प्रान्त खिस्ती होण्याचा प्रसंग आला होता. हा धोका जाणून गंगाजीने आपल्या संगटनेमार्फत जोराचे प्रयत्न चालू केले. आपले लोकांना भरंवसा यावा म्हणून त्यानें आपलें तत्त्वज्ञान सर्वांना सांगितले त्यानें ह्या लोकांना पटविले की जनतेनें उठाव केल्याशिवाय हा धोका नाहीसा होणार नाहीं. लोकांत हिंमत आणली. त्यागाला त्यांना प्रवृत्त केले. हे प्रयत्न इ. स. १७०७–१७०८ पासून सुरु होते पण १७१८ तल्या संघटनेने त्या प्रयत्नांना भरीवपणा आला. गंगाजीचे सोयरे, इष्टमित्र, ह्या प्रान्तांत सर्व ठिकाणीं होते. गंगाजीच्या ह्या प्रयत्नामुळे त्याला लोकांच्या हृदयात एक स्थान प्राप्त झाले होतें. त्याचे लोक घरोघर जाऊन हें क्रांतीचे बीज जनतेत पसरवीत होते. गंगाजीने आपल्या सहकाऱ्यांचे मदतीने कोळी, कुणबी, भंडारी, पाठारे क्षत्रिय, पाठारे प्रभू, चौकळशी, पांचकळशी वाडवल ह्या ज्ञातीत आपल्या तत्त्वाचा खूप प्रसार व प्रयत्न करून त्यांच्यांत जागृति निर्माण केली. गंगाजीचे संघटनेत बाटगे खिश्चन व मुसलमानही होते. सर्वत्र उठावाची भावना दृढमूल झाली होती. पण गंगाजी दूर दृष्टीचा नेता होता. एखादी सबळ राजसत्ता आपल्या संघटनेचे मागे पाहिजे हे त्यानें ओळखले. आपल्या संघटनेने अशा सत्तेचे अभावी उठाव केला तर पत्त्याच्या बंगल्या-

प्रमाणें फिरंगी तो उठाव चिरडतील हें गंगाजी जाणून होता. त्यावेळी कोकणांत १ आंग्रे २ दाभाडे ३ इंग्रज ४ सिद्धांसात ५ पेशवे ह्या सत्ता दृढमूल व सामर्थ्यवान होत्या. सिद्धीसात व इंग्रज ह्या दोन सत्ता फिरंग्यांच्या पक्षपाती होत्या. राहिल्या आंग्रे, दाभाडे, पेशवे ह्या तीन सत्ता. जनतेचा उठाव करण्याची दारुण इच्छा सर्वांना होती पण गंगाजीने घाईने उठाव केला नाहीं. वरील तीन सत्तेपैकीं गंगाजीनीं प्रथमतः आंग्र्याकडे मदत मागितली. हेतु हा कीं फिरंग्याबरोबर मुकाबला करिताना आरमाराचे सान्निध्य असावे. पण आंग्रेयाने मदत नाकारली. आंग्रे व फिरंगी दोघेही चांचेगिरी करणारे तेव्हां आपला व्यवसायी जो फिरंगी त्याच्या विरुद्ध जाण्याचे आंग्र्याने टाळले. दाभाड्यांना गंगाजीनें मदतीकरितां गळ घातली. बुवाजीनाईकाचे मध्यस्थीने खंडेराव दाभाडे यानीं देहूकर गोसावी याच्या समक्ष मदत देण्याचे आश्वासन दिले. ही मदत घेऊन उठाव करावयाचा इतक्यात पेशव्यांची सत्ता कल्याणांत चालू झाली. रामचंद्रपतांचा अंमल कल्याणास १७२० त सुरू झाला. त्यावेळीं गंगाजीने विचार केला कीं दाभाडे हे छत्रपतीचे नोकर व पेशवेही छत्रपतीचे नोकर. स्वतंत्रपणे दाभाड्याची मदत घेतल्यास पेशवे रुष्ट होतील कारण दाभाडे व पेशवे ह्यांच्यांत बेबनाव झाला होता त्याकरिता गंगाजीने रामचंद्रपंताचे मार्फत पेशव्यांचेकडे व पेशव्यांचेमार्फत शाहूछत्रपतीकडे हें गाऱ्हाणें नेण्याचे ठरविले. गंगाजीला पूर्ण कल्पना होती कीं पेशवे, दाभाडे, आंग्रे ह्यांच्याकडून एकाकी हें कार्य घडणें अशक्य होते कारण फिरंगी राजवट बलाढ्य होती. पोर्तुगालचे राजसत्तेचा पाठिंबा ह्या फिरंगी राजवटीला होता. ह्या जबरदस्त राजसत्तेला त्याच्याच तोडीची राजसत्ता मुकाबला देण्याकरिता असावयास पाहिजे होती. हें जाणून गंगाजीनें साताऱ्यास जाऊन छत्रपति शाहूकडून अभय व वचन मिळविलें. छत्रपतीनीं पेशव्यांना वसईच्या मोहिमेचा आदेश दिला. ह्या कामीं पांचही भाऊ १७२२-२३ मध्यें साताऱ्यास गेले होते.कोणातरी अलबत्यागलबत्यांनीं उठून ही हकीकत शाहूना सांगण्याइतपत सोपी नव्हती. गंगाजीची ह्या कारवाईच्या मागें मोठी संघटना होती हें पाहून छत्रपतीनें ह्या कार्याला मान्यता दिली.


गंगाजी ह्या संग्रामाचा उत्पादक : वस्तुतः गंगाजी नाईक हा एकटा ह्या धर्मसंग्रामाचा उत्पादक, संचालक, प्रेरक होता. कै. दत्तात्रय पारसनीस, कै. गोविंदराव सरदेसाई, श्री. म. म. दत्तो वामन पोतदार, श्री. य. न. केळकर, श्री शंकर नारायण जोशी आदिकरून इतिहास लेखक ह्या युद्धाचे सर्वश्रेय गंगाजीनाच देत आहेत. ह्या मोहिमेच्या उत्पादकत्वाचा मान कै. पाध्ये, कै. रा जोशी हे अंताजी रघुनाथ यांना देण्याचा प्रयत्न करतात. खरी वस्तुस्थिति अशी अहे कीं निंबनाईकाकडून ह्या मोहिमेचा श्रीगणेशा झाला आहे. इ. स. १६८३ त छत्रपति संभाजीनें ह्या मोहिमेची मुहूर्तमेढ रोवली. गंगाजीनें मोहिमेचे तयारीस इ. स.

१७०७/०८ पासून सुरवात केली. इ. स. १७१८ त गंगाजीने देवाचा प्रसाद मिळविला. १७२० त रामचंद्रपंतांच्या बरोबर करारमदार केले. १७२२-२३ मध्यें हे पांच भाऊ सातार्‍यास छत्रपतींकडे गेले. इ. स. १७२२ पासून हल्ले प्रतिहल्ले फिरंग्यावर सुरू झाले. इ. स. १७२९ पर्यंत अंताजी रघुनाथ मालाडास आपले वतन चालवीत होते. त्यांचे वतन फिरंग्यांनी जप्त केल्यानंतर गंगाजीचेमार्फत पेशव्यांकडून इंग्रजांचे मध्यस्थीनें त्यानी वतनासंबंधानें पत्रव्यवहार सुरू केला. १७२९ चे आधीचे एकादे चिटोरे, पत्र किंवा एखादा उल्लेख कोणीतरी प्रसिद्ध करावा म्हणजे त्या पुराव्यावर अंताजीस उत्पादक म्हणता येईल. पेशवे दरबारचे, अंताजीबद्दल कोणते प्रकारचे मत होते ते पेशव्याच्या दप्तरांतील पत्रेंच सांगू शकतील.

गंगाजीचे युद्धमंडळ : १) गंगाजी नाईक २) बुवाजी नाईक ३) मुरारजी नाईक ४) शिवजी नाईक ५) नारायणजी नाईक ६) नामाजी देसाई मालाडकर मेहुणे ७) मायाची राऊत कळवेकर मामा ८) नारायणजी सुतार वसईकर जावई ९) लाडकोजी हैबतराव माईदंरकर व्याही १०) बेडजी देसाई मेहुणे मालाडकर. मायाजी राऊत, लाडकोजी हैबतराव, नारायणजी सुतार, हे तिघेजण १७३२ साली मरण पावले. त्यांच्या ठिकाणी अनुक्रमे लक्ष्मण राऊत, भिकाजी हैबतराव, गणेशजी सुतार हे तिघे आले. शामजी नाईक व याचे तीन पुत्र जरी युद्ध मंडळात नव्हते तरी त्यांनी पेशव्यांची नोकरी पत्करून ह्या संग्रामांत भाग घेतला होता.


रामचंद्रपंतांची बोलणी, आश्वासने व आणाभाका : रामचंद्रपंतांनी गंगाजी नाईक यासी आपली क्रियापूर्वक वचन दिधले " जर तुमची वतनें आहेत. ती तुम्हास बाहाल आहेत. या शिवाय तुमचें उर्जित (करील) तुमच्या दारि हति झुलविल. तो बाजीराव असा आहे. बाजीरावाने कितेक वाढवीले आहेत तुम्ही पाहातच आहा. आणि तुम्ही जमीनदार जमिनी सुद्धां बाजीरायाचे पदरीं पडत आहा. तुमच्या भाग्यास जोडा नाही " ऐसे बोलोन देव्हार्‍याजवळ गंगाजी नाईकांस, बुवाजी नाईकांस घेऊन रामचंद्रपंत गेले. गंगाजी नाईकास रामचंद्रपंत बोलिले " जर देवाजवळ आम्ही तुम्ही क्रिया करावी जर तुम्हीं बाजीराया खेरीज दुसर्‍याची आण वाहावी आणि आम्ही क्रिया करतो" मग रामचंद्रपंतानी बाजीरायाची शिक्कटार आणिली मग रामचंद्रपंत बोलिले "आम्ही या शिक्याचे चाकर हा शिका तेच बाजीराव तुमचे बोलणें जें असेल तें बोला" मग गंगाजी नाईक व बुबाजी नाईकाने आपले मुद्दे लिहून दिले त्यासि रामचंद्रपंतानी मुद्दे कबूल केले त्याच्या सनदा शिक्यानिशि करून देऊ म्हणून बोलीले मग गंगाजी नाईक बोलिले जरि आम्ही तुम्हास आपले मुलकांत नेऊन ते राज्य तुम्हास देऊन मग तुमच्या सनदा शिक्यानिशी घेवू परंतु ह्या आमच्या मुद्याचे पत्रावर बाजीरायाने आपले हस्ताक्षरि हे दिल्हे

वसईच्या समराचे उत्पादक व संचालक




कै. गंगाजी नाईक


इतिहास संशोधक व लेखक



लेखक : श्री. गजानन गोविंद ऊर्फ काका नाईक, अणजूर



महारुद्र समारंभ अणजूर (१९३८)



महारुद्र समारंभ अणजूर (१९३८)

म्हणून लिहून घ्यावें. तें रामचंद्रपंतानी मान्य केले आणि बोलिले कीं हे तुमच्या लिहिण्याप्रमाणें करून देऊ. मग आणिक रामचंद्र बोलिले हा बाजीरायाचा शिका मजजवळ आहे. मी बाजीरायाचा मुखत्यार आहे. मी केले ते बाजीरायानें केले आणि बोलिले. तुमच्या लिहिण्याप्रमाणें तुम्हास दिधले याशिवाय तुमचे कार्यसमंधि लोक असुचि इच्छा धरीत आहेत त्यांची वतनें व शिळोत्रें वाड्या फजिने पुरातन असतील तीं व तुम्हि सांगाल ती त्यास देऊन तुमची तुमच्या मुलखांत सत्तासाहेबी चालेल. तुम्ही आपल्या मुलकांत जे कराल तें आम्हास मान्य आहे दिवसास तीन खून कराल ते तुम्हास माफ आहेत. इतके बोलोन मग शाळीग्रामावरील तुळशी उचलून रामचंद्रपंतानीं गंगाजीनाईकाचे हाती दिल्या' (सा. ब.)

गंगाजींचे कल्याणास प्रयाण : ह्या आश्वासनानंतर गंगाजी नाईकांनीं आपल्या कबिल्यासुद्धां कल्याणास स्थलांतर केलें. त्यावेळीं रामचंद्रपंतानी त्याना राहण्यास कल्याण गांवांत मध्यभागी जागा दिली. उपजीविकेकरितां इतोंड व लोनाड गांव इनाम दिले. ह्याची सनद पेशव्यानी दिली होती. आज ही सनद उपलब्ध नाहीं. प्रयत्न करूनही सनद मिळाली नाही पण सा. बखरींत तसा उल्लेख आहे.

गंगाजी नाईकांनीं अणजूर सोडले : इ. स. १७१९ मध्यें गंगाजी नाईकांनी, फिरंगी अंमलापासून दूर राहावे ह्या हेतूने अणजूर सोडले. त्यावेळी फिरंग्यांचा अंमल अणजूरास असे व नसे. मात्र ह्यावेळीं रामचंद्रपतांनी पेशव्यांचा अंमल कल्याणास पूर्णपणें बसविला होता. सुरक्षिततेच्या दृष्टीनें व कारवाया करण्याचे दृष्टीनें गंगाजीनी कल्याण पसंत केलें. कल्याणचे मध्यभागी ती जागा होती. त्या जागेची सनद शिवजी नाईकाच्या नावें मिळालेली होती. आतांपर्यंत ती जागा त्याच्या वंशजांचे ताब्यांत होती. मागें सांगितल्याप्रमाणें गंगाजीस चरितार्थाकरितां लोनाड व इतांडे गांव रामचंद्रपंतानी दिले होते. गंगाजी नाईक त्या गांवाची शेती करीत असत. गंगाजीनें ह्यावेळीं अणजूर सोडले ते त्यांच्या बाबतींत शेवटचे ठरलें. इ. स. १७४१ मध्यें गंगाजी भग्नहृदय होऊन पुण्याहून आले ते कांही काळ कल्याणास राहिले. पुढें गंगाजी काशीस गेले. त्यांचेबरोबर त्यांची बहिण होती. काशीस ते मृत्यु पावले. कुटुंबातील इतर सर्व मंडळी अणजूरास आली त्यासमयीं मोरयाचे मूर्तीची प्रतिष्ठापना अणजूरास माडीत करण्यात आली. त्याच सदरेत श्रीसिद्धीविनायकाची मूर्ती आज आहे.

प्रान्ताची दुर्धर स्थिती : "फिरंगी याणें ठाणें कोंकण ब्रिब्रस्थान हें राज्य फिरंगी ठाणें घेतलें. कुबुद्ध धरिली. वतनें जमीनदारांची बुडविली. गांवचे गांव धरून बाटविले किरीस्ताव केले. सासस्ट गांव व आगर वसईचा बहुतेक लोक धरून बाटविले. महाराष्ट्र धर्मांचे कर्म अवघेच राहिले या जातीचा उपद्रव महाराष्ट्रांस मांडिला. महाराष्ट्रांस अभय

देतां कोणी राहीला नाहीं. त्यामधे पाठारे ज्ञातीचे मराठे लोक त्यांची पाठ हात धुवून घेतलीं. या ज्ञातीचे बहुत बाटविले. पाठारे ज्ञातीस उपद्रव फार केला. प्रभू वाणी उदमी यास थोडा उपद्रव केला. आमचे वडीलास जात वाचवावयाची मुष्कील झाली. वतनें संसार कैसा ऐसा तो दुष्टराजा. महाराष्ट्र देव धर्म आणि आमची क्रियाकर्म सारीच राहिलीं त्या मुलखांत आम्ही शुद्रवत होऊन राहिलों. " (सा. बखर)

गंगाजीचा निश्चय : " वतनदारांचे वंशी आपण जन्म घेतला आहे. आपले पूर्वजांनीं पराक्रम अुत्तम संपादिला. आपण त्यांचे वंशी जन्म घेतला आहे तर आपण हें कर्म आचरु जर साधले तर पुण्य पुरुषार्थ अर्थ आणि किर्त नसाधे तर येकला मृत सत्य मृत तो सर्वास आहे. परंतु कीर्ति विरळा वास्या आलि आपुण हे राज्यांत दुष्ट राजा आला आहे " (सा. ब.)

पाचा भावांचा निर्णय : ' नरदेहास यावें तर कांहीं किर्ती स्वार्थ राहे ती गोष्ट करावी. नरदेही येऊन व्यर्थ मरूं नये ऐसा पाचा भावांचा विचार जाहला. तूं या जिवाचे हाल करून देव प्रसन्न केला. आता आपण हईगई करावि तर आपल्या ऐसे आळसी आणि भ्याड पृथिवीत नाहीं याजकरिता हा प्रयोग करावा. ह्या आपल्या मनसुभ्यास व लागास व भेदास मागास जो खर्च पडेल तो आपला आपण करूं. फौजेस जो खर्च पडेल तो रामचंद्रपंत करितील" बुवाजीनी निश्चय बोलून दाखविला. (सा. ब.)

खंडेराव दाभाड्यांनीं बुवाजी नाईकांस दिलेले आश्वासन : " तुम्ही तुमचा मुलुख आम्हास दिधला तर तुमचे सर्व साहित्य आम्ही करून तुमची वतनें तुम्हास चालऊ त्या खेरीज तुमचे मुलखाचा कारभार तुम्हीच कराल. जे तुम्ही आपले मुलखांत कराल ते मान्य आम्ही करू. आमचें नांवें निशाण मात्र चालवावे. वरकड तुम्ही आपली जमिनदारी व आमचा अंमल तुम्हीच चालवाल " (सा. ब.)

पहिला करार : वर दिलेल्या माहितीवरून दिसतें कीं, बाजीराव पेशवे व गंगाजी नाईक ह्यांच्यामध्ये करार झालेला होता. गंगाजीने आपल्या मुद्यावर बाजीरावाची सही मागितली होती. ह्यावेळीं अर्थात करार झालेला असलाच पाहिजे. पण तो करार आज उपलब्ध नाहीं पण तसाच एक दुसरा करार ह्या दोन वीरामध्ये झालेला श्री. य. न. केळकर यांनी प्रसिद्ध केला आहे. इ. स. १७३७ मधला तो करार आहे, त्यावरून दिसते कीं, पहिलाही करार झालेला असलाच पाहिजे. हे दोन्ही करार पुढे देत आहे.

गंगाजी नाईक मोरगांवास अनुष्ठानास गेले तो मार्ग : अणजूराहून निघाल्यावर गगाजी नाईक बोरघाटांतून गेले किंवा भिमाशंकराच्या घाटातून गेले हें निश्चित कळण्यास

साधन नाहीं, अणजूर ते कर्जत, कर्जत ते खंडाळे, किंवा भीमाशंकर. घाटांतून उतरल्यावर चिंचवड, चिंचवड ते पुणें. पुणें ते जाधवरावांची वाडी, वाडी ते जेजुरी, जेजुरी ते मोरगांव. एकूण अंदाजी १४३ मैल लांब मोरगांव आहे. इ. स. १७१८ त हे प्रस्थान घडले.

कांबे घेतले : इ. स. १७३० भिवंडीजवळचे कांबे, फिरंगपाडा जिंकल्यानंतर गंगाजी नाईक व पिलाजी जाधवराव ससैन्य साष्टींत आले तो मार्ग : कांबे ते सहरोली (सरवली), सहरोली ते भाल, भाल ते खिडखाळे, खिडखाळे ते कौसे, कौसे ते शीळ, शीळ ते शीळखिंडीमधून दिघे, दिघे ते कळव्याचा खडक, कळव्याचा खडक ते इटावें, इटावे ते कळवे, कळवे घेऊन परत येताना खिडखाळे व खिडखाळे ते भीव डोंगरी, भीव डोंगरी ते कल्याण.

वसईचा मार्ग : इ. स. १७३७ गंगाजी नाईकानीं पेशव्यांचे सैन्य माहुलीच्या किल्ल्यावरून वसईस आणले तो मार्ग : माहुली किल्ला ते कोशिंवडे व घोटवड किल्ला, घोटवड ते गऊळबार, गऊळबार ते तुंगारचे रान, तुंगारचे रानांतील बागटाकें, बागटाकें ते कामणचे रान, कामणचे रानांतील वाघटाकें, वाघटाकें ते काकडदाहाड, काकडदाहाड ते काढोळखिंड, काढोळखिंड ते राजावळी, राजावली ते उमेळे, नंतर राजावळीचा तारा, व उमेळे बंदर ह्या दोन ठिकाणाहून सैन्य खाडीपार उतरल्यावर माणीकपुरा, माणीकपुरा ते पापडी, पापडी ते बहादुरपुरा-वसई.

साष्टीचा मार्ग : इ. स. १७३७ त बुवाजी नाईक यानीं राजमाची किल्ल्यावरून साष्टींत ठाणें किल्ल्यावर सैन्य आणलें तो मार्ग; ह्या सैन्याबरोबर चिमाजी आप्पा होते. राजमाची किल्ला ते परबळ (प्रबळ ?) परवळ ते बावामलंगची वाडी, वाडी ते पला, पला ते बाळाखिंडी, (बाळा गांव) बाळाखिंडी ते खिडकाळे, खिडकाळे व शीळखिंड ते कळवे, कळवे ते ठाणें, ठाणें किल्ला जिंकल्यावर ठाणें ते माझीवडे, माझीवडे ते घोणसाळी व परत.

गंगाजी नाईकाने केलेले हल्ले व मारलेल्या लढाया : इ. स. १७२२ त गंगाजी नाईक व शिवजी नाईक मरोळची माडी फोडावयास गेले.

इ. स. १७२८ त फिरंग्यांचा दुर्गाडीवर हल्ला (कल्याण). त्याप्रतिकारात गंगाजी नाईक, शिवजी नाईक व नारायणजी नाईक होते.

इ. स. १७३० त कांबे (भिवंडी) येथील लढाई. त्यांत गंगाजी नाईक, अंताजी रघुनाथ व पिलाजी जाधवराव होते.

इ. स. १७३० त गंगाजी नाईक वगैरेनीं कळवे लुटलें. (डिसेंबर १७३०) पिलाजी जाधवराव व कृष्णराव महादेव होते.

इ. स. १७३४ मध्यें कल्याणावर झालेला फिरंग्यांचा हल्ला गंगाजी आदिनीं परतविला.

इ. स. १७३७ शके १६५९ चैत्र शुद्ध ७ रविवारीं मुऱ्हारजी नाईक, गंगाजी नाईक, बुबाजी नाईक ह्यांनीं सैन्यासह जाऊन ठाण्याचा किल्ला घेतला.

इ. स. १७३७ त वसईच्या मिठागरांत उतरलेल्या फिरंगी सैन्यावर गंगाजी नाईकादी मंडळींनीं हल्ला केला.

इ. स. १७३७ त गंगाजी नाईकादी मंडळींनीं भर पावसाळ्यांत वसईचे कोटावर शिड्या लावून हल्ला केला.

इ. स. १७३७ त माहीमच्या मोरच्यावर फिरंग्यांचा हल्ला झाला त्यावेळीं रामचंद्र हरीस गोळी लागली. तीनशे लोक मेले. ह्यावेळीं फिरंग्यांनीं काहीं मुलुख परत घेतला.

इ. स. १७३८ त धारावीचें मोठें युद्ध. अणजूरकरांचा फकीर महंमद व बैजनाक परवारी पडला. खंडोजी माणकर, रामाजी महादेव व पाठारे क्षत्रीय ज्ञातीचे मुऱ्हारजी नाईक, कुकजी हैबतराव, नारायणजी नाईक, कृष्णाजी नाईक, जयवंतजी सुरवा इत्यादि मनुष्यें लढ्यांत होतीं.

इ. स. १७३८ त फिरंग्यांचा बहादुरपुऱ्यावर हल्ला. गोडे विहिरीवर लढाई झाली. गंगाजी नाईक मंडळींनीं हल्ला परत फिरविला. ह्या सालांत शेवटीं फिरंग्यांचा सर्व मुलुख मराठ्यांनीं घेतला.

इ. स. १७३८ पेद्रु दमेलाचा ठाण्यावर हल्ला पेद्रु दमेल मेला.

इ. सं. १७३९ त मराठ्यांनी माहीम व केळवे एकदम घेतले १० जानेवारी
इ. स. १७३९ त मराठ्यांचा तारापूरवर हल्ला. तारापूर घेतले. येथे बाजी भिवराव पडले. २४-१-१७३९.

इ. स. १७३९ त मढची मोठी लढाई, गोविंद हरी, तुंबाजीपंत, खंडोजी माणकर ह्या शिवाय कृष्णाजी नाईक, मुऱ्हारजी नाईक, नानोजी देसाई, हरजी ठाकूर, बापूजी ठाकूर गोरगावकर, हिराजी ठाकूर, भिकाजी हैबतराव इ. पाठारे क्षत्रीय ज्ञातीचे सरदार त्यांत होते. मढ घेतले.

इ. स. १७३९ त धारावी घेतली. नारायण जोशी व मुऱ्हारजी नाईक यांनीं गायमुखाचा मोरचा चालवून धारावी घेतली.

इ. स. १७३९ त **वसईची अखेरची लढाई**. मुऱ्हारजी नाईक पडले. चारहजार माणूस कामास आले. मुरारजी वैशाख शु. ९ शके १६६१ शुक्रवारी धारातीर्थी पडले. "अवघियाही हिंमत धरून वसईस मोरचे लाविले. जमेदार साळोंखे रायापैकी राणेकुळचे कार्य संमधि गंगाजी नाईक व गणेशजी नाईक व नामजी देसाई व भानजी देसाई व गंगाजी देसाई व कुकजि हैबतराव हे सर्व व बावनजी प्रभू व सूदजि प्रभू व गणेशजि प्रभू पाताणे व तुंग चोरघा भंडारी हे सर्व गंगाजी नाईकासंगे साहीत्यास लागले मोरच्यास व दमाम्यास व सुरंगास व तोफास सामान बंगले व वाडे व तटे व झाप व सोडशिड्या दारुगोळा सामान शंकराजीपंतास व गंगाजी नाईकास पुरवावयास लागले. तिन महिने अहोरात्र दिवस जमीनीस आंग नाहीं" तीकडे साष्टीत गोविंद हरी व तुबाजीपंत व खंडोजि माणकर व कृष्णाजी नाईक जाऊन मढचे कोटास मोरचे लाविले. वसईहून मढास मुऱ्हारजी नाईक पाठविले तेथें साष्टिचे लोक अणजूरकरासंगे तानोजि देसाई व हरजी ठाकूर व पद्मणजी देसाई व मालजि बापभुईकर व भिकाजी हैबतराव याही मोरच्याचे साहित्य करुन आपला मोरचा पुढें बंदराकडे चालवून मढचे बंदर घेतले व खंडोजी माणकर व गोविंद हरी व तुबाजीपंत यानी मोरचे चालवून कोटाची सफेल फोडली. हे चालू असतांना विभूतरायाचा सुरुंग उडाला तेथे कृष्णाजी नाईक आपले लोकानीशी धावला. फिरंगी त्याने मोडला.

घनचक्कर लढाई : दुसरे दिवशीं मोठा सुरुंग उडाला. सारे शाहीचा हल्ला झाला. त्या हल्ल्यांत साष्टीचे क्षेत्री देसाईपैकीं नेतोजी देसाई व त्याचे भाववारीस गंगाजी देसाई आणि पद्मणजि देसाई व भाईंदरकर हैबतरावपैकीं भिकाजी व कुकजि हैबतराव सुख्यापैकीं जसवंतजी सुरवे सारे पाठारे ज्ञातीचे लोक साष्टीपैकीं वसईपैकीं माराष्ठधर्मासाठीं जिवाची आशा सोडून कोटास लागले गंगाजी नाईक व त्यांचे बंधु बुबाजी व मुऱ्हारजी व शिवजी, नारायणजी नाईक हे पांच बंधु व गंगाजी नायकाचा पुत्र गणेशजी नाईक आणिक पुतणे व भाचे जांवई **हें आपलें कार्य म्हणून तुटुन कोटावर पडले.** च्यार हजार माणूस पडले **मुऱ्हारजी पडले** मग भांडण थांबलें फिरंगी गेला. (सा. ब)

पुण्यास प्रयाण : शंकरजी केशव, गंगाजी नाईक, बुबाजी नाईक, नामाजि देसाई आणि कार्यसंमधि लोक सर्व मिळोन पुण्यास गेले. बाजीराव याचा मुलगा बाळाजी पेशवे झाला. त्याच्या व नाईकादी सर्वांच्या भेटी झाल्या. चार महिने झाले. बाळाजी बाजीराव यानें वतनदारांची वतनें देण्याचें नाकारलें. सर्व वतनास गुमास्ते स्थापिले प्रगणे मालाड प्रगणे मरोळ व तर्फ आठगांव प्रगणे साहिवान याचे सरपाटीलकीच्या सनदा गंगाजी नाईकांचे हाती दिल्हा. वरकड वतनें कोणाची देत नाहीं. गंगाजी नाईक कल्याणास राहिले. आंभो तर्फ अमरनाथ येथें तळें बांधलें तळयास मातोश्रीचें नाव देकाळें ठेविलें.

गंगाजीचा कारावास वगैरे : इ. स. १७१९ त फिरंग्यांनीं गंगाजी नाईकास धरून नेऊन तुरुंगात टाकलें. पांचशें रुपये दंड भरून सुटका झाली.

इ. स. १७२२ त गंगाजी नाईकास साष्टींत पाच दिवस कोंडलें. फिरगीयानीं साष्टीचे व अणजूरचे दोनशें माणूस-गंगाजी नाईकांचे सोईरे व भाऊ मिळून तुरुगांत घातले. लांच व खंड देऊन सुटले. ह्याच प्रसंगात रुपाजी भालेराव, नारोजी भालेराव व तानकोजी भालेराव ह्यांना फिरंग्यानीं धरून गोवे येथे नेऊन तेलाची डगलीं आगांत घालून जाळून मारलें. गंगाजी आदी मंडळी बाळखूमच्या गावांतून पडावातूंत निसटली.

इ. स. १७३१ त गंगाजी नाईकांचे साष्टींतील बावीस सोहिरे फिरंग्यानीं धरून बंदिस्त घातले, पुढें ते खंड देऊन सुटले.

इ स. १७३७त वसईच्या हल्ल्यांत दादाजी नाईक भंडारी, खंडोजि बागराव व गुणाजी शिंदे पडले.

इ. स. १७३८त फकीरमहमंद जमातदार व वैजनाक परवारी धाराविच्या वेढ्यांत पडले.

इ. स. १७३९त वसईच्या शेवटच्या लढाईत गंगाजी नाईकाचे भाऊ मुऱ्हारजी नाईक पडले.

मदत देणाऱ्या जमाती : गंगाजी नाईकांना त्याचे कामगिरीत खालील जमाती व जातीनें मदत दिली (१) पाठारे क्षत्रीय (२) शुक्लयजुर्वेदीय माध्येदिन ब्राह्मण (३) पाठारे प्रभू (४) चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (५) सोमवंशी क्षत्रिय (६) भंडारी (७) कोळी (८) खिश्चन (९) आगळे (आगरी) (१०) मराठे (११) मुसलमान. ह्या वेळी इतर जमातीनीही मदत दिली.

गंगाजी नाईकाचा पहिला करार इ. स. १७२०

पहिला करार : इ. स. १७२० मध्यें गंगाजी नाईक आणि बाजीराव पेशवे यांच्यात करार झालेला दिसतो. करार उपलब्ध नाहीं परंतु इतर साधनावरून कांहीं तरी करार झाला होता हें सिद्ध होतें. हा करार निरनिराळ्या राजे बादशहा किंवा युद्धानंतरच जितजेते ह्यामध्यें होणाऱ्या कराराप्रमाणें नव्हता. देश स्वतंत्र करण्याच्या वेडानें पछाडलेल्या लोकनायकांत व त्यास मदत करण्याचें मान्य असलेल्या बलाढ्य राजसत्ताधाऱ्यांत हा करार झालेला होता. सत्ताधाऱ्यानें ह्या लोकनायकाला युद्धांत मदत करावी एवढाच हेतू या कराराच्या मार्गे होता. त्या जनतेच्या लोकाग्रणीनें जनतेची मनें मिळवावीत, उठावाची सिद्धता करावी. इकडचे हवे लागे, वाटा, रस्ते ह्यांचा पुरा बंदोबस्त करावा असा संकल्प त्या करारांत होता. ही मोहिमेची तयारी करितांना येणारा सर्व खर्च गंगाजींनें करावा व पेशव्यांनीं लढाईचा सर्व खर्च स्वतः करावा. मोहीम यशस्वी झाल्यावर सर्व वतनें, शिळोत्रें ज्यांची त्यास पेशव्यानीं सनदा करून द्याव्यात. आणि पेशव्यानीं हा मुलुख आपल्या राज्यास जोडावा असा ह्या कराराचा मुख्य भाग होता. एवढ्या मोठ्या लढाईची सर्व पूर्वतयारी करणें सामान्य नव्हतें पण त्याशिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळें गंगाजीनी ही अट मान्य केली. पेशव्याच्या ह्या अटीने गंगाजीला कर्जाचे खाईत उतरावे लागले. परिस्थिती बिकट होती. पेशवे मोठे धूर्तपणाने प्राथमिक खर्चांतून बचावले गेले होते. गंगाजीना मात्र १७२० ते १७३९ पर्यंत अव्याहत खर्च करावा लागला. त्यांना फार मोठे कर्ज ह्या अव्यवहार्य अटीमुळे झाले. राज्य मिळविणाऱ्या सत्तेने हा सर्व खर्च करावयास पाहिजे होता कारण जिंकल्यावर त्यांना मुलुख मिळणार होता. मुलखाचे कराचे उत्पन्नांतून त्यांचा खर्च निघावयाचा होता. जिंकल्यावर गंगाजीना त्याचे कर्ज फेडण्यास कोणताही मार्ग नव्हता. अशा स्थितीत गंगाजीनी हा सर्व धोका पत्करला त्याचे कारण फक्त देशप्रेम. लोकांना धर्म छळांतून सोडविणे, लोकांची आर्थिक सोडवणुक करणे, धर्म वाचविणे, बाटवाबाटवी बंद करणे, देव देवालये मुक्त करणे असे उदात्त हेतू गंगाजीच्या या धाडसामागे होते. आपली स्वताची वतने सुटतील, मित्रांची वतने सुटतील ही आशा गंगाजींना होती. पण राज्य मिळाल्या-नंतर काय झाले हे दिसतच आहे. बाळाजी बाजीरावाने राज्य पदरांत पाडून घेतले पण इकडच्या गरीब, असहाय्य जनतेच्या तोंडचा घास काढला. त्यांची वतने देण्याचे साफ नाकारले. नानासाहेब पेशव्यांचे चुलते व वडील यांनीं दिलेली आश्वासने बाळाजीने पाया-खाली तुडविली. गंगाजीचे देशप्रेमाला व धर्मप्रेमाला कर्ज हे फल मिळाले. लवकरच पेशव्यांनीं हा मुलुखही गमाविला.

बखरींतला उतारा : ‘मग त्या उपरान्त रामचंद्रपंत बोलीले जर ह्या कार्यास खर्च भारी लागेल तरी एक लाख रुपयांचा ऐवज तुम्हि स्वारी शिकारीकरून मेळवावे’

'त्याप्रमाणें मरोळची माडी फोडावयास गंगाजी गेले असताना तें शक्य झाले नाहीं. गंगाजी नाईकच ६ दिवस साष्टीत कोंडला गेला. वासुदेव जोशीच्या अंमलातही मसलत राहिली' 'गंगाजीनाईक, लागमागाचे लोकास देणें कबूल केले होते ते देताना हयास आले. पंचवीस हजाररुपये घरातील ऐवज मोडतोडकरून भरले. व दाहा हजार रुपये कावेल्यास खर्च जाहाले.' मग पांचाही भावानीं बसून विचार केला कीं आतां कैसे करावे. संसार सोडून वैराग्य घ्यावे तर ब्रम्हस्व (कर्ज) जाले यास काय करावे. मग मनसुवा तोही केला नाहीं अणि (आणि) ज्यास देणें कबूल केले आहे ते त्यास दरसाल द्यावे लागेल. न दिले तर पुढें पत आपली खुडकली. रुपया मिळत नाही आणि ज्या मनुष्यास देणें न दिले तर तो हातचा गेला. आज बारावर्षे जें खावविले तेंही व्यर्थ गेले. ऐसा प्रसंग आपलेवर पडला मग या विचारास गंगाजी नाईक आपले बंधुस बोलिले कीं तुम्हि दम धरून राहावे. मी गुजराथेंत जातो त्या प्रान्ती अमि (आमचे) मित्र सावकारलोक बंदरोबंदरी आहेत ते आम्हास जाणतात, तर मी त्याजकडे जाऊन माल मागून घेऊन आणून लोकांचे देणें वारून नंतर आपण कविल्या सुद्धा देशांतरास जाऊं. परंतु आपण समर्थांचे पदरि आहों त्यास आज्ञेवाचूनी जाणे निट नाहीं. मग बुवाजी नाईक, शिवजी नाईक, अंताजी रघुनाथ ह्या तिघास रवाना केले ते पुणीयास जाऊन बाजीरायास हकिकत सांगितली मग दोघां बंधुनी (चिमाजी व बाजीराव) मनावर धरिले जर हा मनुसुवा-सिद्धीस न्यावा. (सा. व)

बाळाजीनें वतनें नाकारली : 'हें सर्व (गंगाजीचे सगे सोइरे मित्र) गंगाजी नाईकांसंगे साहित्यास लागले. मोर्चास, सुरुंगास, दमाम्यास व तोफांस सामान बंगले व वाडे आणि तटे व झाप व सोडशिड्या दारुगोळा व सामान शंकराजी केशवास आणि गंगाजी नाईकास पुरवावयास लागले. तीन महिने अहोरात्रदिवस जमिनीला अंग (आंग) लावलें नाहीं' अशाप्रकारें सर्व भार गंगाजी नाईकावर होता. त्यामुळें त्यांना कर्ज जाहलें. पण कराराप्रमाणें बाळाजी बाजीराव ह्यानीं वागण्याचें नाकारलें. त्यांनीं वतनदारांची वतनें देण्याचें नाकारलें. वतनें देत नाहींत म्हणो लागले. ह्याचे कारण तुमच्यामुळें आम्हांस एक कोट रुपये खर्च झाला'. सर्व वतनें नाकारली तरी गंगाजी नाईकास सरपाटीलकीचे वतन दिधले. दुसऱ्या सर्व वतनावर गुमास्ते नेमीले.

नानासाहेब पेशव ह्यांनी केलेल्या विश्वासघाताने संतापून त्यांना अंताजी रघुनाथ कावळे यांनी शाप दिला कीं 'तुम्ही पुत्रशोक करून मराल' उ. को. प्रा. इतिहास पान २६. पण गंगाजीनें आपला तोल जाऊं दिला नाहीं. त्यांनी आपला देश परकियांचे हातुन सुटला एवढेच समाधान मानले व ते परस्परे दरवाजांतून कल्याणास आले. कांहीं कालानंतर त्यांनी काशीस प्रयाण केलें. (सा. बखर)

गंगाजीचें कर्ज : त्या मोहीमेकरितां गंगाजी नाईकांनीं आपले संसारावर तुळशीपत्र ठेविले होते. कर्जामुळें गंगाजीस मूळपासून फार त्रास होई. त्या कर्जाची कांहीं माहिती खाली देत आहे.

"पौ. छ. रमजान पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामींचें सेवेशी आणजोरकरास कर्जदार उपद्रव करिता (त) त्यास ताकीद करणे म्हणोन लिहिले तरी त्यास कोणी गोष्टीचा उपद्रव लागणार नाही व स्वामीनी.........अणजूरकरासही सांगितले आहे.

पे. द. पत्र ३१ रु. १६

"पु. रा. राजेश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशी विनंती उपरी राजश्री कृष्णराव काली भिवंडीस आले. गंगाजी नाईक आणजोरकर यास कर्जाची निकड लाविली आहे. आणजोरकर याचे हाल कठीण आहे. आपणास कळावें याकरितां लिहिले असें. बहुत काय लिहीणे ही विनंती. पौ. छ. २२ मोहरम.

पे. द. रुमाल ३४, पत्र १३.

पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी विनंती रा. गंगाजी नाईक बहुत कामाचे माणूस आहेत परंतु सांप्रत याचा कारभार कर्जामुळें व खर्चवेचामुळें बहुत अपत्त झाला आहे. जेणेकरून या गृहस्थाची ऊठवण मोडे व धंदा याचा सज्ज होऊन येई तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. पे. द. रु. ३४, पत्र २१०

'आणजोरकर याचेकडे लोकांचे कर्ज बहुत देणें. घ्यावयासी ऐपत नाहीं .... हसेबंदीप्रमाणें द्यावे घ्यावे तुम्हि त्यास सक्त तगादा केला आहे. जास्ती तगादा न करावा. दुरलौकीक तुमचा होतो तरी काडीभर उपद्रव न द्यावा'.

शंकराजीचे रामचंद्रपंतास पत्र पे. द पत्र ७

गजानन गोविंद नाईक यांचे दफ्तरांतील शंकराजी केशवांचें पत्र.

'राजश्रीया विराजित राजमान्य राजेश्री रामचंद्रपंत स्वामीचे शेवेंशीं. पौ शंकराजी केशव यांचा नमस्कार. विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करित जावें. विशेष अणजूरकर यांचेकडे लोकांचे कर्ज बहुत येणे...घ्यावयासी नाहीं यास्तव गुदस्ता साष्टीचे (मुक्कामी) आम्ही व ...मी... रामाजीपंत व विसाजीपंत आमचे विचारे नऊ साला हसे लावून हसेबंदीप्रमाणें द्यावे घ्यावे या प्रमाणें करार जाहला. हल्ली तुमी त्यास सक्त तगादा केला आहे त्यास पेशजी करार मदार जाहला. सर्वांचा निकाल होईल त्याप्रमाणें तुमचाहि ऐवज हसेबंदीप्रमाणें तुम्हास नऊ सालांत द्यावा आजही तगादा न करणें...ठराव केला तो सर्वांचे विचारे केला असता तुम्हीच तगादा करून अशी... टीका...घ्यावयासी ताकद नाहीं तेव्हां सजच (सर्वच ?) जाईल अशास ही गोष्ट उत्तम

काय ? सर्व मामलेदार व ग्रहस्त पुण्यासी आले. पाठीमागे हा प्रकार होऊं लागला तर दुरलौकीक तुमचा होतो तरी काडीमात्र उपद्रव न व्हावा. हसेबंदी प्रमाणें ऐवज घेण्याचा करार जाहाला त्यास...... '

कर्जामुळे गंगाजीची हलाखी झाली होती ही परिस्थिती पेशव्यांचे व इतरांचे वरील पत्रावरून स्पष्ट होत आहे. ह्या हलाखीची जाणीव पेशव्यांना पूर्णपणें आल्यामुळें त्यांनीं उघड इकडे कळविले होते कीं गंगाजींना कोणीही जास्त तगादा करू नये. हसे-बंदीनें कर्जदारांनीं कर्ज वसूल करावे. पेशवे बाळाजी बाजीराव ह्यास ह्या मोहिमेचे करितां झालेले कर्ज फेडण्यास संधीं होती कारण सर्व फिरंग्यांचें राज्यच त्यांचे हवाली झाले होते. गंगाजींची व त्यांच्या परिवारांची वतनेंही सुटली नव्हती म्हणून ही हलाखी.

दुसरा करार गंगाजी व बाजीराव यांच्यातला

हा करार गंगाजी नाईक अणजूरकर व बाजीराव साहेब यांच्यात १४ मार्च १७३७ त झाला आहे.

श्री.

यादी गंगाजी नाईक बोली कामकाज जालियावर येनेप्रमाणें घ्यावे.

वतन जदीद चाकरीमुळें करून दिल्हे म्हणोन पत्र घ्यावे.

१ करार

पालख्या

४ चाकरीमुळें

१ वतनी पालखी

— नारगडची

५ पैकी कराराच्या २४

सनगे घ्यावी लागे यासी

४५ पासोडी

१०० तिवटे

१४५

एकशे पंचेचाळीस करार खर्चास तूर्त रुपये ५०० पैकीं तूर्त २०० काम जालीयावर बकसीस देऊं.

१ घोडा

साष्टीच्या आरमाराचा सुभा सांगावा कलम १

साष्टीचा सुभा करार केला

सोन्याची कडी

९ प्रा. ९ दर शेराचे प्रा

६ प्रा अदशेर कड ६ येकूण पंधरा

१५

रुप्याची कडी ५० पनास करार

हत्ती बक्षीस सरंजाम सहीत दोन्ही कार्ये झाली तर १ घ्यावा.

गांव इनामदेखिल गणेशजी ये (क) तिशाचा घोडी सांपडतील त्यापैकीं पांच घोडे घ्यावे व तरवारी सांपडतील त्यापैकिं पांच घ्याव्या कलम १

घोडे दोन व तरवार दोन देऊ जे त्या प्रांतीचे लोक चाकरीस उभे राहतील त्यास वतनदार चाकरी करुन साहेब काम करील त्याचे वेतन

१ वस्त्रे आंगाची
१ जोडी मोत्याची खासी कानची
३ तीन करार मुलुखांत लूट न करावी कलम १
कार्ये जाले तरी न करावी
पानसले (रे) कुलवी यांसी माड व टका माफ करार १
गणबीच्या कदीम वाड्या चालत असतील त्याप्रमाणें चालवाव्या १ करार
कलवेकर कोळी चाकरीस उभे राहिले चाकरी करतील तरी त्याची चार होडकी आहेत. त्याचा हाशील माफ करावा. मासळीचा उदीम करतील त्याचा हाशील माफ करावा. १
आमच्या कार्यासमई उभे राहिले तर चालवून.
महमंद सारंग उभा राहेल काम करील काम पाहोन सांगोन चाकरी त्याजपासोन घेतली जाईल खाडीपासून मुख्य स्थलास घेऊन जाईल. चाकरी जाहाल्यावरी सारंगी करार केला जाईल. १
एका तारवाची तांडेलाची सरदारी देऊन १
त्यास द्यावे. चाकर असेल तो चाकरीस उभा राहून सेवा करून दाखवील त्याचे उर्जित करावें कलम १ करार
लक्ष्मण कळवेकर गांव इनाम १
कामास उभा राहील तर देशाचा गांव देऊन १ करार
भानाजी देसाई कामास साष्टीचा जमाव सुद्धा ठाणें यांस गेलीयावर चाकरी करून दाखविल त्याप्रमाणें त्याचे वतन पूर्वापार चालत आले असेल त्याप्रमाणें चालवावें. चाकरी जाल्यावर रोजगार येक सांगावा व लोकांची चाकरी घ्यावी १
वानेरे वेसावे या दोन जागांतील जागा घेऊन द्यावी
सर्व प्रकारे त्याचे उर्जित करूं १

हा करार चालनेच्या जुलै १९६१ च्या अंकात प्रकाशित झाला आहे. सुप्रसिद्ध इतिहास संशोधक व 'वसईच्या मोहिमेचे' लेखक श्री. य. न. केळकर पुणे यांनी प्रसिद्ध केला आहे. हा करार गंगाजी नाईक अणजूरकर व बाजीराव पेशवे ह्यांच्यामध्ये झालेला आहे. ह्या कराराची तारीख १४ मार्च १७३७ ही आहे. मोठ्या दोन कामगिरीना उद्देशून हा करार झालेला आहे. 'दोन्ही कार्ये करून दिल्ही म्हणजे लिहिल्याप्रमाणें चालऊन दोहींतून येक कार्य जाले तर लिहिल्यापैकीं निमे चालऊन' येणेप्रमाणें करार केला असे छ. २२ जिल्काद सु॥ सबासलासीन मया अलफ हा शेवटी शेरा आहे. ही दोन्ही कार्ये कोणती त्याचा तलास केला पाहिजे. हा करार झाला त्यावेळची परिस्थिती न्याहाळली पाहिजे. इ. स. १७२० मध्यें गंगाजी नाईक व रामचंद्रपंत यांच्या बोली होऊन एक

करार झाला होता तो करार आज उपलब्ध नाहीं. परंतु त्या करारामागील पार्श्वभूमी साष्टीच्या बखरींत सविस्तर वार्णिलेली आहे. त्यावेळी गंगाजी नाईक व बुवाजी नाईक यांनी आपले मुद्दे दिले होते. त्याप्रमाणें ते सर्व मुद्दे मान्य करून रामचंद्रपंतानीं 'गंगाजी नाईकांनीं खात्री' करून दिल्यानंतर त्या मुद्याप्राणें करार करून घ्यावयाचें ठरलें होते पण गंगाजीनें आग्रह धरून त्या मुद्याचे कागदावर बाजीरावाची सही घेतली होती. अत्यंत खेदाची गोष्ट कीं तो करार किंवा ते मुद्दे आज आपलेंपुढें नाहींत. पण खाली माहिती देत आहे त्यावरून त्या कराराचे स्वरूप आपणांस दिसून येईल. त्याचप्रमाणें त्या मूळच्या मुद्यांना धरून हा करार आहे हेंही ध्यानांत येईल. सा. ब. पान १८, १९, २० वर रामचंद्रपंत म्हणतात कीं "जर तुमचि वतने आहेत ती तुम्हास बाहल आहेत याशिवाय तुमचे उर्जित (करील) तुमचे दारि हाति झुलविल तो बाजिराव असा आहे. बाजीरावानें कितेक वाढ(वि)ले आहेत पाहतच आहा आणि तुम्हि जमिदार जमिनी सुद्धा बाजीरायाचे पदरि पडत आहा तुमच्या भाग्यास जोडा नाही. गंगाजी नाईक म्हणाले "आम्ही तुम्हास आपले मुलखांत नेउन तें राज्य तुम्हास देउन मग तुमच्या सनदा शिक्यानिशी घेउ परंतु या आमच्या मुद्याच्या पत्रकावर बाजीरायानें आपले हस्ताक्षरी 'हें दिल्हे' म्हणून लिहून घ्यावे" रामचंद्रपंतानी ते मान्य केलें व सांगितले कीं "तुमच्या लिहिल्याप्रमाणें तुम्हांस दिधलें. याशिवाय तुमचे कार्य संबंधि लोक आमुचि इच्छा धरीत आहेत त्याची वतनें व शिलोत्रे वाड्या फर्जिनें पुरातन असतील तीं व तुम्हि सांगाल ति त्यास देउन व तुमचि तुमच्या मुलखांत सत्ता साहेबी चालेल. तुम्ही आपल्या मुलखांत जे कराल ते आम्हास मान्य आहे. दिवसास तिन खून कराल ते तुम्हांस माफ आहेत" गंगाजी त्यावर बोलिले कीं "आमचा प्रान्त आमचि मायभूमि. तिजवर राजा आहे तो दुष्ट. आम्हास फार कष्टि करितो. आमी (म) ची वतनें बुडविली. मुलखाचा देवधर्म बुडविला. आमचे लोक बाटविले. ऐसा उपद्रव करित आहे म्हणोन आम्हि जमिदार आपला मुलुख तुम्हास दिधला. आमची वतनें आम्हांस तुम्हि दिधली हें खरें आणि आपल्या मुलखासहित आम्ही तुमचे पदरि पडलों. तुम्हांखेरीज आम्ही कुणाचे नांव घेणार नाहीं." "आमचा संकल्प असा कीं आपलि या मुलुखास राजा भोसला व्हावा तर जो राजा तोच प्रधान म्हणोन समजोन उमजोन तुमचे अंकित जालो. तरि तो आपला मुलुख तुम्हास साध्य करून घ्यावा मग आपले या वतनाचा व याशिवाय तुम्हि दत्त घ्याल त्याचा उपभोग करावा. बाजीरावाची सेवा येकनिष्ठ करावी. मनि कृत्रीम न आणावे' हे बोलोन रामचंद्रपंत व गंगाजी यानी शालिग्राम व महादेव यांच्या शपथा घेतल्या."

ह्या कराराची ही पार्श्वभूमी आहे. ह्या पार्श्वभूमीवरून दिसून येते कीं, हे वतनदार लोक आपला मुलुख पेशव्यास देण्यास तयार झाले. अट एकच कीं त्यांची वतनें त्यांना

मिळावी. बिंबराजवटीच्या अंताच्या वेळीं हीच भूमिका मुसलमान बादशहाजवळ वतनदारांनी मांडली होती. फिरंग्यांनीं ज्यावेळीं मुसलमान पादशहाला बुडविले व हा मुलख ताब्यांत घेतला तेव्हांही हीच भूमिका ह्या वतनदार जमीनदारांनीं घेतली होती व तीच भूमिका गंगाजी नाईकांनी रामचंद्रपंतापुढें मांडली.

वरीलप्रमाणें गंगाजी व बाजीराव यांचा पहिला करार १७२० त झाल्यानंतर १७३६ पर्यंत ह्या बाबतींत पेशव्यांनीं विशेष कांहीं केलें नाहीं. २।३ वेळां थोडें थोडें सैन्य फिरंग्यांचें मुलखांत पाठविले होते. गंगाजी नाईक १७३६ मध्यें पुण्यास गेले त्यांनीं पेशव्यांना अगदी निश्चयपूर्वक कळविले कीं, 'आपल्याला (पेशव्यांना) हें कार्य करावयाचें नसल्यास तसें कळवा म्हणजे मी (गंगाजी) देशांतरास जातो'. ह्या निर्वाणीच्या बोलण्यानंतर १७३६ त सर्व सरदारांना व गंगाजीस पुण्यास बोलावून मोहिमेची सर्व सिद्धता करण्याचे निश्चित केलें त्यावेळीं गंगाजीने कल्याणास येऊन भवानीच्या गोंधळाचे निमित्त करून आपले लागेहवे, सोहिरे, आप्तेष्ठ, सहकारी वगैरे सर्वांना बोलावून त्यानी त्यांचीं कामें नेमून दिली. त्यावेळीं हल्ल्याची तारीख २७ मार्च ही ठरली. ह्या मोहिमेच उद्देश दोन प्रकारचा होता. एक उद्देश असा कीं ठाणेचा बांधत असलेला किल्ला सर करणें व साष्टी कबजांत आणणें व दुसरा उद्देश हा होता कीं वसई प्रांत व तिकडचे कोटकिल्ले घेणें व वसईस मोर्चें लावून वसई पाडाव करणें हे दोन उद्देश हीच ती ह्या करारांतील दोन कामें होत. अशा वेळी हा करार गंगाजी नाईक व बाजीराव ह्यांच्यात झालेला आहे. हा करार कुठें झाला हे नक्की नसले तरी गंगाजी नाईक पुणें येथें असतांना हा करार झालेला असावा.

कलम १ लें : चाकरीमुळे नवीन वतन दिल्हे करून असें (पत्र द्यावे).

कलम २ रे : नाडगौडी वतनाची पूर्वापारची पालखी एक व च्यार पालख्या चाकरीमुळें मिळाव्या म्हणून एकूण पांच पालख्याची मागणी. परंतु चार पालख्यांचा करार झाला. देशनाडगौडी हा ह्या घराण्याचा बिंबराजापासून हुद्दा व हक्क आहे. त्याला योजून एक पालखीचा हक्क या कलमांत दिला आहे.

कलम ३ रे : पांचहणे (सनगे) लागे याना द्यावी. ४५ पासोडी, १०० तिवटे एकूण १४५ एकशे पंचेचाळीसचा करार (पण) सध्यां खर्चास रु. ५०० पैकीं तूर्त २०० दोनसे, म्हणून कलम.

कलम ४ थे : कार्य जालीयावर बक्षीस देऊं १ घोडा १ वस्त्रे आंगाची १ जोडी मोत्याची खाशी म्हणजे उत्तम, कानची.

कलम ५ वे : कराराचे तीन भाग केले आहेत. एक मुलकांत लूट न करावी कार्य झाली तरी लूट न करावी. ह्यावेळीं सर्वांस असा प्रघात होती कीं ज्या मुलाकावर किंवा

मुलखांतून स्वारी जात असे त्या सर्व मुलुखाची लूट जेत्या कडून केली जाई. म्हणोन गंगाजी नाईकानी आपल्या धोरणानें हें कलम यांत घातलें आहे. जेते म्हणून पेशव्यांनीं आधीं व नंतर लूट करून मुलुख उध्वस्त केला तर आपला हेतु असफल होईल. व गरीब माय-जनतेला आपणच दुःखात टाकले असें होईल ते होऊं नये म्हणून गंगाजीने ही अट घातली आहे. ह्यावरून गंगाजीचे मायभूमीतल्या जनतेवर किती प्रेम होते व तो किती कनवाळू होता हे सिद्ध होत आहे. दुसरा भाग की पानसरे (?) कुलबीयासी मांडव टका माफ. ह्या कलमाचा फायदा गरीब जनतेला होणार होता. मांडव टका हा एक लग्नकर आहे त्याची माफी यांत आहे. तिसरा भाग म्हणजे गणवीच्या (?) कदीम वाड्या चालत असतील तर त्याप्रमाणें त्या चालवाव्या. ह्या कलमानें वाड्यावाल्यांची सोय गंगाजी नाईकांनीं केली आहे.

कलम ६ वे : ' कळवेकर कोळी चाकरीस उभे राहिले चाकरी करतील तरी त्याची चार होडकी आहेत त्याचा हांसील माफ करावा. मासलीचा उदीम करतील त्याचा हासील माफ करावा'. ह्या मोहीमेत कळवेकर कोळी ह्यांचे एक पथक लक्ष्मण राऊत यानें तयार केले होते. गंगाजी नाईकानें भवानीचा गोंधळ कल्याणास घातला त्यावेळीं हाशा कोळी आला होता. कळव्यात जाते वेळी गंगाजी नाईकाचे निरोपाप्रमाणें मायाजी राऊत कळवेकर यांनी इटावा, चेंदणी ह्या ठिकाणच्या कोळी लोकांस तयार ठेविले होते. वालखेड्यापर्यंत चिमाजीआप्पाचे सैन्यास वाट दाखविण्यास हाशा व चाह्या कोळी लक्ष्मण राउताचे बरोबर होते म्हणून त्याच्या हाशीलाची माफी ह्या कलमांत आहे. ह्या लोकांनी ही कामें केली.

कलम ७ वे : ' महंमद सारंग उभा राहेल, ' काम करील. काम पाहोन चाकरी त्याजकडून घेतली जाईल. खाडीपासून मुख्य स्थळास घेऊन जाईल तर त्याच्याबरोबर सारंगी करार करून एका तारवाची तांडेलाची सरदारी देण्यांत येईल. ह्यावरून दिसते कीं गंगाजी नाईकाचे लक्ष आरमाराकडेहि होते व तशी ही माणसें त्यांच्याजवळ होती.

कलम ८ वें : साष्टीचा आरमाराचा सुभा देण्याबद्दल हें कलम आहे, पण ह्या कलमाप्रमाणें साष्टीचा आरमाराचा सुभा दिल्याचे दिसत नाहीं. मात्र सैन्याचे आधिपत्य बुवाजीना दिले होते. ह्या कलमांत आहे कीं सोन्याची कडी १५ देण्यांत यावी व रुपयांची कडी पन्नास द्यावी. सोन्याची कडी प्रत्येकीं नऊ शेरांचीं व ६ कडी प्रत्येकीं अर्धा शेराची.

कलम ९ वें : दोन्ही कार्यें झाल्यावर सरंजाम सुद्धां एक हत्ती बक्षीस द्यावा. रामचंद्रपंतांनी सांगितलें होतें कीं ' बाजीराव गंगाजीचे दाराशीं हत्ती झुलवील '. पण तसें झाल्याचें इतिहासांत नमूद नाहीं.

कलम १० वें : एक गांव ईमान घ्यावा त्याप्रमाणें अणजूर गांव शराकती इनाम मिळाला आहे.

कलम ११ वें : घोडे सांपडतील त्यांतील पांच घोडे व तलवारी सांपडतील त्यांतील पांच तलवारी घ्याव्या ही गंगाजीची मागणी. पण दोन घोडे व दोन तलवारीचा करार झाला.

कलम १२ वें : त्या प्रांतांतले जे वतनदार लोक चाकरीस उभे राहतील व चाकरी करून साहेब काम करतील त्याचें वतन त्यांना द्यावें चाकर असेल व चाकरीत उभा राहून सेवा करून दाखविल त्याचें उर्जित करावे.

कलम १३ वें : मायाजी राऊत कळवेकराचा मुलगा लक्ष्मण कळवेकर हा कामास उभा राहील तर देशाचा गांव इनाम त्याला दिला जाईल. लक्ष्मण राऊताने ह्या मोहिमेंत जीवापलिकडे मेहनत केली आहे. त्यानें कोळी लोकांना घेऊन सैन्याला वाट दाखविणें वगैरे कामें केलीं पण लक्ष्मण ह्यास गांव ईमान दिल्याचें इतिहासांत नमूद नाहीं.

कलम १४ वें : नामाजी देसाई कामास साष्टीचा जमाव ठाणें येथें गेल्यावर चाकरी करून दाखविली. त्याचेप्रमाणें त्याचें वतन पूर्वापार चालत असेल तर चालवावें. चाकरी जाल्यावर रोजगार येक सांगावा व लोकांची चाकरी घ्यावी. वानरे व वेसावे या दोन गांवांतील जागा घेऊन द्यावी. सर्व प्रकारें त्याचें उर्जित करूं

सा. बखरींत पान ५२ वर लिहिलें आहे कीं ' बाळाजी बाजीराव वतनदारांची वतनें देत नाहीं म्हणो लागले याचें कारण तुमच्या मुलुखामुळें आम्हास कोट रुपये खर्च जाला ' सरपाटीलकीच्या सनदा गंगाजी नाइकांचे हातीं दिल्या. वरकड वतनें कोणाचीं देत नाहीं. सर्व वतनावर गुमास्ते नेमले गेले.

हा करार श्री. यशवंत न. केळकर यांनीं प्रसिद्ध केला आहे त्यांतील कलमें पहातां व १७२० सालीं रामचंद्रपंतानीं दिलेली आश्वासने ही पाहता आपणांस काय दिसते ? बाळाजी बाजीराव ह्यांनीं आपल्या वडिलांचे व चुलत्यांचे सर्व वचनाना हरताळ फासून सर्व करार धाब्यावर बसविले. सर्व वतनदार व कार्यसंबंधीं ह्यांचा विश्वासघात केला. आजपर्यंत आमच्या समोर करार नव्हता फक्त कराररस्वरुपी आश्वासने होती. त्या आश्वासनाच्या आधारावर विश्वासघाताचा आरोप बाळाजी पेशव्यावर करण्यास मन धजावत नव्हते. पण ह्या करारानें हें स्पष्ट होत आहे कीं, ह्यांतली आश्वासनें ज्याअर्थी पुरी केलेली नाहींत त्याअर्थी मूळच्या गंगाजी व बुवाजीच्या मसुद्यांतील सर्व आश्वासनें बाळाजी पेशवे ह्यांनीं पुरी कलेली नसणारच.

करारांतले नामाजी देसाई हे मालाडचे देसाई. त्यांचे वतन त्यांना दिले नाहीं. करारांतले लक्ष्मण कळवेकर ह्यांना गांव ईनाम दिलेला नाहीं. गंगाजी नाईकांना हत्ती दिलेला नाहीं ह्यावरून दिसते कीं, हा करार झाला पण तो अमलांत आणला गेला नाहीं. गंगाजी नाईक म्हणजे त्यावेळचे राजर्षि होते कारण ह्या विश्वासघातानंतर त्यांनीं कुठेंही आकस्ताळपणा केला नाहीं. समाधानानें ते म्हणाले कीं " आपले मुलकास दुष्टराजा फिरंगी आहे तो खणून काढावा. महाराष्ट्र राज्य करावें. देवधर्म महाराष्ट्र स्थापावे व तीर्थक्षेत्र मुक्त व्हावी हा संकल्प श्रीमोरयाजवळ केला होता त्यास सर्व आले ".

(सा. व पा. ५३.)

गंगाजीचे तपाला हेंच फळ मिळाले. ह्यावेळी संतापाने अंताजी रघुनाथ कावळे ह्यांनी आशाभंगामुळें काढलेले उद्गार मागे दिले आहेत.

हा करार प्रसिद्ध केल्याबद्दल मी श्री. यशवंत नरसिंह केळकरांचें अभिनंदन करितो

दोन्हीं कार्यें करून दिली म्हणजे लिहिल्याप्रमाणें चालवू व दोहींतून येक कार्य जाते तर लिहिल्यापैकीं निमे चालऊ व येणेंप्रमाणें करार केला असे छ २२ जिल्काद रजब सब्बा सलासीन मया अलफ (१४-३-१७३७). कराराचा गाभा वरील प्रमाणें आहे.

कराराचे विवरण : हा करार फार महत्वाचा आहे असें श्री. यशवंतराव केळकर म्हणतात ते अक्षरशः खरें आहे. हा करार दोन हिंदु धर्माभिमानी देशभक्तांमध्यें झालेला आहे. तो करार करणाऱ्या गंगाजीचेमागें संघटणेची दिव्यशक्ति होती तर शिवछत्रपतींची तळमळीची हिंदवी राज्याची स्वप्नकथा परिपूर्ण करीन तर मीच करीन असें महत्वाकांक्षेचें कंकण हातीं बांधलेल्या बाजीरावाचे मागे राजसत्तेची अमोघ शक्ति होती. आपला देश, आपली मायभूमी, आपला धर्म, आपलें राज्य उभें करून जनतेला सर्व प्रकारच्या वेदनांतून मी मुक्त करीन अशी मनोमन प्रतिज्ञा श्रीमोरयाजवळ करणारे गगांजी एका बाजूस तर सर्व भारताला स्वराज्य मिळवून देईन, सर्व देश सोडवीन, सर्व यातनांतून प्रजेला मुक्त करीन आणि पूर्वापासूनचे परंपरेचें राज्य भारतांत करीन ही प्रतिज्ञा मनोमन करणारे बाजीराव दुसऱ्या बाजूस होते. बाजीरावाना वर उत्तरेस अटकेपार, पूर्वेस बंगालपार, दक्षिणेस कन्याकुमारीपार व पश्चिमेस समुद्रपार हिंदवी राज्य न्यावयाचें होतें. अर्थात् पश्चिमेस फिरंग्याना दर्यापार करण्याची ही आलेली संधी न दवडतां गंगाजी नाईकाचे बरोबर त्यानीं हा करार केला आहे. दोन्हीं कार्यें केल्यानंतर गंगाजीचेद्वारीं पेशवे हत्ती झुलवणार होते. घोड्यांची पागा बांधली जाणार होती. गंगाजीचा मद्दमद दर्यावर सारंग होणार होता. गंगाजीचे दारी तलवारीचा खणखणाट होणार होता अशा अनेक गोष्टी ह्या करारानें गंगाजीचे पदरांत पडणार होत्या. राजपूतानांतल्या ह्या राणेना (हल्ली नाईकाना) पुन्हां एकदां अनेक शतकानंतर ते रजपूतांचे ऐश्वर्य मिळणार होते. दोन्ही कार्ये झाली होती.

बाळाजी बाजीरावानीं ह्या कराराचा मान ठेवून गंगाजीना हें सर्व घ्यावयाचे फक्त बाकी होते. गंगाजींना सोन्याची कडी मिळणार होती ' पण हा हन्त हन्त नलीनीम् गज उज्जहार, ह्या कवीच्या उक्तीप्रमाणें ते स्वप्न भंग पावले. शेवटचा दिवस गोड व्हावा म्हणून जन्मभर केलेला अट्टाहास व्यर्थ गेला. बाळाजी बल्लाळ ह्यांनी अनेक अनुचित गोष्टी केलेल्या आहेत. त्यांच्या बापकाकांनी दिलेली अनेक पवित्र वचनें त्यांनी कस्पटासमान फेकून दिली आहेत त्यातलेच हा करार मोडण्याचे कृत्य त्यांनीं केलें. गंगाजी विषण्ण झाले. भग्नहृदय झाले. त्या विरागी रणवीरानें झालें त्यांतच समाधान मानले. मातृभूमी सोडविण्याच्रे केलेल्या सत्कर्मांतच आनंद मानून गंगाजीनें शेवटी काशी यात्रेची वाट धरली. धन्य त्या विराची योग्यता गंगाजीची विरागी वृत्ती ह्या करारावरून सिद्ध होते १७२० त असाच करार त्या दोन वीरांमध्यें झालेला होता.

पेशवे व इनामदार यांचे संबंध

गंगाजीचा काशीवास : युद्धसमाती नंतर गंगाजी नाईक उदासवाण्या रीतीने कल्याणास राहिले. तेथून कांहीं वर्षांनंतर गंगाजी नाईक आपली बहिण दीपाबाईसहवर्तमान काशींस गेले व तिथेंच त्याचे देहावसान झाले. इ. स. १७४६ च्या पर्यंत गंगाजी हे कल्याणास होते असे एका सभापत्रावरून सिद्ध होते. ह्या सभापत्रांत गंगाजी नाईक शिवजी नाईक व नारायणजी नाईक यांचा उल्लेख सभापत्राचे आरंभी आहे. म्हणजे ह्या वरून दिसून येते कीं बुबाजी नाईकही ह्यावेळी वारले होते. शिवजी नाईकाचे एका पत्रांत बुवाजी नाईकाचे मृत्युचा उल्लेख आहे. त्या पत्रांत शिवजी नाईक लिहितात इंग्रजाच्या हालचाली व फिरंग्याच्या हालचाली कांहीं प्रमाणांत पेशव्याचे विरुद्ध चालू आहेत. त्यांतच शिवजीनी पेशव्यांना ठपका दिला आहे कीं बुवाजी नाईक वारल्याचे आपणास कळले असताना एका पत्रानेही आमचा परामर्ष तुम्ही घेतला नाहीं. शिवजींचे म्हणणे कीं आम्ही खाविंदाना विसरलो नाहीं. इकडच्या सर्व घडामोडीवर आम्ही लक्ष ठेवितो व आपलेकडे वर्तमान पाठवितो. पण आपण आम्हास विसरले आहेत. मुरारजी लढाईत पडले. बुवाजी १७४६च्या आंत वारले. गंगाजी, शिवजी, व नारायेणजी हे तिघे राहिले. गंगाजी केव्हा काशीस गेले हे नक्की ठरविता येत नाहीं परंतु ते १७४६ च्या नंतर लवकरच गेले असावेत. नंतरच्या पत्रावरून दिसून येते की शिवजी नाईक व नारायेणजी नाईक हे पुढे बरेच वर्षे जगले.

इंग्रजांचा दरबार : इनामदारामध्यें अनेकदा कांहीं भानगडी होत असत त्या वेळी पेशव्याकडे ही प्रकरणे जाऊन पेशवे त्या भानगडी मिटवीत व योग्य ते मार्गदर्शन करीत. पुजारी ठेवणे वगैरे खाजगी भानगडीतही पेशवे मार्गदर्शन करीत. म्हणजे राजकारण सोडले तरी सर्व बाबतीत पेशवे व ईनामदार यांचे संबंध सलोख्याचे होते. युद्धानंतर

रामाजी महादेव बिवलकर साष्टीचे सुभेदार झाले. त्यांचे व कृष्णाजी नाईक यांचे संबंध फारच जिव्हाळ्याचे होते. युद्धानंतर कृष्णाजी नाईक व मदनाजी नाईक व बुवाजी नाईक पेशव्याचे नोकरीत होते असे दिसते. कांहीं काळ बुवाजी नाईक ह्यांनीं पेशव्याचे फौजेचे अधिपती म्हणून त्याजबरोबर संबंध ठेवला होता रामाजी महादेव ठाण्यास पेशव्याचे वाड्यांत राहत व त्याचेच शेजारी बुवाजी नाईक स्वताच्या वाड्यांत राहत. बुवाजी नाईकानी पेशव्यांची जमाबंदी करून दिली त्याबद्दल त्याना स्वतंत्र इनामी हक्क मिळाला तो दाखला पुढें देत आहे. बुवाजी नाईक ठाण्यास वारले. त्यांचा दहनविधी कौपिनेश्वराचे देवळाचे आवारात झाला त्यावेळीं त्यांची पत्नी सती गेली. इ. स. १७७४त ठाण्याचा किल्ला इंग्रजानीं घेतला त्यावेळीं रामाजी महादेवाचे चिरंजीव आनंदराव हे सुभेदार होतें. त्याना पकडून इंग्रजानी मुंबईस नेले व पेशव्याचेकडे सन्मानाने पाठविले त्यानंतर इंग्रजानी मोठा दरबार ठाणें येथें भरविला. लोक आधीच परागंदा होऊन अणजूर वगैरे ठिकाणी गेले होते. लोकाना अभय देण्याकरीता हा दरबार भरविला होता. प्रत्यक्ष अणजूरगाव इंग्रजाना मिळाला नव्हता. फिरंग्याचे सुरवातीप्रमाणे तेथें स्थिती होती. साष्टीचे खाडीचे पश्चिमेस असलेला किल्ला व मुलुख इंग्रजानी घेतला होता व कल्याण प्रान्त वगैरे इकडचा मुलुख पेशव्याचे कडेंच होता.

नाईकाना दंड : सर्व वतनदार, ईनामदार, याना इंग्रजानीं ह्या दरबारास बोलाविले त्याप्रमाणें अणजूरचे ईनामदार त्या दरबारास गेले होतें त्यामुळें पेशवे सरकारनी त्यांना ७००० रुपये दंड केला व तो दंड वसूलही केला व वतनही घेतले पण पुढें ईनामदारानी पेशव्याचे दरबारी जाऊन रदबदली केल्यानंतर त्याचे वतन त्याना पेशव्यानी दिले. ही गोष्ट १७७४चे नंतरची आहे. पुढे १७८२ मध्यें इंग्रज व पेशवे ह्यांनी सालपे येथें तह केला त्याप्रमाणें साष्टीचा ३ लाखाचा मुलुख इंग्रजाना मिळाला. अणजूरकर ईनामदारांचा पेशव्याचे बरोबरचा संबंध ह्यामुळें सुटून इंग्रजाचे बरोबर संबंध सुरु झाला.

इ. स. १८०२ मध्ये पेशव्यानी वसईस इंग्रजांबरोबर केलेल्या तहाप्रमाणे पेशव्याची सत्ता वसई साष्टी ह्या प्रांतावरची नाहीशी झाली. ह्यापुढें इंग्रजांचे व इनामदाराचे संबंध पूर्णपणें चालू झाले व करारमदारही झाले. सन १८६० पर्यंत ह्या करारा प्रमाणें सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या गावाचा वसूल ईनामदार करून इंग्रजांना $\frac{1}{3}$ वसूल देत व नंतर आपली स्वायत्तता चालवीत रेव्हीनु सेटलमेंटच्या पर्यंत ठेप पाहणी प्रमाणे भाताचा वसूल व करभार असे. पण पुढे ६१-६२ मध्ये अणजूरगांवची रेव्हीन्यु सेटलमेंट झाल्यानंतर नक्त पैशांत वसूल येऊ लागला. १८६२ पर्यंत हे चालत होते पण १८६० मध्ये इंग्रज व ईनामदार यांत करार होऊन गावाचे कारभाराची एक नवी पद्धत चालू झाली. मुखत्यारानें सर्व वसूल करावा. इंग्रजांना $\frac{1}{3}$

रक्कम व जुडी द्यावी व बाकीचा राहिलेला सर्व वसुल इनामदाराना वाटून द्यावा. हे चालले असताना पुढे अनेक फरक व फेरफार झाले व शेवटी रेती माती प्रकरणासारखे प्रकार होऊन हळूहळू गावची स्वायत्तता व स्वतंत्रता इंग्रजांनी आपलेकडे घेतली. इ. स. १९५३ मध्ये इनाम विलीन झाले.

इनामजप्ती–एक गंडांतर

एक गंडांतर : सरकारनें वतनॲक्ट ह्याचवेळीं पास केला होता. त्याॲक्टान्वयें सरकारनें सर्व वतनें जप्त केली व खालसाहि केली. त्याचप्रमाणें अणजूरचे शराकती ईनाम वतन मानून त्यावेळचे ठाण्याचे कलेक्टर मुलकसाहेब ह्यांनीं हें इनाम सन १८८० सालीं जप्त केलें. त्यावेळीं ईनामदारानीं कलेक्टरकडे 'अणूजूर इनाम' हें जात ईनाम म्हणून एक अर्ज केला. कलेक्टरनें तो अर्ज अमान्य केला. त्यानंतर ईनामदारानीं अहमदाबादेला कमिशनरकडे तसाच अर्ज करून आपलें म्हणणें त्यांच्यापुढें मांडले. १८५६-त संस्थानिकांचीं संस्थानें खालसा कराण्याचा सपाटा लॉर्ड डलहौसी ह्या गव्हरनर जनरलनें चालविला होता. ह्याप्रमाणें ह्या वतन ॲक्टचे बळानें सरकारनें वतनें खालसा करण्याचा धिंगाणा घातला होता. कमीशनर ह्यांनीं अणजूरकर ईनामदारांचा अर्ज नामंजूर करून कलेक्टराचा हुकूम कायम केला. त्यानंतर ईनामदारांनीं दुसरा अर्ज कलेक्टर याजकडे केला कीं, प्रिव्ही कौन्सिलकडे आम्हीं करीत असलेल्या अर्जाचा निकाल येईपर्यंत हें इनाम खालसा करूं नये. पण गावच्या वसूलाचे वेळीं सरकारनें त्याच्या $\frac{1}{3}$ हिश्याबरोबर ईनामदाराचा $\frac{2}{3}$ हिस्सा वसूल करावा व इनामदारांची रक्कम सरकारात अनामत ठेवावी. सरकारनें ह्या कामाकरितां दोन तलाठी अणजूरास पाठविले. पुढें १८८४/८५ मध्यें प्रिव्ही कोन्सिलचा निकाल ईनामदारांचे बाजूनें झाला आणि सरकारांत जप्त असलेली सर्व रक्कम रुपये १०,००० दहा हजार ईनामदारांना मिळाली.

सन १८७८ मध्यें ईनाम कमिशन बसले व सन १८८० सालीं हे प्रकरण सुरूं झाले त्यावेळीं, तुकाराम बाप्पाजी, मुकुंद पांडुरंग, गोविंद विनायक, रामचंद्र सखाराम, ह्यांनी पुढाकर घेतला. पुण्यास जाऊन सरकारी दप्तरांतुन ह्या कामाच्या पोषक अशा अनेक कागदांच्या नकला घेतल्या. ह्या सर्व खटपटीनंतर त्यानीं विनायक जी. भांडारकर नांवाच्या वकीलाकडून एक अर्ज तयार करून घेतला त्या अर्जा सोबत हे पुण्याचे कागद पुरावा म्हणून जोडले. हा अर्ज छापून घेतला. अर्ज इंग्रजीत आहे सोबत त्याची नक्कल जोडली आहे. ह्या सर्व खटपटीत निळाजी मोरोबा नाईक यांची अंग मेहनत

फार झाली ते परवीकचे तरीने ८८६ पैशात ठाण्यास जात व परत येत असत. तुकाराम बाप्पाजी हे ठाण्यास राहत असत.

कलेक्टरकडे सत्याग्रह धरणे धरले : ह्यावेळीं सरकारकडे म्हणजे ठाण्याचे कलेक्टरचे कचेरीसमोर १० वर्षांवरील सर्व मुलें, पुरुष, स्त्रीया यानीं धरणें धरले कीं, एवढ्या लोकांचे अन्न सरकारनें काढूं नये. मुलक कलेक्टर यांनीं ह्या मोर्चास भेट दिली नाहीं हाफीसात बसून राहिले. त्यानीं त्या दीन जनाकडे पाहिले नाहीं. चारपांच माणसांना आंत बोलाविलें व तुच्छतेनें त्यानें त्याना परत जाण्यास सांगितलें. ह्या सर्व वेळीं रोज तुकाराम बाप्पाजी कलेक्टरची भेट घेत पण व्यर्थ. शेवटीं वर लिहिलेला अर्ज प्रिव्हीकौन्सीलकडे पाठविला.

कौन्सीलला अर्ज : हा अर्ज अणजूरास आणला त्यावेळी सर्व इनामदार देवखोलीत जमले. निळाजी मोरोबा ह्यांचे हस्ते श्रीसिद्धिविनायकास अभिषेक घातला. रावजीबापू पंडित याचे हस्ते सिद्धिविनायकाची षोडशोपचार पुजा केली. सर्व इनामदारानीं शुचिर्भुत होऊन श्रीसिद्धिविनायकास आळवून नमस्कार केला कीं हे गंडातर तूंच नाहीसे कर. आजपर्यंत तू अशी अनेक गंडातरें दूर केली आहेस. आम्ही १०० ब्राह्मण बोलावून तुझी पुजा करून मोठा उत्सव करूं असे विनवून सर्वांनी देवखोलीत अर्जावर सह्या केल्या॰ तो अर्ज पुढें विलायतेस पाठविला. २॥ महिन्यानंतर निकाल आला कीं अणजूर हे वतन नव्हे जात ईनाम आहे हें अर्जदारांचे म्हणणे प्रिव्ही कौन्सीलनें मान्य केले व इनाम गांव जप्तीतून मोकळा करण्याचा हुकुम आला. त्या हुकुमान्वये पांच शाखेतल्या पांच प्रमुखांचे नावे इंग्रज सरकारने राणीचे नावाने नवीन सनद दिली तिची नकल जोडली आहे.

दाव्याचा निकाल : हुकुम येण्याचे आधले रात्रीं निळाजी मोरोबा याची आई सरस्वतीबाई यांना स्वप्न पडले कीं एक ब्राह्मण कपड्या पागोट्या सुद्धां येऊन त्यानें निकाल अनुकुल लागल्याचें सांगितले. ते स्वप्न सरस्वतीबाईनीं मुकुंदनानाना सांगितले. त्यानीं निळाजीना पहाटेस ठाण्यास पाठविले. तुकारामतात्या कलेक्टरचे हपीसांत गेले त्यावेळीं त्याना निकाल ईनामदाराचे बाजूचा लागलेला समजले.

इनाम जिंकले : त्याप्रमाणें भिवंडी कचेरीतून इनामदारांना १०,००० रुपये मिळाले. त्यावेळीं बाबाजी लक्ष्मण हे मामलेदार भिवंडी येथे होते. पैसे मिळण्यास रात्र झाल्यामुळें इनामदार रात्रीं सर्वजण पेठेत राघो पाटील याचे येथे राहिले. धनाजीचेकडे कांही राहिले. वरील रुपयांतले २५०० देवाप्रित्यर्थ बाजूला काढले व बाकीचे पैसे वाटण्यांत आले. सन १८८५ मध्यें देवाचा उत्सव करण्याचे ठरविले. त्या पैशातून देवाला सोन्याचा किरीट व सोन्यांची कंठी केली.

समारंभ : त्या प्रसंगानिमित्त फार मोठा समारंभ करण्यांत आला. सर्व ज्ञातीचे ब्राह्मण बोलाविले होते. ज्ञातीतील बहुतेक सर्व प्रमुख सद्‌गृहस्थांना आमंत्रण दिले होते. सिताराम ओवळेकर त्यावेळचे मामलेदार ह्याच्या तोडीचे सर्व ऑफीसर आले होते. कलेक्टर ऑफिसांतले व मामलेदार कचेरींतले सर्व अंमलदार कारकून हजर होते. जनार्दन गोपाळ, जनार्दन राघोबा वगैरे ज्ञातीतले सद्‌गृहस्थ हजर होते. हा सर्व समारंभ पाच दिवस चालला होता. श्री सिद्धीविनायकाची मूर्तीची प्रतिष्ठापना पाच दिवसाकरिता ओट्यावर केली होती. उत्तम मखर तयार केले होते त्याकरिता ओट्याचा दक्षिणेचा दरवाजा बंद केला होता. आरास उत्तम केली होती. अंगणांत मोठा मांडव घातला होता. मुख्य दिवशीं अभिषेक करण्यात आला. महारुद्र घालण्यांत आला. त्याकरितां कल्याण मुंबईहून ब्राह्मण आणले होते. १०० ब्राह्मण जेवणास होते बँड आणला होता पाचवे दिवशीं नायकीण आणली होती पण ही गोष्ट तुकाराम तात्याना आवडली नाहीं. सरकारी नोकर वर्गाला मानाप्रमाणें शालजोड्या, उपरणी धोतरे, बक्षिस दिली. ब्राह्मण भोजनानंतर तिखट जेवणही होते. ह्यावेळी तुकाराम तात्यांचा मोठा सन्मान करण्यांत आला. त्याना छापलेले कविताबद्ध मानपत्र देण्यांत आले. हे मानपत्र मझ्या लहानपणी कै. मदन दादाजी यांचे दिवाणखान्यांत कांचेत घालून लावलेले मी पाहिले आहे. हल्ली त्याची प्रत मिळत नाही. उत्सवाचा एक भाग म्हणून भागवत पुराणाचा सप्ताह करण्यांत आला. आप्पा शामभट भिवंडीकर यांनी सप्ताह केला. हा नारायणरावजी पंडीताचे आतेचा नवरा. मात्र ह्या उत्सवाचे समाप्तीनंतर दोनच दिवसांनी मुकुंद पांडुरंग यांची आई आकस्मितरीत्या तुळशीजवळ मरण पावली.

प्रिव्ही कौंशिलचा अर्ज

TO HIS EXCELLENCY THE RIGHT HONORABLE

THE EARL OF KIMBERLEY

Her M's Principal Secretary Of State For India
In Council, Lodon.

The humble Petition of the undersigned Sir Patils of Adgaum in the Collectorate of Thana in the Presidency of Bombay.

Respectfully Sheweth,

That your Lordship's Petitioners submitted a Petition nearly two years ago in respect of their claim to their Inam

right in 2/3 of the village of Anjoor, in the expectation that the Government of Bombay would in due couse forward it to Her Majesty's Government for disposal.

2. From the course followed by the local authorities, they, however, entertain a fear that the Petition has not yet been forwarded, hence they now take the liberty to submit a copy of the same direct, and beg to be excused for this liberty.

3. Their right in the said village had first been attached because they denied that their right theirein was a service Vatan right; and though, with the view of getting rid of the attachment and thus relieving themselves from immediate pecuniary difficulties, they offered to pay under protest (pending a final decision of the dispute) what was required from them on the supposition of its being a service Vatan. The Collector of Thana for a long time declined to raise the attachment and required your Lordship's Petitioners to give an undertaking that they should not sue Government in a Civil Court, but abide by the decision of Her Majesty's Government on the Petition submitted by them two years ago. Their representations to the Government of Bomboy likewise remained unheeded.

4. This was the result to which a long correspondence between your Lordship's Petitioners and the local Authorities led. The history of that correspondence is, however still more strange, and shows how every endeavour had been made by the Collector to reduce the petitioners to dificulties, and force them, if possible, to consent to a compromise of their most valuable rights.

5. The Collector's orders required your Lordship's Petitioners to do what no civilized Government had ever forced its subjects into doing. They asked the Petitioners to forego the right which every loyal subject of Her Majesty the Queen Empress has the happiness to enjoy of obtaining a judicial adjudication in matters within the cognisance of Civil Courts.

6. Fortunately, however, the at achment has been raised in consequence of orders from the Revenue Commissioner Northern Division and yo_r Lordship's petitioners pay (under protest of course) the 5 annas to which the Collector contends their *Inam* rights are liable to be subjected. It need hardly be said how wrong in *principle* it was on the part of the authorities to exact, and dangerous and suicidal it would have been for your Lordship's petitioners to consent to a voluntary abandonment of their *right to sue.*

7. But though the attachment has now been raised, the real cause of the grievance remains, for; the *Inam* right in question has been subjected to a payment to which, your Lordship's petitioners submit, it is not according to Law liable Totally regardless of the proofs from the Peshwa records of an ancient character of your Petitioners *Inam* rights in Anjoor, totally regardless, also, of proofs forthcoming from his own records, regardless also of the opinions of the Revenue Commissoner and the legal Remembrancer, the Collector of Thana has sought to impeach, and the Government of Bombay support him in impeaching, an authoritative decision given in Act 1830—a decision which has the effect of an authoritative adjudication not only by Regulation XVII of 1827 Chapter X under which it was made, but even under that restrictive enactment, Act X of 1876, which while generally depriving Civil Courts of their jurisdiction in claims against Government"to hold land wholly or partially free from payment of Revenue,"(Section 4 Clause F) expressly provides (in the exceptions) that if such a claim is founded "on or adjudication duty passed by a competent officer under Bombay Regulation XVII of 1827, Chapter X" such a claim shall be cognisable in the Civil Courts.

8. This decision alone was enough to set matters at rest and in the Petitioner's favour; but this is not all. In addition to the evidence that they have already referred to in their first Petition your Lordships Petitioners beg leave to append hereto Seven other documents which have since come to

light. Two of these are papers from the Peshva's records in charge of the British Government, the third relates to enquiry that was made in 1850 by the then Huckd Commisioner Mr. Robertson. The other four papers are respectively Extract from the Kaifayat in Suit No. 4542 of 1838 Exhibit 7 and an extract from Sud (account) from the years 1836–37 to 1839–40, mentioned in the Newad Patra. A kabulayat from the Collector's record and a Lettter from the Peishwa's Officer.

9. The papers relating to the time of the Peshwa's Government are dated A. H. 1161 (A. C. 1760) and A. H. 1172 (A. C. 1771). In the paper of Ac. 1760 what is held by your Lordship's Petitioners as service vatan property is *most clearly distinguished from what is hled by them as Inam*, and 2/3 of Anjoor (to which the Petitioners' present claim refers) are there entered as *Inam* (Appendix A).

10. The paper of Ac. 1771 relates Exclusively to Anjoor, and shows that when a new embankment was set back the old one having been washed away by sea and some land was thus lost, it was directed by the Peshwa that the loss should be borne by his Government and the Inamdars in the proportion of their respective interests in the village. (Appendix B).

11. The enquiry that was held by Mr. Robertson in 1850 resulted in a Report to Government in December of that year, that 2/3 of Anjoor belongs to your Lordship's petitioners as Inam. Not having a copy of that Report, your Lordship's Petitioners are unable to give any further particulars about it; they, however, request that it may be called for from the Government Records. They beg to append Mr. Robertson's notice to them, with which that enquiry commenced. (Appendix C).

12. The Extract paras 3 and 9 of the Kaifayat in Suit No. 4542 of 1338 Exhibit 7 and extract from Sud Expressly relate to *Vatan* and *Inam* being distinct. (Appendix D and D 1).



कै. खंडेराव वामनराव नाईक
(एक क्रांतीकारक १९१२)




कै. शामराव वामनराव नाईक




कै. मोरेश्वर रामचंद्र नाईक



कै. गोविंद विनायक नाईक




कै. मुकुंद पांडुरंग नाईक



कै. रामकृष्ण यशवंत नाईक



कै. दत्तात्रय रामचंद्र नाईक



कै. दिवाकर भाई नाईक

13. The kabulayat from the Collector's record dated 15th January 1848 exclusively ralates to Sir Patilki vatan and not the Inam (Appendix E).

14. The letter from the Peshwas Officer relates to both the Sir Patalki vatan and the Inam village of Anjoor. (Appendix F).

15. Your Lordship's Petitioners beg to be graciously pleased also to call for from the Local authorities the report by the Mamlatdar of Bhivandi to the Collector of Thana on his order dated 8th March 1881. As also the Mamlatdar's report to the Commissioner N. D. dated 23rd April 1881 No. 619. The Petitioners being unable to obtain copies of the same they have therefore not appended them hereto.

16. Your Lordship's Petitioners now entreat that on a perusal of this and their first petition your Lordship in Council will graciously be pleased to Exempt their *Inam* rights in the village of Anjoor from liability to any payment to which service vatans alone are by Law subject and thus relieve from great hardship an ancient family which had occupied no unimportant position in days of yore.

17. In conclusion your Lordship's petitioners beg to observe, that there are two grants each of distinct nature viz., the one is a vatan and the other (the two thirds of the Anjoor village) is an Inam grant, that they have been so treated since the date of the grant, and that the Local authorities have either misconstrued the Sanads and other documents in holding the whole of the grant to be one of vatan nature or unduly stretched the language of the said Sanad and the documents in coming to the erroneous conclusion so fatal to their just and recognized rights. Your Lordship's petitioners beg to mention this fact with a view to your Lordship being graciously pleased to give your Lornship's especial and deliberate consideration to those parts of the papers which bear on or allude to this important point when this memorial comes on for hearing before your Lordship.

And your Lordship's Petitioners as in duty bound wi
ever pray.

15th January, 1884.

सह्या

गोविंद विनायक सरपाटील व ईनामदार
Ramchandra Succaram Sir
Patil and Inamdar
गोविंद रघुनाथ सरपाटील व ईनामदार
जैराम चिमणाजी सरपाटील व ईनामदार
तुकाराम बाप्पाजी सरपाटील व ईनामदार
येसोबा बाप्पाजी सरपाटील व ईनामदार

बाबाजी लक्ष्मण सरपाटील व ईनामदार
पुतळाजी गोपाळ सरपाटील व ईनामद
मुकुंद पांडूरंग सरपाटील व ईनामदार
नारायण दामाजी सरपाटील व ईनामद

शंकरराव विनायकवतीनें दत्तात्रय मार्तं

हिज एक्सलेन्सी धी राईट ऑनरेबल

धी अर्ल आफ किंवरले,

हर मँजेस्टीज प्रिन्सिपाल सेक्रेटरी ऑफ स्टेट फार इन्डीया

इन् कौन्सील, लंडन, याजप्रत

मुंबई ईलाख्याच्या टाणा कलेक्टराच्या हद्दीतल्या आटगावच्या खालीं सह्य
करणाऱ्या सरपाटीलांचा विनंति अर्ज सादर निवेदितों कीं,

अणजूर गावच्या ३/३ इनामी हक्कावरील आमच्या स्वामित्वाबद्दल अर्जदारानी एक
अर्ज सुमारे दोन वर्षांपूर्वी, मुंबई सरकारनें राणीच्या सरकारकडे योग्य वेळीं निकालाकरित
पाठवावा म्हणून; सादर केला होता.

२. स्थानिक अधिकाऱ्यांच्या एकंदर वागण्यावरून आमच्या मनांत अशी
भीति निर्माण झाली आहे कीं, तो अर्ज अजून पाठविलाच नाहीं. म्हणून त्या अर्जाची
एक प्रत परभारे पाठविण्याची आम्ही ही संधि घेतो; ह्याबद्दल आम्हाला क्षमा करावी.

३. अर्जदारानीं अणजूर हें गांव 'सर्व्हीस' इनाम आहे ही गोष्ट नाकारली
होती म्हणुन सरकारनें सरपाटीलकीच्या गावाबाबतच्या मूलभूत इनामी हक्कावर जप्त
बसविली होती. गावावरची ती जप्ती उठवून, पैशाच्या तात्कालीक अडचणींतून मोकळीक
करून घेण्यासाठीं, – अंतीम निर्णय जो काय लागेल तो लागेपर्यंत, – स्वतःच्या हक्क

शाबीत करून घेण्याला कोणत्याही प्रकारें हरकत येऊं नये अशा अटीवर हे सर्वीस इनाम आहे अशा नात्यानें आम्ही जे द्यावयास पाहिजे तें सरकारांत भरणा करण्याची तात्पुरती सोय म्हणून कबूली दिली. तरी जिल्हा कलेक्टरानें बऱ्याच वेळपर्यंत जप्ती उठविण्यास नकार दिला, आणि अर्जदारानीं दिवाणी कोर्टात सरकारवर दावा न करता दोन वर्षांपूर्वी सादर केलेल्या अर्जावर राणीसरकारचा जो हुकूम येईल तो पालन करण्याचे कबूल करावें अशी अट घातली. अर्जदारानीं मुंबई सरकारकडे केलेल्या अर्जाची कांहींही दखल सरकारनें घेतली नाहीं.

४. अर्जदारानी स्थानिक शासन संस्थेच्या अधिकाऱ्याकडे केलेल्या सर्व पत्र-व्यवहाराचा असा वरीलप्रमाणें विपरीत परिणाम झाला. त्या पत्रव्यवहाराचा व अर्जाचा सर्व इतिहास असा चमत्कारिक झाला आहे. अर्जदारांना अडचणींत पकडून, त्यांना फार हैराण करून त्यांच्या महत्त्वाचे हक्कांचे बाबतींत, सरपाटलांना मान्यता नसलेली सरकारी तडजोड त्यांच्यावर लादून शक्य तर ती कबूल करण्यास त्यांना भाग पाडावे असे सर्व प्रयत्न कलेक्टर यांनीं केले ही गोष्ट ह्या पत्रव्यवहारांतून दिसून येतें.

५. कोणतेही सुसंस्कृत सरकार आपल्या प्रजाजनावर जी गोष्ट लादण्याची सक्ती कधीच करणार नाहीं तशा प्रकारची गोष्ट करण्याला कलेक्टरांनीं अर्जदारास सांगितलें. दिवाणी कोर्टात जाऊन कोर्टाच्या अखत्यारांतील गोष्टीबाबत न्यायालयीन निवाडा मिळविण्याचा राणी सरकारचे प्रजाजनाना जो सुखद हक्क आहे त्याचा त्याग करण्यास कलेक्टर यांनीं अर्जदारास फर्माविलें.

६. सुदैवानें, उत्तर विभागाच्या रेव्हीन्यु कमिशनराच्या हुकुमावरून कलेक्टराने आतां जप्ती उठविली आहे, व ईनामदारांचा मूलभूत हक्क शाबीत करून घेण्याच्या ईनामदारांच्या अधिकाराला बाध न येईल अशा अटीवर कलेक्टराने ईनाम हक्कावर ५ आणे जादा हिस्सा मागितला तो ईनामदारानी सरकारांत भरला आहे. अधिकारी लोकांनी अर्जदारावर, आपला मूलभूत हक्क सोडून द्यावा म्हणून सक्ती करणें, तसेंच अर्जदारांनीं सरकारवर दावा करण्याचा आपला हक्क स्वेच्छेनें सोडून देण्याला तयार होणें ही गोष्ट तत्त्वतः किती चुकीची होती हें निराळे सांगण्याची जरुरी नाहीं.

७. तथापि आतां जप्ती उठविली असली तरी तक्रारीचे मूळ कारण शिल्लकच आहे. कारण प्रस्तुत ईनाम हक्कावर जी आकारणी केली आहे ती कायदेशीर नाहीं असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराना अणजूरमध्यें ईनामी हक्क आहे याच्या पुष्ट्यर्थ पेशवे दफ्तरांतील प्राचीन व्यवहाराचा पुरावा सरकारनें लक्ष्यांत घेतला नाहीं, किंवा खुद्द

कलेक्टरांच्या दफ्तरांत सांपडणारा पुरावाही अधिकाऱ्यांनी लक्षांत घेतला नाहीं, इतकेच नव्हे तर रेव्हीन्यु कमिशनर व लीगल रीमेंब्रन्सर (सरकारचे कायद्याचे सल्लागार) यांचे मत धाब्यावर बसवून जिल्हा कलेक्टरांनीं इ. स. १८३० च्या कायद्यान्वयें मिळालेल्या अधिकृत निर्णयाविरुद्ध पाऊल टाकले आहे. आणि मुंबईसरकारनें त्याकामीं त्यास पाठींबा दिला आहे. वास्तविक हा निर्णय इ. स. १८२७ च्या १७ व्या रेग्युलेशनच्या दहाव्या प्रकारान्वयें अधिकृतरीत्या योग्य प्रकारें दिला गेला आहे; इतकेच नव्हे तर इ. स. १८७६ चा दहावा कायदा मर्यादित स्वरूपाचा असून सरकाराविरुद्ध महसूल सर्वस्वी न देतां किंवा अंशतः देऊन जमीन धारण करण्याचा हक्क शाबीत करण्याचे बाबतींत दिवाणी न्यायालयांना अधिकार दिलेला नाहीं (कलम, पोट कलम), तरीपण त्यांत अपवाद म्हणून असें स्पष्ट म्हटलेले आहे कीं, इ. स. १८२७ च्या १७ व्या कायद्यांतील दहाव्या प्रकरणांतील तरतुदीप्रमाणें असा हक्क योग्य अधिकाऱ्याच्या निवाड्यावर आधारित असेल तर दिवाणी न्यायालयाकरवी तो शाबीत करून घेता येईल.

८. हा निर्णय लक्षांत घेतला असता तर वास्तविक सर्व गोष्टींचा नीट उलगडा होऊन निर्णय अर्जदारांच्या बाजूनें झाला असता; परंतु आमचा पुरावा इतकाच आहे असें नाहीं. पहिल्या अर्जामध्यें ज्या पुराव्याचा उल्लेख केलेला आहे त्याशिवाय पुराव्या-दाखल आणखी सात दस्तऐवज दाखल करण्याची आम्ही परवानगी घेऊं इच्छितो. हे दस्तऐवज नंतर उपलब्ध झाले आहेत. त्यापैकीं दोन दस्तऐवज ब्रिटीश सरकारच्या ताब्यांत असलेल्या पेशवे दफ्तरांतील आहेत; तिसरा दस्तऐवज इ. स. १८५० मध्यें हक्क कमिशनर मि. रॉबर्टसन यांनीं केलेल्या चौकशीबाबत आहे; बाकीचे चार दस्तऐवज आहेत ते असे— इ. स. १८३८ च्या दावा नं. ४५४२ मधील निशाणी नं. ७ मधील कैफियतींतील उतारा म्हणजे पहिला दस्तऐवज आणि इ. स. १८३६-३७ ते ३९-४० ह्या अवधींतील जमाखर्चांतील (सूड) उतारा म्हणजे दुसरा दस्तऐवज असा एक आहे; निवाडापत्रांत त्यांचा उल्लेख आहे. कलेक्टराच्या दफ्तरांतील एक कबुलायत असा तिसरा दस्तऐवज असून पेशव्यांच्या अधिकाऱ्यानें लिहिलेले एक पत्र हा चौथा दस्तऐवज आहे.

९. पेशवे सरकारच्या वेळचे जे कागद आहेत ते A. H. ११६१ (A. C. १७६०) व A. H. ११७२ (A. C. १७७१) ह्या काळांतील आहेत. इ. स. १७६० च्या कागदपत्रांत अर्जदाराकडे जात इनाम म्हणून असलेल्या जमिनीपासून 'सर्व्हीस' इनामाची जमीन अगदीं अलग दाखविलेली असून ३ अणजरचा उल्लेख इनाम म्हणून केलेला आहे. आणि याच बाबतींत अर्जदार आपला हक्क सांगत आहेत. (परिशिष्ट A).

१०. इ. स. १७७१ चा जो दस्तऐवज आहे तो सर्वस्वी अणजूरबाबत आहे. त्यावरून असे दिसून येतें कीं, समुद्राच्या पाण्यानें जुना बांध वाहून गेला व नवीन बांध मागच्या बाजूस घातल्यानें थोडी जमीन वाया गेली तेव्हां पेशवे सरकारने असा हुकुम दिला कीं, सरकार व ईनामदार यांचे हक्क ज्या प्रमाणांत आहेत त्या प्रमाणांत ही नुकसानी प्रत्येकाने सोसावी. (परिशिष्ट B).

११. इ. स. १८५० मध्यें मि. राबर्टसन यांनीं चौकशी करून त्याच वर्षीच्या डिसेंबरमध्यें असा अहवाल सादर केला कीं, दोन तृतीयांश अणजूर प्रस्तुत ईनामदारांच्याकडे ईनाम म्हणून आहे. त्या अहवालाची प्रत आमच्या हातीं नसल्याकारणानें प्रस्तुत अर्जदारांना त्याबद्दल अधिक माहिती देतां येत नाहीं. तो अहवाल सरकारी दफ्तरांतून मागऊन घ्यावा अशी आमची विनंति आहे. मि. राबर्टसन यांनी आम्हाला नोटीस देऊन चौकशी सुरू केली. ती नोटीस सोबत जोडली आहे. (परिशिष्ट C).

१२. इ. स. १८३८ च्या ४५४२ दाव्यांतील निशाणी नं. ७ कैफयतीच्या ३ व ९ परिच्छेदांचा उतारा आणि सूड मधील उतारा वतनाचा व वतनाबाबत आहे हें त्यावरून स्पष्ट होते. (परिशिष्ट D व D १).

१३. कलेक्टरच्या दफ्तरांतील १५ जानेआरी १८४८ ची कबुलायत सर्वस्वी सरपाटीलकीच्या वतनासंबंधीं आहे. व ईनामासंबंधाने नाहीं. (परिशिष्ट E)

१४. पेशव्याचें अधिकाऱ्यांचे जे पत्र आहे ते अणजूर गावाचे सरपाटीलकी वतन व इनामसंबंधीं आहे.

१५. अर्जदारांची अशी नम्र विनंति आहे कीं, ठाण्याचे कलेक्टर यांनीं ८ मार्च १८८१ ला काढलेल्या हुकुमावर भिवंडीच्या मामलेदाराचा जो अहवाल आहे तो स्थानिक अधिकाऱ्यांचेकडून मागऊन घेण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणें उत्तर विभाग कमिशनरकडे मामलेदारानीं २३ एप्रील १८८१ ला नं. ६१९ नें जो अहवाल केला आहे तोही त्याचप्रमाणें मागऊन घ्यावा. त्यांच्या प्रती मिळविणें शक्य न झाल्यामुळे त्या ह्या अर्जासोबत जोडलेल्या नाहींत.

१६. अर्जदाराचीं आता आपणाकडे अशी विनंति आहे कीं, हा अर्ज आणि पहिला अर्ज ह्यांची पहाणी करून अर्जदारांचे अणजूर गावांत जे इनाम हक्क आहेत त्यावर व सर्व्हीस इनामावर ज्या प्रकारचे देणे कायद्याने बसू शकते तशा प्रकारचे कांहीं देणे नाही असा निवाडा देऊन गतइतिहासांत उत्तम प्रकारचा दर्जा संपादन केलेले ह्या जुन्या कुटुंबाला अडचणीतून व त्रासांतून मुक्त करावे.

१७. अर्जदारांचे शेवटी तुम्हाला असे नम्र निवेदन आहे कीं, दोन स्वतंत्र अशी दानें (ग्रँटस) आहेत. एक वतन आहे. व दुसरे (अणजूर गावच्या ⅔ हिश्याचे) इनाम आहे. तीं मिळाल्यापासून अर्जदारांना त्याप्रमाणेच वागविले आहे. आणि स्थानीक अधिकाऱ्यानी ती सनद व इतर कागदपत्र याचे रचनेची चुकीची ओढाताण करून अर्जदाऱ्याच्या सर्वथा मान्य अशा हक्काना बाध येईल असा अर्थ लावला आहे. नामदारांनीं हे प्रकरण त्यांच्या पुढें सुनावणीस येईल तेव्हां या सर्व कागदपत्रांचा नीट विचार करावा अशी अर्जदारांची नम्र विनंति आहे.

अर्जदार नेहमी निष्ठावंत रहातील १५ जानेआरी १८८४

सह्या

गोविंद विनायक सरपाटील व ईनामदार
Ramchandra Succaram Sir Patil and Inamdar
गोविंद रघुनाथ सरपाटील व ईनामदार
जैराम चिमणाजी सरपाटील व ईनामदार
तुकाराम बाप्पाजी सरपाटील व ईनामदार
येसोबा बाप्पाजी सरपाटील व ईनामदार
बाबाजी लक्ष्मण सरपाटील व ईनामदार
पुतळाजी गोपाळ सरपाटील व ईनामदार
मुकुंद पांडुरंग सरपाटील व ईनामदार
नारायण दामाजी सरपाटील व ईनामदार
शंकरराव विनायकवतीनें दत्तात्रेय मार्तंड

इनाम निराळे, वतन निराळे यास पुरावे

(**Appendix A**)

(*Referred to in para 9, supra*)

Copy

(The seal of the Inam Commission)

A distinct head abstracted from the Ghadni or paper kept by the Kulkarni. From the Raja mandal Sivaji Rajashri Pant Pradhan to Ramaji Mahadeo at Prant Salsette (in the year) Suma Ihide Sitain mayava alaf. This is a copy of the

Sanad which has been registered in respect of the debt received from the Anjurkars Karju puter the Sir Patils, where of mention has been made in the above letter in the general memorandum book (or ghadni) Chandra 2 Saval vishakh. Out of the Prant aforesaid (a portion) is with (or enjoyed by) Shankaraji Keshao the Sir Patilki of the Prant aforesaid is granted in Inam and vatan to the Anjurkara; as to that, at the time when a general list of their debts was taken from the said individuals, the revenue of (the portion) aforesaid on being included in the memo of the general list of debts, and on the same being paid off, has been received into the Sirkar; consequently at present you are not to offer any molestation to the Vatan and Inamati and Isapati of the aforesaid individual (Shankaraji Keshao) you are to return whatever revenue you may have received, clauses :—

Tho portion of the revenue in connection with the aforesaid vatan, due from every village distributively. Clause.

One third share out of Inam the Maoji Anjoor is received into the Sirkar; the rest is with (or enjoyed by) the aforesaid individuals. Clause.

One sixth share (or portion) out of what is mentioned in the two ciauses belongs to the aforesaid individual (Shankaraji Keshao), to this effect (there is) letter to the said individual. A Rasangi memo is with the Chitnis (or Secretary).

Translated by me
Ganpatrao Nanabhai,
Assistant Translator.
24th February, 1882.

(Appendix B)

(Referred to in para 10 supra)

The seal of the Inam Commissioner

(This is) a copy of a Sanad in the name of Ramaji Mahadeo in the records and papers of the Rojkird o the Swari Rajashri.... Pant Pradhan for the year Suma Issanne Sabain Mayawa Alaf, chandra 14th saval in respect of the ground out of the Khar (or salt batty ground,) situated at Maoji Tarf Atgao and Taluka Salsette.

You made a request to the Huzur saying "that at Maoji Anjoor Tarf Atgao, Taluka Salsette there is a Khar (or Salt) batty ground, yielding two hundred Mudas of Dhemp (or assessment upon arable land last year, there being heavy spring tides, the embankment thereof was washed away to the level of the ground; the embankment of the salt batty ground at the space across the mouth of the sea being very old; i. e. of the time of the Portuguese Goverment was broken down by the force of the water it had to be preserved in good condition, but the force of the water being great, inlets on being formed in several places in the embankment, and water rushing in, the land was rendered salt (and) unfit for cultivation; therefore on leaving out (a portion of) the land and constructing a new embankment inside the same, the Khar [or salt batty ground] was saved. The assessment upon arable land in Mahasuli Panchvisi mudis in respect of the land left out (is as follows):—

24. 19 [in respect of] the two shares [given] in Inam to the Sir Patils.

12–9¼ [in respect of] the Sirkar's portion, third share.

In all thirty seven Mudas and three maunds and a quater whereof twenty four Mudas and nineteen maunds in respect of the estimated assessment of two shares [given] in Inam,

and twelve Mudas and nine maunds and a quarter in respect of the estimated assessment of the Sirkar's one third share, it has been agreed from (or by) the subha to be deducted out of the general assessment according as there may be cultivators & c. j according to that an agreement should be made and given from (or by the Huzur.) In pursuance thereof, this Sanad has been issued to you to the effect that according to the agreement made from [or by] the Subha to give a deduction of the aforesaid thirtyseven Mudas and three Maunds and a quarter in respect of the estimated assessment out of the general assessment in respect of the land which has been left outside the embankment of the salt batty ground, an agreement has at present been made from (or by) the Huzur, so that a deduction having to be made in the general assessment, two shares of the expense will continue to be less upon the Inam, at lands and one share will be less out of the Sirkar's general assessment. To this effect there is Sanad in the name of Ramji Mahadeo.

Translatd by me.
Ganpatrao Nanabhai,
Assistant Translator
15th December, 1882.

(Appendix C)

(referred to in para 11 supra)

No. 113.

To

Rajasri Sir Patil Inamdar,
Maoji Anjur

The special request is as follows :— Since two shares of the aforesaid village continued to be in Inam with you, it is necessary to take your own statements under clauses 3 and

5 of the order, No. 734, of the 9th day of May, in the year 1850 consisting of five clauses, received from the Meherban Archibald David Roberts on Esquire, the Commissioner for investigating the claims of Hakkadars in the Northern Division, you should therefore, within 3 three days from the receipt of this order, be present in the Katcheri (court or office) of the Taluka aforesaid. Dated the 14th day of May in the year 1850.

For the Acting Mamlatdar,
Sivaram Bhagwan Korde,
Shirastedar.
Translated by me,
Ganpatrao Nanabhai,
Assistant Translator.
24th February, 1882.

(Appendix D)

(referred to in para 12 Supra)

Extract Paras 3 and 9 of the Kyfiyat dated 7th August 1837 A. D. in Suit No. 4542 of 1838, Exhibit 7.

To,

John Newborn Esquire, Collector and Divani Court Thana.

From,

Raghupaty Bapuji Naique Guardian of Keshovarao Vasudev and Moroba Vasudev Infant heirs of Ganpat Nimbaji Naique and Raghupati Bapuji Naique himself and Janordan Hariba Naique, Raghoba Hariba Naique and Narayan Jayaram Naique.

Para 3- Government have given Vatan and Inam to us in perpetuity for Enjoyment and Subsistance of our family. None save the members of our family will have a share there

in or there of as owners and up to now there has never been a share enjoyed by any one not a member of our family as a owner. The British Government has in Regulation xvi of 1827 Sec. 20 Clauses 1 and 2 passed by the Governor in Council ruled that the vatan shall continue and remain in the family of the vatandar alone for Enjoyment.

Para 9- The other cause is as follows : If the Plaintiff's claim was just in respect of the 1/6 part of our Inam in the Peshwa's Government he was in power and it is now Since about 20 years Britan Reigns and the Plaintiff's father was alive for many years he is now dead, since about 2 years. He would not have remained quiet without bringing a Suit in Court and under the British Government every one is aware that in either Inam or vatan a Sharer does not get his share peaceably he should go to Court and accordingly some people have by Suits obtained their rights in Inams and vatans. And the Plaintiff's father did not before this in respect hereof bring either suit or apply to Government for relief.

(Appendix D1)

(account)

Translation of a portion of a Marathi sud account from the year 1836/37 to 1839/40.

In the year 1836/37 395

The Plaintiff in his sud (account) has debited Rupees 125 to the name of Balkrishna Balal but on enquires having been made it appeared from the depositions of witnesses Exhibits 49 to 51 that the said Karkun has been doing writing business relating to two shares of mouje Anjoor which have been given in Inam and also in connection with the Sir Patilki vatan, and in the Nivad Patra it is (mentioned) that he shculd perform the writing (business) with regard to vatan

cnly. Cansequently Rs. 75 are deducted by rough calculation on account of the work relating to the Inam village. Which he has been doing, Balance ....50.

(Appendix E)

(referred to in para 13 supra)

Translation of a Kabulayat dated 15th January 1845 Between the Collector of Thana and the undersigned Sir Patils of Turf Atgaun Taluka Bhivandi Sur San Saman Arbiyan Maya tainva Alff 1847/48 Towit the Rao Saheb Mamlatdar of Taluka Bhivandi has ordered as to appoint a Mukhtiyar for the conduct of business in connection with the Sir Patilki as provided in Act v of 1833, Section 4 and Act 11 of 1843 and in acccordance to the Huzur orders Nos. 21-2 and outward No. 936 respectively dated the 17th February 1834, 2nd February 1847. and 29 June 1847 In obedience to the above we do hereby appoint for us and on our behalf Bhai Shivaram Naique Sir Patil our Mukhtiyar from the Current year 1847-48 to 1851-52 for five years certain undertaking to pay him Ruppes 75 per annum for pay out of the Sir Patilki Hack. The said Mukhtiyar shall not be removed without the Collector's order. If any default or irregularity be made by the said Mukhtiyar in respect of documents or otherwise or in case of absenting himself without leave of the Collector or abscounding himself we shall abide by the orders of the Collector in respect thereof made in conformity with the Regulations &c., we shall not plead the absence of the mukhtiyar or any one else. Our vatan is answerable for the acts of the Mukhtiyar. We and our Estates Heirs will abide by these presents. The salary fixed for the Mukhtiyar should be paid to him, on his performing services to the satisfaction of Government, out of the vatan. In case the mukhtiyar being found unfit by Government within the period stated above or abscouding himself another Mukhtiyar

shall with the approval of Government be appointed by us but if any delay be caused in so doing Government may appoint one for the time being and pay him out of the income of our vatan. The same is given in writing with full power and in proper sence. Handwriting of Trimbak Lakshuman Chowbal a Carkun in Taluka Bhivandi.

Attestations	*Signoturcs*
Lackshuman Raghunath Joshi Karkun.	Vishwanath Harbaji Naik, Sir Patil.
	Lackshuman Janordan Naik, Sir Patil.
Balkristna Balal of Anjoor.	Vithal Janordan Naik, Sir Patil.
	Bappaji Jaganath Naik, Sir Paiil.
	Sakharam Shivram Naik, Sir Patil.
	Pandurang Vithoba Naik, Sir Patil.
	Babaji Raghunath Naik, Sir Patil.
	Sakharam Chemaji and Putlaji Gopal Naik, Sir Patils by Bhagwantrao Moroji, Hand writing of Trimbak Krishna Shonde.

(Appendix F)

(referred to in para 14 supra)

Translatlon of a Letter to Shivaji Naik Anjoorkar from Madhowrao Bhokse Armar. Moon, 19th of the month Rabil Aval Sur San Sab Arabyan vaalaf To wit after salutations & c. from you is a years amount due in respect of the Sir

Patilki vatan and the Inam village of Anjoor. Rs. 4,000 are ordered to be paid towards the expenses of the Armar Sidi Anman and vajir Mehomed are sent, therefore send the sum to Janjira Armar and take acknowledgement.

परिशिष्ट ' प '

[परिच्छेद ९ मध्यें उल्लेखिलेले]

नक्कल

(ईनाम कमिशनचा शिक्का)

कुळकर्णी यानीं ठेवलेल्या घडणींतून म्हणजे एका खतावणींतून अलगपणें काढलेले खातें, राजमंडळ शिवजी राजश्री पंतप्रधान यांचेकडून रामजी महादेव, साष्टी प्रांत याला सुमा इहिदे सितैन मयावा अलफ. (या वर्षी दिलेली) एका सनदेची ही नक्कल आहे. ती कर्जाचे बाबतींत दाखल केलेली आहे. हें कर्ज अणजूरकर करजू पुटर सरपाटील यांचेकडून मिळाले आहे. ह्या कर्जाचा उल्लेख उपरिनिर्दीष्ट घडणींतील कागदांत चंद्र २ सावल वैशाख (ला केलेला) आहे. वर उल्लेखलेल्या प्रांतापैकीं एक लहानसा भाग शंकराजी केशव यांचेकडे भोगवट्यास आहे. ह्या प्रांताची सरपाटीलकी ईनाम आणि वतन म्हणून अणजूरकरांना दिलेली आहे. या रकमाकडून कर्जाबाबत यादी केली तेव्हां उपरीनिर्दिष्ट भागाच्या उत्पन्नाच्या उत्पन्नाचा त्यांत समावेश केला होता. कर्ज देऊन झाल्यावर तो भाग सरकारकडे आला आहे. म्हणून वर उल्लेख केलेला इसम (शंकराजी केशव) याचें वतन ईनामती व इसापती हक्काना तुम्ही त्रास देऊं नये. तुमच्याकडे जो वसूल आला असेल तो त्यास द्यावा.

कलमें : वर उल्लेख केलेल्या वतनाबाबत प्रत्येकाकडे यांतून वाटपाप्रमाणे मिळावयाच्या उत्पन्नाचा हिस्सा. कलमः— मौजे अणजूरच्या ईनामाचा एक तृतीयांश हिस्सा सरकारकडे आला आहे; बाकीच्या हिश्याचा वर उल्लेख केलेल्या असामीनीं भोगवटा घ्यावयाचा आहे. कलमः— दोन कलमांत उल्लेख केलेल्याचा एक षष्ठांश हिस्सा उपरिनिर्दिष्ट व्यक्तीचा (शंकराजी केशव) याचा आहे. ह्याबाबतचे त्या व्यक्तीला पत्र आहे. रासनगीचा मेमो चिटणिसाकडे आहे.

दस्तुर खुदनें भाषांतर केले. २४-२-१८८२

गणपतराव नानाभाई असिस्टंन्ट ट्रान्सलेटर.

परिशिष्ट 'बी'

[परिच्छेद १० मध्यें उल्लेखलेले]

(ईनाम कमिशनचा शिक्का)

स्वारी राजश्री ………… पंतप्रधान यांचा सुमा इसने सबैन मयावा अलफ. चंद्र १४ सावाल या वर्षीच्या रोजकीर्दीच्या दफ्तरांत रामाजी महादेव यांच्या नावें असलेल्या सनदेची ही नक्कल आहे. मौजे तर्फ आठगांव आणि तालुका साष्टी, मधील खाग्जमनी बाबतची ती आहे

हुजूराकडे तुम्ही अर्ज केला कीं, मौजे अणजूर तर्फ आठगांव, तालुका साष्टी, येथें खार जमीन आहे. ती जमीन २०० मुडा ढेप इतका सरकारी धारा देते. अतिशय पाऊस पडल्यामुळें भरतीचे पाणी तुफान चढून बांध जमीनदोस्त झाले. समुद्राच्या तोंडाशीं असलेल्या खाऱ्या जमीनीचा बांध पोर्तुगीजाचे वेळेपासूनचा असा जुना असून तो नीट राखणे जरुर असते. पण पाण्याचा जोर फार होऊन बांधामध्यें ठिकठिकाणी भगदाडें पडली, आणि खारे पाणी आंत घुसले. त्यामुळें ती जमीन खारी होऊन शेतीला अयोग्य अशी झाली म्हणून थोडी जमीन बाहेर सोडून आंतल्या बाजुला बांध घालून खार जमीनीचा बचाव केला. जी जमीन सोडली तीजवरील महसुल पंचविशी मुडींतील महसूल (पुढील प्रमाणें) आहे. सरपाटील याना ईनाम दिलेल्या दोन भागापैकीं २४–१९ सरकारच्या एक तृतीयांश हिस्स्यापैकीं. १२ – ९¾ ० एकूण मुडे ३७ व मण ३। पैकीं इनाम दिलेल्या दोन भागाचे २४ मुडे व १९ मण व सरकारच्या ⅓ एक तृतीयांश हिस्स्यावरील महसूल १२ बारा मुडे व ९। मण हें आहे. जितके शेतकरी असतील तितक्या प्रमाणांत सर्व सामान्य महसूलातून कमी करण्याचे हुजूरानीं कबूल केले आहे त्याप्रमाणें करारपत्र करून घ्यावयाचे आहे. त्या अनुसार ही सनद तुम्हाला देण्यांत येत आहे; कीं, खार जमीनीच्या बांधाबाहेर सोडलेल्या जमिनीचे बाबतींत कुलमहसुलापैकीं संबंधित वाटा म्हणून वर उलेखिलेल्या प्रमाणें ३७ मुडे व ३। मणाची सूट देण्याचें सुभ्यानें कबूल केले आहे त्याप्रमाणें हुजूरानीं आतां करार केला आहे म्हणजे कुल महसुलात सूट घ्यावयाची आहे. त्यासाठीं ईनाम जमिनीवर खर्चा-पैकीं दोन भाग कमी बसतील आणि ह्या सरकारच्या कुल महसूलातून एक भाग कमी होईल. या अर्थाची सनद रामाजी महादेव याचें नावें करून दिलेली आहे.

दस्तुर खुदनें भाषांतर केले, गणपतराव नानाभाई.
ॲसिस्टंन्ट ट्रान्सलेटर १५ डिसेंबर १८८२.

परिशिष्ट 'सी'

(परिच्छेद ११ मध्यें उल्लेखलेले)

नंबर ११३

राजश्री सरपाटील ईनामदार मौजे अणजूर यांस :—

मुद्दाम केलेली विनंती अशी कीं, उपरिनिर्दिष्ट गावचा दोन तृतीयांश हिस्सा तुमच्या कडे ईनाम आहे, त्याअर्थी उत्तर विभागांतील हक्कदारांच्या प्रकरणांतील चौकशी करण्याकरितां नेमलेले कमिशनर मेहेरबान आर्चिबाल्ड डेव्हीड रॉबर्टस ऑन इस्कायर यांनीं ९ मे १८५० ला नं. ७३४ चा ५ कलमी हुकुम काढला आहे त्यांतील ३ आणि ५ कलमान्वयें तुमचा जबाब घेणे जरूर आहे म्हणून हा हुकुम मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत तुम्ही तालुका कचेरीत हजर व्हावे. १४-५-१८५०.

दस्तुर खुदनें भाषांतर केले. गणपतराव नानाभाई. शिवराम भगवान कोर्डे

असिस्टन्ट ट्रान्सलेटर शिरस्तेदार

२४-२-१८८२. ॲक्टींग मामलेदार म्हणून


परिशिष्ट 'डी'

(परिच्छेद १२ मध्यें उल्लेखिलेल)

दावा नं. $\frac{४५/४२}{१८३८}$ चा मधील निशाणी नं ७, ता. ७ ऑगस्ट १८३७ च्या कैफीयतींतील परिच्छेद ३ व ९ चे उतारे.

जान न्युबॅन, एस्कायर कलेक्टर व दिवाणी कोर्ट ठाणें यांस.


गणपत निंबाजी नाईक यांचे वारस केशवराव वासुदेव व मोरोबा वासुदेव ह्या उभयतांचे अज्ञान पालनकर्ते रघुपती बापुजी नाईक यांचेकडून व स्वतः रघुपति बापुजी नाईक, जनार्दन हरिबा नाईक, राघोबा हरिबा नाईक व नारायण जयराम नाईक यांचेकडून.



कै. रामचंद्र सखाराम नाईक



कै. गजानन नारायण पंडीत, उपाध्याय अणजूर



कै. भालचंद्र जयराम नाईक



कै. कमळाकर जगन्नाथ नाईक



कै. रघुनाथ गोविंद नाईक,



कै. चिंतामण रावजी नाईक

परिच्छेद ३ : सरकारनें आम्हाला आमच्या कायमच्या योगक्षेमासाठीं व भोगवट्यासाठीं ईनाम व वतन वंशपरंपरागत दिलेलें आहे. आमच्या कुटुंबीयाखेरीज कोणालाहि मालक म्हणून त्यांत हिस्सा नाहीं. आणि आतांपर्यंत आमच्या कुटुंबियाखेरीज इतर कोणीही त्यांचा मालक म्हणून उपभोग घेतलेला नाहीं. गव्हरनर इन कौंसील यांनीं इ. स. १८२७ चा नंबर २६ चा कायदा केला आहे त्यांतील कलम २०, पोट कलम १ व २ प्रमाणें ब्रिटीश सरकारनें ठराव केला आहे कीं, हें वतन वतनदाराच्या कुटुंबीयाकडे उपभोगासाठीं चालू राहील.

परिच्छेद ९ : दुसरें कारण असे कीं, वादीचा इनामाच्या एक षष्ठांश हिस्शाचे बाबतींतला हक्क न्याय्य असता तर पेशवे सरकारचे वेळीं तो अधिकारावर असताना व नंतर गेली २० वर्षापासून ब्रिटीशांचे राज्य आहे, त्यादरम्यान वादीचा बाप दोन वर्षांपूर्वी मरण पावला तोपर्यंत त्यानें कोर्टात दावा लावला असता, कारण ब्रिटीश अमदानींत हें सर्वांना माहित आहे कीं, एखाद्या हक्कदाराला इनाम वा वतनांतील हिस्सा शांतपणें व सलूख्यानें मिळत नसेल तर त्यानें कोर्टात जावे. त्याप्रमाणें काहीं लोकांनी दावे लाऊन इनाम व वतनाचे बाबतीतले आपले हक्क शाबीत करून घेतलेले आहेत. वादीच्या वडीलानीं याबाबतींत दावा लावलेला नाहीं किंवा सरकारकडे अर्ज करून दादही मागितलेली नाही.

परिशिष्ट 'डी१'

(हिशोब)

इ. स. १८३६।३७ ते १८३९।४० च्या मराठीतल्या जमाखर्चाच्या एका भागाचे भाषांतर.

इ. स. १८३६–३७ मध्यें ३९५

वादीनें आपल्या हिशोबांत बाळकृष्ण बल्लाळ यांचें नांवें १२५ रु. खर्ची घातले आहेत परंतु चौकशीत असे निष्पन्न झाले आहे कीं, साक्षीदार–निशाणी नं. ४९ ते ५१ यांच्या जवाबावरून असें दिसून येतें कीं, मौजे अणजूरच्या ईनाम व सरपाटीलकी

वतनाच्या व्यवहारांतील दोन हिश्शाचे जमाखर्च व खतावण्या लिहिण्याचें काम तो कारकून करतो आणि निवाडपत्रांत असे स्वच्छ केले आहे की, त्यानें फक्त वतनाच्या व्यवहाराची लिखापटी करावी. म्हणून ईनाम गावचे बाबतींतील कच्च्या हिशोबानें ७५ रुपये त्यांतून वजा केले आहेत त्याप्रमाणें तो करतो .... बाकी ५०.

परिशिष्ट 'ई'

(परिच्छेद १३ मध्यें उल्लेखलेले)

ठाण्याचे कलेक्टर व खाली सह्या करणारे तर्फ आठगाव तालुका भिवंडीचे सरपाटील याजमधील ता. १५ जानेवारी १८४८ च्या कबुलायतेचे भाषांतर, सुरु सन समान अर्बैन मया तिनवा अलफा १८४७।४८; ती अशी की, भिवंडी तालुक्याचें मामलेदार रावसाहेब यानीं, इ. स. १८३३ च्या पाचव्या कायद्याचे कलम ४ आणि १८४३ चा अकरावा कायदा या अन्वयें आम्हाला हुकूम केला आहे की, सरपाटीलकी-बाबत आम्ही मुखत्यार नेमावा आणि हुजुराचे हुकुम नं. २१–२ आणि जावक नं. ९३६ चे – ज्यांच्या तारखा अनुक्रमें १७ फेब्रुआरी १८३४, २ फेब्रुआरी १८४७ व २९ जून १८४७ अशा आहेत. त्यांत म्हटल्याप्रमाणें वरील हुकुमानुसार आम्ही आमच्याकरितां व आमच्या वतीनें भाई शिवराम नाईक सरपाटील यास चालू वर्ष १८४७–४८ व १८५१–५२ अशा पांच वर्षांकरितां मुखत्यार नेमतो. व त्यास पगार म्हणून सरपाटीलकी हक्कांतून वर्षाला ७५ रु. देण्याचे कबूल करतो. सदर मुखत्यारास कलेक्टराच्या हुकुमाशिवाय कामावरून दूर करतां येणार नाहीं. त्या मुखत्यारानें कागदपत्राचे बाबतींत किंवा अन्यप्रकारें कांहीं लबाडी वा गैरव्ययस्था केली किंवा कलेक्टराच्या परवानगीशिवाय तो गैरहजर राहिला किंवा स्वतः फरारी झाला तर कलेक्टर त्याबाबतींत कायद्यांतील तरतूदीप्रमाणें जो कांहीं हुकुम करतील तो आम्ही मान्य करू. आणि मुखत्यार वा अन्य कोणी गैरहजर आहे अशी सबब सांगणार नाहीं. मुखत्यारांचे सर्व कृत्याबाबत आमचे वतनच जबाबदार राहील. आम्ही आमचे वतनाचे वारसदार त्या तजवीजीप्रमाणें वागू. मुखत्याराचा ठरवून दिलेला पगार, सरकाराला पसंत अशी कामगिरी त्यानें केली म्हणजे वतनाच्या उत्पन्नांतून द्यावयाचा आहे. वर उल्लेख केलेल्या मुदतीचे दरम्यान सदर मुखत्यार अयोग्य आहे असे

सरकारास आढळून आले किंवा तो फरारी झाला तर सरकारच्या मंजुरीने दुसऱ्या व्यक्तीला आम्ही मुखत्यार नेमूं. परंतु असें करण्यांत कांहीं विलंब झाला तर सरकारने त्यावेळेपुरता मुखत्यार नेमावा आणि त्याला वतनाच्या उत्पन्नांतून पगार द्यावा हें आम्ही पूर्ण अधिकारानें व पूर्ण समजूतीनें लिहून दिलें आहे. भिवंडी तालुक्यांतील एक कारकून त्रिंबक लक्ष्मण चौबळ यांचे हस्ताक्षर.

साक्षीदार	सह्या
लक्ष्मण रघुनाथ जोशी, कारकून	विश्वनाथ हरबाजी नाईक, सरपाटील
बाळकृष्ण बल्लाळ अणजूरकर	लक्ष्मण जनार्दन नाईक, सरपाटील
	विठ्ठल जनार्दन नाईक, सरपाटील
	बाप्पाजी जगन्नाथ नाईक, सरपाटील
	सखाराम शिवराम नाईक, सरपाटील
	पांडुरंग विठोबा नाईक, सरपाटील
	बाबाजी रघुनाथ नाईक, सरपाटील
	सखाराम चीमाजी व पुतळाजी गोपाळ नाईक सरपाटील हस्ते भगवंतराव मोरोजी
	त्रिंबक कृष्ण शेंडे यांचे हस्ताक्षर.

परिशिष्ट 'एफ्'

(परिच्छेद १४ मध्यें उल्लेख केलेले)

शिवजी नाईक अणजूरकर यास माधवराव भोकसे आरमार यांजकडून आलेल्या एका पत्राचे भाषांतर चंद्र १९ वा रविल अवल सरसेन साव अर्बैन वलफ ते असे सप्रेम नमस्कार सादर करून अणजूर गांवची सरपाटीलकी वतन व ईनामाबाबत तुमच्याकडून एक वर्षाची रक्कम येणे आहे. आरमाराच्या खर्चापोटी रु. ४००० द्यावेत असा हुकुम करण्यांत येत आहे. सिद्दी अनमान वजीर महंमद यांना पाठविले आहे. तरी जंजीरा आरमाराकडे रक्कम पाठवावी व पावती घ्यावी.

अपील जिंकल्यानंतर सरपाटीलकीचे सनदेऐवजी इंग्रजांनी दिलेली ईनामाची सनद. ५ एप्रील १९०२.

रजिस्टर नं. ४७

ईनाम सनदेची नक्कल

जयराम चिमणाजी नाईक, भास्कर गंगाधर नाईक, दादाजी बाबाजी नाईक, रामचंद्र सखाराम नाईक आणि **मुकुंद पांडुरंग नाईक**, मिळून आसामी पांच (५) यांस— ज्यापेक्षां मौजे अणजूर, ता. भिवंडी, या गांवचा २/३ हिस्सा ईनाम म्हणून चालण्याचा दावा असून तो गांवचा २/३ हिस्सा **सन** १८८४/८५ सालचे सरकारी हिशोबीं खालीं लिहिल्याप्रमाणें दाखल आहे.

धारण करणाराचें नांव	गांवचे २/३ हिश्याचे क्षेत्रफळ			गांवचा २/३ श हिश्याचा आकार	वजा			
	नाकिर्दसार	किर्दसार	एकूण		सलामी अथवा दुसरा कर आजपर्यंत इंग्रज सरकारास द्यावयाचा असेल त्याची रक्कम	गांवचा २/३ हिस्सा ईनाम मिळाल्यापूर्वीचें दुमाला जामिनी: एकंदर मोजणी	एकंदर आकार	नक्त गांवचे २/३ हिश्याचे वसुलीपैकीं देण्याची एकंदर रक्कम
१. जयराम चिमणाजी नाईक २. भास्कर गंगाधर नाईक ३. दादाजी बाबाजी नाईक ४. रामचंद्र सखाराम नाईक ५. मुकुंद पांडुरंग नाईक	एकर १०३ गुंठे १४ आणे १० २/३	१८१९ २६ ८	१९२३ १ २ २/३	५०५४-०-८ ताडाचा आकार:- १४७-१०-८ ५२०१-११-४ रेती मातीचे उत्पन्नावर ईनामदार यांचा हक्क नाहीं.	०-०-०	०	०-०-०	२००-०-० गांवचे नोकर १३३-५-४ मुलकी पाटील ६६-१०-८ पोलीस पाटील

आणि ज्यापेक्षा सदरहू गांवचा $\frac{2}{3}$ श हिस्सा मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचा सन १८६३ चा आक्ट ७ यावरून जे समरी सेंटलमेंट करण्याचा अधिकार दिला आहे त्या समरी सेंटलमेंटाखालीं आणलेला आहे.

त्यापेक्षां या सनदेवरून असें सांगण्यांत येत आहे कीं, जीं मनुष्यें सदरील गांवचे $\frac{2}{3}$ हिश्याचे वेळोवेळीं कायदेशीर धारण करणारीं होतील त्यांच्या खाजगत मिळकतीप्रमाणें इंग्रज सरकारकडून तो गांवचा $\frac{2}{3}$ हिस्सा खाली लिहिलेल्या शर्तीवर निरंतर चालविला जाईल, त्या शर्ती अशा कीं:—

१ ली— सदरहू धारण करणारे यांनीं इंग्रज सरकारचे इमानी रयत असोन व इंग्रज सरकारास खालीं लिहिल्याप्रमाणें कायम रकमा दरसाल देत जाव्या.

सलामी अथवा दुसरा कर आजपर्यंत द्यावयाचा असेल तो ············ रुपये.

सदरहू आक्टाप्रमाणें कायम केली असेल ती जुडी : ························

जमिन बाद	६०६-१२-१
ताडाबद्दल	१८- ७-४
एकूण रु.	६२५- ३-५

२ री— सदरहू गांवचा $\frac{2}{3}$ हिस्सा ईनाम मिळाल्यापूर्वीचे जे कोणतेहि दुमाले मग ते जमीन असोत, अथवा नक्त नेमणुका असोत, त्याजवर सदरहू धारण करणाराचा कोणताहि दावा हल्लीं किंवा पुढें चालणार नाहीं. आणि ते दुमाले इंग्रज सरकारकडे अखेर खालसांत होत तोंपर्यंत त्या सरकारांतून जसजसे हुकूम वेळोवेळीं होत जातील त्या अन्वयें ते सर्व चालविले पाहिजेत, वर लिहिलेल्या शर्तीस अनुसरून वागल्यास सदरहू मौजे अणजूर (अंजूर) ह्या गांवचा $\frac{2}{3}$ श हिस्सा सदरीं लिहिलेल्या कायम रकमांत कधींही जास्त न करितां आणि सदरहू गांवचा $\frac{2}{3}$ श हिश्याचा कोणताही कायदशीर धारण करणाऱ्याचा हक्क मग तो वारसानें किंवा दत्तविधानानें किंवा देणगीनें किंवा इतर प्रकारानें प्राप्त जाहलेला असो, त्याबद्दल सरकारतर्फे हरकत किंवा शंका न घेतां निरंतर चालविला जाईल.

ही सनद सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल यांच्या वतीनें मुंबईचे गव्हर्नर इन कौन्सिल यांच्या हुकुमावरून मे० जे. पी. आर., कलेक्टर सा० बहादुर जि. ठाणें यांचे सहीशिक्क्यानिशीं तारीख ५ माहे एप्रिल सन १९०२ रोजीं करून दिली असे. आणि सदरहू जयराम चिमणाजी, भास्कर गंगाधर, दादाजी बाबाजी, रामचंद्र सखाराम, मुकुंद पांडुरंग हे सदरहू ईनाम (गांव) व सांगितलेल्या शर्ती व अटी यासहित स्वीकारतात. त्याच्या दाखल्याबद्दल नं. १-३-५, यांनीं मराठींत व २-४ यांनीं इंग्रजींत खालीं सही केली आहे. शिक्का ठाणें कलेक्टरचा. (सही इंग्रजी) जे. पी. आर., कलेक्टर, ठाणें.

भाग दुसरा

सनदा, आज्ञापत्रें दफाते व समागित इस्टेटी

(श्री. गजानन गोविंद नाईक यांच्या दप्तरांतून)

पेशव्यांकडून अणजूरकर नाईकांना मिळालेली सरपाटीलकीची सनद

श्री
राजा शाहू नरपति
हर्षनिधान बाळाजी
बाजीराव मुख्य
प्रधान

(शिक्का)

छ मा। अजामि जमीदार परगणे साष्टि व तो आटगाव परगणे सायेवान प्रांत वसई यांसी बाळाजी बाजीराऊ प्रधान सुमूर सन इसने आर्बैन मया व अलफा इ. स. १७४१ बेश्मी गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दनजी नाईक बिन मुरारजी नाईक व सीवजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महीमानराऊ कुळी सोळांखी ज्ञात पाठारे पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मरोळ परगणे साष्टी व वतनदार

मोकादम मौजे अणजूर तो आटगांव परगणे सायेवान प्रांत वसई हें प्रांत मजकूराहून तीर्थरुप राजश्री बाजीराऊ व तीर्थरुप राजश्री चिमणाजीपंत आपा याचे दर्शनास सातारी याचे मुकामीं सन सलास अशरीन मिया अलफामधें येऊन आपली हकीकत विदित केली कीं, आपण पुरातन प्रांत मजकुरचे वतनदार आहों त्यास वसई प्रांत फिरंगीयाकडे आहे त्याणें देवस्थानें याचा व तीर्थाचा व महाराष्ट्र धर्माचा लोप केला कितेक हिंदु लोक भ्रष्टाऊन क्षार केले. आपण पुरातन वतनदार देशनारगौंडपणाचें वतन होते त्यास फिरंगीयाकडे तो प्रांत जाहालियापासून वतन चालों देत नाहीं याजमुळें आपण कुटुंबसह-वर्तमान त्या प्राताहून येऊन कल्याण प्रांते प्रस्तुत राहिलो त्या प्रांताची हकीकत व आपले वृत्त निवेदिल्यावरून त्या प्रांतीं साहेबांनीं मसलहत करून प्रांत मजकूर सर करावा देवस्थापना व स्वधर्मस्थापना होये ते गोष्टी करावी व आपले वतन आपणास करून द्यावे त्या प्रांतीचे कोट किल्ले जंजीरे वसई व कोट ठाणे या जागांचे लागमाग व खाड्याचे उतार व मार्ग वाटास आपण माहीत आहो व ठाणे व वसई कोटाचे लाग आपले स्वाधीन आहेत म्हणून त्याजवरून अणजूरकर मजकूर यास तीर्थरुपानी आज्ञा कली की, तुमचे हव्ये लाग्ये असतील ते हाती धरून वसईचा व ठाण्याचे उताराचा लाग ठीक करणें त्याजवरून याणी हव्ये लाग्ये त्या प्रांतीचे हाती धरून कोट ठाण साष्टि येथील लाग व तेच खाडीचा उतार व वसईचे आगराच्ये खाडीचे लाग केले ते वर्तमान हुजूर येऊन तीर्थरुपास साल्दरसाल निवेदन केले त्यावरून संन सब्रा सलाशीन मिया अलफामध्यें तीर्थरुप राजश्री आपानी मसलहत करून फौज समागमें देऊन राजश्री शंकराजी केशव व राजश्री चिमणाजी भीमराऊ फौजसमेत गंगाजी नाईक व सिवजी नाईक अणजूरकर बराबर देऊन वसईस पुढें रवाना केले व राजश्री खंडोजी माणकर व राजश्री रामचंद्र हरी यासी फौज समागमे देऊन बुवाजी नाईक व मुरारजी नाईक व नारायणजी नाईक तिघे बंधु बराबर देऊन साष्टीची खाडी पार करून फौज नेऊन ठाणीयांचा कोट हस्तगत त्याच्या हवी लागानें जाहाला तीर्थरुप कैलासवासी राजश्री आपा खासा फौजसुद्धा पाठीवर जाऊन प्रांत मजकूरचे गड कोट किले हस्तगत करून प्रांत मजकूर सोडऊन स्वराज्य केले याजमुळें स्वधर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालते जाहाले व अणजूरकर या पांचा बंधुनीं ऐकनिष्ठपणें जीवाभ्य श्रमसाहस करून सेवाधर्म संपादिला व मुरारजी नाईक अणजूरकर जंजीरे वसईच्ये कोटास हला जाहाली ते समई युद्धप्रसंगांत स्वामी कार्यी खर्च जाहाले त्याजवरून अणजूरकर मजकूर याजवर कृपाळु होऊन तीर्थरुप कैलासवासी याणीं नुतनवतन करार करून द्यावे ऐसा करार केला त्याजवरून हाली अणजूरकर गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व सिवजी नाईक हे हुजूर पुण्याचे मुकामी येऊन आपली हकीकत ईस्तकबील तागायत निवेदन केली याजवरून अणजूरकर मजकूर यासी नूतनवतन देशनारगौडी उर्फ सरपाटलकीचे वतन परगणे साष्टी देखील जकायेती

व तर्फ आठगाव देह २६ सवीस परगणे सायेवान पैकीं तर्फ मजकूर देखील जकायेती जलमार्ग व उभामार्ग व बंदरे परगणे मजकूर व तर्फ मजकूर वतन करार करून दिले असे देह बी तपशील.

परगणे साष्टि प्रांत वसई देह

तर्फ मालाड देह

१ कसबे मालाड. २ वानई (?). ३ मढ. ४ येरगल. ५ आकसे. ६ मख. ७ मालवण. ८ चारखोप. ९ कांदवली. १० बोरवली. ११ सिंपवली. १२ एकसर. १३ मंडपेश्वर. १४ दहीसर. १५ कसहेरी. १६ नागाठणें. १७ तुलसी. १८ पोयेसर. १९ आकुली. २० वेडवण. २१ कुरार. २२ दिंडोसी. २३ आरें. २४ आंब्रवली. २५ मानास (?). २६ मोगरे. २७ बांदवली. २८ वणारें (?). २९ गोरेगांव. ३० पाहाड. ३१ चिंचोली. ३२ वेसावें. ३३ डोंगरी. ३४ मनोरी. ३५. उतन. ३६ गोराई. ३७ घोडबंदर. ३८ भाईंदर. ३९ मुर्धे. ४० काशी. ४१ मिरें. ४२ कसबें ठाणें.

देखील पांच पाखाड्या

४३ चरई चेंदणी. ४४ नवपाडा. ४५ येऊर. ४६ वरसावे बोरभाट. ४७ चेंणे. ४८ ओवले. ४९ वडवली. ५० कांवेश्वर. ५१ तुर्फे. ५२ बालकुम. ५३ मांझीवडें. ५४ चितलसर. ५५ घोरडें. ५६ कोलसेत.

५६

तर्फ मरोल देह

१ कसबे मरोळ. २ बापनाले (?). ३ सारवी (?). ४ उणगाव. ५ इरली. ६ विहाड. ७ खोपरी खुर्द. ८ तुंगवे. ९ ठाणें. १० तीरंगाज (?). ११ कोपरी मालवडी. १२ मूळगांव. १३ कोदीवटें. १४ विखरोली. १५ नाऊर. १६ पोसपवली. १७ मांडुप. १८ चेंदेवली. १९ मोरोसी (?). २० खोरे. २१ मुलुंद. २२ पवई. २३ साई. २४ कानझुरे. २५ तुंबे. २६ मारवली. २७ वडवली. २८ आणीक (?). २९ माहूल. ३० नानाले. ३१ चेंबूर. ३२ मांडाले. ३३ माणवुत (?). ३४ माणखुर्द.

३५ देवजरे. ३६ बोरले. ३७ घाटकोपर. ३८ कीरोल. ३९ कुरले. ४० आसनपे. ४१ मोहीली. ४२ साहार. ४३ बामणवाडा. ४४ चाकाले. ४५ जू. ४६ आंधेरी. ४७ गुंदवली. ४८ वरेवली. ४९ काल्हे कल्याण (?). ५० इलेपाडले. ५१ परजापुर. ५२ वानरें.

५२

तेरीज

५६ तपे मालाड
५२ तपे मरोल

१०८

ता॥ आठगाव परगणे सायेवान पैकीं देह

कीता देह

१ अणजूर. २ वेहळे. ३ पिंपलास. ४ गोवें. ५ कोन. ६ टेंब्रवर. ७ फेणें. ८ कामतघर. ९ कसबेरी. १० सीरगाव नारपोळी. ११ कारवली. १२ वडुनवघर. १३ वडघर.

१३

कीता देह

१ डुंगे. २ कालवार. ३ राहानाल. ४ केवणी. ५ दिवे. ६ पुर्णे. ७ कोपर. ८ काल्हेर. ९ कसेली. १० गुंदवली. ११ दापोडें. १२ वल. १३ वोवली.

१३

१३
१३

२६

एकूण परगणे साष्टी देह येकसें आठ व तर्फ आठगाव परगणे सायेवान देह सवीस ऐकून देह येकसें चवतीस जिराईत व बागाईत व घरपट्टी व वण व मोहो तर्फ व ताडे व माड व भंडार थळभटीया व कुंमार देखील कोली मछीमार व तरी उतार वगैरे जराईत्र व पाटीत्राव व जकायती व बंदरे जलमार्ग व उभामार्ग व मीठ बंदरे व मीठागर व थलभटीत व थलमाडें व गादीया वरें देंव व खारी सरकारी जमाबंदी होईल

त्याजवर हक देशनारगोडी उर्फ सरपाटीलकी अणजूरकर मजकूर यांसी करार बी तपशील·

नकदी जमाबंदी सरकारी आकार होईल त्यास रयेत निसवत हक कर सेद रुपया १ येक प्रमाणें करार केला असे देवीत जाणें १.

वतन समंधें ईनामगाव मौजे अणजूर ता॥ आठगाव परगणे सायेवान ईनाम दिल्हा असे त्यास सरकार आकार होईल त्यापैकीं तिजाई सरकारांत घ्यावी बाकी दोन तक्षीमा ईनामतीकडे दिल्हा असे येक तक्षीम सरकागत वसूल होईल बाकी दोन तक्षीमा सरपाटील याजकडे देवीत जाणे कलम १.

मानपान टिला विडा व सीरपाव आधी देशमुखाचा त्याचे मागे देशपांडीयाचा त्याचे मागे सरपाटील यास करार करून दिल्हा असे देवीत जाणे कलम १.

खासगत सरपाटील याचे घरचे गलबत १ येक बार कौलीखंडी २५ पंचवीस घर खर्चाचे हागेमीसगम (?) हरजीनस व लाकूड फांटे सीवार रानांतून अणजूरास अगर ठाणीयास सरपाटलाचे घरास येईल अथवा ठाणीयाहून अणजूरास जाईल त्यास जकात सरकारांतून माफ केली असे पाच भाऊ वाटणीप्रमाणें वेवार करीतील कलम १

खासगत सरपाटील याची घरें पांच व चाकराची घरें सा व बटकीची घरे जी असतील त्याची घरपट्टी सरकारांतून माफ केली असे कलम १.

सीकार व पारद व पडीत सावज होईल त्यास सीवाल (हिसा ?) देशमुखाचे फरे सरपाटील यास करार करून दिल्हे असे देवीत जाणें कलम १.

मास (?) बकरीयाचे जे गावी असतील त्यास रयेत निसवत सालीना हक देशमुखाचे च्वथाई करार केला असे देवीत जाणे कलम १.

गला हर जिनस सरकारी जमाबंदी होईल त्याजवर रयेत निसवत हक दर खंडी से कैली बारोल मापे ८॥ अदमण करार केला असे देवीत जाणें कलम १.

ईनाम अगर सरकारांतून मौजे वेसावे ता॥ मालाड परगणे साष्टी एकूण आकार सरकारी बेरीज राजभाग रा॥ २५ पंचविस वाडी येक येकून ईनाम सरकारांतून दिली असे कलम १.

सेव सबजी व वानगी देशपांडीयाचे निमे रयेत निसबत करार करून दिली असे देवीत जाणे कलम १

घर हवेली सतोतन फिरगी याचा घरटा होता तो सरपाटील मजकूर यास घरवाडा करार करून दिल्हा असे कसबे ठाणे पैकी घरवाडा जमीन देखील परसु आगवाडा व पिझवाडा बीघा १।। दीड सरकारांतून ईनाम करून दिल्हे असें कलम १.

सरपाटील याचे घरी लग्नें व मुहूर्त लेकीची व लेकाची व चाकर असामी सा त्याचे घरी लग्नें व मुहूर्त होतील त्यास लग्नटका व पाट दाम माफ केला असे कलम १.

लग्नें व मुहूर्त होतील त्यास सेला देशपांडीयाचे नीमे सरपाटील यांस करार केला असे जीवनम वाफीला (?) रयेत निसबत देवीत जाणें कलम १.

पा।। मजकुरी तली असतील त्यास तेलीयाचे घर घाणीयास देशपांडीयाचे निमेचे तेल रयेत निसबत करार केले असे तेलीपैकीं देवीत जाणें कलम १.

सरपाटील याचे घरचा गाडा १ येक रानासिवारास जाऊन काबाड आणील त्यास जकात माफु केली असे कलम १.

पा।। मजकुरी चाम्बार ज्या गावी असतील त्यास सालीना उते १ येक दर गावास करार करून दिल्हे असे देवीत जाणें कलम १.

पा।। मजकुरी कुंभार ज्या गांवी असेल त्यास सालीना दर गावास मडकी बरंड (?) येक करार करून दिल्ही असे कुंभारपैकीं देवीत जाणे कलम १.

सरपाटील याचे घरचे बेगमीस सालीना म्हैस येक व बैल येक बटीक येक व टोणगा येक येकून च्यार दागिने पाच जण भाऊ याचे घरामध्यें विकत घेतली तरी वाटणी प्रा।। ५ पो मजकुरास सरकारातून जकात माफु केली असे कलम १.

पा।। मजकुरी झाप सरकार बेरीज होईल त्यास दर हजारी हक झाप सुमार पांच ५ रयेत निसबत करार केले असेत देवीत जाणें कलम १.

पा।। मजकुरी ग्वाही साक्ष येखाद्ये जागां घालणें जाहाले तरी देश कुलकर्णी याचे मागें घालावी कलम १.

पा।। मजकुरी ज्या गांवी सुतार असतील त्याणी सालीना नागर येक भरून द्यावासा करार केला असे सुतारापासून नागर भरउन देवीत जाणें कलम १.

पा।। मजकुरी माहार ज्या गावी असतील त्याणे सरपाटील याचे घरी रोज ४ च्यार सालीना राबणुक करावी कलम १.

पा। मजकुर तांबोळी ज्या गांवी असेल त्यास दररोज दर दुकानास पाने विड्याची सुमार ५ पाच रयेत निसबत करार करून दिली असेत तांबोलीपैकी देवीत जाणें कलम १.

किरकोळ बाब रयेत निसबत देशपांडीयाचे नीमे करार करून दिली असे देवीत जाणें कलम १.

येकूण कलमे चोवीस सदरहू प्रमाणें साल मजकुरापासून करार करून दिली असेत तरी देशनारगौडी उर्फ सरपाटीलकीचे वतन सदरहुप्रमाणें उपभोग देखील हक लवाजीमे व ईनाम गाव येक मौजे अणजूर व आगरवाडी वेसावेंपैकीं येक व मान पान टीला विडा सरपाटील मजकूर यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वेतन अनभऊन सुखरुप राहातील या पत्राची प्रत लिहून घेऊन असल पत्र सरपाटील मजकूर यांस भोगवटीयास परतोन देणे जाणीजे छ २२ सवाले आज्ञाप्रमाण.

लेखन
सीमा

(शिक्का)

१ सरपाटीलकीची सनद :— सोबतची सनद पेशव्यानीं पांच भावाना दिलली आहे. हिलाच देशनाडगौडीची सनद म्हटलें जाते. खालील हक्क हिच्यांत अंतर्भूत आहेत. (१) अणजूर गांव शराकती जात इनाम आहे. (२) वेसावे ता॥ मालाड आगरवाडी ईनाम दिली आहे. (३) शेव सवजीचा हक्क (४) देशनारगौडीचा मुख्य हक्क म्हणजे रुपये शंभरमध्यें ३ रु. वसुलातून घेणे. (५) १३४ गांवावर हा हक्क चालत होता. (६) ठाण्याचो जमीन घरठ्यास व बागास ईनाम. (७) पर प्रांतातली कर वसुली व जकात माफी. (८) ईनाम गांवाच्या हद्दीचे आतील रेती माती दगड वगैरे नदी नाले खाड्या मधील मालावर कर फी वसूल करणे. (९) अबकारी कर अणजूर हद्दींत वसुल करणें. (१०) १३४ गावावरील मान पान विडा लग्न टक्क्याचा हक्क. (११) ताड माड कर वसुली. (१२) तेली, चांभार, सुतार, लोहार, तांबोळी, महार वगैरे यांच्याकडून बलुते कर वसूल करणें. (१३) गलबत कर माफ.

ह्या सर्व इष्टेटी समागीत होत्या. त्याचा तपशील व वृत्तांत येणेप्रमाणें. (१) ईनाम सरपाटीलकीच्या म्हणजे ईनामाच्या हक्काचें विवरण : ह्या अणजूरच्या ईनामकीच्या हक्काचा भोग सन १९५३ पर्यंत ईनामदारानीं घेतला. १९५३ मध्यें हा ईनाम गांव सरकारात विलीन झाला. ह्याबाबतींत अनेक अदलाबदली वगैरे झाल्या त्यांचे विवरण निरनिराळ्या ठिकाणीं वाचावयास मिळेल. (२) वेसावे ता॥ मालाड ह्या आगरवाडीचे

उत्पन्न रु. २५ किती साले ईनामदारानीं घेतले ह्याची नोंद कोठेही नाही तसेंच तें उत्पन्न केव्हापासून बंद झाले ह्याचाच शोध नाही. (३) सरपाटीलकीचे गांव व अणजूर ईनाम गांव ह्या ठिकाण मारल्या जाणाऱ्या मासळीवर ईनामदाराचा हक्क असे कालपरवापर्यंत अणजूर गांवीं आलेल्या मासळीच्या होडीवाल्याकडून मासळी घेण्याचा हा हक्क बजावला जात होता. सरपाटीलकीचा मासळी घेण्याचा हक्क सरकारनें रद्द केल्यानंतर त्या गावांचा हा हक्क बुडाला (४) हा देशनारगौडीचा हक्कही सरकारच्या सरपाटीलकीचे गावावरील हक्काबरोबर नष्ट झाला. (५) १३४ गावावर ह्या सनदंमुळें जे हक्क प्राप्त झाले होते ते सर्व हक्क सरकारनें सरपाटीलकीचा हक्क दोनशे आठ रुपयांचे बदल्यात घेतल्यानंतर रद्द झाले. (६) ठाण्याचे जमिनीचे बद्दलचे विवरण ठाणे जमीनीचे आज्ञापत्राचे ठिकाणी वाचावयाच मिळेल. (७) हे सर्व हक्क सरकारनें बदल्यांत घेऊन रद्द केले. (८) रेती-मातीचे हक्काचे बद्दलचे विवरण पुढें वाचावयास मिळेल. (९) हा अबकारीचा हक्कही सरकारने सरपाटीलकीचे हक्काप्रमाणें ४२ रुपयाचे बदल्यांत घेऊन रद्द केला. (१०) १३४ गावावरचा लग्न टक्का वगैरे हक्क असाच बंद झाला. (११) ह्याच पद्धतीनें हे सर्व हक्क रद्द बातल झाले. राहिलेले विलीनानंतर गेले. (१२) तेली, चांभार, सुतार, लोहार वगैरेच्या कडून कर वसुल करणे असेच रद्द झाले. (१३) गलबतकर ईनामदारास माफ असे तोही पुढें रद्द झाला.

वतन, इनाम ह्यांच्या संबंधाने थोडेसें

अणजूरचे ईनाम हें शराकती ईनाम आहे. ईनाम कमिशननें १८८१ त आपले कामास सुरवात केली. ह्या कमिशनचा हेतु इतकाच की, ईनामे वतने नाहीशीं करणें त्याप्रमाणें हेंही ईनाम त्यांनी जप्त केले. ईनामात दोन प्रकार आहेत. वतन ईनाम व जात ईनाम हे ते दोन भाग होत. कुळकर्णी, पाटील, वगैरे वतन ईनामे सरकारनें खालसा केली. खोती ईनामेही खालसा करण्यास सरकारनें सुरवात केली. आपले ईनाम, जात ईनाम होते व इतर पुष्कळशी ईनामे वतन ईनाम होती. वतन ईनामे म्हणजे नोकरी, कामगिरीच्या पायावर दिलेली ही ईनामे होत. अर्थात जी ईमाने अशा प्रकारची होती त्यांची चौकशी करून त्या त्या कामगिरी न बजावणाऱ्या लोकांची ईनामे, कमिशनने जप्त केली कारण ‘ कामगिरी तर ईनाम ’ हा कमिशनचा दंडक होता. आपले ईनाम हे बक्षिस ईनाम होते. वसई मिळविण्याच्या यशातले ते ईनाम होते म्हणजे ते जात ईनाम होते. जात म्हणजे बक्षिस होय. सरपाटीलकीच्या सनदेंत ते ईनाम दिलेले होते. पण ते कामगिरीचे ईनाम नाही असे आमचे म्हणणे होते. हें म्हणणें प्रीव्ही कौंसीलने मान्य करून आपले ईनाम जप्तीतून सोडले व नवीन सनद इंग्रज सरकारने दिली ती सनद सोबत जोडली आहे. शराकती ईनाम म्हणजे काहीं भाग

ईनामदाराचा, राहिलेला भाग सरकारचा; अशी विभागणी ज्यात असते ते शराकती ईनाम होय म्हणजे भागीदारीचे ईनाम होय.

पेशव्यांनीं अणजूरकरांना ठाण्याची जागा, वाडा व घरटा बक्षिस दिल्याबद्दलचें आज्ञापत्र

(गजानन गोविंद नाईक यांच्या दप्तरांतून)

शीका ७ मो अजम गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दन नाईक बीन मुरारजी नाईक व सीवजी नाईक व नारायणजी नाईक बीन निंबाजी महिमानराऊ कुली सोलोंखी **ज्ञात पाठारे** सरनाडगौड उर्फ सरपाटील पुरातन वास्तव्य वानरें ता। मरोल प्रांत साष्टी व तों आठगांव प्रगणे साहेवान प्रांत वसई यांसी रामाजी माहादेव नामजात प्रांत साष्टी सु।। खमेस आर्बैन मया व अलफे तुम्हांस हुजूराने श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीजी **सरपाटीलकीचे वतन** नुतन करून दिल्हे त्याच्या सनदा बरहुकूम सनपे छ २२ सवाल सनई सन आर्बैनामध्यें सादर जाल्या तेथें तुम्हास वतनी घरटा माडी संतोतन आगवाडा पीछवाडा जमीन बिघा ८१॥ दीड व बाग सरकारी मौजे वेसावें ता।। मालाड येथें ।।।२५ पंचवीससाची देविली यैशास संतोतनची मांडी व फीरगीयाचे देऊल संलग्न आहे तें जागा घर बांधावें तरी तें स्मशानरुप आहे व पीछवाड्यास बाग सरकारी आहे याजकरीतां तुम्ही हुजूर श्रीमंतास पुणीयाचे मुकामीं विनंति केली की, स्वामीणी कृपालु होऊन वेसावेंपैकीं बाग दिल्हा आहे त्याच्या यैवजी संतोतनचा बाग करार करून द्यावा म्हणजे घर, वाडा व बाग येके स्थळी होईल म्हणून अर्ज केलात त्यावरून हुजूरची आज्ञा जाहली की तो बाग सरकारचा आहे तो व्रात्यास मवावलाया (?) नसे तुम्हास कसबे ठाणें येथें बाग व घरटा येकत्रच दुसरे स्थल नेमून देणे म्हणोन आम्हास हुजूरची परवानगी जाली त्यावरून कसबे मजकूर येथें बाग व घर वाडी यांसी जमीन करार करून दिल्ही बी तपसील.

* * *

भाग लारेस बाउलपाव जमीण घरटे बीघा ८१॥३

की पडजमीण बागाचें दक्षण भागी बीघे ८॥२॥।

भाग मनेल कोलास येकूण घरटा जमीण बीघे ८१॥१

लग०

यांसी चतुःसीमा उभी मोजणी काठ्या

पुर्वेपासोन वाटेचा रस्ता बागेचा उत्तरभाग पेसजी बागेची भिताडे व घरट्याची भिंताडे पश्चम रस्ता पर्यंत मोजणी काठ्या ४५ बागेची पश्चम दिशापासोन उतरपर्यंत गली उभी मोजणी काठ्या सुमार ३२.

दक्षणपासोन उतररस्तापर्येंत बागेची पुर्व त्रिंबक अनंत याचे बागाचे दरम्यान गली उभी मोजणी काठ्या सुमार ३९ पूर्वेचें गली पासोन पश्चम गलीपर्येंत बागेची दक्षणदिशा नजीक बाग नी। मनवर येतीं उभी मोजणी काठ्या सुमार ४१.

एकूण मोजदाद झाड झाडोरा विहीरी सुमार बी तपसील

आंब्रे सुमार रायेवल	१० रोपे	चिंचा ४ बारदार	ताडे सुमार २० बारदार
	१४ बारदार	३ उमेदवार	१६ गैरबारदार
	—	—	—
	२४	७	३६
सोनचाफे	५ बारदार	वोवळी १	डालीम झाड १
	२ वाझे		
	—	शेवगा १	फलम बेटे १
	७		
नारळमाड सुमार	१९ बारदार	फणस १ उमेदवार	पेरा झाडें ४
	१९ गैरबारदार	४ ईडीचीं झाडें	फोफली रोपे १३
	१ उमेदवार	१ आवळी	विहीरी ३ पाणीदार
	११ रोपे	१ बोर	१ माफकपाणी
	१ झीट		
	—	येकूण तेरीज झाडें सुमार	बिहीरी
	४७	१४८	४

येकूण जमीण बिघे पावनेच्यार बिघे पावनेदोन पांड व उभी मोजणी उतर दिशा काठ्या पंचेतालीस व पुर्व दिशा काठ्या येकूण च्यालीस दक्षण दिशा काठ्या येकेतालीस पश्चम दिशा काठ्या बतीस व मोजदाद झाडें येकसे आठेतालीस व विहीरी च्यार सदरहू बागेचा महसूल खेरीज हकदार रु. ३० तीस बा मु॥ पैकीं वजा घरवाडा जुमले सनद

बिघा ८१॥ दीड याचे येवजी वजा रु॥ ५ बाकी ईनाम बाग रु. २५ येकूण पंचवीस रु॥ साल दरसाल करार करून ईनाम दिल्हे असे तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि व वंशपरंपरेनें उपभोग करीत जाणे बागांत नवी झाडे लाउन कदमा देखील उपभोग करणें जाणीजे छ ४ माहे जिल्हेज मोर्तब.

[हल्लीं ठाणें येथें कलेक्टरांची कचेरी आहे ती ही जागा होय. त्याच्या समोरील जमीनीची पट्टी म्हणजे भाडे म्युनिसिपालिटीकडून इनामदाराना मिळत असे. पण शेवटीं हलगर्जीपणानें अगदी अलीकडेच त्या उत्पन्नाला इनामदार मुकले आहेत. ह्याच जागेत आज श्री समर्थ प्रेस आहे. संतोतन = सॅंड अंतोन]

संतोतन = सॅंड अंतोन.

ठाण्याची जमीन : प्रथमतः पेशव्यानीं ईनामदाराना वाडा बांधण्याकरिता मौजे वेसावे तो मालाड येथें वतनी जागा घरटा दिला होता परंतु त्या जागीं संतोतनची वाडी व फिरंग्यांचे देऊळ आहे. अर्थात ह्या स्मशानभूमीजवळ घर बांधणे योग्य नाहीं असें पेशव्यास कळविल्यानंतर ईनामदाराना ठाणें येथें जागा देण्यांत आली. हल्ली कलेक्टरचे ऑफीस व कंपौंड आहे ती ही जागा होय. बुवाजी नाईकाना युद्धानंतर सेनापति नेमले होते ते त्या वाड्यांत राहत असत. हल्लीचा पेढ्या मारुती आहे तेथपर्यंत ही जागा होती. तो मारुति ईनामदाराच्या प्रवेशद्वाराजवळील मारुति होय असें वृद्धांनीं सांगितले आहे. ठाण्याचे मदन पुरुषोत्तम म्हात्रे याणीं मुलाखतींत तसें सांगितले आहे. ही सर्व जमीन ३॥ बिघे होती. ह्या समागित इस्टेटीचे काय झाले ह्याचा पत्ता लागत नाहीं पण हल्लीच्या मुख्य सडकेच्या पश्चिमेस खुली असलेली जागा ईनामदारांची होती. हल्ली त्या जागेपैकीं एका तुकड्यावर इमारत बांधलेली असून बाकीची जागा खुली आहे. पूर्वी येथें बाजार भरत असे. ह्या जागेचें भाडे बुवाजीचे वंशज म्युनिसिपालिटीकडून घेत असत. बाळकृष्ण तुकाराम ह्यांच्या नंतर पुढें कोणीही दस्तगिरी न घेतल्यामुळें हल्ली नामदाराना कांहीं मिळत नाहीं. पेढ्या मारुतीची व्यवस्था ज्या गोसाव्याकडे आहे तोच गोसावी अणजूरच्या देवस्थानाचा पुजारी आहे. हे पुजारी ईनामदारानीं सनदा देऊन नेमलेले होते. हल्लीच्या कलेक्टर ऑफीसचे इमारतीचे व त्याचे बाजूने वाड्याचे भिंतीचे निरीक्षण केल्यास दिसून येतें कीं, हाच वाडा ईनामदाराचा असावा. पडक्या स्थितींतले तटाचे भाग सभोंवार न्याहाळता दिसते कीं, पेढ्या मारुती हाच ईनामदाराचे वाड्याचे प्रवेशद्वारावरचा मारुति होय. युद्धानंतर रामाजी महादेव ह्यांना सुभेदार व बुवाजीना फौजेचे व मुलकीचे अधिपती पेशव्याने नेमले होते हे दोन्ही

अधिकारी एकमेकाजवळ असावे म्हणून ठाणें येथें नाईकाचे जागेचे उत्तरेस सडकेपलिकडे रामाजी महादेव वितलकर सुभेदार याच्याकरितां वाडा बांधला होता. तिथें रामाजी व आनंदराव रहात होते. हल्ली जज्ज कोर्ट आहे त्या ईमारतीची ठेवण पाहिली तर त्या पुरातन काळच्या वाड्याच्या बांधणीप्रमाणेंच आहे. ही एक समस्त ईनामदारीची समागित इस्टेट अनास्थेमुळें नाहींशी झाली. ह्या संबंधाचे बक्षिसपत्र रामाजी माहादेव यांच्या तर्फेने मिळाले तें पत्र खाली देत अहे.

श्री
राजा शाहु नरपति
हर्ष विधान
बाळाजी बाजीराव
मुख्य प्रधान
(शिक्का)

श्री गजानन गोविंद यांचे दफ्तरांतून

आज्ञापत्र : समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री बाळाजी पंडीत प्रधान ता।। आगरवाडीचे मोक··· मौजे वेसावे तो मालाड परगणे साष्टे प्रांत वसई सुहुर संन इसने आर्बेन मया व अलफ बेश्मी आज्ञापत्र (इ. स. १७४१) गंगाजी नाईक व मुरारजी नाईक यांचे पुत्र जनार्दन नाईक व सिवजी नाईक व नारायणजी बिन् निंब्राजी नाईक महिमानराऊ कुत्री सोळोंखी ज्ञात पाठारे देशनारगौडी उर्फ सरपाटीलकी परगणे साष्टी व तो आठगाव परगणे सायवान प्रांत वसई प्रांताचे मसलतेस जीवाभ्य श्रम साहास करून सेवाधर्म संपादिला. याजकरितां अणजूरकर मजकूर याजवर कृपाळू होऊन नुतन वतन देशनाडगौडी उर्फ सरपाटीलकी परगणे साष्टे व तर्फ आठगाव परगणे सायेवान प्रांत वसई येथील वतन करून दिल्हे असे. यासी वतन संमंधे ईनाम आगरवाडी मौजे मजकुरी सरकार बेरीज राजभाग रु. २५ पंचवीस इनाम, सरकारांतून दिली असे. तरी राजभाग रु. पंचविसामध्यें येक वाडी सरपाटील मजकूर याचे हवाली करणें. तेथील उत्पन्न जे होईल ते सरपाटील मजकूर यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने ईनाम चालवित जाणे. प्रतीवर्षी नुतन पत्राचा आक्षेपन करणें. या पत्राची प्रती लिहोन घेऊन अस्सल पत्र सरपाटील मजकूर याजवळ भोगवट्यास परतोन देणे जाणीजे छ बावीस सवाल आज्ञा प्रमाण.

लेखन
सीमा
(शिक्का)

कल्याणची जमीन : ही जमीन कल्याण म्युनिसिपालिटीच्या आफीस जवळ गावातून येणाऱ्या दोन रस्त्याचे त्रिकोणांत आहे. १७२० मध्यें गंगाजी नाईक अणजूराहून सर्व कावेल्यासुद्धां रहाण्यास गेले त्यावेळीं पेशव्यानीं ही जमीन ईनामदाराना रहाण्याकरितां व इतांडे व लोनाड येथील शेती उपजिवीकेकरिता सनदेने ईनाम दिली. ही सनद जनार्दन भाई याचे जवळ होती असे रामचंद्र सखाराम म्हणत असत. अनेकदा प्रयत्न करुनही सनद जनार्दन भाईकडून मला मिळाली नाहीं. ह्या जमिनीवरील काही भागावर एका मुसलमानाची वखार होती तो मालकी हक्काने जमीन बळकावू पहात होता म्हणून जनार्दन भाई यानीं त्याजवर फिर्याद केली होती. फीर्यादीचे निकालाचे आंत जनार्दन भाई वारले. ह्या सर्व जमिनीचे भाडें जनार्दन भाई वसूल करीत. त्यांच्या नंतर त्यांचे नातू दिनानाथ शिवराम हे भाडे वसूल करीत. त्यांची आई वारल्यानंतर अनास्थेमुळें ही जमीन म्युनिसिपालीटीने घेतली.

इताडची जमीन अशीच अनास्थेमुळें गेली. अद्यापही इताडकर कांहीं जमीन अणजूरकराची म्हणून दाखवितात. हा गांव भिवंडी तालुक्यांत लोनाडे जवळ आहे.

मोकासा : ३०-४-१७३५ रोजीं पेशवा रोजकीर्दी दफात्यांत असा उल्लेख आहे कीं, गंगाजी नाईक अणजूरकर दशम याला साल मजकूरी मौजे जाहानवल तर्फ सोनाळे हा गाव मोकासा दिला होता परंतु तो वासुदेव जोशी यानी दिला नाहीं म्हणून त्या गावांचे ऐवजी तितक्याच उत्पन्नाचा दुसरा गाव मौजे जावसई तर्फ अंबरनाथ हा गांव मोकासा दिला आहे. हा गांव समागित होता. अनास्थेमुळें गेला. दसरात नेमून दिलेले वतन म्हणजे मोकासा.

माथेखार : अणजूर गांवातल्या निरनिराळ्या जमीनी व जागा ईनामदारानी पांच जणांत वाटून घेतल्या पण त्यांतली माथेखार ही खार जमीन मात्र समस्त ईनामदाराची म्हणून एकत्र समागित राहिली आहे व आजपर्यंत ती तसीच आहे. तिचे उत्पन्नाची व इतर व्यवस्था हल्ली चिंतामण मुकुंद नाईक, वसंत दत्तात्रय नाईक व वसंदराव पुरुषोत्तम नाईक करितात. ह्या खारीचे सविस्तर विवरण माथेखार ह्या सदरांत पुढे वाचावयास मिळेल.

वांद्रे राजण पाखाडी : इ. स. ११६३ मध्यें बिंबराजाने बिंबस्थानांत वसाहत केली त्यावेळीं त्यानें नाईकाच्या मूळ पुरुषास अणजूर व वांद्रे ही दोन गावीं बक्षिस दिली. १५८० पर्यंत ईनामदाराचे पूर्वज वांद्रे राजण पाखाडी येथें राहत होते व त्या ठिकाणाहून वांद्रे व अणजूर ह्या गांवाची व्यवस्था पहात होते. १५८० त फिरंग्यांचा जुलम असह्य झाल्यामुळें बाळ नाईक वगैरे तीन भाऊ अणजूरास आपल्या

गांवावर आहे, ह्या ठिकणाहून गंगाजीने राजकारण करून पेशव्यांना वसई साष्टी मिळवून दिली. त्यानंतर बाळाजी बाजीराव पेशव्याने नाईकाना फक्त सरदेशमुखीचे वतन दिले त्या सनदेत पेशव्यानी अणजूर गांव शराकती ईनाम म्हणून नाईकांना दिला. त्यांचा दुसरा गांव बांद्रे दिला नाहीं. त्यामुळें ईनामदारांचे गांव दोन असताना पेशव्यानी एक गांव दिल्यामुळें ईनामदारांचे नुकसान मात्र झाले.

अणजूरची माडी व मुलगय तळे : इ. स. १५८० च्या सुमारास नाईक अणजूरास राहण्यास आले तेव्हापासून त्यानीं ह्या माडींत राहण्यास सुरवात केली. हल्ली त्या माडीत कांहीं जणांचा भाग आहेच. तसेंच त्याचवेळीं हें मुलगय तळे फिरंग्यांकडून ईनामदारांना मिळाले. ही माडी व हे तळे ही ईनामदाराची समागित इस्टेट असून माडीचे भाग झाले आहेत. ह्यापेक्षां जास्त विवरण तळी व भूवर्णन ह्यांत वाचावें.

माथेखारी प्रकरण

माथेखार : ही खासगत जमीन समस्त ईनामदारांची समागित आहे. ह्या खारीचे क्षेत्रफळ ११४८३५। गुंठे आहे व हल्ली धारा ४०४८४३ इतका भरावा लागतो. ही एवढ्या एकरांची खार लागवडीस यावी म्हणून प्रथमपासून निरनिराळ्या इसमाना करारानें दिली जात असे. इ. स. १८५३ २० ऑागस्ट रोजीं ही खार जयराम यादवजी आर्ते व रामचंद्र जगन्नाथजी सोमवंशी क्षेत्री पाठारें याना कौलानें म्हणजे करारानें कसण्यास दिली. कौल असा कीं, ह्या उभयतानीं माथेखारीचा बांध बांधून ही खार कसणूकीस आणावी. त्याचे मोबदल्यांत कौलदारानीं सतत २७ वर्षे त्या खारीचे उत्पन्न घ्यावे. ईनामदारानीं स्वतःच्या पैशानें धारा २७ वर्षे भरावा. ह्यांत गल्ती होउन एखाद्या साली ईनामदारानी धारा भरला नाहीं व तो धारा कौल्दाराना भरावा लागला तर माफीची साले दिडपट्टीनें वाढवावी. एक वेळ तसा प्रसंग आला व ही खार ४०॥ वर्षे पर्यंत माफीने कौलदारानीं वापरली ह्यास माफी म्हणतात. माफीची सालें संपल्यानंतर इस्ताव्यानें कौलदारानें खारीचे उत्पन्न ईनामदाराना द्यावयाचे असे ठरले होते. अशी हा इस्तव्याची साले संपल्यानंतर पुढें निरतर ह्या खाडीचा कुल मक्ता दरसाल कौलदारानें ईनामदाराना द्यावयाचा अशी शर्थ त्या कौलात होती. त्या शर्ती-प्रमाणें ४०॥ वर्षे माफी व ५ वर्षे इस्तबा संपल्यानंतर कै. मोतीलाल हरगोविंद ह्यानें १८८२ पासून इस्तव्याप्रमाणें व १८८७ पासून संपूर्ण मक्ता देण्यास सुरवात केली. खारीचा मक्ता कौलांत १७ मुडे, १६ मण, १४ पायली एवढा ठरला होता. मोतीलाल मध्यें येण्याचे कारण हे कीं, इ. स. १८६३ सालीं ह्या कौलातले हक्क मूळच्या कौलदारां

कडून गणपत सखाराम, दत्ताजी मार्तंड ह्यानी आपले नांवें करून घेतले. त्यांच्या पासून हे हक्क मोतीलाल हरगोविंद यानीं १२ सप्टेंबर १८८६ रोजीं आपले नांवें करून घेतले. मूळ कौल केला आर्तेच्या बरोबर. पण त्याची पूर्ती मोतीलाल हरगोविंद ह्याना करावी लागली. जेमतेम मोतीलाल ह्यानीं १९०० सालापर्यंत उत्पन्न दिले. पुढें उत्पन्न देण्याचे त्याने नाकारले त्यामुळें १९१० मध्यें निळाजी मोरोबा नाईक ह्याच्या नांवें मोतीलालवर फिर्याद देण्यांत आली. पहिले तीन चार फीर्यादीचे वेळीं, कै. रामचंद्र सखाराम, कै. रावजी भाई नाईक, कै. दादाजी बाबाजी, श्री. हरेश्वर दाजीबा, श्री. चिंतामण मुकुंद व श्री. गजानन गोविंद, कै. निळाजी मोरोबा यांनी कसून मेहनत केली. त्यांत जास्त तकलीफ कै. निळाजी मास्तर यानीं घेतली. सर्व फिर्यादी ह्यानीच चालविल्या.

फिर्याद दिली : १९१० मध्यें अणजूर गणेश मंडळाचे सभासद, कै. मोरेश्वर रामचंद, कै. मोरेश्वर दाजीबा, कै. कमलाकर जगन्नाथ, कै. विनायक निळाजी व गजानन गोविंद नाईक ह्यानीं शंकराचे देवळांत जमून माथेखारीबद्दल कै. मोतीलाल हरगोविंद याजवर फिर्याद करण्याचा वरील निर्णय घेतला पण बहुतेक ईनामदार सदर मोतीलालचे देणेकरी होते निळाजी मोरोबा हे मोतीलालचे कर्जदार नव्हते. हे पाहून त्याचीच निवड केली व निळाजी मोरोबा यानी ती मान्य केली. ह्याच प्राथमिक खर्चाकरितां गजानन गोविंद नाईक, कै. मोरेश्वर रामचंद्र, कै. भालचंद्र जयराम, कै. हरेश्वर दाजीबा व चिंतामण मुकुंद यानीं पैसे गोळा केले व फीर्याद दिली. पहिला दावा जिंकल्यानंतर कै. रामचंद्र सखाराम यानीं हसबनीसाकडून खर्चास पैसे घेतले त्यामुळें तो ६ वा. भागीदार झाला.

कै. मोतीलाल हरगोविंद याचेवर खालीलप्रमाणें दावे करण्यांत आले. पहिला दावा १९१० ला लावला. दुसरा दावा सन १९१५ मध्यें लावला. तिसरा दावा १९२२ मध्यें लावला. ह्यावेळीं रावबहादुर राव व दळवी असे दोन वकील होते. मोतीलाल याचे वकील कोयाजी होते. मोतीलालने दावा जिंकला. त्यावर हायकोर्टांत अपील १९२४ त गुदरले. त्याचा निकाल २।१२।१९२६ रोजीं आपल्या बाजूनें झाला. त्या अपिलाचे वेळी कै. दिवाकर भाई यांनी कै. बारिस्टर जयकर वकील दिले होते. त्यावेळीं त्यांनी हे अपील जिंकले. चवथा दावा सन १९३४ त दिला गेला. त्याचा निकाल इ. स. १९३७ सालीं हायकोर्टांत लागला. हाही दावा आपण जिंकला. त्यावर मोतीलालचे वारसानीं प्रिव्ही कौन्सीलकडे अपील करण्याची परवानगी मागितली. हायकोर्टानें परवानगी नाकारली. त्यामुळें मोतीलालचे वारस ईनामदारांचे निरंतरचे कुळ म्हणून राहिले. मोतीलालचे वारसानी हे कौल बदले याचे नांवें बदलले पण त्यांत त्यांना यश आले नाहीं. कारण जरी कौल बदलेचें नावें करण्यांत आला तरी कौलाचे बंधनांतून मोतीलालचे वारस

सुटत नाहींत असा कोर्टाचा निर्णय बाहेर पडल्यावर सर्व उपाय थकल्यानंतर मोतीलालचे वारस व ईनामदार यांच्यात वाटाघाटी होऊनई नामदाराना त्यांनीं ११००० इतकी रक्कम दिल्यानंतर ते निरंतरचे कूळ म्हणून राहिले नाहींत. हल्ली ह्या खारीची व्यवस्था श्री. चिंतामण मुकुंद नाईक, श्री. वसंद दत्तात्रय नाईक व श्री. वसंत पुरुषोत्तम नाईक हे पहातात. ही जमीन ह्या तिघांचें नावें रेकार्डला लागलेली आहे.

श्रीगजानन

कौल चिटी मजरे दिवे मौजे अणजूर तर्फ आठगांव तालुके भिवंडी फुटीस्त खार नवीन बांधण्याबद्दल माफी इस्ताव्याची नोंदण्यास दिल्ही ता। २१ आगस्ट सन १८५४ एक वाजतां.

राजश्री जेयराम यादवजी अरते व रामचंद्र जगन्नाथजी सोमवंशी क्षत्री पाठारे वा। जंजीरें हल्ली मु।। मौजे अणजूर—

कौलचिठी निसबत सरपाटील तर्फ आठगांव व ईनामदार मौजे अणजूर तर्फ मजकूर तालुके भिवंडी सुरू सन आर्बा खमसेन मयातेन व अलफ सन १८५३/५४ कारणे कौलचिठी लिहून देतो ऐसाजे मजरे दिवे मौजे मजकूर येथील खार बनाम माथेखार व वेलसुरे ही फुटीस्त होऊन दर्यागर्क जाली आहेत ती बंदीस्तवार दुसरे ठिकाणीं बांधण्यास आम्ही बहुतवेळां इतर लोकांस माफी इस्ताव्यानी वगैरे दिल्ही परंतु त्यांही माफी कांहीं वर्षे खाऊन सेवटीं फुटीस्त होऊन बंदीस्त होत नसोन आम्हांस करण्याची सवड नाहीं आणि मजरे व मौजे मजकूर येथील जमीन खारें पाणी येऊन बुडीत होते तेणें करून आमचे फार नुकसान होत आहे. सबब सदरहू माथेखार व वेलसुरे याची बंदीस करण्यास देतो ती बंदीस्त करण्याची जागा आमचे वडील यांही दक्षिणेस मजरे मजकूर येथील खार बनाम मुंडोरा याचे हदीपासून उत्तरेस मौजे गुंदवली तर्फ मजकूर येथील लागवड जमिनीचे हदीपर्यंत सिला सुद्धां दुबाजू दुहेरी दगड आणि मोठे सील चांगले मजबूत बांधण्यास व चुनेगची उघड्या चार दक्षिणेकडील सीलास व भेटणाचे बांधासुद्धां दगड लावण्यास खर्च अजमासे रुपये २००१ लागतील त्या खर्चाचा अजमास पाहून सदरी लिहिलेली माथेखार व वेलसुरे हे माफीनें दिल्ही आहेत याजबाबत कलमें येणेप्रमाणें.

१. सदरहू खारीचें ढेप खारे रकम चोविसी मुढे १७ पैकीं वजा पडणाबाहेर जमीन अजमासे मुडा १ व वृत्तीपैकीं रकम ढेप मण ८६ एकूण ढेप १८६ एक मुडा साहा मणाचें वजा जातां बाकी ढेप मुडे १५८१८ मणाची तुम्हांस माफी सालें इस्तक

बील सन १८५४ / ५५ तागाईत सन १८८१ / ८२ मिळोन वर्षे २७ व इस्तावा इस्तक-बील सन १८८२ / ८३ तागाईत सन १८८६ / ८७ मिळोन वर्षे ५ याचे भात खारे पंचवीसी मुढे दरसाल ठराव येणप्रमाणें.

८ सन १८८२ / ८३ चे सालीं भातमुडे आठ
१० सन १८८३ / ८४ चे सालीं भातमुडे दाहा
१२ सन १८८४ / ८५ चे सालीं भात मुडे बारा
१५ सन १८८५ / ८६ चे सालीं भात मुडे पंधरा
१७॥ सन १८८६ / ८७ सालीं भात मुडे (साडे) सतरा चार मण

सदरहू प्रमाणें इस्तवापुरा झाल्यावर साल दरसाल भात खारे पंचवीशी मुडे १७॥८४ देत जाऊन सुखरूप उपभोग तुम्हीं व तुमचे वारसाही घ्यावा व मत्त्याचे भात मजरे मजकूरी बंदरपावेत करावें.

सदरी लिहीले ढेपाची चतुसीमा येणें प्रमाणं.

१) पूर्वेस सेत नथनांगर दरम्यान बांध दगडाचा त्याच सेताचा.

१) पश्चिमेस वोसीक जमीन सेत मजकूर पैकी असोन खाडी आंत पाणी आहे त्या खाडी पलीकड मौजे कसेळी येथील हाद व सेत मजकूर तुरसुई व सेत खालवई.

१) उत्तरेस मौजे गुंदवली येथील सीव दरम्यान खाडी व मौजे वेहेले येथील सीव.

१. दक्षणेस सेत भेटण व सेत खालवई.

सदरहू प्रमाणें चतुःसीमा असोन तुमचे बंदीस्ती आंत सेत मजकूर पैकीं जमीन येईल ती दिल्ही आहे.

२. सदरहू खारीचे बंदीस्तीस भेटणाचे बांधा सुद्धां दुहेरी दुबाजू दगड व उघड्याचें काम साल मजकूर पासोन दोन वर्षांने पुरे करावें या मुदतीत उघड्याचें काम दगडासुद्धा न केल्यास वर लिहिले इस्ताव्याची सालें तुम्हांस मजुरा न देतां भर दरानें वसूल घेतला, जाईल.

३. सदरहू खारीची बंदीस्त व भेटणाचा बांध चांगला मजबूद मोठे उधानाचें पाणी वर नचढे असा च्यार हात मथल्यास रुंदीचा जेव्हांचे तेव्हांच घालावा. तुमचे हैगईमुळें वक्तसीर बंदीस्त न होतां खार फुटीस्त होऊन तिकडोन खारें पाणी येऊन आमची जमीन मजरे व मौजे मजकूर येथील बुडीत जाहली असतां जें नुकसान होईल तें तुम्हापासून भरून घेतलें जाईल.

४. जो भेटणाचा बांध बांधावयाचा तो चांगला मजबूद बांधल्यावर आमचेकडील खारी फुटीस्त होऊन एकदम पाणी येऊन रीसीकानें सदरहू बांध फुटोन तुमचे खारींत पाणी जाऊन नुकसान झालें असतां आम्ही भरून देऊं.

५. सदरहू भेटणाचा बांध घालणें तो पूर्वेस हरिश्चंद्र नाईक वगैरे याचे खोपेरे भेटणपैकीं आहे त्याचे दक्षिणेस कांहीं डाग टाकून व पश्चिमेस पुरीव दगड आहे तेथपर्यंत चांगला मजबूद न फुटे असा घालावा. तसाच सदरहू खारीचे पश्चमेची बंदीस्त करण्यास तुम्हांस दिली आहे ती बंदीस्त एकदम चांगली मजबूद करावी. तुमचे कसूरमुळें एकदम पक्की बंदीस्त न होतां तिकडोन पाणी येऊन तुमची माफीची जमीन बुडाली असतां आम्ही जास्ती माफी वगैरे देणार नाही.

६. मौजे मजकूर हा गांव आम्हांस दोन हिसे इनाम असून तिसरा हिसा सरकार वसूली त्याचा मक्ता आम्हांकडे आहे. त्या तिजाई मक्त्याचा आम्ही परभारें निकाल करीत जाऊ. तुम्हांकडे त्याचा माफीचे सालांत संबंध नाहीं. जर एखादे सालीं सदरहू खारीचे मक्त्या अनवयें तिसरे हिशाचा वसूल तुम्हां पासून सरकार परभारें घेऊं लागल्यास तुम्ही बिलकूल देऊं नये.

७. सदरहू तिजाईचा मक्ता आम्ही कारणपरत्वें सोडल्यास सरकारांतोन कची वसूलबाकीची वहीवाट होऊन सदरहू खारीचे जमिनी अन्वयें तिसरे हिशाचा माफीचे सालांत वसूल सरकार घेऊं लागल्यास सदर कलमाप्रमाणें वसूल देऊं नये. जर सक्तीनें सरकार वसूल घेईल तर सदरी पहिले कलमी माफीची सालें लिहिलीं आहेत त्याचे दीडीनें माफी देऊं.

८. इस्ताव्याचे व ठरावाचे सालांत एखादेसालीं प्रज्यन्याचे अप्तीमुळें नापीक जालें असता गांव व माहल सीरस्तेप्रमाणें मजुरा देणेचें तें दिल्हें जाईल. माफीचें सालांत प्रज्यन्यानें नापीक जालें असतां मजुरा मिळणार नाहीं.

९. सदरहू माफी अथवा इस्ताव्याचे अगर ठराव्याचे सालांत तुमचे बंदीस्त वरून खारें पाणी येऊन जमीन बुडीत होऊत नुकसान जाल्यास मजुरा मिळणार नाहीं.

१०. सदरहू खारींतील पाण्याचे उत्पन्नाबद्दल सेव सबजी सिरस्ते अनवयें जीवन माफक वाटणीप्रमाणें एकवेळ एकास दिल्ह्यावर दुसरून त्याचे उधाणास दुसऱ्यास देऊं नये व आम्ही हरकत करणार नाहीं.

११. सदरहू खारींत सदरी पहिले कलमांत वृत्तीबद्दल रकम ढेप मण ८६ ची जमीन आहे ती वृत्तीची सरकारी वीस खंडीपैकीं वृत्त आहे असें नाहीं. खारीचे चाकरीबद्दल पाटील यास आम्हांकडून चालवणुकी आहे. जर पाटील याजकडून चाकरी

बराबर न जाल्यास त्यास ती वृत्त मिळणार नाहीं. सदरहू वृत्तीची जमीन जो खारीची चाकरी बराबर करील त्यास देण्याची तजवीज तुम्ही करावी.

१२. सदरहू भेटणाचे बांधास समई आम्हांस जरूर लागल्यास एक फूटीची रुंदीची गोंडी आम्हांपैकीं गंगाधर विश्वनाथ वगैरे आमचे एक तक्षीमदार हे आपले खर्चानें चांगली चुनेगची भेटणांतील पाणी जाण्यास ठेवतील. आमचे कडील किंवा तुम्हांस बांधण्यास खार दिल्ही आहे ती फुटीस्त होऊन इकडील अथवा तिकडील खार पाणी न येऊं जाऊं देण्याची तजवीज आम्हीं एक तक्षीमवाले साल दरसाल सदोदित करीत जाऊं. आमचे हईगईनें पाणी जाऊं येऊं देण्याची तजवीज बराबर न जाल्यास इकडेस तुमचे खारीस नुकसान होऊं लागल्यास तुम्हीं सदरहू गोंडी बंद करावी.

१३. सदरहू खारींत आमचे हिसेदार यांची भाग ठेवली असता तुम्हांस खार दिली जाणार नाहीं. व कौल साधे कागदावर देण्याची वहिवाट आमची आहे त्याप्रमाणें आम्हीं हा कौल तुम्हांस दिल्हा आहे. पुढें मागें तुम्हांस छापण्याची जरूर तुम्हांस लागल्यास त्याचा खर्च आम्हीं भरून देऊं.

एकूण तेरा कलमें खाली लिहिल्याप्रमाणें वहिवाट करावी याप्रमाणें आम्हीं सर्व चालूं. जास्ती उपसर्ग लागणार नाहीं. ता। २० माहे आगष्ट सन १८५३ इसवी. मिति श्रावण वद्य २ शके १७७५ प्रमादीनाम संवत्सरे. दस्तुर

दस्तुर भाई शिवराम नाईक सरपाटील.

(सही) गंगाधर विश्वनाथ नाईक सरपाटील दस्तुर खुद.

(सही) लक्ष्मण जनार्दन नाईक सरपाटील दस्तूर खुद.

(सही) पांडुरंग विठोजी नाईक, सरपाटील दस्तुर खुद

(सही) सखाराम शिवराम नाईक, सरपाटील हिसा दहावा दस्तुर खुद

(सही) नारायण दामाजी नाईक, सरपाटील दस्तुर खुद हिसा दहावा.

(सही) हरिचंद्र बापाजी नाईक सरपाटील दस्तुर खुद हिसा दहावा.

(सही) सदासीव हरबाजी नाईक सरपाटील दस्तुर खुद.

(सही) गणोबा हरबाजी नाईक दस्तुर खुद.

(सही) बाबाजी रघुनाथ सरनाईक सरपाटील दस्तुर खुद.

(सही) परशराम वासूदेव नाईक सरपाटील दस्तुर खुद.

(सही) चिमणाजी परशराम नाईक सरपाटील आज्ञान याचे पालीग्रहण करणार आई गोदावरीबाई भ्रतार परशराम जनार्दन नाईक दस्तुर चिमणाजी परशराम नाईक सरपाटील.

(सही) नारायण जयराम नाईक सरपाटील दस्तुर खुद.

(सही) सिताराम चिमाजी नाईक व पुतळाजी गोपाळ नाईक सरपाटील वहीवाटदार त्रिंबक बाळकृष्ण शेंडे कारकून वहिवाटदार निसवत भगवंतराव मोरोजी गाहाणदार. असल ब ।। बर

(सही) गणपत धोंडोजी कारकून

साक्ष | सही
(सही) परमानंद रनसोड पाटील भाईंदर | (सही, रामचंद्र जगन्नाथजी मुंबईकर
(सही) रामचंद्र दौलत भिवंडकर हल्लीं वस्ती ठाणें

तळीं व मूलगय : पांच भावाची पांच तळीं. व एक समागित अशी सहा आहेत. अणजूरगांव व पाडे मिळून पांच मोठी तळीं आहेत. शिवाय एक लहान तळे व एक खडकांतली टाकी आहे. ह्या व्यतीरिक्त निव्वळ पुष्करणीवजा मुलगय नांवाचे फिरंग्यानीं दगड चुन्यानें बांधलेलें तळें आहे. अणजूरची मूळ माडी फिरंग्यानी १५३५ नंतर केव्हां तरी बांधलेली आहे. त्याप्रमाणें त्या माडीभोवतीं किंवा वाड्याभोंवती तट बांधलेला हल्लीं नादुरुस्त स्थितींत असलेला अस्तित्वांत आहे. ह्या तीन वास्तुचें बांधकाम व तळ्याचें बांधकाम एकाच प्रकारचे आहे. सर्वत्र तोच दगड व तोच चुना वापरलेला आहे. बांधणीची पद्धत तीच आहे माडीच्या वरपर्यंत सर्व भिंतीं दगड चुन्याच्याच आहेत. ह्यावरून असें ठामपणें वाटते कीं, फिरंग्याच्या डिव्हीजन किंवा सबडिव्हिजनला राहण्याचे उद्देशानें हा वाडा व ही तटबंदी फिरंग्यानी केलेली आहे. त्याच्या पुढें जाऊन असेंही ठामपणें दिसून येते कीं, फिरंग्यानीं ही पुष्करणी त्या अंमलदारांचे बायकांचे वापराकरितां व क्रिडास्थानाकरितां बांधलेली आहे. ही पुष्करणी तटाच्या अगदीं लगत आहे. ही पुष्करणी इ. स. १५८० त इनामदार अणजूरास आल्या वेळेपासून पांच भावाची समागित म्हणून आजपर्यंत वापरण्यांत येत आहे. ह्या मुलगयची सर्व व्यवस्था बुबाजीचे वंशजाचे मोठ्या शाखेकडे सोपविलेली आहे. सध्यां गजानन गोविंद ह्याच्या वहिवाटीस ती पुष्करणी आहे. ह्या मुलगयमध्यें गावांतल्या कोणत्याही इतर व्यक्तीला पाय पाण्यांत बुडविण्याची परवानगी नव्हती. सर्व इनामदार, त्यांचे आश्रित व इतर भावंडाच्य कुटुंबियानाच फक्त त्यांत वापर करण्यास परवानगी होती. ही मिळकत खाजगी असून ही हल्लीं सर्वांना खुली आहे. अर्थात गांवची तळीं ह्या सदरेंत ही पुष्करणी 'मुलगय' येत नाहीं. समोर पूर्व बाजूस पन्नास फुटी लांबीच्या ३० पायऱ्या आहेत. ह्या मुलगयचे दक्षिण बाजूस एक मध्यवर्ती उभा खांब आहे व तिकडे तळ्यातून बाहेर निघण्यास १५–२० पायऱ्यांचा लहान जिना आहे. उत्तरेचे बाजूस एक बांधकाम आहे. ह्यावरून

त्या ठिकाणीं मोटेची व्यवस्था असावी असा तर्क होतो. गांवची तळीं ह्या सदरांत हें तळें येत नाहीं असें ह्यावरून दिसून येते. ही मुलगय गावठणांत आहे हे त्याचे वैशिष्टय आहे.

२ पांच भावाची पांचतळी

बोरले तळें : अणजूर येथे बोरल्याच्या बागाचे पश्चिमेस 'बोरले' नावाचे तळे आहे. ह्या तळयावर बुवाजीच्या वंशजाची वहिवाट आहे ह्यांतली मासळी बुवाजीच्या वंशजातले इसम मारीत असत धरताचे आळीचे व तऱ्याचे आळीचें लोक इनामदाराना मदत देत. हें तळे बुवाजी नाईकांचे वाट्याचे होय.

संकारले : कोळीपाडाचे पूर्वेस 'संकारले' नांवाचे तळे आहे. ह्या तळयाची मासळी गंगाजीचे वंशज पांडकरांचे कडून मारून घेत असत गंगाजीचे वहिवाटीचे हे तळेच त्यांचे वाट्याचें म्हणून त्याच्याकडे आहे.

खोकरले : अलीमघरपाड्याचे पश्चिमेस 'खोकरले' नांवाचें तळे आहे. ह्या तळयाची वहिवाट मुऱ्हारजीचे वारसाकडे आहे त्याच्या वाट्याला हे तळे आले आहे ह्या तळयातली मासळी मुऱ्हारजीचे वंशज आलमघरचे लोकांचे मदतीनें मारीत असत. हल्ली त्यांत विहीर बांधलेली आहे.

देवाळे : पाडा भरोडी येथें 'देवाळे' नावाचें मोठे तळे आहे ह्याच तळयाचे पाळीवर सर्व ईनामदार व इतर पांढर पेशे ह्यांची दहनभूमी आहे. हे तळे शिवजी नाईकाचे वाट्यास आल्यामुळे त्यांचेच वंशज ह्या तळयातली मासळी भरोड कराच्या मदतीनें मारीत असत.

गांवतळे : दिवेपाड्यास 'गांवतळे' आहे. हे तळे नारायणजी नाईक यांचे वांटणीस आल्यामुळें त्यातली मासळी दिवेकरांचें मदतीनें नारायणजीचे वंशज मारीत असत.

वडाळे : अणजूर गावचें हद्दींत 'वडाले' नावाचे सहावे तळे अणजूरचे उत्तरेस आहे. ह्याची वहिवाट शामजीचे वंशजाकडे आहे. प्रथमपासून ह्या तळयांत हरीजनांचा वापर होता व मासळी मारून तेच नेत असत.

टाके : ह्या सहा तळयाशिवाय अणजूर हद्दीत एक टाके आहे. ती टाकी दगडातून फोडून काढलेली आहे. पाणी पुरेपुर राहते ही टाकी गोविंद विनायक ह्यांनी फोडलेली आहे. दिवे खाडीचे बांधास व भिटणाचे बांधास ह्यातले दगड नेलेले होते.

साष्टीची बखर पान ५३ वरील मजकूर असा आहे. " गंगाजी नाईक कल्याणास राहिले. तेथें कल्याण सुभ्यांत मौजे कांबे तर्फ अंबरनाथ या गावावरि तळे खणले. मातुश्रीचें (स्मरणार्थ) नांव देकाळे ठेविले."

पण कांब्यास तळे नाहीं. शिवाय कांबे हा गांव भिवंडीजवळ आहे विशेष तपासा अंती कळले कीं आंभा (ढोका) इथें बांधलेला तलाव आहे तो धर्मार्थ बांधलेला आहे अशी लोकवार्ता तिथें आहे हा आंभा गांव बावा मलंग रस्त्यावर वाडीजवळ आहे म्हणजे अंबरनाथ तर्फेतच आहे ज्या इसमाने बखरीची ही प्रत लिहिली त्याने मोडी वाचतांना 'आंभा'चे ' कांबे ' वाचलेले दिसते. व तसे होणें शक्य आहे.

गंगाजी नाईकाचे आईचें नांव 'देवका' किंवा 'देवकीबाई' असावें असें 'देकाळे' ह्या तळ्याचे नांवावरून स्पष्ट होतें. कारण ' देवकाळे ' ह्या शब्दाऐवजीं नकल कारानें ' देकाळे लिहीलेले आहे. किंवा तळ्याचे नांव उच्चारतांना मधला ' व ' गळला असावा. अणजूरास सहा तळीं आहेत त्यांत ' देवाळें ' नांवाचे एक मोठें तळें आहे. 'देवाळें व देकाळें' हे शब्द एकत्र आणले म्हणजे दिसते कीं ह्या संलग्नातून 'देवका' हें नांव गंगाजीचे आईचे आहे अशी खात्रीं पटते. ह्या तळ्यांचे नावांत एक मौज आहे प्रत्येकाचे शेवटीं 'आळे' म्हणजे आलय हा शब्द जोडलेला आहे. 'खोखर'चे; 'खोखारले' ' बोरचे ' ' बोरले '; ' शंकरचे ' ' शंकारले '; ' देवाचे '; ' देवाळे '; वडाचे ' 'वडाळें '; 'गांव'चे 'गांवतळे ' किंवा 'गांवाळें'; ही सर्व तळीं अणजूर गांवांचे परिसरात आहेत.

३ पांच भावांच्या पांच पोवळ्या

अणजूर पोवळी :—अणजूरची खाडी हीजवर मासळीचा हक्क बुवाजीचे वंशजाचा होता. खाडीतली म्हणजे पोवळीतली मासळी मारली जातांना खारपाटलाने दोन वेळा लोकांचे कडून प्रत्येकाकडून एक मासा घ्यावा व ती मासळी गोविंद विनायक कडे पोहोचविली म्हणजे त्या मासळीचे दोन वाटे केले जात. बुवाजीचे वंशज त्यांतला एक वाटा घेत व दुसरा गंगाजीच्या मोठ्या शाखेतील इसमास देत पण पोवळीचे द्वारावर बोकसी मांडली जाई त्यांतली मासळी दर उधाणास २ वेळां खार पाटील आमचेकडे आणीत असे. ही पोवळी गंगाजी व बुवाजीची होय.

अलीमघर पोवळी :—अलीमघर या गांवच्या खाडीच्या पोवळींतल्या मासळीचा व बोकशीचे मासळीतला ईनामदाराचा भाग म्हणून खार पाटील विनायक दिवड्या ही मासळी मुराराजीचे वंशजाकडे नेऊन देई.

भरोडी पोवळी :— भरोडीच्या खाडीतल्या पोवळीच्या व बोकशीच्या दोन वळच्या मासळीवर हक्क शिवजीच्या वंशजाचा असे तो भाग ढुंध्या खार पाटील त्यांना पोहचवी.

दिवे पोवळी :— दिवे खाडीतल्या पोवळीच्या व बोकशीच्या मासळीवर हक्क नारायणजीचा वंशजाचा असे. फक्ऱ्या आंब्रो खारपाटील ही मासळी मुकुंद पांडुरंग कडे पोहोचवीत असे.

दिवे खाडीच्या बांधास बांधलेल्या उघडीतील एकावर हक्क गोविंद विनायक (हे कर्वेंच कारभारी) यांचा असे तो हक्क भिवंडीचे कर्वे रामचंद्रपंत यांनीं स्वतः लिहून दिला होता कारण ह्या दिवे खाडीची बंदिस्ती गोविंद विनायक नाईक करीत व खाडी-बांधावर देखरेखहि तेच करीत.

पांच भावांच्या पांच बागा

पांचभावांच्या पांच बागा : अणजूर गांवाचे पूर्वेस हे पांच बाग एकमेकांना लागून आहेत. कोळीवाड्यापासून हे बाग सुरवात होतात ते महारवाड्यापर्यंत संपतात.

पाड्याचा बाग : गंगाजी नाईकाचे वंशजाना 'पाड्याचा बाग' मिळाला त्याच्य वर संपूर्ण मालकी गंगाजीच्या वंशजाची आहे, ह्या बागांत आंब्यांची झाडें फार होती. त्या व इतर झाडांचा उपभोग ते घेत असत. त्यांतल्या फळांची वांटणी त्या शाखेंतल्या सर्वांना मिळत असे ह्या बागांकडची देखरेख जयरामचे वंशज करीत व उत्पन्न सर्वांना वांटीत ह्याचा धारा जयराम चिमणाजीचे वंशज भरीत असतात. त्या खालची जमीन आजही त्याच शाखेच्या सर्वांची आहे. पण हल्ली अनास्थेमुळें गांवकरी वहिवाट करतात.

नवाबाग : त्या बागांचे पूर्वेस 'नवा बाग' आहे. हा बाग बुब्राजीच्या वंशजाचा आहे मदन दादाजी त्या बागेची देखरेख करीत व सर्वांना फळांचीं वांटणी देत असत. त्यांच्या नंतर गजानन गोविंद नाईक हे देखरेख करीत व फळांची वांटणी सर्वांना देत असत. ह्या बागाचा धारा येसोबा बाप्पाजी भरीत असत. हाही बाग आंब्याचा आहे ह्या बागची व्यवस्था स्वतःचा बाग म्हणून वसंतराव पुरुषोत्तम नाईक हल्लीं पहातात.

मुरुम खाणीचा बाग : पाड्याच्या बागाला लागून 'मुरुमखाणीचा बाग' आहे. तो मुरारजी नाईकांचे वंशजाचा आहे. त्यांचे वंशज ह्याचा उपभोग घेत असत. फळे आंबे, चिंचा शाखेतल्या सर्वांना वाटीत असत, पण हल्लीं त्यांचे वंशज कोणीही

अणजूरास नसल्यामुळें पाडेकर त्यावर स्वामीत्व करीत असतात ह्या बागाचा धारा दादाजी बाबाजी भरत असत.

देवीचा बाग : ह्या बागाचे उत्तर दिशेस 'देवीचा बाग' आहे बागाजवळ अंजुबाई देवीचे देऊळ आहे म्हणून त्यास देवीचा बाग म्हणतात. ह्या बागाचा उपभोग नारायणजी नाईकाचें वंशज चिंतामण मुकुंद घेतात त्याचा धारा तेच भरतात. ह्या बागांत अद्यापपर्यंत बरीच आंब्याची झाडें आहेत.

झोटींगाचा बाग : या बागालाच खेटून 'झोटींगाचा बाग, आहे त्याठिकाणी झोटींग बसविलेला आहे म्हणून ह्यास झोटींगाचा बाग म्हणतात. ह्याची वहिवाट व उपभोग शिवजीचे वंशज घेतात ह्याचे आंब्याचे उत्पन्न सर्वांना राखणदार विभागून देत असत ह्याचा धारा गजानन दिवाकर नाईक भरीत असतात.

ग्राम व्यवस्था १७४१. हसबनीसाना पाचा भावानी दिलेली सनद.

गंगाजी प्रभुती पाचा भावानी हसबनीस याना दिलेल्या सनदेची नक्कल खालीं देत आहे.

(फाटले आहे) .... मुरारजी नाईक, सिवजी नाईक..................

.... नाईक महिमानराव कुळी सोळंखी सरपा....................

मुक्काम मौजे अणजूर तर्फ आठगांव व देशनाडगौडी प्रगणे साष्टी व तर्फ आठगांव प्रमाणें सायेवान प्रान्त वसई सुमासन आर्बेन मया अलफा कारणें राजश्री शंकराजी केशव व केशव महादेव, माहादजी केशव यांचे पुत्र व धोंडो केशव व बाळाजी केशव उपनांव फडके अत्रीसूत्र आश्वलापन पुरातन वतनदार मौजे मुरधे तर्फ पावस प्रान्त राजापूर हाली वास्तव्य कसबे पुणें प्रा. मजकूर यांसी वतन पत्र लिहून ऐसेजे आपण वसई प्रान्ताहून फिरंगी याचे अमलात आपले वतन पुरातन न चाले संबध कल्याण प्रान्ती जाऊन प्रान्त वसई येथील मसलहत करावे म्हणून सन सलास असरीत मया अलफामध्यें राजश्री बाजीराव पंडित प्रधांन याचे दर्शनास सातान्याचे मुक्कामी जाऊन हुजूर विदीत केले की आपण पुरातन वतनदार देश नाडगौडी ऊर्फ सरपाटीलकी प्रान्त वसई व दवण येथील आहों त्यास प्रान्त मजकूरची मसलहत करावी म्हणवून विदीत केले त्यावरून राजश्री पंडीत मानीले आपणावर कृपाळू होऊन आज्ञा केली की प्रान्त मजकूरची मसलहत करणें जरूर आहे. तुम्हीं लागभाग प्रान्त मजकूरचे वसईचे कोटाचे व ठाणीयाचे व साष्टीचे लाग व खाडींचे उतार मनास आणून ठीक करणें म्हणवून आपणास आज्ञा केली त्यावरून आपण प्रान्त मजकूरचे लाग मनास आणून सनसबा सलासीन मया अलफामध्यें श्रीमंत राजेश्री बाजीराव पंडीत प्रधान व श्रीमंत राजश्री

चिमणाजी पंडित आपा याचे दर्शनास पुणीयाचे मुक्कामी गेलो तेथें गेलींयावर मसलहत प्रांत मजकूरची करावी म्हणवून सिधांत जाला त्याजवरुन तुम्हांस व आम्हास आज्ञा जाली.

त्यावरून तुम्ही व आम्ही मिलोन मसलहती ठराव केला ते समई आपल्यास विनंती केली की तुम्ही प्रांत वसई येथील चवदा प्रगण याच्या व ईनाम गांवाच्या वतनाच्या सरनाडगौडी ऊर्फ सरपाटीलकी या वतनाच्या सनदा घेतल्या ते समई आपले वतनाची वतनी गुमस्तगिरी वंशपरंपरेनें आपणाजवळ मागितली त्यावरून आपण पांचा भावानी आत्मसंतोषे आपलें वतन देशनाडगौडी प्रांत वसई येथील गुमास्तेगिरी तुम्हास तुमचे वंशपरंपरेनें करून दिली असें जे वतनामध्यें उत्पन्न होईल त्याची सावी तक्षीम तुम्हास गुमस्तगिरीस आपले तर्फेनें आपण तुम्हांस करून दिली असे त्यास सन सबा सलासीन मया अलफामध्यें मार्गशीर्ष वद्य नवमी गुरुवारी पुणीयाचे मुकामी मसलहतीच्यापूर्वी वतनी गुमस्तगिरीचा राजिनामा तुम्हास आपण लेहून दिला आहे त्यास हल्ली मसलहत सिद्धीस गेली आहे त्यावर सन इसने आर्बेन मयाव अलफामध्यें श्रीमंत राजश्री बाळाजी बाजीराव पंडीत प्रधान याचे दर्शनास पुणीयाचे मुकामी आपण व तुम्ही जाऊन प्रांत मजकूर आपले देशनाडगौडीपणाचें वतन मागीतलें त्यास श्रीमंत कृपाळू होऊन तुम्हास वतन उतन प्रमाणें सायतर्फ व देखील जकायती व बंदरे जमाबंदी कुळाबाब व कुळकानुवर आपणास आसनपे.

एकूण कलमे २४ सदरहू प्रमाणें सालमजकुरी पासोन वतन आपणास सरकारांतून वंशपरंपरेनें करून दिले आहे याची वतनी गुमास्तेगिरी पुत्रपौत्रादि तुमचे वौंशपरंपरेनें आपले तर्फेनें तुम्हास करून दिली असे त्यास सदरहू चोवीस कलमे सरकारचे सनदेंत आपणांस पाचाभावास वतन करून दिली आहेत त्यापैकीं आम्हीं पांच भाऊ वडील याजकरीता आम्ही आपणांस वडीलपणाचें मानास येणप्रमाणे ठेविली असेल कलमें बी तपशील.

इनाम आगरवाडी सरकारांतून मौजे वसावे ता. मालाड प्रगणे मजकूर येकूण आकार सरकार बेरीज राजभाग रुपये २५ पंचवीस ईनाम सरकारांतून दिली असे ते आपले वडीलपणास ठेविली असे कलम १

सेव सबजी व चानगी देशपांडे याचे निमे रयेत निसवत करार करून आम्हास

मानपान टिळा विडा सीरपाव आधी देशमुख्याचे त्याचे मागे देशपांडीयांचा त्याचा मागे आम्हांस करार करून दिला असे तो आपण वडीलपणास ठेविला असे कलम १

खासगत आमचे घरचे गलचत एक बार कैळी खंडी २५ पंचवीस सदर खर्चाचे बेगमीस गला हरजीनस व लाकूड

दिली असेत आम्ही आपले वडीलपणास घेतली असे कलम १

शिकार व पारधी पडीत सावज होईल त्यास शिसाल (१) देशमुखाचे व फरे (१) आम्हास वतन संबधे करार करून दिले असे आम्हीं आपले वडील पणास घेतले असे कलम १

खासगत आमचे घरचा गाडा एक रानांत शिवारास जाऊन कावाड आणील त्यास जकात माफ करून घेतली असे तो गाडा आम्ही आपले वडीलपणाकडेच वहिवाटु कलम १

फाटे व सीवर रानांतून अणजूरास अगर ठाणीयास आमचे घरास येईल अगर अणजूराहून ठाणीयाचे घरास येईल अगर ठाणीहून अणजूरास येईल त्यास जकात सरकार कर माफ केली असे त्या गलबताचा वहीवाट आम्ही पांचा भावानी करावा. कलम १

प्रमाणें मजकुरी लग्न मुहुर्त होईल त्यास सेळा देशकुळकर्णी यांचें निमे जीवन माफीक (१) रयत निसबंत करार करून घेतला असे तो आम्ही आपले वडील पणाकडे ठेवला असे. कलम १

येकूण कलमे सात आम्हीं पाचा भावाही वडीलपणाचे मानास ठेविली असेत. या खेरीज वतनाचा आकार दरोबस्त होईल त्याची सावी तक्षीम तुम्हांस दिली असे तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेनें अनभवून गुमास्तगिरी करून सुखरूप राहाणें आपले ही वौशंपरंपरेनें चालवितील वतनमध्यें लिहिणें पडेल ते तुम्हीं आपले तक्षिमेत आपलेकडून तुम्हीं लिहिण्यास ठेवून तुम्हीं आपले तक्षीमेतील त्यास मुशाहिरा देऊन वतनाचे लिहिणें चालविणें व वतनमध्यें आपणापासोन सरकारात सिरणी रुपये १५०१ पंधरासे येक घेतले त्याची तक्षीम सावी गुमास्तगिरीसंमध्यें तुम्हांपासोन रुपये २५० अडीचशें आपण घेतले असेत दरबार (१) खर्च जो पडला त्याची सावी तक्षीम आपण तुम्हापासोन घेतली असे आपले वतनसंबंधे सरकारची प...रझड पडेल ते पांच तक्षीमा आपण देत जाऊन सावी तक्षीम तुम्हास वतनी गुमस्तगिरी करून दिली आहे. त्यासमध्यें तुम्ही देत जाणे. सदरहू आम्ही पांचबंधु व आमचे वौशपरंपरेने चालवून तुम्ही तुमचे वंशपरंपरेने सदरहू प्रमाणे एकनिष्ठेने सुखरूप राहणें त्यास जो कोणी अंतर करील त्यास श्री. शपद असे. शके १६६३ सोळासे त्रेसष्ट दुर्मतीनाम संवत्सरे पौष वद्य पंचमी गुरुवार तारीख १७ माहे जिल्काद बीकलम गोपाळ केशव पटवर्धन वतनदार मौजे नारे (नावे) ता. राजापुर.

ही सनद पाचाभावानीं शंकराजी केशव फडके उर्फ हसबनीस यास पुणें येथें सन १७४१ मध्यें दिली आहे. ह्यातला पहिला भाग व शेवटचा भाग वर दिला आहे. मधल्या भागांत पेशव्यानी फक्त इनामदारानाच दिलेल्या सरपाटीलकीच्या वगैरे हक्काच्या नोंदी आहेत म्हणून तो मजकूर वर दिला नाहीं.

ईनामदारांचा नोकर वर्ग : अणजूरचे इनामदार आपल्यापैकी कोणा एका ईसमास गांवचा मुखत्यार नेमीत असत. हाच इसम इनामदारांचा प्रतिनिधी होय. त्याच्या हाताखाली हसबनीसांनी दिलेला गुमास्ता काम करी दफ्तराची व्यवस्था ठेवणे गावकीचा वसुल करणें, सरकारचा भाग ⅓ जूडी सुद्धां देणे हे त्यांचेच काम असे. नंतर राहिलेली रक्कम हाच मुखत्यार इनामदाराना वाटीत असे. ही सर्व कामें गुमास्ताच करी. पोटइनामदाराचा हिस्सा पृथक धर्मादाय,सामुदायिक धर्मादाय देवास्थानावरील खर्च वगैरेचा व्यवहार हाच गुमास्ता करीत असे. हक्कांचे रुपांतर पैशांत होण्याचे पूर्वी सरपाटीलकीचा वसूल १३४ गांवावरचा हाच गुमास्ता करीत असे चिल्हर खर्च तोच करी. मुखत्यारी सर्व दफ्तर गुमास्ताच सांभाळीत असे. गंगाजी नाईक ह्यानीं शंकराजी केशव याना आपले भाऊ मानले होते शंकराजी केशव हे पेशव्यांची ह्या भागांतली कामें करीत असत. पेशव्याचे बरोबर वरीचशी अनुसंधानें गंगाजी नाईक ह्यांचे मदतीनें करीत असे गंगाजीच्या सर्व कर्तृत्वांत शंकराजी हे साक्षीभूत असत. ह्यानींच गंगाजीचे कर्जा-संबंधानें पेशव्यांचेकडे शब्द खर्चला होता.त्यामुळें पांचजणांत शंकराजी केशव हा आपला धाकटा भाऊ गंगाजी यानीं मानला होता व त्याकरितां गगाजीचे व शंकराजी केशव ह्यांचे ठरलें होतें कीं शंकराजी केशव ह्यानीं गंगाजीचे इनामांत गुमास्तेगिरी करावी व त्याबद्दलचा मोबदला म्हणून त्यांना गंगाजीनी इनाम उत्पन्नाचा सहावा हिश्याचा भाग लिहून दिला होता. ती सनद वर दिली आहे. वडीलपणाचा अग्रभाग म्हणून कांहीं कलमें गंगाजीनें स्वतःकडे ठेविली होती व राहिलेल्या भागाची सनद दिली होती. अशाप्रकारें कांहीं काल लोटल्यानंतर शंकराजीच्या वंशजानीं गुमास्ता देण्याचें बंद केलें त्यामुळें इनामदार मुखत्यारचे हातून सर्व वसूल करून पाचा भावात वाटीत असत. हसबनीसानीं ईनामदार यांच्यावर फिर्याद दिली त्यावेळीं ज्याच्याजवळ सनद वगैरे कागद होते त्यांनीं तें पुढें न आणल्यामुळें जमाखर्चाचे कागदावरून हसबनिसाचा सहावा हिस्सा कायम झाला व अशारीतीनें इनामदार ह्या हिश्यास कायमचे मुकले हें सनदेवरून दिसून येईल. तसेंच माथेखारीच्या एका फिर्यादीचेवेळीं हसबनीसाकडून खर्चास पैसे घेतले गेल्यामुळें त्यांना माथेखारीचाहि हिस्सा फुकटांत दिला गेला.

मुखत्यार वरील सर्व कामें स्वतः करूं लागले त्यांना २०० रुपये वार्षिक मेहनतांना मिळत असे त्यांतून मुखत्यार स्वतःकरितां कारकून ठेवीत असत. मुखत्यार याना लहान लहान दावे चालविण्याचा अधिकार होता तसेच त्याना लहान गुन्ह्याकरिता शिक्षा देण्याचाही अधिकार होता. गावचे अंतर्व्यवस्थेत सरकार हात घालीत नसे. सर्व अंतर्गत व्यवस्था मुखत्यारच पहात असत इनामदाराचे दप्तर गावीच असे. ह्या सर्व व्यवहाराला कलेक्टर किंवा मामलेदार ह्याचा शिक्का मोर्तब लागत नसे. सरकारांत अर्ज करितांना इनामदाराना तिकीटाची व फीची माफी असे तसेच गावातल्या

एखाद्या खटल्यांत गुन्हेंगाराकडून जामीन घेण्याचा हक्क इनामदाराना होता. हे सर्व अधिकार मुखत्यार वापरीत असत.

माझ्या माहितीप्रमाणें चिमणाजी परशराम, मुकुंद पांडुरंग, गोविंद विनायक, रामचंद्र सखाराम, दादाजी बाबाजी, जनार्दन भाई ह्यानीं मुखत्यारीचे काम केले आहे. भाई शिवराव हे पहिले मुखत्यार १८४७।४८ ते १८५१।५२ होते असे साधार सिद्ध झाले आहे. बाबाजी लक्ष्मण, गोविंद रघुनाथ ह्यानी मुखत्यारी केली असेही समजते. सन १८६१ मध्यें सखाराम शिवराव मुखत्यार होते असेही समजते.

सन १८९१ नंतर अनेकदा गांव सरकारनें जप्त केला व परतही दिला. वसुल थकला की गांव जप्त होई व सरकार आपले येणे वसुल करून पुनः गांव इंनामदाराना परत देई. ह्यावेळी सरकार तलाटी नेमीत असे त्याचा पगार, सादीलवार, फेन्शन फंड वगैरे सर्व खर्च इनामदारांचे हिश्यातून सरकार कापून घेई. १९०५ सालानंतर सरकारने जप्त केलेला गांव पुनः इनामदाराना दिला गेला नाहीं. १९०८ मध्यें इनामदारानी हींच तलाठ्याची व्यवस्था कायम ठेवण्याचा अर्ज सरकारांत दिल्यामुळें शेवटपर्यंत तलाठ्याचेच हवाली हा गांव गेला. आजपर्यंत खालील तलाठी अणजूरास होऊन गेले.

(१) सिताराम विश्वनाथ जोशी (बाबा) पहिला तलाठी इ. स. १९०५ मध्यें. (२) मामा पळसुले. (३) विठोबा पळसुले. (४) दामले. (५) जोगळेकर. (६) पेणकर. (७) भोईर. (८) कोंडलेकर. (९) ना. भा. पाटील. (१०) छद्रीक. ह्यावेळीं १९५३ मध्यें इनाम गांव विलीन झाले. तोपर्यंत पगार वगैरे सर्व खर्च ईनामदार देत असत. (११) पतंगराव. (१२) बळीराम लक्ष्मण शेटे. हल्ली आहेत.

तलाठी किंवा मुखत्यार याचे हाताखाली पोलीस पाटील हे काम करीत. अणजूर, दिवे, भरोडी, अलीमघर या चार गावास चार पोलीस पाटील असत. पाटीलानीं वरील मुलकी कामगारांचे कामात मदत देणे, फौजदारी कामात फौजदारांना मदत देणें ही कामें पाटीलांची होत. गावाचा बंदोबस्त त्यानींच ठेवावयाचा असे. तसेच देवी डॉक्टर, बेलीफ वगैरे सर्वांना पोलीस पाटील मदत करीत. त्याच्या हाताखाली मढवी असत. त्यांचा पंचोत्रा पोलीस पाटील आपल्या पंचोत्रातून देत म्हणून ते पाटलांची कामे करीत. पो.पाटील यानी तो पंचोत्रा बंद केल्यामुळें मढवी बंद झाले. मढवी याचे मुख्य काम म्हणजे आलेल्या अंमलदाराची सरबराई करणें हे असे. तलाठी किंवा मुखत्यार चिल्हर खर्चाचे रु. ५० खर्च करित गावांत कोणी शास्त्री, पंडीत, कथेकरी, पुराणिक आला तर त्याची व्यवस्था ठेवणे, त्यांना बिदागी देणे ही कामें हे मुखत्यार किंवा तलाठी करीत.

तसेंच गावंत कोणी सरकारी मनुष्य आल्यास ह्याच पैशातून त्याची बडदास्त ठेविली जाई. पुढें ही चिल्हर खर्चांची रक्कम वसंतराव पुरुषोत्तम नाईक इनामविलीन होईपर्यंत वरील कामाकरितां खर्च करीत असत.

अणजूरची पाटीलकी : अणजूर येथें नाईक राहण्यास येण्याचे आधीं येथें मूळचे ठाकूर घराणें राहत होते. त्या घराण्यांत अणजूरची पाटीलकी प्रथमपासून होती. त्याचवेळीं ह्या पाटीलकीत कुणबी घराण्याची भागीदारी असावी असें दिसते कारण हल्ली अणजूरास ही पाटीलकी पांच पांच वर्षांचे हिशोबानें तीन ठिकाणी वाटली जात आहे. कारण ह्या पाटीलकींत गंगाजी नाईकाचे दुसरे शाखेचा इसम भागीदार आहे व एक कुणबी पाटीलही आहेत. म्हणजे ठाकूर व कुणबी असे मुळचे दोन भागीदार आहे आणि नाईक घराणें इकडे आल्यावर त्यानीही एक पाळी आपल्याकडे घेतलेली दिसते. ठाकूर हे पहिल्या पाळीत, नाईक दुसऱ्या पाळीत व कुणबी हे तिसऱ्या पाळीतले होत. पुष्कळ वर्षांपासून ठाकूर हे आपला मनुष्य नेमून त्याच्याकडून पाटीलकी उरकीत. तसेच नाईकही दुसऱ्याकडूनच आपली पाटीलकी चालवित. ह्या पाटीलकीच्या उत्पन्नांतून पाटील हे श्री सिद्धीविनायकाचे धुपदिपाकरितां वार्षिक १४ रुपये देत असत पण पुढें पुढें पाटील लोकांनी हे पैसे देण्याचे नाकारले, दिवे येथें आलटून पालटून दोन घराण्यांत ही पाटीलकी चालत होती. अलीमघर येथे एकाच घराण्यांत ही पाटीलकी होती. भरोडीसही ही पाटीलकी एकाच घराण्यांत चालू होती. पाटील हा गावाचा महत्वाचा नोकर होता. शहाणा पाटील गावांची सूत्रें हाती घेऊन गावाचा कारभार सुरळीत चालू ठेवीत असे. तंटेभांडणें मिटविणें, शांतता राखणे ह्या दोन गोष्टीची जबाबदारी पाटलावर असे. सरकारनें ह्या पाटलाना केव्हाही पंचोत्रा सरकारचे रकमेंतून दिला नाहीं. मिराशी व पाटील ह्यांचा पंचोत्रा दरोबस्त नाईक देत असत. सध्या सरकारनें ही पाटीलकी रद्द केली आहे. ही कायमची रद्द होते किंवा त्यांत काहीं रुपांतर होते हे पाहणे आहे.

कोतवाल : कोतवाल हे घराणें इनामदारांपैकीच आले आहे. ह्याचे व इनामदारांचे तीन दिवसांचे सुतक व सुवेर पाळण्यांत येत असे. ह्याची घरें वरली आळी व खालची आळी ह्याच्या मधल्या जागेत असत. ह्या आळीस कोतवाल आळी म्हणत. हल्ली ह्याचे कोणीही भाउबंद अणजूरास नाहींत. बाळ नाईकांचे बरोबर तान नाईक व भीव नाईक हे सखे भाऊ आले. मागे म्हटल्याप्रमाणें तान किंवा भीव ह्या दोघापैकीं कोणीतरी अणजूरास राहिले व त्याणी काळ दुरावल्यामुळें बाळ नाईकाचे वंशजाचे बरोबरचा भाऊपणांचा संबंध तोडला व ते तीन दिवसाचे आशौच मानू लागले. त्याना कोतवाल हे नांव कोतवालीवरून पडले केव्हां पडले हें समजू शकत नाहीं. होळी लावण्याचा

त्यांचाच हक्क होता. बाळ नाईकाचे दुसरे भाऊ अष्टागरांत कीहीम येथे गेले असे समजते व तेथेच त्यांचे वंशज आहेत.

बलुतेदार मिराशी व इतर : बलुतेदारीची ही पद्धत फार पुरातन कालापासून भारतात चालू होती त्यामुळें खेडी स्वतंत्र व स्वायत्त असत. बाहेरील मदतीची अपेक्षा खेड्याना नसे. त्यांचे ते स्वतंत्र राज्य असे. ही पद्धत जसजसी कोसळूं लागली तसतशीं खेड्यातली स्वतंत्र बाण्याची पद्धत कोसळत गेली. खेड्यात सर्वत्र रामराज्यें होती. हल्ली खेडीं हा भारताचा उकीरडा झाला आहेच ? ग्रामपंचायती स्थापन करून स्थिती सुधारणेचा प्रयत्न हे सरकार करीत आहे पण पायाच चुकलेल्या घराप्रमाणें खेड्यांची दैना वाढत आहे. ह्याप्रमाणें मिराशी हे अणजूरचे बलुतेदार होते. हल्ली महारवाड्यांत गोमा काथोड गायकवाड त्या वंशातला प्रमुख वंशज आहे. त्याला स्वतःला सखे भाऊबंद नाहींत पण इतर भाउबंद आहेत. शिवाय वेहळे गांवचे एक कुटुंब तेथें आहे व दुसरे कुटुंब लोनाडचे आहे. नाईक अणजूरास येण्याचे अगोदर पासून हे गोमाचे कुटुंब अणजूरास आहे. पूर्वी हा महारवाडा पाड्यावर जाण्याच्या मागांवर असलेल्या टेपावर होता पण कामाचे व्यवस्थेकरिता हा महारवाडा हल्लीचे ठिकाणी आणला गेला. गंगाधर (गंगाजी) नाईकाच्या बरोबर ह्या कुटुंबानें वसईच्या मोहिमेच्या वेळीं फार मदत केली म्हणून गंगाधर नाईकाने त्याना ५० एकर जमीन बक्षिस दिली. डोळे बांधून त्यातल्या प्रमुख इसमानें जी जमीन दाखविली ती त्याला गंगाधर नाईकाने दिली त्यातली पेढीवरची जमीन त्या लोकांकडे आहे दुसरी जमीन गेली. गोमाचे घराणें मूळचे होय पण कामाचा उरक होईनासा झाल्यामुळें गोमाचे पूर्वजानीं देवरूख येथून आपले भाऊबंद आणले व त्याना आपले भागीदार केले. त्यामुळें ही दोन घराणीं चालू झाली हें पुढें सांगितले आहेत. दुसऱ्या घराण्याचा वंशवेल मिळत नाही गोमाचा वंशवेल माहित आहे तेवढा देत आहे. त्या दुसऱ्या घराण्यांत १० इसम आहेत. त्यांत आज रामजी जगू प्रमुख आहे. ह्या सर्वांच्या मोबल्यांत गांवातल्या प्रत्येक कुटुंबांकडून त्याना भाताचा भारा मिळे व पेज पाणी म्हणजे आम्ही गेलो तर रोज भाकरी मिळत असे व सणासुदी पक्वाने मिळत. ह्या घराण्याचे गायकवाड हे नांव आहे. अणजूरचे मिराशी हे मिराशीच्या २८ गावांतले सभेचे प्रमुख आहेत. सोबत आवणीचे गीत व बळीराजाचे गीत अशी दोन गीतें पुढें देत आहे.

मूळ पुरुष शिवा
|
काल्या
|
धुंदल्या
|
काथोड
|
गोमा

ग्राम व्यवस्था : मिराशी

मिराशी : मिराशी हा ग्रामव्यवस्थेतला शेवटचा नोकर होय. गावांतल्या सर्व कामात ह्याची फार मदत असे. इनामदारांकडून अलिमघर, भरोडी, व अणजूर ह्या तीन ठिकाणच्या इनामदारांच्या पैशांतून त्याना मोबदला मिळे. ह्याने गांवांत मुखत्यार किंव तलाठी अथवा वरचे अंमलदारांस मुलकीच्या म्हणजे वसुलाच्या कामांत मदत करावी असा शिरस्ता होता. त्याचप्रमाणें शिपाई, फौजदारी अंमलदार याचे बरोबर त्याने फिरून त्याच्या कामांत सर्व प्रकारची मदत करावयाची असे. तसेंच बेलीफ, देवी डॉक्टर वगैरे इतर कोणी अंमलदार आल्यास त्याला मदत करावी गावाच्या बंदोबस्ताचे काम त्याच्याकडे असे. वसुलाचे भरणें त्यानेच ने आण करावयाचे असत. शिवाय गांवकीची सर्व कामें त्यालाच करावी लागत. कोणत्याही गोष्टीची माहिती दवंडी पिटून त्यानेंच द्यावयाची असे. इनामदार पगार देत असल्यामुळें त्यांच्यावर त्यांचा अग्रहक्क असे. सरकारी दवंड्या त्याला द्याव्या लागत त्याप्रमाणें इतर गांवकीच्या दवंड्या तोच देई. ह्या रीतीनें त्याच्याकडून सर्व कामें करून घेतली जात.

होळीचे सणाचे वेळीं त्यानें पाडा व अणजूर येथून लाकडे, शेणी गोळा करावयाच्या असत. तो मुरारजी चौक झाडीत असे. त्यालाच रात्री पूजेच्या वेळेपासून त्या मध्यरात्रीपर्यंत वाजंत्री ठेवावे लागे. होळी पेटल्यावर पहिला मान म्हणून माझ्या दाराजवळ वाद्य गाणे करून नंतर इतरांचे दारी मान देऊन तो जात असे. ह्या मानाबद्दल त्याला माझ्याकडून ४ आणे मिळत. बाबूराव भालचंद्र कडूनही पोस्त मिळत असे. गांवातून इतराकडून त्याला मोबदला मिळे. गावचे लोक खडीचा बांध बांधीत असत त्यावळीं खाडीवर जाण्याचा ईशारा म्हणून मिराशी हाक मारीत असे. खाडी बांधून पुरी झाल्यावर शेवटच्या दिवशी मिराशीचे वाद्यासह खाडी बांधणारे लोक मिरवत घरी येत त्यावेळीं योग्य ते वेतन त्याना खाडीवाले देत असत. गावांत देवीचे सातीक करतात त्यावेळीं शिबी टोपली हेच मिराशी देतात. दसऱ्याचे शमीपूजनाचे वेळीं मिराशाचे वाद्य असे त्या वाद्यासह मंडळी मोठ्या चौकापासून राममंदिरापर्यंत जात व राममंदिरापासुन मिरवणुकीसह इनामदार श्री गजाननाचे द्वारी येत व नंतर देवीचे देवळांत जात. त्यावेळीं गंगाजीचे वंशज त्याना ठराविक देणे देत असतात. आवणी संपल्यानंतर मिराशी दारोदार जाऊन आशीर्वाद देतात त्याबद्दल त्यांना ठराविक मोबदला मिळे. पहिला मान माझा आहे तसेच बळीचे पूजनाचे दिवशीं पहाटे मिराशी प्रत्येक इनामदारांचे घरी जाऊन बळीच्या राजाचा आशिर्वाद देतात हाही प्रथम मान माझाच आहे प्रत्येकी मी ४ आणे देत असतो. गावांत होणारे चामडे यावर मिराशांचा हक्क असे. त्याच्या मोबदल्यांत पाच इनामदाराना पाळीपाळीने वर्षास एक पायतन एका इनामदारास मिळे. देवी आल्या,

मयत झाले किंवा अशाच कांहीं कारणानी शेतकरी बंधूच्याकडे वाजंत्र्य नेत. ह्या व इतर सर्व गावकीच्या कामाकरितां त्याना गांवचे लोक दर वर्षास प्रत्येकी एकेक भाताचा भारा देत असत. दिवाळीच्या सणाचे वेळीं त्याना खाद्य पदार्थ मिळत असत. मिराशानी चार गावें निरनिराळी अशी वाटून घेतली आहेत इनामदाराना दिलेल्या पायतनाव्यतिरिक्त प्रत्येक गांव पाटलास व खार पाटलास एकेक पायतन मिराशी देत असत. गंगाजीच्या नोकर लोकास पाटील म्हणत त्यानाही एक पायतन मिळे शिवाय गावच्या मिराशांना दोन पायतणे मिळत. ही पायतणें गावाचा चांभार महारांचे वतीनें देई. मिराशी दर वर्षास दोन दोन असत. पंचोत्रा दोघे वाटून घेत. मिराश्यामध्यें दोन घराणी आहेत. एका घराण्यात एकटा गोमा काथोड गायकवाड आहे त्याला पुढें वंशज नाही. दुसऱ्या घराण्यात रामजी आदी १०।१२ पुरुष आहेत. आता ही बलुतेदारी पद्धत सरकारने बंद केली व रोकड पगारी कोतवाल नेमले आहेत पण हे मिराशी पूर्वीप्रमाणें कोंडवाड्याचे राखणावळ करतात व गांवची कांतडी घेतात. होळीचे वगैरे प्रसंगीं आता कोणीही मिराशी येणार नाहींत. ते बुद्ध झाले आहेत.

बलुतेदार चांभार : अणजूरास एक चांभार घराणे आहे. त्यांचे आडनांव दिनकर हे आहे. हेही पुरातन आहेत त्यांचे म्हणणें आहे कीं, आमचे मूळगांव अणजूरच होय. महारवाड्याच्या पूर्वेस ह्यांची घरें आहेत. अणजूर गावचे बलुतेदार मिराशी ह्यानाच गावांतली चामडी घेण्याचा हक्क होता पण चांभार व महार ह्यांच्यात करार होता कीं, बाहेरगांवीं कांहींही किंमत असली तरी अणजूरकर मिराशी यानी टोणगा म्हैस याची चामडी २॥ रुपयासच अणजूरचे चांभारास द्यावी व गाईचे चामडे ०१२ व बैलाचे चामडे १॥ ह्या भावाने द्यावे. त्यांना इतर गांवचे चांभारास चामडी विकता येत नसत. कोणी चुकल्यास त्याचा न्याय होई व अपराधी शिक्षेस पात्र होई. चांभार ह्याना मिराशाचे सावकार म्हणत व हे चांभार त्याना आगाऊ पैसेही देत. त्याच्या मोबदल्यात मिराशीच्या हकीकतीत सांगितल्या प्रमाणें इनामदार, गांव पाटील, खार पाटील इत्यादिना मिराश्याचे वतीनें फुकट पायतनें वर्षास द्यावी असे ठरले होते. त्याचप्रमाणें इमानदाराची सांधणुक चांभार फुकट करीत व गावांतल्या प्रमुख लोकांची सांधणुक निम्या दरानें करीत असत.

मिराशेची वतनी जमीन : तोरणे माळाजवळ इनामदारानी दिलेली बलुत्याची जमीन होती ही २॥ बिघे जमीन मेहरबानजी पारशी यास राघोने १० रुपयांत गहाण घातली व पुढें ती जमीन गेली. त्यांचा वंशवेल.

मूळपुरुष गंध्या
|
राघो
|
हाल्या
|
वालक्या —— —— मारुती

वालक्या: विठ्ठल —— हरी
विठ्ठल: केशव —— महादेव
हरी: शंकर
मारुती: मंगळ्या —— गणपत
मंगळ्या: |

१) मिराशाचें गाणें : चांग आवणीनंतर नारळी पौर्णिमा झाल्यानंतर आशीर्वादपर गाणें.

खैर जन्मला खैर खांदी । ध्रामण जन्मला ओंढ्या रानांत ॥
कुणबी जन्मला आईचे पोटी । बैल जन्मला गाईचे पोटी ॥
ह्या दोघांची झोंबी शेताचे वांदी । ऊठ आंजो ऊठ बांधो ॥
कुणब्याचे पूत गेले वन्जे । माणीक मोत्या घेऊनि आले ॥
छपरी तारुं लावून घरी आले । कडपास खंडी, भाऱ्यास मुडा
आवडी माळ । माचोल्या आवडा कणा । मामल्या भोईरा प्रसन्न ।
तसा काका कुणब्याला प्रसन्न हो.

२) दिवाळीचें गाणें : आशीर्वादपर

कोर दिवाळ्या कोर दसरा । गाई म्हशी गोठे भरा । कन्यापुत्र राज्य करा ।
सोने विरो कथीऴ विरो । बळीचे राज्य प्रसन्न होव.

इनाम गांव व्यवस्था : इ. स. १७४० च्या आंत बाहेर अणजूर हा गांव पेशवे सरकारने इनामदारास ' जान इनाम ' दिला. हा गांव शराकति इनाम असल्यामुळें गांवचे वसुलातून ⅔ हिस्सा इनामदारानीं द्यावयाचा व ⅓ हिस्सा सरकारनें द्यावयाचा असा संकेत ठरला पण कोणत्याहि लागोपाठच्या सरकारनें ह्या गांवचा वसुलीचा हिस्सा परस्परें घेऊं नये असाही संकेत ठरला. इनामदारांनीच स्वतः ह्या गावचा वसुल करावयाचा, वसुलीचा खर्च इनामदारांनीं स्वतः सोसावा हेही ठरले. वसुल आलेनंतर इनामदारांनीं त्यांतला ⅓ हिस्सा सरकारला द्यावयाचा व ⅔ हिस्सा हिस्सेरशीनें

इनामदारास वाटावयाचा हेंही ह्यावेळीं ठरले गेले. ही पद्धत अगदीं प्रथमपासून इ. स. १८६१ सालापर्यंत चालू होती. त्यांत खंड पडला नाहीं. इनामदारांनीं शंकराजी केशव फडके यांना सनद लिहून देऊन हसबनीस यास एक गुमास्ता नेमून त्याकडे वसुल सोंपविला. सन १७४१ च्यामध्यें झालेल्या वरील सनदेप्रमाणें त्या हसबनीसाला वसुलीच्या मजुरी पोटीं $\frac{2}{3}$ उत्पन्नांतला सहावा हिस्सा द्यावा असेही ठरले. ह्या सनदेवरून स्पष्ट होते कीं, इनाम गावावरचा सर्व व्यवहार व इतर सर्व हक्क इनामदारांचेच अंगभूत आहेत आणि त्यामुळें कोणत्याही नवीन सरकारास ह्या गांवचा वसुल करण्याचा हक्क नाही. इ. स. १८६१ पर्यंत पुष्कळ वेळां वसूल संपूर्ण होत नसे व त्यामुळें सरकारचा $\frac{1}{3}$ वसुलही येत नसे. अशावेळीं सरकारचा $\frac{1}{3}$ हिस्सा अनेकदा पोहोंचविला जात नसे. ह्या करवसुलीला व्यत्यय येण्याचे कारण असे असे कीं, लँड रेव्हेन्यु अॅक्टप्रमाणें वसुलीन देणाऱ्यांच्या वस्तुजप्त लिलांव करणे किंवा जमीनी जप्त करणें, किंवा अशा प्रकारचे जालीम उपाय इतरत्र योजिले जात असत तसे ते उपाय योजावयाचा अधिकार इनामदाराना नसल्यामुळें त्यांची वसुली होत नसे. ही अडचण दूर करण्याकरितां ठाणें कलेक्टर व अणजूर इनामदार यांचे मध्यें १९ मार्च १८६१ रोजीं तो सुप्रसिद्ध करार झाला.

सरकारी करार

सन १८६१ चा करार-कलेक्टर ठाणें यांचे बरोबर : सन १८६१ ची पाहाणी सर्वे होण्याचे पूर्वीं ढेप पद्धतीनें वसुल करण्यांत येई. ढेप पद्धत म्हणजे ठरलेल्या जमीनीबद्दल ठरलेले भात घेणे पण १८६१ चे पहाणीनंतर सर्वे होऊन शेताना धारा लागू झाला व त्याप्रमाणें वसुल होऊ लागला. इनामदारानी अणजूर गांवास प्रथमतः सर्वे नाकारली पण पुढें ती करून घेतली. ह्यावेळीं कलेक्टर व इनामदार यांचेमध्यें एक करार सन १८६१ मध्यें झाला. इनाम गावाचा वसुल करण्याचा अधिकार सरकारास नव्हता. पण $\frac{1}{3}$ हिस्सा सरकारला वसुल द्यावा लागे. इनामदाराकडून वसुलात ढिलाई होई. म्हणून सोयीकरिता सरकारनें हा करार केला. हा करार १९ मार्च १८६१ रोजीं झाला. इतर कलमाबरोबर त्यात ही खालील कलमें महत्वाची होती. इनामदारांना जंगम मालाच्या जप्त्या काढणे किंवा जमीनी जप्त करणेचे हक्क नसल्यामुळें वसुल होत नसे. ही अडचण जाणून करारात घालण्यांत कीं, १) भिवंडीच्या मामलेदारानें लँडरेव्हेन्यु अॅक्टाचे आधाराने इनामदाराच्या नोकरास किंवा मुखत्यारास वसुल होण्याकरितां सरकारी मदत देत जावी. (२) दुसरी महत्वाची बाब ही कीं, इनामदारानें ज्या कोणास नेमले असेल त्यानें परस्परे इनामदाराना वसूल झालेल्या रकमेतला $\frac{2}{3}$ हिस्सा वाटावा व $\frac{1}{3}$ हिस्सा सरकारांत भरणा करावा.

कलेक्टरचा हुकूम : कांहीं संशय उत्पन्न झाल्यावरून भिवंडी मामलेदाराच्या नं. ५९४/१८६२-६३ च्या रिपोर्टावरून कमिशनरनें हुकूम काढला कीं, कांहीं असले तरी खालसाचे सर्व नियम व प्रघात अणजूर गावाचे वसुलाचे वेळीं उपयोगात आणले जावेत अशारितीने १८९२-९३ पर्यंत ही सर्व मदत योग्य वेळीं मिळत जात होती. व त्यामुळें कोणताही अडचणीचा प्रसंग तोपर्यंत उद्‌भवला नाहीं. ह्या व्यवस्थेमुळें त्या वेळच्या सरकारला इनामदारांच्या अधिकारांत हात घालता आला नाहीं. १८६१ चे कराराप्रमाणें सरकार फक्त मदत करीत असे इनामदाराच्या कामात हात घालू शकत नसे. १८९३-९४ मध्यें कलेक्टरनें तसेंच हुकूम काढले. पण सन १८६१ च्या करारास व ह्या हुकुमास भिवंडी मामलेदारानी व इतर ऑफीसरानीं न जुमानता इनामदारांची मदत तोडली व त्याचा दुष्परिणाम होऊन पुन्हा गांवाकडे बाकी थकली त्यामुळें सरकारनें गांव जप्त करून $\frac{1}{3}$ हिस्सा वसूल केला व तो सरकारात जमा केला व १८९८त गांव इनामदाराना दिला पुनः १९०० सनांत सरकारनें गांव जप्त केला पण इनामदारांचे अनेक अर्ज झाल्यावरून सरकारने हुकुम काढला कीं हें सरकारचे कृत्य सन १८६१ च्या कराराविरुद्ध हत आहे म्हणून सरकारने ४७७६/१९०७ च्या हुकुमाप्रमाणें फर्मांविले कीं जमा झालेली कोणतीही रक्कम सरकार एकटें घेऊं शकत नाहीं होणाऱ्या वसुलाचे $\frac{2}{3}$ व $\frac{1}{3}$ असे वाटे झालेच पाहिजेत तसेंच सरकार कायदेशीररीत्या गांव ताब्यांत घेऊं शकत नाहीं. आणि इनामदारानां गांव द्यावा असेंही फर्मांविलें. हेही लक्षांत ठेवावे कीं, जरी सरकारनें गांव दोनदा जप्त केला होता तरी इनामदाराचे माणसाकडून वसुली केली होती सरकारी इसमाचेकडून वसुली केली नाहीं. ४७७६/१९०७च्या हुकुमाने खालील गोष्टी निश्चित केल्या. (१) सरकारला अणजूर गांव जप्त करतां येत नाहीं व ताब्यांत ठेवता येत नाहीं. (२) ह्या गांवची जमीन सरकारलला जप्त करितां येत नाहीं (३) सरकारला स्वतंत्रपणें ह्या गांवचा वसुल करण्याचा कोणताही अधिकार नाहीं. (४) सरकार हे इनामदारांना वसुलीचे कामी मदत करण्यास बांधलेले आहे. (५) जी रक्कम जमा होईल त्याचें $\frac{2}{3}$ व $\frac{1}{3}$ असे वाटे होऊन ती सरकार व इनामदारांना मिळावी सरकारला एकट्याला मिळणार नाही. (६) जमा वसुलीतला $\frac{1}{3}$ हिस्सा स्वतंत्रपणें निरनिराळ्या प्रसंगीं सरकार घेऊं शकत नाहीं.

सरकारी मदत : १९०७-१९०८ पर्यंतचा सर्व वसुल झाल्यावर इनामदारानीं स्वतः अर्ज करून हीच पद्धत चालू ठेवण्याची विनंती सरकारला सन १९०८ मधें केली व त्याप्रमाणें क्रमशः वसूल होंऊ लागला पण पुनः ह्या व्यवस्थेने ही वसुली झाली नाहीं तेव्हां सरकारनें १९०९ त गांव जप्त केला पण हीच व्यवस्था चालू राहिली. पण थक बाकीची वसुली न करितां सरकारनें गुलाम मुस्ताफा ह्याला ३३१ एकर जमीन ७२२७ रु. धारा बाकी असतांना एकरकमेनें ११६६ रुपयाचे धाऱ्यावर विकत दिली.

गांव परत घेण्याचा एक प्रयत्न : ह्या सर्व वेळीं तालाठ्यांचा दरमहा पगार, सादिलवार, पेन्शन फंडाची रक्कम वगैरे सर्व प्रकारचा खर्च इनामदाराचे हिश्यातून सरकार घेई. अशाहि स्थितींत १९१६ त गांव ताब्यामधें घेण्याकरितां कांहीं इनामदारानीं माझें नांव मुखत्यार म्हणून सुचवून अर्ज केला होता पण राहिलेल्या कांहीं इनामदारानीं व हिस्से विकत घेतलेल्या इनामदारानीं सह्या देणेंचे नाकारल्यामुळें ⅔ सह्या न मिळाल्यामुळें सरकारनें गांव जप्तच ठेवला.

इनामदारांचें दप्तर : इनामदाराचे दप्तर नेहमीं इनामदारांचे ताब्यांत असे. सन १९०९ पर्यंत गांव जप्त झाले तरी ते दप्तर शेवटी अणजूरास चिन्तामण मुकुंद यांचेकडे ठेवलेले होते पण १९१० सालांत सरकारनें रेतीमातीचे वेळीं जशी इनाम गांवांत कारवाई केली तशी कारवाई करून इनामदारांचे दप्तर भिवंडीस ठेवले. अनेकवेळां मागणी केल्यानंतरही ते मिळाले नाहीं. पूर्वीचे दप्तर हल्ली नाहीं व नवीन दप्तर आज उपलब्ध नाहीं. ही शोचनीय गोष्ट आहे.

पेशवे व इनामदार : इ. स. १७७४ मध्यें इंग्रजानीं ठाणें येथें आनंदराव सुभेदार यांचा पराभव केला आनंदराव एकटाच राहिला इंग्रजानीं त्यास पकडलें त्यावेळीं इंग्रजानीं रयतेला जाहीररित्या दिलासा दिला कीं, कोणी देशत्याग करूं नये. आपापल्या वतनावर प्रत्येकाने यावे याप्रमाणें अणजूरचे इनामदार त्यांच्या साष्टीचे वतनावर हजर झाले. हें वर्तमान पुणें येथें गेल्यानंतर पेशव्यानीं इनामदाराच्या ह्या गुन्ह्याकरितां त्यांना ७००० सात हजार रुपये दंड केला व तो दंडहि इनामदारानीं पेशव्यांना दिला. वतनावर हजर होणें हा इनामदारांचा गुन्हा नव्हे मोठ्या प्रयत्नानें, जीवाभ्य श्रम करून इनामदारानीं वसई व साष्टीबेट पेशव्यांना मिळवून दिले. तो मुलुख पेशव्यानीं राखण्यांत कसुर केल्यामुळें इंग्रजांना पेशव्यांचा पराभव करतां आला मुलुख हरवला जाण्याईतका कमी बंदोबस्त ठेवणाऱ्या पेशव्यांनीं आपली धोडचूक छपवून इनामदारांना दंड करणें हें त्यांचे कृत्य अत्यंत अन्यायाचें आहे. पाठारे ज्ञातीच्या शेंकडों जवानांनीं व गंगाजीच्या संघटणेतल्या इतर जवानानीं साष्टी व वसईकरितां आपलें बलिदान केलें त्याबद्दल त्यांची वतनें न देण्याचा अन्याय करणाऱ्या पेशव्यांनीं हा नाईकावर केलेला अन्याय पेशव्यांनाच शोभतो. वसईच्या संग्रामानंतर पेशव्यांनीं ह्या प्रान्तात मुळीच बंदोबस्त ठेवला नव्हता. सैन्य ठेवलें नाहीं सन १७८४ मध्यें महादजी शिंदे यांनीं पुढें हा सर्व मुलुख तहानें इंग्रजानांच दिला. इनामदारांना मात्र ७००० रु. भूर्दंड उगाच भरावा लागला.

इनामदारीचा हक्क : सरपाटीलकीची सनद पेशव्यानीं नाईकांना दिली त्यांत अणजूर हा इनाम गांव संस्थानाचे दर्जाचा दिला आहे. त्या इनामीच्या हक्काप्रमाणें काय काय इनामदारांच्या अधिकारांत त्याना करिता येत असे तें आता पाहू. या गांवचा वसूल करण्याचा प्रथमचा महत्वाचा हक्क आहे. म्हणजे इनामदार त्या बाबतींत स्वतंत्र व स्वायत्त होते. ह्या वसुलीचे कामांत सरकारला हात घालता येत नसे. वसुल टरविणें, माफ देणें, जप्ती करणें वगैरे सर्व बाबींत स्वतंत्रपणें इनामदार वागत असत. हा गांव शराकती इनाम असल्यामुळें $\frac{1}{3}$ उत्पन्न सरकारला द्यावे लागे. जुडी भरावी लागे. हे तिसरे हिश्याचे, वसुलाचे, सरकारचें उत्पन्न सरकार परस्परें वसूल करूं शकत नसे किंवा जुडी ही **स्वतंत्रपणें** सरकार वसुल करूं शकत नसे. इनामदारांचा मुखत्यार गुमास्ताचे किंवा पुढें कारकूनाचे मदतीनें गांवचा वसूल करी.ठरलेला सरकारचा $\frac{1}{3}$ हिस्सा जुडी वगैरे इनामदार सरकारला भिवंडी येथें पोहोचवित लिलावांतल्या वस्तु सरकारकडे न पाठविता इनामदार त्यांचा लिलाव गावीं करीत. अणजूर गावची पडीत जमीन किंवा गुरचरण ह्याजवर इनामदारांची सत्ता असे. अशी जमीन किंवा गुरचरण भाड्यानें देणेचा किंवा कायम विकणेचा हक्क इनामदारांचा असे मात्र त्यातला $\frac{1}{3}$ हिस्सा इनामदार सरकारांत भरणा करीत असत. बाकीची रक्कम अणजूर गांवींच वाटली जाई. गावचे ताडमाड याचे लिलांव इनामदार करून त्याचाहि $\frac{1}{3}$ हिस्सा सरकारांत भरणा करीत असत. मागे लिहिल्या-प्रमाणें इनामदाराचे इनाम गावाचे हद्दींत कोणीही कसलेही दुकान घातले तर त्याची पट्टी इनामदार स्वतः घेत असत. इतर कोणताही इतर वस्तुवरील कर किंवा दर्यातली मासळी मारण्याचा हक्क इनामदार कुणालाहि मक्त्यानें देत व ते उत्पन्न स्वतःच घेत. ह्याच हक्कानें कोणी दारूचे दुकान ह्या हद्दीत घातले तर इनामदाराचे परवानगीनें ते घातले जाई व त्याचेकडील लिलावाची रक्कम इनामदार स्वतःकरिता वसूल करीत असत. तसेच इनामदारांना खाडीचा जो भाग सनदेप्रमाणे मिळाला होता. त्यांतली रेती, माती, दगड वगैरे वस्तुवर इनामदारांचा हक्क होता व रेतीमातीचे दगडाचा इनामदार लिलाव करून ते उत्पन्न स्वतः घेत असत. जमीनीच्या धारा वसुलीचे बाबतींत फक्त सरकारला तिसऱ्या हिश्याचे उत्पन्न घेण्याचा हक्क होता. इतर बाबती इनामदाराच्या स्वतःच्या होत्या. त्या व्यवहारांत सरकार हात घालू शकत नसे. खाडीतले पाणीही विकून त्याचे उत्पन्न इनामदार घेत असत.

इनामदारांना मुलकी फौजदारी हक्क : अणजूर गांवची सर्व मुलकी व फौजदारी कामें इनामदार आपले पाटील मिराशी ह्यांच्या मदतीनें करीत असत. लहान लहान रकमांचे मुलकी दावे इनामदार चालवित असत व निर्णय देत. तसेंच लहान प्रमाणांतले फौजदारी दावे इनामदार चालवित व निर्णय देत. गावांत कोणी दुकान

घातेले किंवा धंदा योजला तर ईनामदारांचे परवानगीची जरूरी असे. साग, शिसव ह्या झाडावरही इनामदारांचा हक्क असे. इनामदारांचे परवानगीनें ही झाडें तोडली जात असत निराळा सरकारचा परवाना लागत नसे. इनामदारांचे परवानगीनें कोणासही मीठ पिकविता येत असे एकूण हे कीं इनामदार हें स्वतंत्र व स्वायत्त असत. एखाद्या संस्थानिकाप्रमाणें सरकारचा रेव्हीन्युचा हिस्सा सरकारास दिल्यानंतर आपल्या क्षेत्रांत इनामदार स्वतंत्रपणें रहात असत. सन १८६१ ची रेव्हिन्यु पाहणी बरेच दिवस ईनामदारांनी आपल्या गावांस लावून घेतली नाही. इनामदारांनीं परवानगी दिल्यानंतर ही सर्व पाहणी अणजूर गांवांत करण्यांत आली.

देशनाडगौडीचा हक्क : हा हक्क ज्या सनदेनें इनामदाराना प्राप्त झाला त्या सनदेचा उल्लेख मागें आला आहे. आतां त्या हक्काचे स्पष्टीकरण करीत आहे. हा हक्क परगणे साष्टी प्रांत वसई मधील १०८ गांवावर व ता आठगांव परगणे सायेवान पैकीं २६ मिळून १३४ गांवावर मिळालेला आहे. ह्या हक्कानें काय, कोणत्या बांबतीवर इनामदार आपला अंमल चालवूं शकत त्याची कल्पना येण्याकरितां सनदेतला तेवढा भाग येथें देतों. "अणजूरकर यासी नूतन वतन देशनाडगौडी उर्फ सरपाटीलकीचे वतन परगणे साष्टि देखिल जकायेती व तर्फ आठगांव देहसवीस परगणे सायेवान पैकीं तर्फ मजकूर देखील जकायेती जलमार्ग व उभामार्ग व बंदरे परगणे मजकूर व तर्फ मजकूर वतन करार करून दिल्हे असे देह बी तपसील. एकूण परगणे साष्टि देह येकसे आठ व तर्फ आठगांव परगणे देहसवीस येकून देह येकसें चवतीस जिराईत व बागाईत व धरपट्टी व वण व मोहो तर्फ व ताडे व माड व भंडारथळ भटीया व कुंभार देखील कोळी व मच्छीमार व तरीउतार वगैरे जराई व पटीबाब व जकायेती व बंदरे जलमार्ग व उभामार्ग व मीठबंदरे व मिठागर व थलभटीत व थलमोड व गादीया, बंदरें व वखारी सरकारी जमाबंदी होईल त्याजवर हक्क नाडगौडी उर्फ सरपाटीलकी अणजूरकर यासी करार बी तपसील"

देशनाडगौडीचा हक म्हणजे सरकारी उत्पन्नांतला १०० शंभर रुपयांतला ३ रुपयाचा हिस्सा इनामदारांनी घ्यावयाचा हक होय. वरील १३४ गावांतला उत्पन्नाचा हा हिस्सा इनामदार वसुली करत असत. वर दिल्या प्रमाणे तेवढ्या सर्व बाबींच्या करांत इनामदाराचा नाडगौडीचे उत्पन्नाचा हक्क होता निरनिराळे संस्थानिक राजे असाच करार मुख्य सत्तेबरोबर करून हा हक्क उपभोगीत असत हा संस्थानिकाना दिला जाणारा एवढा मोठा हक्क ज्या अर्थी पेशव्यानी इनामदाराना दिला त्यावरून असें दिसते कीं, पेशव्यानी अणजूरकर इनामदाराचे संस्थानिकत्व मान्य केले. त्या हक्का प्रमाणे वरील उल्लेखिलेल्या सर्व बाबतीतील १३४ गावावर इनामदार कर बसवू शकत व तो

करभार वसूलही करू शकत ह्या सनदेने इनामदाराला अणजूर इनाम दिले आहे त्या अन्वये ईनाम गावांत सर्व हक्क स्वयंभूपणाने संस्थानिकाप्रमाणे इनामदार उपभोगित होते ह्या १३४ गावावर शंभर रुपया पासून तीन रुपया पर्यंत तेच हक्क इनामदार उपभोगू शकत होते. त्याच प्रमाणे ह्या सनदेत आगरवाडी ही वाडीही इनाम दारांना इनाम दिलेली आहे तिचाही उपभोग ईनामदार संस्थानिक दर्जाने घेत असत पेशव्याचे अमदानींत हा संस्थानिकत्वाचा दर्जा ईनामदार संभाळून असत ह्या सनदे-प्रमाणे सरकारी दरबारास इनामदाराना बहुमानाचे बोलाविणे हल्ली हल्ली पर्यंत कलेक्टर कडून येत असे. हे बोलावणे म्हणजे समान दर्जा होय. ह्या हक्कामुळे इनामदाराना जो अधिकार मिळाला होता तो अधिकार इनामदार गाजवीत असत पण इंग्रजाचे अमदानीत इंग्रजांनी त्यामुलखातली ही एक त्यांची अडगळ खालील प्रमाणें दूर करून सरकारने इनामदाराना ह्या हक्काबद्दल सालीना २०८ रुपये वंशपरंपरेनें देण्याचे ठरवून हा वसुलीचा हक्क विकत घेतला काँग्रेस सरकारनें सर्व भारत एकछत्री करण्याचे उद्देशानें इनामी हक्क, संस्थानिक हक्क, वगैरे नाहींसे केलें. वरील विवेचनावरून हे लक्षांत येते की अणजूरचे इनामदार अणजूर गांवात संस्थानिक म्हणून रहात असत.

रेतीमातीचा हक्क : इनामदार हे संस्थानिक होते हे जसे सरदेशमुखांचे हक्काचे विवरणावरून दिसन येते त्याप्रमाणें ह्या सनदेत दिलेल्या रेतीमातीचे हक्कानेहि तेंच सिद्ध होत आहे. ह्या सनदेत लिहिले आहे कीं सुरई नावाच्या खाडीतल्या खडकापासून पश्चिमेकडे खाडीफाटां जात आहे त्या फाट्यातील पासापर्यंत म्हणजे ठाण्यातील येणाऱ्या पाण्याच्या व वसईहून येणाऱ्या पाण्याचा संगम जेथें होतो तेथपर्यंत बोरभाटीच्या जागेतल्या रेतीमाती वगैरेवर इनामदाराचा मालकी हक्क आहे ह्याची सीमा म्हणजे समोरच्या बाजूला उधाणाचे पाणी किनाऱ्यास लागते तितक्या रुंदीच्या क्षेत्रावर हा हक्क इनामदाराना दिला आहे. ह्या दर्यांवर कोणीहि मासळी मारली तर त्याचा मालकी हक्क इनामदाराना मिळत असे ह्या क्षेत्रातले रेतीमातीचे लिलाव दरवर्षी इनामदार करीत. येणारे उत्पन्न वाटीत असत. अनेक वर्षे ह्या बाबतीत कोणताही प्रश्न उत्पन्न झाला नव्हता पण पुढें इनामदारांना इंग्रज सरकारनें लिहिलें कीं ठाणें जिल्ह्यातला रेतीमातीचा लिलाव आम्ही करतो पण त्यावेळी तुमच्या जागेतला लिलांव होतोच असें नाहीं त्यामुळें सलगपणा राहत नाहीं तेव्हां आपण परवानगी देत असाल तर आमच्या लिलावाचेवेळीं आपल्या जागेतल्या रेतीमातीचा लिलांव आम्ही करू. आपल्याकडून परवानगी आल्याशिवाय आम्ही लिलांव कायम करणार नाहीं. प्रथमवर्षी इनामदारांचे परवानगीनंतर तीनवार करून हे लिलांव कलेक्टर कायम करीत असे. पुढें कांहीं वर्षांनंतर कलेक्टर परवानगी न घेतांच लिलांव स्वतः कायम करी. पण पैसे

मात्र नियमितपणें कलेक्टर पाठवित असे. इनामदार सावध न होता त्यांनी ते चालू दिले. कांहीं वर्षांनीं कलेक्टरनें पैसे देण्याचे बंद केले. व इनामदारांना लिहिले की आपण कोणत्या आधारावर हा हक्क सांगत आहात ते सिद्ध करावे. इनामदारांनीं सरकारवर फिर्याद दिली हायकोर्टात इनामदार फिर्याद जिंकण्याच्या स्थितींत असतांना सरकारी वकीलानें निराळाच मुद्दा काढला कीं सरकारवर फिर्याद करतांना आधीं कलेक्टरकडे तसा अर्ज केला पाहिजे. अर्ज केल्यानंतर फिर्याद कोणीही सरकारवर करूं शकतो. ह्याचा आधार घेऊन पेन्शन ॲक्ट प्रमाणें हा दावा हायकोर्टानें काढून टाकला मात्र पुनः दावा देण्याची मुभा ठेवली. ह्याचे उत्पन्न फक्त त्यावेळीं शंभर रुपये येई. एवढ्या थोड्या रकमेकरितां कशाला दावा द्या म्हणून इनामदारांनी फिर्याद दिली नाही व हा हक्क गमावला. हल्ली त्याठिकाणचें रेतीचे उत्पन्न वर्षास १०००० पर्यंत येत असते. जमनादास मेहतांचे राजवटींत मी अर्जाने हा न्याय मिळवण्याचा प्रयत्न केला परंतु मला कोणीही प्रोत्साहन दिले नाहीं व कागदपत्रांचीही मदत दिली नाही. खालीं निकालपत्र दिले आहे.

दावा दिला : ही फिर्याद इ. स. १८९१ मध्यें ४२ इनामदाराच्या वतीनें कै. मुकुंद पांडुरंग नाईक यानीं ठाणें कोर्टात गुदरली. सरकारच्या सूचनेबरहुकुम १८९३ मध्यें ठाणें लोकल बोर्डासही प्रतीवादी केले. ह्या फीर्यादीचा निकाल जड्ज ह्यामिल्टन यांनं १८९६त आमच्या विरुद्ध दिला. त्यावर १८९७ मध्यें हायकोर्टात अपील केले पण फेरन जड्जानीं ते नामंजूर केले. पेन्शन ॲक्ट (४ व ६) ह्या कलमाच्या आधारें ते नाकारले त्यानंतर इनामदारानी प्रिव्ही कौन्सीलकडे अपील न केल्यामुळें हा हक्क गमावला गेला. कारण असें कीं, त्यावेळीं ह्या रेतीचा मातीचा लिलांव फक्त १०० शंभर रुपये वर्षास होत होता. तेव्हां एवढ्या रकमे करीता आणखी खर्च नको असें जाणून हा दावा प्रीव्ही कौंसीलकडे नेला गेला नाहीं. हा दावा जर विलायतेस गेला असता तर आपण जरूर जिंकलो असतो असे माझे मत आहे. इनाम जप्त झालेले सुटले त्या मुद्दावर आपण हाही दावा जिंकला असता. त्या फिर्यादीचे वेळीं सर्वजण सनदेचा अर्थ लावित कीं, इनामदार फक्त नक्त पैशाचे हक्कदार आहेत जमीनीचे नाहीं इनाम जप्तीत आपण जमीनीचे मालक ठरलों हे लक्ष्यांत घेतां त्यावेळींही सरकारचा वरील मुद्दा रद्द ठरला असता व अपील जिंकलों असतो.

निकाल पत्र :

Appeal No. 37 of 1897 from the original decree
Mukund Pandurang Naik & others Appellant original Pltt.

Vs

The Secretary of State for India in Council and another } Respondent

Appeal from the decision of J. Hamilton Esqur., District Judge of Thana in suit No. 6 of 1891.

Mr. V. G. Bhandarkar for the Appellant.

Mr. Government Pleader for the Respondant.

Judgement : We think that the Pensions Act (see 4 & 6) is an absolute bar to the Pltt's claim. They can only recover by showing that their claim is an itaim of the revenue of the Village Anjur for it is clear that there was no grant of the soil of the Village to the ancestors of the Pltts. Such being the nature of their claim the Pensions Act prevents the Court from making any decree against Govt. in respect of the Decree confirming with Costs.

6–9–97

(Sd) C. F. Faran
(Sd) E. G. Candy

निकाल पत्राचा मराठी अनुवाद

अपील नं. ३७/१८९७ पूर्वीच्या निकाल पत्रावरचे
मुकुंद पांडुरंग नाईक व इतर मूळचे अपीलन्ट } वादी फिर्यादी

विरुद्ध

सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इनकौन्सिल व इतर
मूळचे प्रतीवादी व आताचे } सामनेवाले

ठाणें डिस्ट्रिक्ट जज्ज टी. हामिलटन ह्याचे निवाडा पत्रावर हायकोर्टानें दिलेला निवाडा.

वकील व्ही. जी. भांडारकर : अपीलेट करिता

वकील सरकारी : सामनेवाल्याकरितां

निवाडा : आम्हास असें वाटते कीं पेन्शन ॲक्ट (से. ४ व ६) हा अपील करणाऱ्याचा हक्काविरुद्ध मोठा अडथळा आहे. अणजूर गांवचे रेव्हीन्युपैकीं रेती माती हक्क ही एक बाब आहे असें त्यांनीं दाखविल्यावरच ते आपले पैसे वसूल करूं शकतात. कारण फिर्यादीवाल्यांच्या पूर्वजांना त्या गांवची जमीन इनाम दिली नव्हती हें अगदीं स्पष्ट आहे. त्यांचे हक्काचे असें स्वरूप असल्यामुळें पेन्शन ॲक्ट, सरकार विरुद्ध कोणत्याही प्रकारची डीक्री (निवाडा) देण्यास कोर्टास बंदी करीत आहे म्हणून तीच मुळची डीक्री खर्चासुद्धां कायम करीत आहे.

६-९-१८९७

सही–सी. टी फेरन
सही ई. जी. कँडी

अबकारी हक्क : अणजूर ईनाम गावास संस्थान म्हणण्यास हरकत नाहीं. सरदेशमुखीचा हक्क, रेतीमातीचा कर घेण्याचा हक्क, अबकारी कर वसूल करण्याचा हक्क, वगैरे दर्शवितात की अणजूरगांव संस्थानच होय. अणजूरच्या मुक्त्यारास कोर्टी-तील कामात जामीन घेण्याचा हक्क होता तसेच लहान सहान रकमेचे मुलकी दावे व फौजदारी खटले चालविण्याचा हक्कही होता. सरकारी दरबारांत संस्थानिकांना बसण्याचा मान असे तोच मान मुक्त्यार याला होता. त्याप्रमाणें त्यांना सरकारी आमंत्रण येई. अणजूरचे हद्दीत जर कोणी दारुचे दुकान घातले तर त्याच्यावर अबकारी कर ईनाम-दार बसवीत असत. पुढें इंग्रजांनी सर्व सपाट करण्याचे इरायानें हा हक्क निरंतरचे ४२ रुपये देण्याचा करार करून सरकारनें विकत घेतला अशी सर्व उत्पन्नाची खाती सरकारने सरकारजमा केली. देशमुखीचा हक्क, रेतीमातीचा हक्क, अबकारी हक्क, शेवसवजीचा हक्क ही चार मोठी खातीं होत. फक्त अणजूर गांवचे इनामाचे $\frac{१}{३}$ भागाचा हक्क शेवटपर्यंत राहीला. मध्यंतरी सरकारनें कावा करून इनामी हक्क १ रुपयांस २० रुपये ह्या हिशोबानें विकत घेण्याचा बूट काढला होता पण कोणीहि इनामदारानें तो हक्क विकला नाहीं.

हे अबकारी हक्काचे पैसे गंगाजीचे वंशज व बुबाजीचे वंशज जयराम चिमणाजी व भास्कर गंगाधर यांचे नांवे मंजूर होऊन येत व सर्व इनामदारांना वाटले जात. पण पुढें इनामदारांनी त्यांतले २५ रुपये गणपतीच्या फंडास दिले बाकीचे पैशांतून गांवचे खातीकास ६ रुपये दरवर्षी देऊन व खर्च बजा जाऊन जे राहतील ते श्रीगणपतीचे कार्यास लावीत असत.

सेवसबजीचा हक्क : मासळी मारणाऱ्या लोकांकडून व मासळी विकण्याकरितां येणाऱ्या आठवडाल्याकडून हा कर वसूल केला जाई. खाडींत मासळी मारणाऱ्याकडून कोणीहि इनामदार हा कर मासळीच्या रूपांत वसूल करीत असे. मात्र मासळी विकण्यास कोळी आले तर ज्या गांवात तो कोळी उतरे त्या गांवचा इनामदार हा सेवसबजीचा हक्क म्हणजे जेवणी वसूल करी. आलीमघरास कोळी आला तर मुरारजीचे वंशज ही जेवणी घेत. अणजूरास कोळी आला तर बुबाजीचे वंशजांनी जेवणी घ्यावी. पाड्यावर जर कोळी आला तर गंगाजीचे वंशजांनी जेवणी घ्यावी व भरोडीस कोळी आला तर सिवजीचे वंशजांनी जेवणी घ्यावी व दिव्यास कोळी आला तर नारायणजीचे वंशजांनीं जेवणी घ्यावी. मासळी संबंधाचें हक्क म्हणजे सेवसवजी घेण्याचे हक्क होत. पाटीलकीचे म्हणजे देशमुखीचे सनदेप्रमाणें १३४ गांवात कुंभार, सुतार, कोळी, चांभार, तांबोली वगैरे धंदेवाल्या लोकाकडून सर्व हक्क जेवणी सुद्धां वसूलकरतां येत असत परंतु सरकारनें ईनामदाराचे हे हक्क हिरावून घेतले.

संस्थानिकाचे हें हक्क इनामदारानां प्राप्त झाले होते त्यास स्वतंत्र पुरावा म्हणून खाली पेशव्याचे स्मरण वहीतली सनद देत आहे ह्या सनदेस 'दफाते' म्हणतात ह्यावरून मांझे म्हणण्यास बळकटी येते की अणजूरकर इनामदाराना संस्थानिकाचे सर्व हक्क होते.

विड्याचा मान : गांवांत कोणाकडे लग्न किंवा कांहीं कार्य निघाल्यास ईनामदारांना विडा नारळ देऊन बोलाविणें करण्याचा प्रघात होता. व हल्ली ही कांहीं प्रमाणांत तो चालू आहे. हें बोलावणे वाजंत्र्यासह येत असे मात्र हा मान त्या त्या गांवच्या इनामदारांस देण्यांत येई. तऱ्यांची आळी वगळून बाकीच्या अणजुर गांवात व पाड्यावरील ठराविक दोन घरांत कांहीं कार्य निघाले तर हा मान बुवाजीच्या वंशजाना मिळे. तऱ्यांची आळी व पाडेगांव या ठिकाणी हा मान गंगाजीचे वंशजास मिळे. अलिमघरास कांहीं कार्य उद्‌भवल्यास हा मान मुरारजीचे वंशजाना मिळे. भरोडीस कांहीं कार्य उत्पन्न झाल्यास हा मान शिवजीच्या वंशजाना मिळे व दिवे गांवचा हा मान नारायणजीचे वंशजाना मिळत असे. हा मानाचा हक्क सनदेत उल्लेखिलेला आहे. हा मान १३४ गांवातून इनामदारांना मिळे परंतु सनदेंतल्या सर्व हक्काबद्दल व मानाबद्दल सरकारने २१८ रुपये उक्त देण्याचे ठरविल्यामुळें हे सर्व हक्क व मान इनामदारास मिळेनासे झाले पिझोडी व शीरपावही प्रमुख इनामदाराना मिळत असे पण हक्काचे बदल्यात मिळणाऱ्या रकमेनंतर हें सर्व रद्द झाले.

शिळोत्री : शिळोत्री म्हणजे दर्या किनाऱ्याचे लगत खारे पाण्यापासून जमीनीचें संरक्षण करण्याकरितां बांधलेला बांध होय अणजूर खाडीचा हा बांध बराच मोठा आहे दिवे परसीक तरीजवळून हा बांध सुरू होतो तो अणजूरच्या खडपापर्यंत जातो. हल्लीं तेथें उघाड्या बांधलेल्या आहेत. हा बांध गांवाचे लोक बांधीत असत. बांध बांधण्याची पद्धत 'गो' 'वाटा' ही होय ह्या पद्धतीचे स्पष्टीकरण असें कीं ह्या बांधाचे कांहीं 'भाग' उर्फ 'वाटे' केलेले होते. खाडीतल्या कांहीं सर्वे नंबर वाल्यांत ते वाटलेले होते. म्हणजे ज्याच्या नंबरावर जी 'वाटा' नेमला असेल त्यानें किंवा तो नंबर कसणाऱ्यानें तो बांधावयाचा असे. अमक्याच नंबरांवर वाटे कां व बाकीचे नंबर मोकळे कां हें समजण्यास आज मार्ग नाहीं. अनंत काला पूर्वीचा तो रिवाज होता किंवा परंपरा होती. हे वाटे त्या त्या ईसमाचेकडे बांधण्यास असत पण एकंदर बांधाची जबाबदारी कोणी तरी घेणेच जरूर होते म्हणून 'गो' ही दुसरी पद्धत गावानें ठरविली होती. अणजूर खाडी बांधाची जबाबदारी ६० 'गो'वर होती पूर्वापार पासुन ही जबाबदारी झेलण्यास ही साट माणसे निवडली होती. अमुक एका सर्वे नंबरचा मालक किंवा कसणारा 'गो' ठरलेला असल्यामुळें त्याला ह्या कामावर स्वत: किंवा मजूरदार पाठवून काम पुरे होई-

पर्यंत यावे लागे. ही व्यवस्था सुद्धां कोणीतरी पूर्वीच चालू केलेली होती. ह्यांचा एक खार-पाटेल असे. हे खारपाटेलकीचे काम अणजूरास म्हणऱ्यांचेकडे असे व त्या कुळांतला मुख्य पुरुष खारपाटेल पूर्वापारचाच नेमलेला असे. खारपाटलाने १२ शी पासून ४ थीं पर्यंत दर उधाणास रात्रीं व दिवसा ह्या बांधावर देखरेख करावयाची असे. नेऊर किंवा खांड पडली असेल वती लहान असेल तर स्वतः नाहींतर 'गो' वाल्यांना जमवून बुजविणेचें काम खारपाटलाकडे असे. ह्या कामाबद्दल त्याला बोकशी मांडव्याचा अग्रहक्क असे. मी अणजूरचा प्रथमचा 'गो' असल्यामुळें वडिलांचे वेळेपासून पहात आलो आहे कीं हें सर्व आमच्या वडिलांचे मार्फतीनें होत असे 'हांक' मारली म्हणजे सर्व 'गो' जमून फुटलेला भाग किंवा कोणी वाटा बांधलेला नसेल तो भाग किंवा ज्या वाट्याला मालक नसेल तो सरकारी वाटा ते बांधीत असत. व वाट्याच्या मालकाकडून त्याची मजुरी घेत. एकंदरीत व्यवस्था बघणारे गांवचे ६० गो असल्यामुळें हें काम नीट होई. हल्लीच्या सरकारी कायद्याप्रमाणें बांध बांधल्यावर देखरेखीची जबाबदारी कोणावरही नसतें. ह्या फरकामुळें हल्लीचे बांध लगेच फुटतात. पुनः जमिनी ओसीक त्या ओसीकच रहातात व लोकांना मुर्दंड म्हणून बांधाला खर्चलेला मूळचा पैसा भरावा लागतो.

ह्याच पद्धतीनें दिवेखाडीचा बांध बांधला जाई पण ७५-८० वर्षांपूर्वी हिवे गांवावर प्रसंग आला होता कीं गांव उठवून कोठें तरी नवीन जागीं गांवन्यावा कारण खाडीचा बांध बरेच वर्षे बांधला गेला नव्हता त्यामुळे विहीरीचे पाणी खारट झाले होते परंतु त्यावेळीं रामचंद्र कर्वे ह्यांनी दिवे गावची सर्व खारी जमीन विकत घेतली व बांध स्वतः बांधला त्यामुळे 'गोवाटा' पद्धत नाहीशी होऊन फजनदारी पद्धतीप्रमाणें मालकावर बाहेरील बांधाची जबाबदारी आली अलिमघरची निसरीचे खाडीची बंदिस्ती अलीमघरचे एक कुटुंब वाटा पद्धतीनें स्वतः करिते गांवखाडीची बंदिस्ती गोवाटा पद्धतीनेंच सध्या होत आहे. भरोडीच्या खाडीतली सर्व जमीन इनामदार (भरोडीचे) यांच्याकडे असल्यामुळें ती बंदीस्ती इनामदार करितात. रामचंद्र सखाराम त्यानंतर त्यांचे पुत्र कै. दत्तात्रय रामचंद्र करीत. भरोडीची खारपाटीलकी दुंद्याचे घराण्यांत आहे. अलिमघरची खारपाटीलकी विनायक दिवड्याकडे आहे व दिव्याची खारपाटीलकी रावजी काफऱ्याचे कुटुंबांत आहे.

संस्थानिक हक्क : मागे सांगितले आहे की अणजूरच्या इनामदारांना संस्थानिकाचे हक्क होते. त्याकरितां पुरावा देण्यांत आला कीं इनामदारांचे ईनाम हद्दींत दारूचे दुकानावर अबकारी कर ईनामदारांना वसूल करितां येत होता. इनामदाराना तरुकाष्ठ पाषाणीवर कर बसवून वसुल करिता येतो होता ही गोष्ट रेतीमातीचे हक्कावरून सिद्ध होते. इनामदार ताडमाडादीवर कर बसवून बसूल करीत होते. सरपाटीलकीचे सर्व हक्क उपभोगित होते. दुकानदारावर कर बसविणें, मासळी मारणारावर कर बसविणें

व कोणत्याही इतर धंद्यावर कर बसविणे किंवा नवीन दुकानें आली तर त्याच्यावर कर बसविणे हे सर्व कर त्याना वसूल करितां येत असत इतकेच नव्हे तर इनामदार सरपाटीलकीचे कर, इनामगावाव्यतिरिक्त १३४ गावातून वसूल करीत. मानपानविड्यांचा हक्क ही त्यांना मिळालेला होता. मुलकी व फौजदारी हक्क इनामदार गावांत वापरीत होते. ह्यावरून वरील म्हणण्यास पुष्टि मिळते परंतु त्याप्रमाणेंच आणखी एक 'दफातो' देऊन हा इनामदारांचा स्वायत्ततेचा हक्क पेशवे सरकारनें मान्य केला आहे नानासाहेब पेशव्यानी देशमुखीचे देशनारगोडीचे वगैरे इतर सर्व हक्क गंगाजी नाईक व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना नाकारले व त्या ठिकाणीं गुमास्ते नेमून सरकार ते कर वसूल करीत असत. इनामदाराला फक्त सरपाटीलचे हक्क बाहल केले. अशारितीने इनामदार १३४ गांवावर म्हणजे त्यावेळच्या सरकाराचे गांवावर हे सरपाटीलकीचे सनदप्रमाणें सर्व प्रकारचे कर बसवून ते वसूल करीत म्हणजे इनामदार हे स्वायत्त व स्वतंत्र होते म्हणून त्यांना आपल्या गावाव्यतिरिक्त इतर सरकारी गांवावर हे कर वसुल करता आले. सर्वत्र सरदेशमुखीचे कर वसूल करण्याकरिता पेशव्यानीं स्वतंत्र गुमास्ते नेमले होते त्यांत त्यातल्या कांहीं इसमाना देशमुखीचा कर वसुल करण्याकरितां नेमलेले होते. हे गुमास्ते अणजूर गांवातून हा कर वसूल करण्याचा प्रयत्न करूं लागले. जहागिरदाराचे जहागिरीतून हा कर किंवा वतनदाराचे वतन गावातून हा कर सरकार वसूल शकत असे पण अणजूर गांव ह्या करातून मुक्त आहे असाच निवाडा पेशव्यानी देऊन अणजूर इनाम गावाचे स्वातंत्र्य मान्य केले आहे त्याबद्दलचा पेशव्यानी दिलेला 'दफाते' पुढें देत आहे.

दफाते : दफाते म्हणजे स्मरण वही. पेशव्यांच्या स्मरण वहीतला उतारा खाली देत आहे बारनिशीमध्यें वार केलेल्या सनदेचा हा उतारा आहे. ही सनद गणेशजी नाईक व शिवजी नाईक अणजूरकर यांना दिलेली आहे. सरदेशमुखी हक्क चालविण्याबद्दल ही सनद आहे. कृष्णराव बलाळ याला सरदेशमुखी हक्काचे वसुलावर गुमास्ता नेमण्यांत आले होते. त्यानें अणजूरचे इनामदारापासून सरदेशमुखीच्या कराचे पैसे मागितले आमचा इनाम गांव स्वायत्त व स्वतंत्र असल्यामुळें तुम्हाला (कृष्णराव बल्लाळला) आमच्याकडून हा कर मागता येणार नाहीं हा दावा इनामदारांचा होता पुढें ही हकीगत इनामदार यानीं पेशव्याचे कानावर घातली तेव्हां इनामदारांचे म्हणण्याप्रमाणें ही सनद दिली आहे.

उतारा

" रोजकीर्द राजमंडळ स्वारी रा. पंतप्रधान सुमा ईहीदे (१) सबैन मया व अलफे छ २९ सवाल यात दफाते पत्राचे पोटीं गणेश नाईक व सीवजी नाईक अणजूरकर सरपाटील याचें नांवे मौजे अणजूर गांवचे देशमुखी हक्क चालविण्याबद्दल पो। नावे (१) सनद बार आहे तिचा उतारा गणेश नाईक व सीवजी नाईक अणजूरकर सरपाटील प्रांत साष्टी

याणी हूजूर होऊन विदीत केले की प्रांत मजकूर देखील आठगांव येथील देशमुखी व देशपांडेपण वसूल कर्णे, सरकारचे व सरपाटीलकी आम्हा अणजूरकराची येसी दोन्ही कडे वतने सरकार अमलापासून चालत आहेत त्यास सरपाटीलास ईनाम गांव मौजे अणजूर ता. मजकूर हा गांव इनाम दिला ते समई तिजाई दरसाल सरकारांत घेऊन दोन तक्षीमा दरोबस्त गांव इनाम दिला आम्हा आणजूरकराकडे चालत आहे त्या सदेशमुखीकडे इनाम गांव आहेत त्याचा हक्क सरपाटीलानी न घ्यावा व सरपाटीलाचा गांव अणजूर येथील देशमुखांनी न घ्यावा या प्रमाणे परस्परें पेशजी पासुन चालत आहे देशमुखीचे हिशेब सालेसाल पूर्वी हूजूर येऊन हकाचे आकारास सदरहू अन्वयें अणजूर हक्काविशी वजा पडून हिशेबाच्या मखलाशा होउन फडशे होत आले आहेत त्यास हाली सन सब्तसीतेनांत देशमुखीच्या अमलाची कमावीस कृष्णराव बलाल यास सरकारांतून सागीतली त्याणी येविसी आक्षेप घेतला कीं अणजूरकरचा हक्क देशमुखीचा यावा. त्यास सरसुभा वसईस या बाबचे (बाबतचे) विसाजी केशव यासही समजोन त्याची चौकसी हीसेबाची मनास आणीली व पूर्वी हुजूर सातान्याचे मुकामी श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यास आपण अणजूरकरानी विनंती केली कीं साष्टी प्रांताची मसलत **आम्हीच सेवटास नेली** त्यावरून आम्हास सरकाराहून वतन इनाम गांव दिल्हा त्यापैकीं तिजाई सरकारांत घेतात तरी येविसी कृपाळू होऊन चालत आल्याप्रते चालवण्याची आज्ञा केली पाहिजे म्हणून त्याजवरून श्रीमंत मेहरबान होऊन देशमुखानी हक न घ्यावा येसा करार केला त्या प्रो चालत आल्या ब्रमोजीव हकास वजा पडून सालेसाल सदरहू प्रो हक परस्परें ग घ्यावा हे चालले हा दाखला ब्रालाजी नारायेण माजी मामलेदार देशमुखीचे याणी सांगितला त्याजवरून सन आर्बासीतेनांत याचा आक्षेप न करणें म्हणून सरकारचें पत्र सरसुभाहून दिल्हे आहे. वतन इनाम गांव दिल्यापासून अज्रि पावेतों हक देशमुखीकडे दिल्हा नाहीं तरी पुढें येविशींचा आक्षेप न करीत ते केले पाहिजे म्हणून त्याजवरून हें पत्र सादर केलें असे तरी मौजे मजकुराचा हक देशमुखानी न घेतला याप्रो पेसजीपासून साल दर साल चालत आले त्या बमोजीव चालवणें फिरोन या बाबेचा तगादा न करणे व दरसाल ताकीद पत्राचा उजूर न धरणे म्हणोन चिटणिशी पत्रें.

१ रामजी महादेव प्रांत साष्टी थांस

१ कृष्णराव बल्लाळ कमदारनी (१) देशमुखी प्रांत साष्टी यास

गंगाजीना पालखीचा हक्क : गंगाजीनाईकाना पेशव्यानी पालखी दिली व त्याच्या खर्चाकरिता व्यवस्थाही सरकारने केली. दुसऱ्या करारांत आहे त्याप्रमाणें प्रामाणिकपणानें नानासाहेब चालते तर गंगाजीच्या द्वारी हत्ती बांधला गेला असता.

गंगाजीचा सारंग : त्याच करारप्रमागें गंगाजीना दर्यावरही हक्क मिळाला असता त्या कराराप्रमाणें पेशव्यानी गंगाजीचे माणसास सारंग करणेचे होते. ह्यावरून सिद्ध होते कीं अणजूरकर नाईक हे संस्थानिकांचे हक्क भोगीत होते ह्या दफात्यांत जुनीच आश्वासने दिली आहेत. हा दफाता सन १७७० मधला आहे.

कृष्णराव बल्लाळ : कृष्णराव बल्लाळ याला साष्टीतून सरदेशमुखीचा वसूल करावयास पाठविले होते. तो इनामदाराचे गावांत, व वतन गांवावरचे गांवाची ही सरदेशमुखी वसूल करूं लागला त्यावेळीं पेशव्यानी गणेशजी नाईक व शिवाजी नाईक याचे नांवे सनद दिली की त्याने ह्या बाबतीत इनामदारांचे मुलखांतून ही सरदेशमुखी वसूल करू नये त्या बाबतीतची ही सनद आहे. ह्यावरूनही सिद्ध होते कीं इनामदार संस्थानिकांचे हक्क उपभोगीत होते.

अणजूर संस्थांनचें विलीनीकरण : १९५३ मध्यें हा इनामगांव सरकारनें विलीन करून घेतला त्यानंतर सर्व हक्क नाबाद झाले पण त्याच्या आधी ह्या इनामदारांना नुसते नांवाचें इनामदार ह्या इंग्रज सरकारनें केले व त्यांचे सर्व हक्क आपल्याकडे घेतले इतकेच नव्हे तर सक्तीनें इनाम गांवाची वहिवाट सरकारनें १९०५ पासून क्रमाक्रमानें आपले कबजांत घेतली हा इतिहास आतांपर्यंतच्या उताऱ्यावरून दिसून येत आहे सरकारने कावेबाजपणानें इनामदारांचे दप्तर मागून नेंले ते व पुढील दप्तर सरकारनें आपल्याचकडे ठेविले.

जमाबंदीबद्दल ठराव

बुबाजी नाईकाबद्दल : बुबाजी नाईक यांच्या संबंधाचा सरकारी उल्लेख.

A. D. 1808 Regulation

इ. स. १८०८ सरकारी ठराव

VIII second In consisltance with their own usage the maraltas added to the Portugues assesment under the denomination of Deshmookey a grain payment rated first at two adawlies per para amounting to eight poreent on the rice taken and to seven persent on the nekdy or reddy money part of the rental laying at the same time, another tax in favour of Bogajee Nayak a Hindoo, who having assisted then in the canquert was constitued **Head Patel** in which capacity he was

Their financial admistration addition to the Tokah assisment and that of sirpate lakey

anthorised to exact two seers per para or persent on the rice and one half persent on the nekdy settlement under denomination of sirpatelky.

भाषांतर

कलम ६ (दुसरा भाग) मराठ्यांचें नेहमीचे पद्धतीप्रमाणें त्यांनीं पोर्तुगीज लोकांच्या वेळच्या करवसुलीत देशमुखी या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या सदराखालीं नवीन कराची बरीच भर घातली देशमुखी म्हणजे भाताच्या रूपानें दिला जाणारा हा कर प्रथम फऱ्याला दोन अधोली धान्य याप्रमाणें होता म्हणजे भाताचे निपजेवर तो शेंकडा आठ टक्के अथवा रोकड पैशाच्या करान्वयें शेंकडा सात टक्के होता. त्याचवेळीं बुवाजी नाईकाचें नांवेही कर वसुल करण्याची मुभा असे बुवाजी नाईक ह्या एका हिंदूनीं त्याना मुलुखगिरीत मदत केली होती. म्हणून **मुख्य पाटील** म्हणजे सरपाटील त्यांना नेमण्यांत आले होते. ह्या सरपाटीलकीच्या नात्यानें त्या प्रत्येक फऱ्यामागें दोन शेर धान्य कर घेण्याचा अधिकार होता व नकदीवर शेंकडा अर्धा टक्का व तांदुळावर शेंकडा दोन टक्के कर घेण्याचा अधिकार होता. "

ह्या पत्राचा आशय इतकाच कीं सरपाटीलकीची सनद पांच भावांचे नांवें जरी होती तरी पण बुवाजी नाईकांचे नांवे वर दिलेला सरपाटीलकीचा स्वतंत्र कर वसूल केला जात होता.

" साष्टी प्रातांतील जमीनदाराचे हक्क " ह्या सदराखालील लेखांत 'टणत्कार' कर्ते पान ६३ वर लिहीतात. " साष्टीप्रांत अगदी उजाड झालेला असाच मराठ्याना मिळाला मराठ्यांचा साष्टी प्रांतावरील पहिला सुभेदार खंडोजी माणकर असून त्यानें आल्याबरोबर पोर्तुगीजांचे जे गांव कामगार **म्हातारे** म्हणून असत त्याना बोलाऊन आणिले व त्यापैकीं लायक इसमास गांवोगांव पाटील नेमीले जे कोणी जमीन लागवडीस मागतील त्यांना ताबडतोब जमीनी देण्याचा पाटलांस अधिकार मिळाला. बोगाजी नायक म्हणून एक हिंदु पुढारी मराठ्यांना पोर्तुगीजाविरुद्ध मदत करण्यांत प्रमुख होता त्यास सरपाटील करण्यांत आले व त्याचे करितां सरकारसाऱ्यावर एक सरपाटीलकीं, म्हणून नवाकर बसविण्यात आला. " ह्या उताऱ्यांतला कांहीं गोष्टी विपर्यस्त आहेत. उदाहरणार्थ लढाई नंतरचा पहिला सुभेदार रामाजी महादेव बिवलकर होता. ह्यावरून एक सिद्ध होत आहे कीं वरील रेग्युलेशनमध्यें म्हटल्याप्रमाणें खरोखर बुबाजीचे जमाबंदीचे कार्याकरितां फक्त त्याच करितां पेशव्यानीं एक नवीन कर बसविला. सरपाटीलकीं हा कर नसून ते वतन होतें १८०८ च्या रेग्युलेशन मधून वरील माहिती घेतली आहे असे दिसते. मात्र सरदेशमुखी हे वतन निराळे व हा बुबाजीकरितां बसविलेला कर निराळा.

भाग तिसरा

देवस्थानें, उत्पन्न खर्च व सण

श्री सिद्धीविनायक : ही वरदमूर्ती नाईकांचे पुरातन दैवत होय. महादेव देश ह्यास संतान होत नव्हते तेव्हा सिद्धीविनायकाचे आराधननें त्यास पुत्र झाला. त्या वेळीं सतत पाच पिढ्यापर्यंत गणपती हेंच नांव ठेविले जाई. साष्टी फिरंग्याचे जोखडा खालून सोडविण्याचा निश्चय पाच भावानीं केला त्यावेळीं 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे । परंतु आधी भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे' ह्या समर्थांचे उपदेशाप्रमाणें गंगाजी नाईकानीं मोरगावास अनुष्ठान करून प्रतिज्ञापूर्तीकरिता परमेश्वराचा प्रसाद मिळविला. चिंचवडच्या चिंतामणी देवानें मोरया गोसावीच्या पूजेतली मूर्ती गंगाजीस दिली व एक तलवारही दिली. हाच तो प्रसादाचा गणपति होय. ह्या वरद-मूर्तीची स्थापना इ. स. १७४१ मध्यें वसई युद्धानंतर अणजूर येथें देवाचे खोलींत केली. त्याचठिकाणीं ती आजपर्यंत आहे. एकदा कांहीं भानगडीमुळें ही मूर्ती रामचंद्र सखाराम ह्यानीं माडीवर नेली होती व तिथेच त्यावर्षीची गणेशचतुर्थी करण्यांत आली. १८८५ सालीं इनामदारानीं, जप्त झालेले इनाम मुक्त झाल्यामुळें मोठा उत्सव अणजूरास केला त्यावेळीं माडीचे ओट्यावर पांच दिवस मखरात मूर्ती ठेविली होती. एवढा काळ

वगळल्यास ती मूर्ती देवाचे खोलीतच आहे. ही देवाची खोली सार्वजनिक आहे. ती खोली स्वतंत्र असून कोणाचे वाट्यास दिलेली नाहीं

गंगाजी नाईकाचे कुटुंबीयाकडून ह्या देवतेची पूजा रोज होत असे. बहुधा मोठ्या शाखेचे लोकाचा तो मान होता. इनामदाराना काहीं अडचण असली म्हणजे इनामदारांचे उपाध्याय पंडित हे देवाची पूजा करीत. त्याना त्याकरितां धर्मादाय निधीतून परस्परें पंचवीस रुपये इनामदाराकडून मिळत असत. नंतर धारावाढीनंतर रुपये १०० मिळूं लागले होतें. पुढें हेही अशक्य झालेमुळें पूजेकरिता स्वतंत्र पुजारी ठेवण्यांत आला. प्रथमतः रावजीभाई नाईक हे कांहीं रकमा जमवून व सततची वर्गणी देऊन रामचंद्र सखाराम व वामन गोविंद याच्या सहकार्यानें पुजाऱ्यास वेतन देत असत. कांही काळ ही व्यवस्था चालू राहिली पुढें तीही व्यवस्था अशक्य झाल्यामुळें दिवाकर भाई हे स्वतःचे पदरचे पैशाने पुजाऱ्यास वेतन देत असत. नंतर कोणी कोणी स्वखुशीने पैसे देत त्यांतून पुजाऱ्याचे वेतन भागविले जाई. हे अशक्य झाल्यावर श्री ' सिद्धिविनायक फंड ' १०-८-१९४५ सालीं स्थापन करून त्यातून हल्ली पुजाऱ्याचा पगार दिला जातो. ही व्यवस्था कायम स्वरूपाची झाली आहे. ह्या फंडास कायम निधि म्हणून शिवराम पंढरीनाथ ह्यानी ५०० पाचशे रुपयाच्या प्रामेसरी नोटा दिल्या आहेत. व इतरानीहि रकमा दिल्या आहेत. व लक्ष्मण रघुनाथ नाईक यानी १॥ बिघे जमीन व दत्तात्रय रामचंद यानी १ एकर जमीन दिली आहे. हल्ली पुजारी अभ्यंकर हे गृहस्थ आहेत. कै. विठ्ठल विनायक देवधर यानी ३०-३५ वर्षे ही सिद्धीविनायकाची पूजा केली.

गणेशचतुर्थी : गणेश चतुर्थीचे दिवशी सर्व इनामदार अणजूर येथें जमतात. देवाचे पुढें भाद्रपद प्रतीपदेपासून दर रात्रीं कीर्तन होत असते व चतुर्थीचे दिवशी मोठा उत्सव होतो. वरदमूर्तीचे बाजूस श्रीगणपतीच्या मूर्तीची स्थापना करण्यांत येते. ही स्थापना बाबूराव भालचंद्र गंगाजीचे वरीष्ठ वंशज ह्याचे हस्तें होते. त्यानंतर सर्व इनामदार पूजा करितात नंतर सामुदायिक आरती, प्रदक्षिणा होते. सर्वांना आशिर्वाद मिळतो. नंतर सर्व इनामदाराचेकडून नैवेद्य येतात व सर्व नैवेद्य सामुदायिकरित्या देवाला दाखविले जातात. ह्या गणपतीव्यतिरीक्त कोणाही इनामदारास स्वतंत्रपणें गणपती आणता येत नाहीं. सर्व इनामदाराचा हा एकच सार्वजनिक गणपती येत असतो. दुपारी सार्वजनिक प्रश्नावर चर्चा होते व रात्री इनामदाराची सभा होते. त्यांत इनामादि सर्व प्रश्नाची चर्चा होते. श्रीसिद्धिविनायक फंडाचे सभासदांची सभा होते. रात्री कीर्तन होते. दुसरे दिवशी रात्रौ समाप्तीचे कीर्तन होते व त्यावेळीं प्रसाद मिळतो. ह्या दोन प्रसंगीं रामचंद्र सखाराम, व दिवाकर भाई तसेंच बाबूराव भालचंद्र मंडळींना चहापान देतात. शिवाय चतुर्थीच्या रात्री गणपती दिवाकर चहा-

पान देतात. ह्या कीर्तनाच्या खर्चाकरिता देवाला एक शेत दिले आहे. त्यातून हा खर्च केला जातो पण उत्पन्न पुरत नाहीं. ह्या सर्वांची जबाबदारी बाबूराव यांचेवर असल्यामुळें कमी जास्त खर्च त्यानाच करावा लागतो. श्रीसिद्धीविनायकाचे उत्सवाची जबाबदारी व मान बाबूराव भालचंद्र यांचाच आहे.

देवाची खोली : देवाचे खोलीत भवानीची स्थापना आश्वीन शुद्ध प्रतिपदेला करितात. त्याठिकाणी दसऱ्यापर्यंत सर्व कुटुंबातील निरनिराळ्या सुवासिनी पूजल्या जात. त्याचप्रमाणें त्याचखोलीत कृष्णाष्टमी च्या रात्रौ कृष्णाचा जन्म केला जातो. देवाचे खोलीचे समोर सोहाळे करिताना देवीची पूजा करितात व बोकडाचा बळी बाहेरच्या आंगास दिला जातो. खंडेरायाचा भंडारा करून पाचा नारळांची तळी याच ठिकाणी भरली जाते. असे लहानसहान उत्सव प्रसंग ह्या देवखोलीत करण्यांत येतात. कुटुंबात मुलांची लग्नें झाली तर इथें पुजा व सोहाळा देवापुढें केला जातो.

देवाचे खोलीचें मखर : देवाचे खोलीत देवापुरतें मखर आहे. तें जीर्ण झाल्यामुळें दिवाकरभाई यांनीं त्याचा जीर्णोद्धार केला. सिद्धिविनायक ट्रस्टचे पदाधिकारी पुढें दिले आहेत. तसेच फंड गोळा करण्याकरितां व इतर मदतीकरिता नेमलेल्या मंडळाचे पदाधिकारीही पुढे दिले आहेत.

देवाचे दागिने : देवाचे दागिने, देव्हारा, कपडे वगैरे ठेवण्याकरितां तिजोरी, कै. रावजीभाई, वामन गोविंद, रामचंद्र सखाराम ह्यानी विकत घेतलेली आहे पण आजपर्यंत तिचा वापर करण्यांत आलेला नाहीं. ठरल्याप्रमाणें ती दुरुस्त करून तींत देव्हारा, दागिने, कपडे ठेवण्यांत यावे व त्याच्या दोन किल्ल्या जबाबदार माणसाचे जवळ देण्यांत याव्या. ही सर्व व्यवस्था श्रीसिद्धिविनायक ट्रस्टने करावी असे ठरविलेले आहे.

ह्याच मंडळीनी निधि गोळा करून देवखोलींत लादी बसविली आहे व तिजोरीही दुरुस्त करून देवखोलींत जमीनीत बसविली आहे.

श्रीशंकराचे देऊळ : हे देऊळ इनामदारानीं बांधलेले आहे. समोर दीपमाळ आहे. श्रीगणरायाची खोली माडीत आहे व हें शंकराकरितां बांधलेले देऊळ गावाच दक्षिणेस आहे. ह्या देवळाचा जीर्णोद्धार रामचंद्र सखाराम ह्यानी कांहीं वर्षांमागे केला त्यावेळीं त्यानी भास्कर गंगाधर याचे घरस्याचे घडीव दगड शंकराचे देवळास लाविले. देवळास दरवर्षी उत्सवाचे आधी दुरुस्ती करण्यांत येते.


श्रीराम, श्रीविठोबा, श्रीमारुती यांचे देऊळ : हे देऊळ शंकराचे देवळाचे दक्षिणेस आहे. देवळाची पहाणी करताना दिसून यत कीं, श्रीरामाची खोली व सोपा



श्री शंकराचे देऊळ, अणजूर




श्री अंजूबाई देवी मंदीर, अणजूर



सतीचा टेप, अणजूर



श्री झोटींग, अणजूर



मुलगय तलाव, अणजूर



श्री विठोबा राई रखमाई, अणजूर



श्री विठोबा, अणजूर

हें अगदी प्रथमतः विठोजी नाईक यांनी बांधलेले आहे. नंतर केव्हां तरी मारुतीचा सोपा व विठोबाचा सोपा बांधलेला असावा. खांबाचे रचनेवरून दिसते कीं, श्रीरामाचे सोप्यास नंतर दक्षिणेस जोड दिलेली असावी. ह्या देवळाचा जीर्णोद्धार १९३० सालांत नाईक मंडळीकडून वर्गणी जमवून केला गेला. दिवाकर भाई, चिंतामण मुकुंद व कमळाकर जगन्नाथ यांनी रक्कम जमवून जीर्णोद्धार करण्यांत आला. ह्या जीर्णोद्धाराचे काम वसंतराव पुरुषोत्तम नाईक यानी केले. देवाला धर्मादाय म्हणून समस्त इनामदारानी शेते दिली आहेत. ह्या शेतीचा धारा इनामदाराचे इनामात खर्च पडत असे. जमनाबाई महंतचे पणतु हे ह्या देवाचे आज पुजारी आहेत. हे नेहमी गुमास्ता नेमून पूजा करून घेतात हल्ली श्रीपाद देसाई ह्याना पुजारी, गोसावी याने नेमले आहे. शेतीचा वसुल त्यानें करून त्या उत्पन्नाचेपोटीं पूजा करावयाची असे इनामदार व गोसावी यांचे विचाराने ठरले आहे. श्रीरामनवमी, श्रीहनुमानजयंती, श्रीकृष्णजयंती ह्या दिवशी तो स्वतः उत्सवाची व्यवस्था पहातो. पिजरीचा प्रसाद आणतो. दागिने इनामदाराचे आहेत. वरील उत्पन्न तीन देवस्थाना-करिता आहे. फक्त देवांचे पूजेकरिताच त्या उत्पन्नाचा खर्च व्हावयाचा आहे. उत्सवा-करिता येणाऱ्या रकमाचा पैसा उत्सवाप्रीत्यर्थ खर्च होत असे हें त्या त्या उत्सवाचे वेळीं दिलेले आहे.

१) देवीचे देवळाचा जीर्णोद्धार कै. दिवाकरभाई व वसंतराव पुरुषोत्तम नाईक यानी केला.

२) शंकराचे देवळाचा जीर्णोद्धार कै. रामचंद्र सखाराम नाईक यांनी स्वखर्चानें केला.

३) देवखोलीचे सुबक देवघराचा जीर्णोद्धार कै. दिवाकरभाई नाईक ह्यानी केला.

४) माडीचा जीर्णोद्धार श्री. वसंतराव पुरुषोत्तम, दिवाकरभाई नाईक, कमलाकर जगन्नाथ नाईक, श्री. भगवंत निळाजी नाईक, धाकलभाई मदन नाईक, दत्तात्रय रामचंद्र नाईक ह्यानी आपापले भाग दुरुस्त करून केला.

तीन देवळे पांच देवस्थाने : ही तीन देवळे-देवीचे देऊळ, शंकराचे देऊळ, श्रीराम, विठोबा, मारुतीचे देऊळ इनामदारानी बांधलेली आहेत. त्यांचा जीर्णोद्धार त्यांनीच केलेला आहे. सिद्धीविनायकाशिवाय अशीं ही चार प्रमुख देवस्थानें अणजूरांत आहेत. ह्यापैकीं श्रीशंकर, श्रीमारुती, श्रीराम, श्रीविठोबा ह्या चार देवस्थानांचे उत्सवांची व श्रीसिद्धीविनायकाचे उत्सवाची वांटणी पांच भावांत झालेली आहे. उत्सवाकरितां इनामातून येणारे पैसे त्या त्या देवस्थानाचे उत्सवाकरितां इनामदारांचे

हिश्यातले श्री. चिंतामण मुकुंद यांचे नांवें येत असत व चिंतामण मग त्या त्या इनामदारास देत असत.

पांच देवांचे उत्सव : वर पांच देवस्थानांचा उल्लेख मी केला आहे. ह्या देवांचे वार्षिक उत्सव होत असतात. पांच भावाकडे पांच उत्सव वांटले आहेत.

१) गंगाजी नाईक : श्रीसिद्धीविनायकाचा श्रीगणेशजयंतीचा उत्सव.

२) बुवाजी नाईक : श्रीशंकरदेवाचा महाशिवरात्रीचा उत्सव.

३) मुरारजी नाईक : श्रीहनुमान जयंतीचा चैत्रांतला मारुतीचा उत्सव.

४) शिवजी नाईक : श्रीविठोबाचा श्रीकृष्णजयंतीचा उत्सव.

५) नारायणजी नाईक : श्रीरामाचा श्रीराम नवमीचा उत्सव.

ह्या प्रत्येक उत्सवाकरितां इनामातून पैसे खर्ची पडून चिंतामण मुकुंदचे हस्ते येत. त्या त्या रकमेंतून वरील उत्सव साजरे होत असत इनाम विलीनानंतर त्या त्या शाखेंतले इसम हे उत्सव आजपर्यंत स्वखर्चानें करीत आले आहेत.

चिल्हर खर्च : ह्या देवस्थानाप्रमाणें चिल्हर खर्चास म्हणून ५० रुपये येत. शेवटी शेवटी ते वसंतरावाचे नांवें येत असत. हा खर्चाचा पैसा प्रथमतः दोन उद्देशाने ठेवण्यांत आला होता. पहिला हेतु हा कीं, ह्या पैशांतून कोणी सरकारी इसम आला तर त्याच्या मलामणीच्या खर्चाची तरतूद करण्यांत येत असे. तसेंच गावांत पुराणिक, गोसावी, कीर्तनकार किंवा तत्सम कोणी इसम आल्यास त्याच्या संभावनेचा खर्च ह्याच्यातून होई. पुढें हा खर्च येण्याजाणाऱ्या इसमाकरिता कांहीं अंशाने होई व राहिलेली रकम श्रीगजाननचेकरितां खर्च होत असे. अबकारीच्या राहिलेल्या पैशांतून देवाला गळ्यातली साखळी घेतली आहे. त्याप्रमाणें चिल्हरचे पैशांतून सतरंजी घेतली आहे.

श्रीवज्राबाई : श्री वज्राबाईचे यात्रेच्या वेळी समस्त इनामदाराकडून एक मण गोडे तेल दिव्याकरिता दरवर्षी देवीस जात असे.

देवळांतील विठोबाची मूर्ती सन १९६० वर्षी भंग पावली होती त्याठिकाणी विठोबाची नवी मूर्ती श्री. वसंत दत्तात्रेय नाईक यानी समारंभाने बसविली.

खर्च वसंत दत्तात्रय मधुकर रामकृष्ण व प्रभाकर जगन्नाथ या तिघानी, केला. त्यांत जास्त खर्च वसंत यानें केला. गजानन दिवाकर याने अंगमेहनत केली. पुढील हकीकत परिशिष्टांत आहे.

१९६३ साली सितामाईची मूर्ती भंग पावल्यामुळें श्री. चिंतामण मुकुंद नाईक यानी समारंभानें स्वखर्चाने मूर्तीची स्थापना सोमवार तारीख ३।६।१९६३ रोजी केली. सविस्तर हकीकत परिशिष्टांत आहे.

अणजूर देवस्थाने इस्टेटी व जमीनी : (१) श्रीगणपतीदेव वहिवाटदार श्री. बाबूराव भालचंद्र नाईक. समस्त इनामदारांकडून श्रीसिद्धीविनायकाच्या उत्सवाचे खर्चाकरिता— गणेश चतुर्थी सर्वे नं. $\frac{१४७}{२}$ २८५। क्षेत्र १८-२-० आकार.

(१) श्रीसिद्धिविनायक ट्रस्ट फंड वहिवाटदार चिंतामण मुकुंद नाईक, दत्तात्रय रामचंद्र नाईक यांचेकडून $\frac{५८९}{१}$ स. नं. १ ४॥ क्षेत्र ७-१४-० आकार, ट्रस्ट फंड $\frac{३६८}{५}$ सर्वे $\frac{३७०}{३}$ सर्वे $\frac{३७०}{५}$ एकूण क्षेत्र १-२० आकार १०-७-० लक्ष्मण रघुनाथ नाईक याजकडून हस्ते गजानन गोविंद नाईक.

(३) श्री. ग्रामदेवी वहिवाटदार दत्तात्रय रामचंद्र नाईक, रामचंद्र सखाराम नाईक याजकडून. स. २१४/१ ८२१ क्षेत्र.

(४) श्रीव्रहिरी खंडोबा वहिवाटदार मोरेश्वर रामचंद्र नाईक परशराम ठाकूर यांचेकडून ११/८ स. ८१४। क्षेत्र २-७-० आकार हे दैवत मूळच्या ठाकूर घराण्याचे आहे.

(५) श्रीराम विठोबा देव. वहिवाटदार चिंतामण मुकुंद नाईक सर्वे २२/४, ५४/२, ५५/१, १४०/०, १४३/०, ३७५/२, ४७४/२, ४७५/१, ४८२/१, ४८३/६, ४८३/९, ४८५/१, ४८५/३, ४८८/१, ४८८/३, ४९५/१, ४९८/१, ९३९/५, ९६१/२, ४९८/५ एकूण क्षेत्र २२८४ आकार ११६-०-९ दादाजी बाबाजी, जयराम चिमणाजी, गोविंद विनायक, मुकुंद पांडुरंग नाईक या चौघांकडून.

(६) श्री रामदेव वहिवाटदार चिंतामण मुकुंद नाईक सर्वे नं. ५०३/१४, ५११/२, ५११/४ एकुण क्षेत्र २८३६॥ आकार १२-१२-० गोदावरी भिकू ठाकूर याजकडून.

(७) श्रीमारुती व शंकर देव वहिवाटदार चिंतामण मुकुंद नाईक ४९४/४, ४९४/१०, ५०३/११, ५०५/३, ५०७/६, ५०७/१०, ५८१/७ एकूण क्षेत्र १८३४ आकार ७-८-० गोदावरी भिकू ठाकूर यांजकडून.

(८) श्रीशंकरदेव अणजूर वहिवाटदार विनायक दिवड्या पाटील रा. अलीमघर व चिंतामण मुकुंद नाईक. श्रीमती चंद्रीबाई, रामचंद्र सखाराम नाईक यांची बहीण ५३५/३२, ५३६/९, ५३६/४, ५३६/३२ ५३६/५०, ५३९/१२ एकूण क्षेत्र १८२७॥ आकार रु. ६-०-६. या जमीनी श्री. चंद्रीबाईनी दिल्या.

(९) श्रीशंकरदेव वहिवाटदार गजानन गोविंद नाईक, बाबुराव भालचंद्र नाईक व दादाजी बाबाजी सर्वे ५०६/२, ५०७/२, ५०७/४ एकूण क्षेत्र १८१४। आकार ४-१२-०.

दिवे देवस्थानें : श्री. शंकर देव वहिवाटदार रावजी कापुऱ्या पाटील मु. दिवे सर्वे ६७५/१, ६६७/१, ६७५/२, ८९५/३, ८९५/५, ८९५/१४, ६२५/९, ७६५/५-२, ७७३/४-२, ७८१/७-२, ७०२/९-१, ८९४/१-१, ६१२/०, ६१३/२, ६१४/१, ६१५/०, ६१६/०, ६१७/२, एकूण क्षेत्र १८८१३ एकर आकार ८२-१३-६ धर्मादाय देणार पद्मनाभ पंतीय लोक.

(२) श्रीशंकर देव वहिवाटदार महादेव शिवराम देशमुख दिवे ६५७/० सर्वे ४-३८॥ क्षेत्र आकार १६-१३-०

कुलाची देवी हरबाई : हरबा उर्फ हरबाई देवी. ह्या हरबाई व हरडाई देवींचे ठिकाण वेसावेचे पुढचें मढ गांव होय. एकाच देवळात ह्या दोन देवी आहेत. हरबाई ही कांहीं कुटुंबांची देवी आहे व हरडाई ही दुसऱ्या कांहीं कुटुंबांची देवी आहे. त्याप्रमाणें हरबाई देवी अणजूरकर नाईक घराण्याची कुळदेवता आहे. ह्या दोन मूर्तीपैकीं समोर उभे राहता डावे बाजूची मूर्ती हरडाई देवी व उजवे बाजूची मूर्ती हरबाई ही होय. हरबाई देवीचे हें देऊळ बिंब राजाचा नातू एकदेवराणा याचे कारकीर्दीत अंकुशदेव राणे याचा नातू महादेव देश ह्याने बांधिले. ह्याच देवीचें दुसरे एक देऊळ विरार येथें बांधलेलें आहे विरारची हरबाई ही शुक्ल यजुर्वेदीय ब्राह्मणांची आहे. मढची हरबाई देवी ही पाठारे क्षत्रियांची आहे. मढ गांव हें सुंदर व रमणीय असें बेट आहे. मढला एक किल्ला आहे. बिंबकालांत व पोर्तुगीजकालांत ह्या बेटावर बंदोबस्त असे व कांहीं प्रसंगीं येथें हल्ले व लढाया झालेल्या आहेत. फिरंग्याच्या जुलमी राजवटींत ह्या मूर्ती लोकांनीं तळ्यांत लपविल्या होत्या. फिरंगी राजवट समाप्त झाल्यानंतर त्या मूर्ती बाहेर काढण्यांत आल्या. पोर्तुगीजकालीं व बिंबकालीं ह्याठिकाणीं लढाया झाल्या आहेत.

अणजूरकर नाईकाचे घराण्यांतील सर्वजण ह्या देवीचे दर्शनास हमेशा जातात. लग्न झालेल्या जोडप्यानें ह्या देवीस जरूर जावे असा प्रघातच नाईकांत आहे. तसेंच इथें मोकळी व कोरडी खाडी हवा आहे. वनश्रीने नटलेले हें बेट फारच मनोहारी व सुंदर असल्यामुळें ह्याठिकाणीं अहोरात्र लोक येत असतात. ही देवी नवसाला पावते असा विश्वास लोक बाळगतात. मढाला खिश्चन कोळी, हिंदु कोळी, पाचकळशी ह्या जमातीची विशेष रहदारी होती. हल्ली सर्वच समाजाची उपस्थिती तेथें आहे. पूर्वी ह्या बेटास चारही बाजूनें पाण्याने वेढले असल्यामुळें वेसावेवरुन होडीने जावे लागे. आता मालाडहून बसने थेट देवीच्या दारापर्यंत जाता येते. अणजूरकरांची अमाप भक्ति श्रीसिद्धीविनायकावर आहे त्याचप्रमाणें ह्या देवीवर अणजूरकरांची अलोट भक्ति आहे.

देवीच्या देवळाला जे दोन कळस आहेत ते कै. रामचंद्र सखाराम नाईक व दामोधर रावोबा रावते यानीं पुढाकार घेऊन देवळाचे कळसाचे काम पुरे केले त्याचप्रमाणे विहीरीही त्यांनीच खोदून बांधून घेतल्या आहेत.

देवळाचा उद्धार : मढचे गांवकरी यानी २०,००० रुपये ह्या देवीच्या देवळाचा जीर्णोद्धार करण्याकरितां सन १९५७ मध्यें जमविले व जास्त रकमेकरितां आपले ज्ञातीतील ८ माणसाची कमेटी नेमली होती. त्या संबंधाचे पत्रक श्री. भास्करराव रामचंद्र भोपी याचे सहीने काढले होते त्याप्रमाणें जीर्णोद्धार पुरा होऊन देऊळ उत्तम झाले आहे. हे पत्र पुढें दिले आहे. आपले ज्ञातीतून २००० रुपये जमा केले होते.

जाहीर विनंती

श्री हरबाईदेवी हरडाईदेवी मंदिर जीर्णोद्धार

मढ गावांत श्री हरबाईदेवी व हरडाईदेवीचे एक पुरातन देवालय आहे. मढ गांव तसेंच त्याच्या परिसरांतील इतर गांवें व बृहन्मुंबई येथील कांहीं लोक त्याना कुलस्वामिनी मानतात. त्यांच्या दर्शनाला फार दूरवरून लोक नेहमी येत असतात.

सदर मंदिर अत्यंत जीर्ण झालें असून मोडकळीस आले आहे. त्याचा जीर्णोद्धार करण्याचे गांवकरी मंडळीनें ठरविलें. त्यासाठीं श्री हरबाईदेवी व हरडाईदेवी मंदिर जीर्णोद्धार कमिटीची स्थापना केली. कमिटीवर गावांतील प्रतिष्ठीत असे वीस सद्गृहस्थ असून रितसर चेअरमन व सेक्रेटरी वगैरेंची निवड केली. कमिटीनें दादरकर पत्की आणि

कंपनीकडून प्लान तयार केला असून म्युनिसिपालीटीने त्यास परवाना दिला आहे व पाडव्याच्या शुभमुहूर्तावर बांधकामास सुरुवात झाली.

कमिटीनें मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठीं गावांतून फंड उभारला आहे. काम पुरें करण्यासाठीं जवळ जवळ पंचवीस हजार रुपयापर्यंत खर्च येणार आहे, पैकीं मढ येथील गांवकरी लोकांनी अकरा हजार रुपयापर्यंत वर्गणी जमा केली आहे. त्याचप्रमाणें मुंबई व उपनगरांतील देवींच्या उपासकांनी उदारहस्तें देणगी द्यावी अशी विनंती आहे. त्यासाठीं मुंबई येथें सबकमिटी नेमिली आहे. कमिटीवर खालील गृहस्थ असून त्यांच्या-जवळ आपण आपली देणगी द्यावी.

१) श्री. रामकृष्ण यशवंत नाईक
२) ,, यशवंत रामचंद्र चेंबूरकर
३) ,, भालचंद्र बाळाराम रावते
४) ,, चिंतामण मुकुंद नाईक
५) श्री. भिकोबा वामन पाटोरे
६) ,, गोविंदराव कृष्णनाथ चेंबूरकर
७) डॉ. भाल श्रीकृष्ण पाटील
८) श्री. गणपत जयराम चेंबूरकर

आपला नम्र,

भास्करराव रामचंद्र भोपी

चेअरमन

श्री हरबाईदेवी हरडाईदेवी जीर्णोद्धार कमिटी

मढ,

दि. २०-५-५७

अंजुबाई : गांवच्या स्थापनेपासून हें देऊळ आहे. त्या देवळाचा जीर्णोद्धार वसंत पुरुषोत्तम व दिवाकर भाई यानी केला. ह्या देवीचे नांवावरून गांवास अंजूर हे नांव दिलेलें आहे. ह्या देवीच्य देवळांत शीतळादेवीची मूर्ती उत्तरेस आहे व देवीच्या समोर वेताळाची मूर्ति आहे. हे देऊळ गांवकीचे असून गावकीच्या सर्व सभा, सातीकाची बोळवण वगैरे सर्व गांवकीच्या गोष्टी ह्या देवळातच होत असतात. ह्या गांवातलें हे प्रथमचे देऊळ आहे. ह्या देवीचा उत्सव पौष महिन्यात पौर्णिमेला दरवर्षी होतो. त्यावेळीं देवीचा पाठ वाचला जातो. त्या समयीं पूर्वी यात्रा भरत असे व शौकिन लोक नाटके करीत असत. ह्या देवींची उत्सवानंतर रात्रीं पालखी निघते. अंत्यविधीनंतरची सर्व क्रियाकर्मांतरें ह्याच देवळांत इनामदार व पांढरपेशे वर्गांचे लोक करीत असतात. ह्या देवीपुढचे सर्व उत्पन्न पूर्वी भोपी घेत असे. हल्लीं म्हणेराच्या कुटुंबातला कोणीतरी घेतो. देवीच्या तेलवातीकरितां भोप्याला पैसे देत असत. हल्लीं गांवकीकडून तेलवात केली जाते. देवीच्या उत्सव समयीं होम झाल्यावर देवीची पोथी

वाचण्यांत येते. हा उत्सव पूर्वी इनामदाराचे उपाध्यायाचे गुमास्ते करीत. हल्लीं कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांनीं देवीला दिलेल्या शेताच्या अुत्पन्नांतून हा अुत्सव केला जातो. देवीचे सातीक म्हणजे देवीला बलीदान देणें व तिच्याकडून मुलामाणसांना अभय व गुराढोरांना संरक्षण मागणें होय. देवीचे वारे भक्ताच्या अंगांत येते व त्यानंतर तो भगत दोन बोकडाचा बळी देवीला देतो. एक बोकड इनामदाराचा व दुसरा बोकड गावकीचा होय. इनामदाराचा बोकड म्हणेरे याची माडीवर व दुसरा पाटीलाचें माडीवर कापण्यांत येतात. मग रात्रीं मिरवणूक सर्व गावाभोवतीं फिरते कांहीं उडीद तांदुल वगैर शिंपडींत आरडाओरड करीत हें लोक गावाला प्रदक्षिणा करीतात व नंतर कांहीं मासे शिजवून प्रसाद वाटला जातो. कांहीं भाग तसाच ठेवत.त व सर्व इनामदाराकडे दुसऱ्या दिवशीं प्रसाद पाठविला जातो. सातीक जोपर्यंत झाले नाहीं तोपर्यंत कोणीहि आवणी सुरू करू शकत नाहीं. प्रथमतः इनामदार इनामाच्या रकमेंतून ६ रुपये ह्या सापीकाला देत. नंतर अबकारी हक्काचे पैशांतून ६ रु. दिलें जात असत. हल्ली गावकरी दुकानदारापासून घेतलेल्या पैशातून दोनहि बोकड आणीतात. पूर्वीं गांवकऱ्याचे बोकडाकरितां दर चुलीस वर्गणी काढली जाई.

कानकई : देवीच्या देवळासमोर पूर्वेस कानकई देवीचा थापा आहे ही देवी गांवचे सीमेवर आहे व लोक हिचीहि भक्ती करितात.

झोटींग : देवीचे देवळाचे उत्तरेस झोटींगाची स्थापना सर्वेनंबर १ मध्यें आहे. ही एक उभी मूर्ती आहे. कानकई, देवी झोटींग हे पुरातन काळचे देव आहेत व त्यांची स्थानें देवीच्या आसपासच आहेत.

बहिरीभवानी : मूळच्या ठाकराची ही देवी. हिची स्थापना झोटींगाचे बांगात आहे. हिची सर्व व्यवस्था मूळचे ठाकूराचेंकडे आहे. त्यानी एक लहानशी जमीन देवीला दिली असून त्या उत्पन्नांतून तिची व्यवस्था केली जाते. नाईक कुटुंबाचे वतीनें नवरात्राचे आरंभी श्री गजाननाच्या बाजूस ज्या भवानी देवीची स्थापना करण्यांत येते व दसऱ्याला जिची सांगता करण्यांत येते ती भवानी देवी ही नव्हे. ती भवानी इनामदारांची देवता आहे.

खंडेराव : श्री सिद्धीविनायकाचे खोलीत हे देवस्थान आहे चंपाषष्ठीला येळकोट करण्यांत येत असतो.

नवरात्र : श्रीसिद्धीविनायकाचे खोलीत नवरात्राची स्थापना करण्यात येते. सर्व इनामदार फुलाच्या माळा व विडे पाठवितात व त्याच ठिकाणीं नवरात्राच्या सुवासिनी पुजण्यांत येतात. आश्वीनांत हे नवरात्र असते.

गुडीपाडवा : चैत्र शुद्ध प्रतिपदेस सर्व गांवांत गुढ्या उभारल्या जातात. नंतर ह्या दिवशी एकमेक एकमेकांचे घरी जाण्याचा प्रघात आहे. दुःखी माणसांचे घरी सांत्वना करितां ह्या दिवशीं जावयाचें असते. ह्या दिवसापासून स्त्रियां सुवासिनी पूजन सुरू करतात.

श्रीरामनवमी : चैत्र शुद्ध प्रतिपदे पासून श्रीरामाचे मंदिरांत देवासमोर रोज रात्री कीर्तन सुरू होते. रामनवमीच्या दिवशीं दिवसा कीर्तन होऊन श्रीरामाचा जन्मोत्सव करण्यांत येण्याचा रिवाज आहे. ह्या सर्व उत्सव, कीर्तनें वगैरे बाबी नारायणजीचे वंशजाकडे सोपविलेल्या आहेत. त्यांच्याकडे हा सर्व उत्सव आहे. ह्या करिता ईनामांतून रकमा खर्ची घातल्या जात. हा पृथक धर्मादाय आहे. ही रक्कम नारायणजीच्या हिश्यातून खर्ची पडत असे. रामनवमीला मोठी यात्रा भरते व रात्रीं पालखी निघते. पालखीची व्यवस्था वरीलप्रमाणें नारायणजीचे वंशज करतात. इनाम खालसा झाल्यानंतर ह्या उत्सवाचा खर्च श्री. चिंतामण मुकुंद नाईक स्वतः पदरचा करतात. मात्र अष्टमी, नवमी व समारोपाकरिता दशमी अशी ३ दिवस कीर्तनें केली जातात. ह्या दिवसापासून ९ दिवस रामायणावर दुपारी प्रवचन करण्यांत येई. नवमीच्या दिवशी समाप्ति होऊन मिरवणुकीने रामायणाची पोथी श्रीसिद्धीविनायकाचे स्थानापर्यंत नेत व त्या ठिकाणी पोथीची पूजा होत असे. ही पोथी वाचण्यास भिवंडीचे काळे घराण्यातले प्रवचनकार येत असत. हें त्यांचे वर्षासन होते. रामनवमीचे दुपारी निरनिराळे गावचे लोकांची भजनें येतात.

रामनवमीच्या दुसऱ्या दिवशीं कुस्त्या केल्या जातात. त्याचा खर्च गांववाले वर्गणी जमवून करीत. पण हल्लीं गांवकीच्या पैशांतून केला जातो. ह्या दिवशीं मुलांना गांवजत्रा ह्या नात्यानें शाळेंतून सुटी दिली जाते. श्रीरामनवमीच्या रात्री फार पूर्वीपासून देवाच्या निमित्तानें नाटक करण्यांत येत असे. पूर्वी ही नाटकें इनामदार करीत असत. हल्ली ही नाटकें गांवातील लोक स्वखर्चानें करितात. यात्रेत पाळणे तमाशे वगैरे येतात.

श्री हनुमानजयन्ती : चैत्र शुद्ध पौर्णिमेस हनुमानाचा जन्म श्री हनुमानाचे मूर्तीसमोर करण्यांत येतो. त्यानिमित्त द्वादशीपासून प्रतिपदेपर्यंत ५ दिवस किर्तनें केलीं जात. हा उत्सव मुरारजीचे वंशजाकडे असे. त्या उत्सवाकरितां पृथक धर्मादायमधून पैसे येत असत व हा उत्सव करण्यांत येई. हल्ली बरीच वर्षे हा उत्सव मुरारजीचे वंशज कोणीही अणजूरास नसल्यामुळे श्री. चिंतामण मुकुंद नाईक करीतात. इनाम विलीन झाल्यानंतरही चिंतामण नाईक हा उत्सव एकच दिवस पौर्णिमेस जन्मानिमित्त करितात.

वटपौर्णिमा : गावाच्या मध्यभागी एक मोठे पिंपळाचे झाड पुरातनपासून आहे. त्याला मोठा पार बांधलेला आहे. ह्या जागीं वडाचे मोठे झाड होते ह्याची

व्यवस्था गंगाजीचे वंशज पाहतात. त्या पारावर गावांतील सुवासिनी एकत्र येऊन वडाची पूजा उपाध्यायाचे सांगण्याप्रमाणें करीत असत. सुवासिनीना एकत्र आलेले पाहणे मोठे शोभादायक असे. नंतर सुवासिनी एकमेकांचे घरी जाऊन हळदकुंकू एकमेकांना देत असत. स्त्रियांचा असा हा पहिला सार्वजनिक उत्सव होय. लहानपणी आम्ही म्हणत असूं ' अणजूरगांवी स्थल मारुतीचे । तेथें असे हो बळ नाईकांचे ।।

नारळी पौर्णिमा : नारळी पौर्णिमेचे दिवशीं मुलगय तळ्यांत मंगल स्नान करण्यात येई. सर्व इनामदार या प्रसंगीं हजर असत. नंतर माडीचे ओटीवर सप्तर्षीचे पूजन, होम वगैरे केला जाई त्यावेळीं सर्वजण नवीन यज्ञोपविते घेत असत. हा सर्व समारंभ बुबाजीच्या शाखेकडेच असे. होमाचा व पूजेचा मान माझा होता. यज्ञोपवित ग्रहण केल्यानंतर सर्वांना माझ्याकडून चहापान व पानसुपारी देण्यांत येई.

महाशिवरात्र श्रीशंकर : श्रावण महिन्यांत श्रीशंकरावर अभिषेक घालण्यांत येत असे. श्रावण महिन्यातल्या प्रत्येक सोमवारी गंगाजीचे घराण्यांतील व इतरांच्या पूजा शंकरास येत असत. शंकराची ह्या महिन्यांतील सोमवारची मुख्य पूजा बुबाजीचे घराण्यांतील मोठ्या शाखेंतले इसम त्यांच्याकडे म्हणजे माझेकडे असे. श्रीशंकराचे पूजेकरितां शेते दिली आहेत. बुबाजीच्या व गंगाजीच्या घराण्यातली ती शेते आहेत. त्यांचा धारा त्याचे वंशज आजपर्यंत भरीत आले आहेत. त्याचे उत्पन्न देवाचे पूजेकडे खर्च होते. श्रीराम, श्री मारुती, श्री. विठोबा याची पूजा मुंबईच्या गुरवाकडे सोपवलेली आहे. तोच गुरव शंकराची पूजा करतो. रामचंद्र सखाराम याची बहिण चंदुबाई हीनें शंकराला शेते दिली आहेत. त्यांचे ट्रस्टी चिंतामण मुकुंद नाईक व दिवड्या पाटील आहेत त्यांचें उत्पन्न आलीमघरचा विनायक देवड्या पुजाऱ्यास देतो. माघ महिन्यातल्या महाशिवरात्रीच्या दिवशीं देवावर अभिषेक केला जात असे. त्याप्रसंगीं रात्रौ एक कीर्तन करण्यांत येत असे. देवाचे कीर्तनाकरितां पृथक धर्मादाय सदरांत रक्कम खर्ची घालून देण्यांत येई. ह्याची सर्व व्यवस्था बुबाजीच्या मुख्य शाखेतले म्हणून माझ्याकडे चालत होती परंतु हल्लीं ही सर्व व्यवस्था वसंत पुरुषोत्तम करीतात. हल्ली इनामविलीन झाल्यानंतर वसंतराव स्वतःचे खर्चानें ही व्यवस्था करीतात व हल्ली एक कीर्तन करण्यांत येते. त्रिपुरीपौर्णिमीला दिपमाळ उजळली जाते. त्या रात्री इनामदार शंकराचे देवळात जमत असत व सुवासिनी रात्रौ शंकरास कमळे वाहीत असत.

कृष्णाष्टमी : श्रावण कृष्ण ८ मीस श्रीकृष्ण जन्म साजरा करण्यात येत असतो. ह्या प्रीत्यर्थ पंचमीपासून नवमीपर्यंत किर्तनें केली जात. अष्टमीला हंडी फोडली जाते. आधल्या रात्री रोहिणी नक्षत्रावर विठोबाचे मंदिरांत श्रीकृष्णाचा जन्म रात्रौ कीर्तनानें केला जात असे. त्याचप्रमाणें रात्रीं १२ वाजतां कृतिका नक्षत्रांवर श्रीसिद्धीविनायकाचें

मंदिरांत श्रीसिद्धीविनायकाचे अधिकारी पूजाऱ्याचे करवीं करीत असतात. ह्या उत्सवाकरिता पृथक धर्मादायमधून उत्सवाप्रित्यर्थ रक्कम येत असे. मंदिरातला हा उत्सव शिवजी घराण्यातले इसम करीत असतात. मात्र हा उत्सव फिरती पद्धतीने त्या घराण्यातले इसम करीत असतात. हल्ली कांहीं उत्पन्न येत नसले तरी ते इसम स्वतःच्या खर्चाने उत्सव करीतात. फक्त दोनच दिवस कीर्तने केली जातात.

हरितालीका : भाद्रपद शुद्ध ३ रोजीं स्त्रिया हरतालीकीची पूजा करतात. सांगण्यांत येत आहे कीं फारपूर्वी सर्व स्त्रीया श्रीसिद्धीविनायकाचे मंदीरात जमून ही पूजा सामुदायिकरीत्या करीत असत. हल्ली घरोघरी ही पूजा होते. ह्या दिवशी केळी, जिबूड ह्यावर स्त्रिया उपवास करितात.

श्रीगणेशचतुर्थी : ह्या निमित्य भाद्रपद प्रतिपदेपासून पांच दिवस कीर्तन केले जात असे. चतुर्थीचे दिवशी श्रीगणरायाची पूजा करून पार्थिव मूर्तीची स्थापना श्रीसिद्धीविनायकाचे मंदिरात शेजारी गंगाजीचे मुख्य शाखेच वंशजाकडून होत असते. त्या पूजेनंतर इतर इनामदार व आलेले आप्तेष्ट पूजा करितात. सर्व इनामदाराचे नैवेद्य येतात व देवाला नैवेद्य सामुदायिकरीत्या दाखविले जातात. नंतर सामुदायिक आरती, प्रदक्षिणा आरती, आशिर्वाद झाल्यावर लोक घरचे घरी जातात. रात्रौ कीर्तन होते व सभा होत असते. दुसऱ्या दिवशीं तीर्थप्रसादाचे कीर्तन होत असते. ह्याचा खर्च गंगाजीचे वंशज बाबूराव भालचंद्र हे करितात. त्यांच्या खर्चाकरितां शेत दिलेले आहे त्याचे उत्पन्नांतून हा खर्च करण्यात येतो. देवाचे पूजेकरितां धर्मादाय रकमेंतून २५ रुपये व नंतर १०० शंभर रुपये दिले जात. मूळारंभी ह्या देवाची पूजा गंगाजीचे वंशज स्वतः करीत असत. अडचणीचे प्रसंगीं इनामदाराचे उपाध्याय गुमास्ते पंडीत करीत असत व त्यांना ते रुपये मिळत. पण पुढें इनामदारांना पूजेला अवसर न मिळाल्यामुळें देवाचे पूजेकरितां पुजारी ठेवण्यांत येऊ लागला. रावजीभाई नाईक यांनीं वामन गोविंद व रामचंद्र सखाराम याच्या सहकार्यानें कांहीं दिवस पुजाऱ्याची सोय केली. नंतर कै. दिवाकर भाई नाईक ह्यानीं स्वतः कांहीं दिवस पुजाऱ्याची सोय केली तदनंतर श्री. सिद्धिविनायक फंड स्थापला गेला व त्यांतून ही पुजाऱ्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. श्रीगजाननाची मूर्ती गौरी विसर्जनाचे दिवशीं मिरवणुकीने देवाळे तळ्यावर नेऊन विसर्जन केली जाते. ह्या मिरवणुकींत गावचे सर्व गणपती सामील होतात ही मिरवणुक वाजंत्र्यासह देवाळे तळ्यावर जाते. इनामदाराची मूर्ती विसर्जन झाल्यावर इतर सर्वांच्या मूर्ती विसर्जन केल्या जातात. ह्या समारंभात शामजीच्या वंशजाचीही एक मूर्ती असे. हल्ली कोणीही गणपतीची स्थापना त्याचे घरीं करीत नाहींत. विसर्जनानंतर नारळ फोडले जातात व त्यांचा प्रसाद वाटला जातो. नंतर इनामदार लोकांना त्याचे उपाध्याय पंडीत त्यांच्या घरीं बोलावले

जाई चहा वगैरे तिथें पंडीत देत असत. अणजूरास पंडीताचे कोणी नसल्यामुळें तो प्रघात बंद आहे.

ऋषिपंचमी : भाद्रपद शुद्ध पंचमी म्हणजे ऋषिपंचमी होय. ह्या दिवशीं जनावरांचे कष्टाचे कांहीही अन्न स्त्रिया सेवन करीत नसतात. मनुष्याचे कष्टाचेच अन्न खावयाचे असा आजच्या दिवसाचा दंडक स्त्रिया पाळतात. पुढें यंत्रयुग येणार व त्यावेळीं हातानें काम करण्याचे सर्वजण टाळतील असे भविष्य ओळखून एक दिवस तरी स्वतःचे कष्टाचे खाण्याचा दंडक ठेवला तर लोक हातानें काम करण्याचे चालू ठेवतील ह्या उद्देशानें हा दंडक ऋषिमुनींनी लावून दिला आहे.

गौरी : गौरीच्या दिवसांत सर्वांचे घरी गौरी येतात. गौर ही गजाननाची आई मानली जाते व ती ह्या दिवसांत माहेरपणाकरितां आणली जाते. अर्थात ही शंकराची बायको होय. हरितालिकाची पूजा म्हणजेच गौरीची पूजा होय. हरितालीका म्हणजे गौरी होय.

नवरात्र व दसरा : आश्विन शुद्ध प्रतिपदेस नवरात्र सुरू होतो. त्यादिवशीं नवरात्राची घटस्थापना श्रीसिद्धीविनायकाचे मंदिरांत करतात. दसऱ्यापर्यंत त्या नवरात्राचे-देवीचे-घटांची पूजा करण्यांत येते. शिवाय चिंतामण मुकुंद नाईक यांचे स्वतःचे घरीही रोज सप्तशतीचा पाठ वाचला जात असे. शिवाय अणजूरकरांकडून प्रत्येकीं घटांकरितां रोज एक माळ येते. तेवढीच केळी, तेवढेच विडे व तेवढीच दक्षिणा जमते. ह्या नवरात्रीचे दिवसांत रोज सप्तशतीचा पाठ ब्राह्मणाकडून वाचला जातो. शेवटच्या दिवशी त्याची समाप्ती होते. ह्याकरितां इनामदाराचे रकमेतून छबिना म्हणून पैसे खर्च पडत असत. हल्लीं बाबुराव भालचंद्र स्वखर्चानें हें सर्व करतो. दसऱ्याचे दिवशीं सीमोल्लंघन करण्यांत येते. त्याचेकरितां रामाचे मंदिरांचे पारासमोर आपट्याची डहाळी आणून तेथें पूजा केली जाते. घरताचे कुटुंबियाचा डहाळी आणण्याचा हा मान आहे. त्यास गंगाजींच्या वंशजाकडून व बुवाजीचे वंशजाकडून प्रत्येकीं २ आणे दिले जात. ह्या पूजेचा मान गंगाजीचे वंशज बाबूराव भालचंद्र याचा आहे. पूजा झाल्यावर राममंदिरांत व शिव मंदिरांत देवांना सोनें दिल्यानंतर वाजंत्र्यासह सर्वजण मिरवणुकीने श्रीसिद्धीविनायकाचे मंदिरांत देवाला ' सोने ' देत. त्यावेळी शिवजीचे वंशज दिवाकर भाई याचेकडून सर्वांना चहा मिळत असे. नंतर इनामदार देवीचे देवळांत जाऊन देवीला सोने देत व नंतर गांवात प्रत्येकाचे घरी जाऊन लहान मुले, म्हातारी माणसे व स्त्रिया याना सोने प्रत्येकजण देई नंतर हे लोक आपापल्या घरी जात. प्रत्येकाचे दारांत मुख्य सुवासिन आरती घेऊन तयार असे. सुवासिनीनी ओवाळल्यानंतर मुख्य पुरुष घरांत जाऊन देवापुढें कोहाळा कापीत असे. सुवासिनीनी ह्या दिवशीं ओवाळणें व कोहळा कापणे ही

क्षत्रियत्वाची दर्शक चिन्हें आहेत. ह्याच दिवशीं बडोद्यास व पुण्यास मोठा समारंभ होई. पेशवाईचे काळांत दसऱ्याचे मुहूर्तावर पेशवे यांची स्वारी मुळगिरीस जात असे. ह्या नवरात्राचे नऊ दिवसांत गावातले प्रत्येक कुटुंब आपला सुवासिनी पूजनाचा व हळदी कुंकवाचा समारंभ उरकून घेई.

होळी पौर्णिमा : फाल्गुन प्रतीपदेपासून होळीच्या उत्सवास सुरवात होते. कोंवड होळी म्हणजे होळीचा आधला दिवस. तोपर्यंत लहान मुलें होळी करिता लाकडे ईनामदारांकडून रोज जमवित. फार पूर्वी गांवात एकच होळी होती. त्यानंतर तरे लोकांनीं स्वतःची होळी केल्यामुळें दोन होळ्या झाल्या शिवाय मुकुंद अनाजीचे घरी एक होळी लागते व श्रीरामाचे मंदिरासमोर रामदेवस्थानांची होळी असते. होळी पौर्णिमेचे दिवशी मिराशी मुरारजी चौक झाडून साफ करितात. कोळी पाड्यावरून व तरे व्यतिरीक्त दुसऱ्या सर्व अगजूरकराकडून मिराशी लाकडे व शेणी गोळा करतात. डाक्याचे आळीचे लोक होळी करिता दोन आंब्याचे खुंट आणतात तो त्याचा मान आहे. तेच कोंवड होळी व मोठी होळी ह्यांचे खांब गाडून ठेवतात. गांवातले कोतवाल ह्यांचा अग्रमान पहिल्या पूजेचा व होळी लावण्याचा आहे. त्याच्या गैरहजेरीत माझ्याकडे तो मान सूपूर्द केला होता. पहिली पूजा झाल्यावर गावांतल्या सर्व सुवासिनी सामुदायिक रीतीनें पुजा करितात. ह्या सर्व वेळीं महारांचे वाजंत्री वाजत असते. पूजेनंतर डाकी होळी रचतात. बारा वाजल्यानंतर रात्रीं होळी पेटविली जाते. प्रथमतः माझ्याकडे कोणी-तरी होळी पेटविण्याचे आधी येत. कोतवाल सर्वांना दख्खल देत व नंतर होळी पेटविली जात असे. त्यानंतर सर्वजण होळीला प्रदक्षिणा करितात. त्या वर्षांत लग्न झालेली जोडपी होळीचे दर्शनास येत. पंधरा दिवसापर्यंत होळकर पाट्या खेळत. पण ह्या दिवशी पोवाडे गाणीं, लावण्या वगैरे रात्रभर बोलले जात. ह्यातला पहिला मान वरताचा आहे. लोक रात्री लाकडे आणत. फार पूर्वी ह्या दिवशी इनामदाराचे स्वयं-पाक होळीवर आणले जात व मग सर्वजण होळीवर त्यांचा फडशा करीत. रात्रीं होळी पेटवल्यानंतर मिराशी वाजंत्री वाजविण्याचा पहिला मान भला व दुसरा मान भालचंद्र जयराम याना देत.

धुलीवंदन : हाही एक होळीचा भाग आहे त्यादिवशीं सर्व इनामदार चौका-तल्या होळीवर जमत व माझे घराचे ओटीवर धुळ घेत. त्यावेळी प्रत्येक दुकानदारा-कडून २ रुपये व दारु दुकानदाराकडून १४॥ रुपये घेत असत. प्रत्येक उपाध्याय छत्रियांचे म्हणून १। रुपये देणगी देत म्हणजे तीघांचे ३॥। रुपये होत. ह्या पैशांतून गुळनारळ चणे आणून प्रसाद सर्वांस देत असत. राहिलेल्या पैशाचे पोस्त म्हणजे जेवण करून लहानथोरांना दिले जाई. धुळवडीचे दिवशीं आग्री व कोळी लोक शेणाचा वापर करीतात.

वामन द्वादशी : फाल्गुन महिन्याचे द्वादशीस रंगद्वादशी म्हणत व त्यादिवशी सर्व इनामदार, बाबूरावचे ओटीवर जमून रंग खेळत त्यावेळी सर्व खर्च गंगाजी नाईक ह्यांच्या वंशजाचा असे रंगपंचमीस ही इनामदार त्याच्याच ओस्र्यावर जमून रंग घेत. ह्याही दिवसाचा खर्च बाबूरावांच्या वडिलांचाच असे.

मकरसंक्रांत : ही पौष महिन्यांत जानेवारी १४ तारखेस येत असते. त्यावेळीं सार्वजनिकरित्या इनामदार तिळगुळ वाटीत असत. ह्यानिमित्तानें वर्षांत झालेले कटुप्रसंग सुधारले जात असत.

महाशिवरात्री : ह्यादिवशीं लहानशी यात्रा भरते उत्सव हल्ली वसंतराव करितात वगैरे हकिगत मागें आलीच आहे.

माघी गणेशजयन्ति : हा श्रीगणरायाचा जन्मदिवस. ह्यादिवशीं अणजूरास मोठा उत्सव होतो. देवास लघूरुद्रानें अभिषेक करण्यांत येतो. पुजा झाल्यानंतर रात्रौ कीर्तन होत असते सार्वजनिकरित्या आरती होते. अनेक स्त्री-पुरुष इनामदार, व इतर देवाचे जयन्तिकरितां येतात. दोन दिवस लोक रहातात. रात्री करमणुकीचे प्रकार होतात. आलेल्या पाहुण्याना दोन दिवस भोजन देण्यांत येतें. एका कमिटीनें हें काम अंगावर घतलें आहे व देणग्या जमवून हा सर्व खर्च केला जातो.

दीपावली उर्फ दिवाळी : आश्वीन वद्य १३ पासुन दिवाळी सुरू होते. कोणी कोणी तर आठविंड्या पासून दिवाळीची सुरवात मानून तुळशीविवाहानंतर तिचा शेवट मानतात. धनतेरसीचे दिवशी धनाची पूजा करितात. नरकचतुर्दशीच्या आधल्या रात्री पहाटेस मुरारजीच्या वंशजांतील वंशज मुरारजीच्या नावें मंगल स्नान करितात. नरकचतुर्दशीचे पहाटे उठून लोक दिवस उजाडण्याचे पूर्वी मंगल स्नानें आटोपतात. ह्या वेळी पहाटेस न्हावी बुवाजीचेकडे व गंगाजीकडे जाऊन त्याच्या वंशजाना उटणे शिरेतेल. लावीत असे. नंतर न्हावी इतर इनामदाराकडे जाई. त्यास त्याबद्दल प्रत्येकी ४ आणे मिळत. ह्या वेळी दारुकाम उडविण्यांत येते. ह्या दिवशीं इनामदार एकमेकांचे घरीं जातात. त्यावेळी जो त्या वर्षी दुःखी असेल त्याच्या वरीं आधीं जाऊन त्याला घेऊन मग इतराचे घरी जात असत. नरकचतुर्दशीचे दिवशी किंवा दुसऱ्या दिवशीं लक्ष्मीपूजन करण्याचा प्रघात होता. ज्यांच्या घरीं हें लक्ष्मीपूजन व सरस्वतीपूजन होई त्यांचे कडे सर्व इनामदार जात असत. दुसरे दिवशी कार्तीक शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी सकाळी पहाटेस सर्वजण मंगलस्नानें उरकीत. ह्या दिवशी न्हावी वरील सर्व इनामदाराचे कडे जाऊन त्याना आरसा दाखवित असे ह्या बद्दल त्याला प्रत्येकी ४ आणे मिळत. नंतर बळी पूजन प्रत्येकाचे दारी होई. त्या नंतर गुरेढोरे यांना रंगवून जळत्या ढिगाऱ्यावरून उडवून गोबळीक्रिडन केले जाई. गुराची झुंज ह्याच वेळी होई. ह्या दिवशी घरांतील मुख्य सुवासिनी सर्वांना आरती करीत असतात. त्या वेळी अहेर व पैसे आरतींत टाकण्यांत येत. नरकचतुर्दशीचे वेळी मंगल स्नानानंतर मुख्य सुवासिनी

सर्वांना ओवाळून ' इडापीडा ' टळो असें चिंतन करीत असे. बळी राजाचे दिवशी इनामदार एकमेकांना भेटत असत. राममंदिरांत जावून देवदर्शन घेत. देवळांत मोठा बळी करीत. द्वितीयेस बहीणी भावाला ओवाळीत असत ह्यास **भाऊबीज** म्हणतात. अशारीतीनें हे पांच दिवस मौजेंत जात. बळीचे दिवशी मिराशी येवून पहाटेस सर्वांना मंगल गीतें म्हणून आशिरवाद देत असतो. त्याला सर्वजण कांहीं पोस्त देतात. प्रथमतः तो आमच्याकडे येत असतो. प्रथमचा मान म्हणून आवणी झाल्यावरही असेंच अभिष्ट तो चिंतीत असतो ह्या वेळी त्याचे जवळ कणकेचे बैलाचे चित्र असे.

तुळशीविवाह : कार्तीक द्वादशी पासून तुळशीविवाहास प्रारंभ होतो व शेवट पौर्णिमेचे दिवशी होतो गावातला पहिला तुळशी विवाह बाबूराव भालचंद्र यांचेकडे होतो नंतर सर्वजण करीतात. हा त्याचा मान आहे.

धर्माधिष्ठान : परमेश्वराचे अधिष्ठानाशिवाय कांहीं कार्य होत नाहीं असा विश्वास गंगाजी व चार भावांचा होता. तो विश्वास आपणास साष्टीचे बखरीचे पानापानांत सर्वत्र दिसून येत आहे. आपली व आपल्या सहकाऱ्याची वतनें सुटत नाहींत असें दिसल्यानंतरही भग्नहृदय झालेल्या गंगाजीने शेवटचे वर्तन व उद्‌गार स्थितप्रज्ञ कर्मवीराप्रमाणें काढले. मनांत चलबिचल होऊं दिली नाहीं. गंगाजी हे श्रीमोरयाचे निस्सीम भक्त होतें व बुबाजी हे पंढरीनाथाचे उत्तम भक्त होते. आळंदी देहूला त्यांच्या वाऱ्या होत असत. ज्या मातृभूमीत फिरंग्याचे अमदानींत स्नान करणें देखील मना होतें त्या ठिकाणीं सर्व धर्मकृत्ये रोज होत असलेली पाहून गंगाजीना किती आनंद झाला असेल ! गंगाजी व शामजी याच्या सह्यानेच स्वतःच्या हातानें 'दातृत्वास मान्य' असे अक्षरे लिहून दिलेला राजीनामा खाली देत आहे त्यावरून गंगाजीची धार्मिक कार्यावरची निष्ठा व्यक्त होत आहे. ह्या राजीनाम्यांत दिलेल्या गावातून यज्ञकर्त्या ब्राह्मणानीं प्रत्येक गांवीं एक रुपाया वसूल करावयाचा हक्क त्या राजीनाम्यांत दिला आहे. तसेच पंचवटीच्या गोडबोलेना मोरोबा नाईक व लक्ष्मण नाईक, दामोदर नाईक यांनी धर्मादाय भात दिलेले पत्रही खाली देत आहे. नारायेणजी नाईक याचे घरी देवपूजेस ठेवलेल्या ब्राह्मणाचे दुर्वतनाचे प्रकरणही पुण्यास श्रीमंताकडे पोहोचले होते. ह्या सर्व गोष्टी सिद्ध करीतात कीं, अणजूरकर नाईकाची प्रवृत्ती धर्माकडे विशेष होती. इनामदारापैकीं सर्वांची आजही श्रीमोरयावर विशेष भक्ती आहे तसेच पंढरीची वारी करणारेही गृहस्थ बुबाजीच्या घराण्यांत आहेत.

गोडबोलेना दिलेल्या धर्मादाय पत्राची नक्कल १

धर्मादायपत्र : स्वस्तिश्री श्री शालीवाहन शके १७१४ (सन १७९२) परिधावी नाम संवत्सरे फाल्गुण वा।। ११ भानुवासरे दिल्हे धर्मादाय पत्र येसीजे पो राजश्री हरभट तथा सखारामभट बीन नारायणभट गडबोले गोत्र कौशिक सुत्र हिरणकेश वास्तव्य कसबे कल्याण स्वामीचे सेवेसी सेवक मोरोबा नाईक तथा लक्षुमन नाईक तथा

दामोधर नाईक अनजूरकर सरपाटील तो आठगांव व प्रान्त साष्टि दंडवत विज्ञापना येंनी यास कांहीं परलोक साधण करावी येशी इछा जाहली त्यास तुम्हीं सुविद्या सत्पात्र कुटुंबवछळ येशापत्री धर्मादाय दिधली याने बहुत श्रेयेस्कर यैसेस समजून श्रीपरमेश्वर पीतर्थ कांहींयेक साल मजकुरापासोन साल दरसाल धर्मादाय असावा यास्तव आपणास आम्हीं खुसरजावतीनें सालमजकुरापासोन साल दरसाल भात गोडे खंडी दोन सवा सा मणी साडेतीसेरी वसक मापे सुमार ॥ २ ॥ असे साडे बारा मण मुडा पंचवीस लजीम धर्मादाय पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें आवलाद आफलाद तुम्हास आम्हाकडे मौ अणजूर ईनाम गांव आहे तोपर्यंत आम्हीं देऊं व आमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरा आवलाद आफलाद प्रमाणे मजकूराचा उपभोग आमचे हिशाची करतील ते देत जातील पुढें भोगवटी यास हें पत्र धर्मादाय तुम्हांस लिहून दिले असे हस्ताक्षरें धर्मादाय पत्र लेहून दिल्हे सही लक्षुमन नाईक सही पत्रावर साक्ष मोरभट पाटणकर बीन सदाशिव पाटणकर वरुन श्रीपंचवटी नासीक १.

पत्र २

दिक्षिताना दिलेल्या राजिनाम्याची नकल

राजश्री हरी दिक्षित उपनाम मम......
हर गोत्र भारद्वाज सूत्र हिरणकेशी......
प्राचीन वास्तव्य पंचनदी क प्रांत (कनोज)
हाली वास्तव्य कसबे कल्याण स्वामीचे सेवेसी
१६५२ (सन १७३०) साधारण नाम संवत्सरे श्राव...
मी गुरुवारे तद्दिनी लिखिते राजीनामा
सरदेसाई व देशमुख व देशपांडीयेचे लोक
द व सेटे महाजन व म्हात्रे व खोत पाटील बर
मेत गणोत प्रान्तफिरंगण वसई बहादरपूर
ता. आठगांव अणजूर माकण माव
व वे ल.

१	१	१
पा॥ सासष्ट	पा॥ मनोर	पा॥ माहीम
१	१	१
पा॥ माहा	पा॥ तारापूर	पा॥ काकण
१	१	१
पा॥ खैरणे व पा॥ नंदबेलापूर	पा॥ अशेरी	पा॥ कसबे दवन
१	१	१

दान पत्रासमान्ये
दातृत्वास सही

सही शामजी नाईक व गंगाजी नाईक
महिमानराऊ सरनागवडी प्रांत
वसई बहादुरपूरा गौरवशाल

श्रीएकविरा कुली
नगाग संदेल
नानाशरण

श्रीराम

श्री

सु॥ इहिदे सलासीन मया अलफ कारणें वेदशास्त्रसंपन्न राजमान्य यांसी राजिनामा लेहून दिल्हा ऐसाजे स्वामीनी श्रीमहास्थली सोमयाग केला तो आपण दृष्टीनें अवलोकून परमसंतोष पाहून हेतूपूर्वक निश्चय केला कीं यैसा स्वधर्म आपले मुलखांत व्हावा आणि यैसे सुपात्र ब्राह्मण स्नानसंध्यादि षटकर्मे आचरोन महायज्ञ करितात. यास आपण गांवगन्ना वरशासन करून देऊन धर्म वृद्धी करावी तेणें करून पातकनाश पावोन सुखोत्पत्तीनें पावन होवोन म्हणून काया. वाचा मनसा निश्चय केला होता. तदनुसार होऊन आले त्यावरून स्वामीस आत्मसंतोषे दर गांवास रुपया १ प्रमाणें धर्मदायाची वृत्ती पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करून दिधली असे तरी स्वामीनी सालदरसाल वृत्ति अनुभवित जाणें यास कोणी अंतराय करणार नाहीं. जो अंतर करील तो आपले स्वधर्मास परान्मुख होऊन पूर्वजासहवर्तमान अधःपातास जाईल हा राजिनामा लेहून दिल्हा सही छन मोदम

प्रां. पंचनद

१ वाळ्या पाटील व नामपल मौजे दहिवली

१ धांग पाटील मौजे म्हातार्डी

१ मुठपा मौजे दिवे

१ धाग म्हात्रा मौजे भूपड

१ बाळ म्हात्रा मौजे पाथार्डी

१ तान ठाकूर मौजे डोंब्रोली

१ बाळ म्हात्रा व नाम म्हात्रा मौजे ठाकुरली

१ राघू म्हात्रा मौजे कोपर

१ चाउपा मौजे निळजे

१ चाउ पाटील मौजे बेतोडे

१ गणू म्हात्रा मौजे खिडकाळी

१ येसु पाटील मौजे देसई

१ मुग पाटील मौजे डावले

१ बापु पाटील मौजे कवसे

१ भाग पाटील मौजे झागावे

प्रां. सायेवान

१ नावपा मौजे अडिवरे

१ वांग पा. मौजे भाताणे

१ बाल म्हात्रा मौजे जवसे

१ धर्म पा मौजे मांडगे

प्रां. माकण खाच

१ लक्षुमजी पा. कसवे कामण

१ त्राम पाटील मौजे करंजे

१ भामपा मौजे खोणीतली

१ बाल पाटील मौजे चंदर

१ चांग पाटील मौजे डावेघर

१ आल पाटील मौजे उसरघर

१ कान पाटील मौजे आगासन

१ पोस पाटील मौजे बापणे

१ हर पाटील मौजे जानवली

१ धाग पाटील मौजे नवघर


१ म्हाद पाटील मौजे राऊर तर्फ नवघर

१ म्हाद पाटील मौजे करंजाल तर्फ नवघर


१ म्हाद पाटील ठेवणी तर्फ नवघर

१ विठ पाटील मौजे बोकेडे तर्फ नवघर

१ पद चौधरी मौजे पोल्हण




श्री विठोबा, अणजूर (पुरातन मूर्ति)



श्री राम लक्ष्मण सीता, अणजूर



श्रीराम विठोबा मंदीर, अणजूर



श्री अंजुबाई देऊळ



श्री हनुमान, अणजूर



श्री वेताळ, अणजूर

१ पोस म्हात्रा मौजे हेंदुठणे

१ घार म्हात्रे बारीवली

१ भाम भोईर मौजे उमरली

१ बाळ चौधरी मौजे चोले

१ उधव पाटील मौजे चिंचोटी तर्फ काल्हण

१ तान पाटील मौजे कोलई

१ आत्माजी पाटील मौजे देऊळ

(**टीप** : ही सर्व गांवे कल्याण सुभा म्हणजे कल्याण तालुक्यांतली आहेत)

दातृत्व ; हा राजिनामा १७३० सनांतला आहे मुक्काम कल्याण येथें हा राजिनामा लिहिल्ला आह. त्यावेळीं गंगाजी व शामजी कल्याणास राहत होते. सेटे महाजन म्हात्रे खोत पाटील ह्या सर्वांनी हा राजिनामा लिहिला आहे. गंगाजी नाईकांनी हा सोमयाग पाहिल्यानंतर त्यांना आनंद झाला पण गंगाजी कल्याणास निर्वासित अवस्थेंत होते. दिक्षिताचा मान सत्कार करावा ही त्याची दृढ मनीषा होती. आपल्या मुलखातही असे यज्ञ व्हावे ही इच्छा पण आपला मुलख तर फिरंग्यांनीं आक्रमिलेला तेव्हां दिक्षितांना मान सन्मान करून वृत्ति घ्यावी एतदर्थ गंगाजीनें हा उपदूव्याप केला आहे त्यांची अनंत गावे साष्टी वसईस होती पण तो प्रान्त फिरंगी यांच्या ताब्यांत असल्यामुळें गंगाजीनें कल्याण तालुक्यातले ह्या पट्टीचे पाटील म्हात्रे महाजन मिळवून त्यांचे मन वळवून त्यांच्याकडून हें दान करून घेतले आहे. गंगाजी निर्वासित अशा स्थितींत कल्याणास राहात होते व उपजीविकेकरितां लोनाडास खोतीने शेती करित होते तरी पण त्यांनी नेट धरून कल्याणांतल्या अनेक गांवातल्या लोकांची मनें वळविण्यांत व दान मिळविण्यांत त्यांनी यश मिळविले. ह्यावरून एक सिद्धान्त प्रस्थापित होता कीं कोणत्याहि मनुष्यानें कोणतीहि गोष्ट सद् हेतूनें केल्यास त्यांस देव मार्ग दाखवितो. गंगाजी नाईकाचे म्हणणे ज्या अर्थी परक्या प्रान्तातल्या लोकांनीं मान्य केले ह्याचा अर्थ असा की, गंगाजी नाईकाचे व्यक्तिमत्व फार मोठे होते व कोणीहीं त्यांच्या हाकेस ओ देत असे. गंगाजीनें वसई व साष्टी सोडविण्यात जे यश मिळविले त्याला त्याचे व्यक्तिमत्वच कारणीभूत आहे. 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते' विद्वान ह्याठिकाणीं 'लोकाग्रणी' हे शब्द वापरावे म्हणजे गंगाजीचे व्यक्तिमत्व मान्य करावे लागेल. गंगाजी नाईकांचा ज्ञातींतला दर्जा पुढें वाचा.

भाग चौथा

सभापत्रे व आख्यायिका

सभापत्र : सभापत्र शके १६६८ (१७४६ सन) क्षयनाम संवछरे आश्विन वद्य नवमी ९ भोमवार गंगाजी नाईक व सिवजी नाईक व नारायेणजी नाईक अणजुरकर **सूर्यवंशी** क्षेत्री सरपाटील प्रान्त साष्टि तर्फ आठगांव प्रा॥ सायेवान यासी नामजी देसाई व जीवनजी देसाई व भानजी ठाकूर व गणजी तांडेल व केशवजी पुरो……… मालजी व मुगाजी म्हातारे येकसारकर जागजी घरी………म्हात्रे कांधवलीकर हरजी व अंताजीरुथ बोरवलीकर मुकुंदजी व बबनजी ठाकूर दहिसरकर, बाभुजी चोधरी व भानजी सुतार मागठकर (१) भिकाजी हैबतराऊ व जनाजी पा॥ व खेमजी म्हात्रे भाईदरकर, बालकोजी राऊत व बबनजी वोवळकर बापुजी ठाकूर व लखमणजी म्हातारे गोरगांवकर, त्रिंबक पुरो व पैते (१) म्हात्रे व चेंड म्हात्रे मनोरीकर ऊत म्हात्रे व गोपाळ म्हात्रे वडुवरात (१) चेंभूरकर पदमणजी म्हात्रे बोरवलकर काल (१) पुरो वढवलीकर तुभाजी देवनरकर, पुतलाजी राऊ जुहूकर, बेंड म्हात्रे व हरी म्हात्रे गुणगांवकर नार म्हात्रे व सुंदर पुरो चरईकर व समस्त गोतगंगा **सोमवंशी क्षेत्री ज्ञात पाठारे** ठाण्याचे मुकामी जमाव जाला होता तेव्हा वहुतास विहीत शालें कीं नाईकांचे चित्तात काहीं वहामा निमित्य कीं मागा फिरंगाण राज्य होते तेव्हां प्रा. मालाड येथें बाजूजी हरजी ठाकूर याजकडे लग्न होते वधु मौजे गोऱ्हाईकर भिकाजी म्हात्रा……… ……वाजपा (१) त्या लग्नामध्यें कोणीतरी………नाईकास पायधोणी नाहीं यांसी ………ता बाशा (१) नाईकांचे चित्तात………त्याजवरून लेहून दिलें कीं

तुम्हास··· ·····ची तावून (१) धरणें तुमचे पूर्वापार वंशपरंपरेने·············चालत आली आहे हल्ली ही चालतच आहे. या गोष्टीचे अंदेशा न धरावा ऐसा नाहीं. आपले जातीत ही गोष्ट कोणी कोणी बोलेल तो गोताचा गुणेगार असे व त्यास श्रीवाराणशीची शपत असे आणि तो सौमवंशी जातीचा नसे क्षत्रकुळीचा नसे यांसी दिला (१) हरकत नाहीं हे सभापत्र सर्वांही लिहिले.

सही	सही	सही
पुतळाजी राऊत जुहुकर	गणरुत बोरवलीकर	मुकुंदजी ठाकूर दहीसरकर
चाळाजी दुगाजी खारकर	मदनजी केशवजी पुरो	पदमणजी म्हात्रे बोरलकर
गणपत तांडेल मालाडकर	तुकाजी देवनेरकर	मौजे गुणगाव सही हरजी म्हात्रे
चाल म्हात्रा कांदलकर	डुवराथ चेंभूरकर	चेंड म्हात्रे मनोरकर
बाबाजी मालाडकर	नारण म्हात्रे दारलेकर	मुनहव
भानजी एकसारकर	अंताजी रुथ बोरवलकर	बाबाजी वोवळेकर
बेंड म्हात्रे गुणगावकर	ब.ळकोजी वोवळेकर	जीवनजी देसाई मालाडकर
गोपाळ पुरो मनोरकर	बापूजी चोधरी मालाड ठाकूर	भिकाजी हैवतराऊ भाईदरकर
कात········· ·· ·· ···	कंक म्हात्रे	भानजी मागाटकर (१)

शके १६९० सर्वधारी (१) नाम संवत्सरे माहे···········गुण प्रत्य (१) १५ ते दिवशीं असल पत्र आ·········कान शिपायी याजबरोबर अणजूरास सिवजी नाईक यांचेकडे रवाना केले असे.

हे पत्र शके १६६८ म्हणजे सन १७४६ तले आहे. परंतु त्या पत्राचें शेवटीं दिलेल्या शकाचा उलघडा होत नाहीं. ह्या पत्रावर तीन नाईकाचीं नांवें आहेत. मुरारजी नाईक लढाईत पडले व बुवाजी नाईक मृत्यु पावले असें ह्या पत्रावरून दिसते. शिवजीचें एक पेशव्याना गेलेले पत्र इतरत्र छापले आहे त्यांत बुवाजीचे मृत्युचा उल्लेख आहे म्हणजे ते पत्र १७४६ च्या नंतरचे ठरते.

दुसरें सभापत्र

सभापत्र : हें पत्र पांडुरंगजी नाईक यानीं नारायणजी नाईक यांना वसईहून लिहिलेले आहे. ह्या पत्रांत वसईच्या सभापत्राचा मजकूर आहे. ह्या पत्रावर शक सन नाहीं. त्यामुळें नारायणजी नाईक किती सनापर्यंत जिवंत होते हें उमगत नाहीं.

तीर्थस्वरुप नारायणजी नाईक अणजूरकर बाबा वडीलांचे सेवेशी आलेफ पांडुरंगजी नाईक आणजोरकर चरणावरी मस्तक ठेवून सीर सास्टांग दंडवत विनंति येथील क्षेम वैशाख वद्य १० पावेतो समस्त सुखरुप असो. विशेष वडिलांचे आशिर्वादें करून स्वारीहून सुखरुप वसईस आलो. वडीलास कळावें म्हणून लिहिले आहे व ऐथील वर्त-मान ते राजश्री केशवजी धाकजी याचे मुलीचे लग्न समयीं.........वोऊ (१) लागला

ते चिरंजीव राजश्री विटोबा नाईकाची बायको तिथें गेली होती ती तेथून उठविली म्हणालें कीं तुम्हांस माण नाहीं त्याजवरून राजेश्री गणेशजी राजश्री उधवाजी व याचा व केशवजीचा षामणा (सामना ?) बहुतच झाला. परंतु त्यास न मानता मुलीला उठवून घरास धाडीले तेव्हां प्रातःकाळी गणेशजी व राजश्री पोमजी याही येऊन आबाजवळ वर्तमान सांगितले त्याजवरून आबास विशाद फार जाहला आपले देयें (देहे) करून त्याचे पारिपत्य उत्तमप्रकारें जे या देहापासून होऊन आले ते केले त्या समस्तास काहींत कर (?) त्याहीं अन्यायें माफी मागून आपला मान जो पायधुणीचा खराच होता त्याप्रमाणें त्यांनीं समस्त मिळोन सभापत्र करून दिले आहे. त्याची नकल आपलेकडे पाठविली आहे. असल कोणाची हाती पाठविता कामा नये. ये वर्तमान जाले ते परस्परें विहीत होऊन येईल तें करणें विज्ञापना.

कांहीं ठिकाणीं महासभेनें मोकादम नेमलेले असत. त्यांना त्या ठिकाणचे प्रमुख म्हणून मानीत व हे मुकादम सभांचे कामांत भाग घेत व ठरावाची अंमलबजावणी झालेली पहात. महासभा व जनता ह्यांच्या मधला हा दुवा असे.

अहगरंतली महासभा जे अधिकारी नेमी त्यास खोत म्हणत असत.

"आंग्रेकालीन अष्टागर" मधील नोंद

इ. स. १७४६ नोव्हेंबर

चेऊलचे अधिकारी यांच्या नोंदीतली नोंद : १२१ [इ. स. १७४६ नोव्हेंबर] शके १६६८ क्षे नाम संवत्सरे सन सवा आबैन माहे मार्गसीर ऊर्फ जिलकाद माहे मजकुरी साष्टीस बालाजी व कृष्णाजी व चिरंजीव माहादेऊ गेलो ते समयी शेरे-समध (शरीर संबंध) भेटले. त्यांची नामें मौजे मालाड प्रांत देसक मोकाम ठाणें—

१ जीवनजी देसाई
१ नामजी देशाई
१ नेतोजी नामजी
१ चिरंजीव त्रिंबक नाईक
५
१ कृष्णाजी विठोजी अंजूरकर नाईक
मालाड
१ धर्मनजी
२ शामजी परो याचे पुत्र
१ विठल परो
१ धाकजी
२

१ नारायणजी नाईक अंजूरकर
सरपाटील प्रांत साष्टी ता.
आठगांव व प्रांत साईवन
१ जनाजी नारायण नाईकाचा पुत्र
२ परो
१ सुंदर परो १ भीव परोः— २
१ लक्ष्मणजी कळवेकर
१ सकरभट उपाध्याय
१ सकराजी वलद यादवजी हरन
शामजी चेऊलकर पाताणे
७

१ धाकजी वल्द जीवनजी देशाई

बंदर मुंबै

१ केशवजी गणेशजी

१ केरोजी जानजी

१ गोपालजी कामजी

१ उधवजी गोविंदजी

...... केशवजी

बंदर वसई

१ गणेशजी रघुजी

१ गोविंदजी

१ पांडवजी मदनजी

'पाताणे' शब्दानें काय बोध घ्यावा? पाताण्याबरोबर शेरे समध (शरीरसंबंध) आपल्यांत होत होता काय? नारायणजीचे उल्लेखावरून समजते कीं, १७४६ पर्यंत नारायणजी हयात होते. पुरो याचे नांव 'परो' उच्चारले जात होते. लक्ष्मण कळवेकराच्या उल्लेखानें समजते कीं, लक्ष्मण कळवेकर १७४६ पर्यंत जिवंत होते. कृष्णाजी केणाचा मुलगा हा संशय विठोजी मुळे निरसन होतो. नामजी देसाई १७४६ पर्यंत जिवंत होते.

ह्या नोंदीवरून दिसून येतें कीं अणजूरकर नाईकाचे शेरेसमध अष्टागाराबरोबर व चेऊलच्या मानकऱ्या बरोबर होत होते. नारायणजीचे पुढें त्याचा सर्व हुद्दा दिलेला आहे.

आख्यायिका, प्रघात, रूढी

अणूजरकरांतली गांधारी : मुरारजी नाईक वसईच्या घोर हल्यांत कामास आले. कष्टानें गंगाजी आदीनीं शोधून मुडदा पाहिला. गंगाजी व सर्व फार कष्टी झाले पण म्हणतात मुरारजीचे प्राण देहास सोडून गेले नव्हते. प्राण डोळ्यांत आले होते. गंगाजीनें ओळखले व किल्ल्याकडे बोट केलें. मुरारजीनें पेशव्यांचे निशाण पाहून डोळे मिटले. मुरारजीचे निधनाची वार्ता कल्याणास आली त्यावेळीं त्यांची साध्वी पत्नी येसूबाई हिने आपले डोळे बांधले. तीन वर्षे सूर्यदर्शन व दीपदर्शन घेतले नाहीं.

अणजूरकरांतल्या सती : अणजूरकर नाईक मूळचे राजपुतान्यांतले राणे होत हे सिद्ध झाले आहे. राजपुतान्यांतून ते सौराष्ट्रांत आले. तिकडे बरेच वर्षे राज्य केलें. वंश सोळोंखी. सौराष्ट्रला पराभव पाहून कनोजला गेले व तेथें राजपुत्राचा मित्र म्हणून सरदार होऊन राहिले. रजपुतांचे वैशिष्ट्य म्हणजे मरणाची बेफिकीरी होय. आपल्या स्त्रियांचा जोहार (अग्नी दिव्य) करून केसरी रंगाचा पोशाख करून आत्मसमर्पण करणें ही गोष्ट त्यांचे हातची होती. स्त्रिया या नेहमींच सती जात असत. हे रजपुतांचे दोन्हीं गुण अणजुरकर बायकांचे रक्तांत होते. पूर्वेतिहास पाहिला तर वसईच्या

संग्रामापर्यंत कोणत्याही प्रसंगीं आघाडीवर राहून त्यांनीं युद्धांत आत्मसमर्पण केले आहे. तसेंच उपलब्ध माहितीप्रमाणें आजपर्यंत अणजुरकरांच्या अनेक सुसाध्वी सती गेलेल्या आहेत. बिंबराजवटीत ज्या सती गेल्या त्याची हकीकत खालीं देत आहे. निकामलीकाने भायखळावर युद्धांत नागरशास मारले. त्यांत हरनाईक पडला त्यानंतर नागरशा राजाची राणी गोराईसे व हरनाईकाची पत्नी कमळाईसे ह्या दोघी मालाडास सती गेल्या. कृपाळदेशराणा चाच्यांचे वेळी वेसाव्यास लढतांना मेले. हे ह्या प्रसंगाचे अनुरोधाने दिसंत. गणपत देशनारगौडे बदलापुरांत युद्धांत मरण पावले. निवराजापासून आजपर्यंत चार सती गेल्या, बुवाजी नाईक ठाण्यांत राहात होते व त्याचे देहावसान ठाणें येथें झाले. कौपिनेश्वराचे देवळाचे आवारात एक चाळ उत्तर बाजूस होती. त्या ठिकाणी स्मशान होते. बुवाजींची पत्नी त्याठिकाणी सती गेली. देवळाचे आवारांत आता एक वृंदावन आहे. कोतवाल घराण्यांत एक २० वर्षांची मुलगी होती. कोतवाल हे नाईकांचे तीन दिवसाचे अशौची होत. पडावातून तिचा नवरा वसईस जात होता. पडाव वाटेत बुडाला त्यांत तो मृत्यु पावला. मृत्युची खबर अणजूरास येण्याचे अगोदरच त्या मुलीनें सतीची तयार करण्यांस सर्वांना सांगितले. कोणी ते मान्य करीत ना. ह्या वाटाघाटीत खरी खबर आली व ती मुलगी नवऱ्याच्या पादुकावर सती गेली. ते सतीचे ठिकाण भरोडीच्या रस्त्यावर आहे. त्या वृंदावनाच्या फटीत नागपंचमीस पाल, विंचू, सर्प असे दिसतात. मी पाहिले आहेत.

वाघरु : बोरल्याचा भाग म्हणून ७/८ एकर जमीन वरकस एकत्र आहे. ह्या ठिकाणी अपरंपार झाडे होती. इतकी कीं त्या जागेला अरण्याचे स्वरुप आले होते. घनिष्ट अशा त्या भागामध्ये दिवसा जाणेंही भीतिप्रद वाटे. त्यावेळी अलीमघरास जाण्याचा रस्ता बोरल्याचे तळ्यापाळीवरुन होता. समोरच्या परशिकच्या डोंगरातून वन्य जनावरें पुष्कळदा येत असत. अशाच प्रसंगापैकी एकावेळी परशराम नाईक तळ्यापाळीवर जात असतांना एका वाघरुची व त्यांची भेट झाली. त्यांनी न डगमगता त्याच्याशी सोट्यानें मुकाबला केल्यामुळे ते वाघरु पळून गेले.

हरबाजी नाईक : एकाकाळी हरबाजी नाईकांचा दरारा फार होता. कोणतीही स्त्री चोळीशिवाय माडी खालून जात नव्हती. त्यावेळीं स्त्रिया आपली पादत्राणें गावाबाहेर हातात घेत जात व माडीखालून कोणीही विडी ओढीत जात नसे.

इ. स. १७७४ नंतर किंवा त्या सुमारास इंग्रजांनी ठाणें येथें दरबार भरवला होता. असे दरबार त्यावेळी इंग्रजी अंमलदार मुद्दाम दरवर्षी भरवीत असत. अशा एका दरबारास अणजूरक ईनामदारास बोलाविले होते. ह्या दरबाराचे वेळी कलेक्टरचे बाजूस ईनामदाराची खुर्ची असे. ह्या एका समारंभास ईनामदारानीं आपला नोकर

पाठविला होता हे उघडकीस आल्यापासून इनामदारांची खुर्ची कलेक्टरचे पासून दूर गेली अशी ऐकीव हकीगत सांगण्यात येत.

सतीचे वृंदावन : कौपिनेश्वराचे आवारांतील देवस्थाने वगैरेंची पुनर्रचना ट्रस्टी करीत आहेत त्या प्रसंगानें बुबाजीचे पत्नीचे सती गेलेले ठिकाण बदलणें शक्य आहे. वृंदावन पुनः बांधणेंकरितां समस्त इनामदारांनी देवळाचे ट्रस्टीजवळ १५० रु. दिले व त्यांतून सतीचे वृंदावन कौपिनेश्वराचे मंदिराजवळ बांधले आहे.

तुकाराम बाप्पाजी : हे कर्तृत्ववान पुरुष होऊन गेले. सन १८८० मध्यें कलेक्टर मुलक यानें इनामदाराचे इनाम जप्त केले ती केस प्रिव्हीकौन्सीलपर्यंत नेण्याची कोशीस तुकाराम बाप्पाजी यांनीं केली सर्व इनामदाराना ह्यांचीच आशा होती. केस जिंकल्यानंतर जो मोठा समारंभ अणजूर येथें झाला. त्यावेळीं सर्व इनामदारांनी तुकाराम बाप्पाजी यांना कविताबद्ध मानपत्र छापून दिले. मी ते मानपत्र स्वतः पाहिले होते, वाचले होते. मदन दादाजी नाईक याचे दिवाणखान्यांत काचेंत घातलेले ते होते.

कांहीं किरकोळ

सतीचा टेप : अणजूरचे पूर्वेस सुमोरे १ मैलावर देवाळे तलाव आहे. त्या तलावाचे बाजूस एक उंचवटा आहे. त्याठिकाणी हे सतीचे वृंदावन आहे. म्हणून त्या उंचवट्यास सतीचा टेप म्हणतात. तसेंच त्याजवळून गेले कीं पुढें भरोडीपाडा लागतो. ह्याची कथा अशी आहे कीं, कोतवाल घराण्यांतील एक २० वर्षांची सुवासिनी त्या ठिकाणीं सती गेली आहे. तिचा नवरा पडावानें वसईस जात होता. मध्यंतरी वादळ होऊन संभूच्या गोंडांत पडाव बुडाला व त्यांत तो मरण पावला. गावात ही बातमी येण्यास बराच काळ लोटला पण त्या मुलीला साक्षात्कार झाला व कळले कीं तिचा नवरा बुडून मेला. तिनें आपल्या वडील कुटुंबियाना सांगितले कीं, मी सती जात आहे. माझा नवरा मेला आहे. व त्याच्या भेटीला मला त्वरित गेले पाहिजे. लोकांनी ही गोष्ट चेष्टेवर नेली. तिनें फार आग्रह धरला लोकांचा नाईलाज झाला. इकडे लोक तयारीस लागले तोच तो इसम मेल्याची बातमी आली. नवऱ्याच्या पादुका घेऊन ती मुलगी वरील ठिकाणी सती गेली. तिनें सती जातांना सांगितलें कीं कोणी भीति बाळगू नये व माझा मांडव तोडू नये. मी निश्चयानें व शांत चित्तानें सती जात आहे. ते हे वृंदावन सतीचा टेप होय.

ह्या वृन्दावनला भेगा गेल्या आहेत. त्यांत पाल, विंचू, व नाग सर्प नागपंचमीचे दिवशी असतात. हें खरे किं काय म्हणून एका नागपंचमीला तेथें गेलो असताना मला तीन जीव तेथें दिसले. लोक भक्तीभावानें नागपंचमीस तेथें जाऊन पूजा करीत असत.

अणजूर गांव कुठें होता : अणजूर १२००-१५०० वर्षां पूर्वीचा आहे. पण

तो गांव ह्या टेपावर होता असे म्हणावयास कांहीं कारणें आहेत. फिरंगी ज्यावेळीं इकडे आले तेव्हां त्यांनीं हल्ली आहे त्या ठिकाणीं वाडा बांधला व आजुबाजूस हा गांव वसला. अशी एक कथा आहे कीं अणजूर खाडी (खाऱ्या जमीनीची जागा) आहे ती पूर्वी नव्हती. भरतीचे पाणी अगदीं मूलगयपर्यंत येत असे. पुढें ईनामदार अणजूरास आल्यावर त्यांनीं ही जागा भरून काढली व अलीमघरापासून ते दिवेंपर्यंत ५००, ६०० एकर जमीन तयार केली. फिरंगी ह्याचा सर्व भर खाड्या व दर्या ह्यावर होता व त्याकरितां त्यांच्या राहण्याची जागा बंदर किनाऱ्याजवळ असत. ह्या प्रमाणें फिरंग्याना हा अणजूर वाडा व तटबंदी ही ह्या ठिकाणी बांधली कारण त्यावेळीं अणजूर हें बंदर असावें. सतीच्या टेपाचे दक्षिणेस देवाळे तळे आहे त्याच प्रमाणें ह्या टेपाजवळ जतबाव म्हणून एक खड्डा आहे अर्थात ती बाव गांवकऱ्यांची विहीर असावी. अणजूरचे अनुशासनांतलें चतुःसिमेचे वर्णन वाचले म्हणजे पूर्वीचे गाव सतीचे टेपावर होते असेच म्हणावे लागते. टेपावर खणले असताना कांहीं घरटाणे सारख्या जमीनी दिसून येतात.

शाळागृह : अणजूरास १८५० च्या आधीपासून शाळा चालू आहे. पूर्वीचे शाळागृह माडीसमोर होते. ती जागा भास्कर गंगाधर नाईक याची होती. ह्यावेळपर्यंत अणजूरचे लोकांचे स्थलांतर झालेले नव्हते. गांव फार मोठा भरण्याचा होता. सर्व आळ्यांत दाटीवाटीने बांधलेली घरें होती. अर्थात पांढरपेशाच्या मुलाना तरी वाचन, लेखन, हिशोब यावा ह्या उद्देशानें शाळा घातलेली होती. शाळा गावांतल्या लोकांनी बांधलेली होती. नंतर तिची व्यवस्था सरकारकडे देण्यांत आली. ह्यावेळीं स्कूल बोर्ड किंवा लोकल बोर्ड नव्हती. सर्व व्यवस्था मामलेदाराचे मार्फत चालत असे. गावांत भरणा फार असल्यामुळें मुलेंही भरपूर असत. शेतकरी बंधुना शिक्षणाची उमज झाली नव्हती व त्यामुळें आवड नव्हती. त्यामुळें शेतकरी बंधुची मुलें क्वचितच येत असत. ह्या मुळच्या पंतोजीच्या शाळेचे रूपांतर पुढे पुढे सरकारी शाळेत झाले. ह्या शाळेंत निळाजी मोरोबा नाईक, विष्णुपंत कीर्तने इत्यादि फार चांगले शिक्षक होते. त्यावेळीं हेडमास्तरला पगार ७ रुपये होता. ह्याच शाळेंत शिकून इनामदाराची मुलें ठाणें, मुंबई येथें इंग्रजीकरितां जात होतीं. नंतर साधारणतः १८७५ ते १८८० मध्यें हल्लीचे शाळागृह इनामदारानी बांधले. त्याच ठिकाणीं आजची शाळा आहे. रामचंद्र गोगटे, देव इत्यादि चांगले गुरुजी ह्या शाळेस मिळत गेल्यामुळें ही शाळा भरभराटीस येऊन स्कूल बोर्डाने ह्या शाळेस गटप्रमुख शाळा केली. ह्या गटांत ७ गावच्या शाळा आहेत. अणजूरची शाळा व्ह. फा. पर्यंत आहे. शाळेचा निकाल नेहमी समाधानकारक असतो. १९६० मध्यें विश्वनाथ विठ्ठल पाटील हा गटांत दुसरा आला. ह्या शाळेंत हल्ली महाजन हे हेडमास्तर आहेत व इंग्रजी मास्तर पाटील आहेत. मुलांना बसण्यास पुरेशी सोय नाहीं हें पाहून स्कूल बोर्डानें नवीन गृह बांधलेले ह्या गृहाचे दक्षिणेस आहे.

गजानन गोविंद नाईक हे लोकल बोर्डाचे प्रेसिडेन्ट स्कूल बोर्डाचे सभासद असतांना ही शाळा व्ह. फा. पर्यंत झाली. साठे मास्तरांनी ही शाळा ४ ची ७ वर्गांची केली.

शाळागृहें देवस्थानें-निरानराळ्या पाड्यातील

दिवे (खाडी) : अणजूर गांवची देवस्थानें, उत्पन्न, व्यय वगैरेचा वृत्तांत दिलेला आहे. आतां दिवे पाड्यावरची देवस्थानें देत आहे. दिवे गांवचे पूर्वेस गांवापासून दोन फर्लांगवर व गांवांत शिरण्याचे वाटेवर देवीचें देऊळ आहे.

पद्मनाभ महाराज : दुसरें एक देऊळ पद्मनाभ पंथाचे अनुयायांनी गांवचे पश्चिम भागांत बांधलेले आहे. ह्यात श्रीशंकर व लक्ष्मीनारायण, मारुती ह्या मूर्ती बसविल्या आहेत. देवळाचे आवारांत विहीर खणलेली आहे. व एक लहानशी चाळ पुजाऱ्याला रहाण्याकरितां व इतर नैमित्तिक कार्याकरितां बांधलेली आहे. ह्या देवळाचा ट्रस्ट आहे. पंथीयांनी ह्या देवाचे पूजेकरिता व इतर उत्सवाकरिता जमिनी दिल्या आहेत. त्याच्या उत्पन्नातून ह्या देवांचा खर्च चालतो. ट्रस्टी होणाराकरितां एक अट आहे ती म्हणजे प्रत्येक ट्रस्टीने मद्यमांसाचे सेवन करतां कामा नये व त्यानें देवळास कांहीं धर्मादाय दिला पाहिजे. ह्याच पंथीयानी वर्गणीनें व देणग्यांनी हे देऊळ १९३५ सालीं बांधलें आहे. महाशिवरात्रीच्या दिवशीं मोठा उत्सव करण्यांत येतो. पंथीयांची किर्तनें, प्रवचनें होतात. भजन, नाटकेंही होतील. यात्रा भरते व रात्रीं पालखी निघते. त्या दिवशीं सर्वांना अन्नाचा प्रसाद देण्यांत येतो.

अलिमघर : गावांचे पश्चिमेस देवीचे देऊळ आहे. त्यांत तिसाचे देवीची प्रतिमा वसविली आहे. गावकऱ्यांनी वर्गणीनें हें देऊळ बांधले. तीसाचे यात्रे नंतर षष्ठीला ह्या ठिकाणी यात्रा भरते. रात्री दिवाळकाठी निघते व नाटकही होत असते. दुसऱ्या दिवशी देवीला बोकड, कोंबडी बळी दिली जातात. गांवातले लोकांनी शाळागृह बांधले आहे. शाळा चालू आहे.

भरोडी : ह्या गांवास पूर्वेस एक व पश्चिमेस एक अशी दोन हनुमानाची देवळें आहेत. ह्या गांवात हनुमान जयंतीस यात्रा भरते. खेळ व भजनें होतात. पूर्वेच्या देवळाचा जीर्णोद्धार कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांनी केला व गांवकऱ्यानी पश्चिमेचे देवळाची दुरुस्ती केली. गावी शाळा आहे पण शाळागृह नाही.

भाग पांचवा

घरांतील कजिये

(१) मोरोबा नाईकांचे मदनाजी नाईक यास पत्र

श्री

राजश्री मदनाजी नाईक बीन सेमजी नाईक आणजोरकर यासी मोरोबा जनार्दन नाईक, अणजूरकर सरपाटील रामराम विनंति उपरी तुम्हास चाकरी संबंध वडीलानी मागा समागीतपैकीं तीन मुड्याचे ढेप गोडे दिल्हे आहे त्यात तुमचा कालक्षेप चालत नाहीं म्हणोन राजश्री नारोपंत बापट नी॥ आब हसबनीस यासी तुम्ही मधेस्तीस घालोन आम्हा जवळून दोन मुड्याचे ढेप गोडे नुतन मागितले त्याजवरून सदरहू दोन मुड्याचे ढेप तुम्हास आम्ही चाकरीमधे दिल्हे असे हे खावून आमची चाकरी जी पडेल ती करीत जाणें सरकार धारा आम्हाकडेस इनाम पट्टी ज्या साली पडेल ती तुम्ही द्यावी.

(२) येसूबाई मुरारजी यांचे मदनाजी नाईक यांस पत्र

श्री

'रा॥ मदनाजी नाईक यांसी येसूबाई मुक्काम अणजूर येथील कुशल तागायत श्रावण वैद्य ११ पावेतों क्षेमरुप असो विशेष तुम्ही पत्र पाठविले तें पावले

लिहीला मजकूर कलों आला. सर्व हलव्याच्या (वलव्याच्या १) गोष्टी लिहील्या याचा जाब तुम्हास न लिहावा परंतु आमचा बहुत वृद्धापकाल तेशांत हाली दुखणे लागले आहे शरीराचा भरवसा नाहीं याकरितां जाब लिहिला आहे. कारण कीं फिरंग्या राज्यात तुमचा तेव्हा फिरंगी बाटविल म्हणोन कैलासवासी शामजी नाईक याणी हरी घरत तीघे भाऊ व तुम्ही तिघे (शामजीला तीन मुलगे दिसतात) व तुमची मातोश्री यैशी लोनाडास आम्हा जवळ पाठविली तेंव्हां तुम्हास गुराचे वेड्यांत जागा देऊन आणी तुम्ही तिघे लहान रांडीचे पोरे तेशांत आपले कुळाची हा अर्थ चित्तांत आणोन तुमचा बहुत प्रकारें प्रतिपाल केला लहानाचे थोर केलेत आपले बरोबर आबरुनीं नेले आणिले आपले कासेस लागले आहेत ते नावारुपास आणिल्यावर मागेपुढें आपले आठवितील म्हणोन किले राजमाची येथें आपले हवाल्याचे असामीवर ठेविले सर्व साहित्य केले. गावीं दोघे बंधु होते त्यास येकास वसईस आसामी दिल्ही आणीक येक घरी होता त्याचेही संसाराची व पुढें आमची कीर्त वाखाणाल त्यास साष्टी गेल्यापासून नानाप्रकारची बालंटी रचोनच तेन साधने साधोन जेन्मवरी येत तुम्हास जे उपकार केले आहेत त्याची फले दाखविता उत्तम आहे परंतु सत्या असल्याचा झाडा विश्वराजवळ द्यावा लागेल ज्या गोष्टी आमचे उभयताचे मनीं व स्वप्नीं नव्हत्या आणीका नव्हती. त्या गोष्टीचे तुम्ही हाली बालंटे रचोन वादास प्रवर्तले आहा परंतु परिणाम सुद्धा पाहोन वर तावे वरकड जेथं स्वामीत्व आहे तेथें ईश्वरी औंश जाणावा तेथेंच खऱ्या खोट्याची निवडी होते हे पूर्ते समजावे वरकड जनार्दन नाईक यासी आपला लेक म्हणोन आम्ही उभयतांनी काया वाचा मनांपासून करार केला आहे हे मागापासून सर्वांस ठाऊक आहे आणि कैलासवासी गंगाजी नाईक यानी सरकारची वतने पत्रे घेतली त्यातही नाव लिहिले असेल असा जनार्दन नाईक यासी आपण सत्य सुत्कृत मागापासून लेक घेतला आहे हें खरे आहे तुम्ही उदंड बालट रचोन साधने साधील्याने परिणाम नाही हे आपले शरीराचा अंतसमय म्हणून लिहीले आहे त्यास अद्यापि तरी दूरवर दृष्ट होऊन सौसाराचे सुद्धीत येऊन वर्तणे म्हणजे बरे आहे असेही असोन स्वभाविक क्रमासच प्रवर्तोन लटके खोटे करून आमचे पाठीस लागता तरी तुमचे कदापी जन्मेजन्मातरी बरे होणार नाही आणि आमचे खरे आहे त्या गोष्टीस भंग होणार नाही हे पुरती मनाची निशा असो देणे या उपरी पाप पुण्याचे भेये धरून वर्तणे हे बहुत काय लिहिणे ही विनंति '

मदनाजी नाईकानीं उत्पन्न केलेल्या प्रश्नास येसूबाईने दिलेले उत्तर वर दिले आहे. मदनाजीचा आक्षेप मुरारजीचे दत्तक विधानाबद्दल आहे हें आपणास दिसून येते. आता त्या प्रकरणांतली सिवजी नाईक याची जबानी देत आहे शेवटी मदनाजीला पेशव्याचे सर सुभेदार यानी फिरोन आक्षेप न घेण्याबद्दल ताकीद दिली. त्याचे पत्रही देत आहे.

(३) सिवजीची जबानी

श्री

जबानी सिवजी नाईक अणजूरकर हकीकत लिहून दिल्ही येसीजे फीरंगाणची मसलत केली तें समयीं श्रीमंताच्या सनदा घेतल्या मसलतीमुळें साष्टी प्रांताची फक्ते जाहाली वसई तीन वर्षें भांडली तेथें मुरारजी नाईक कामास आले त्याजवर नव्या सनदा घ्यावयास पुण्यास गेले ते समई राजश्री शंकराजीपंत यासी पेशजी गुमास्तेगिरी समधें सावी तक्षीमा देऊ केली होती तेव्हां आपण पाच भाऊ वर्तमान होतो हल्ली मुरारजी नाईक वारले तेव्हां चवघे राहिलो तेव्हां पांचवे तक्षीमेस शंकराजीपंत जडतात याच उपाय केला पाहिजे. दिवान्यांत चाल्याची आहे याचेस कोन्ही बोलेल तो आमचे कोन्ही होणार नाहीं उभयता धणी होते ते कैलासवासी जाहाले आतां आपले कोन्ही ऐकणार नाही तेव्हा मुरारजी नाईकाचे तक्षीमेस नारायणजी नाईक याचे लोकास नांव लिहिले जनार्दन नाईक बीन मुरारजी नाईक असे गुमास्त्याचे तेक्षीमेकरिता लिहिले परंतु मुरारजी नाईक याणी कांहीं जनार्दन नाईक यास मांडीवर घेतले नाही आणि दत्तविधान केले नाही व गोतासही दाखला नाहीं दिवाण दरबारी सभे देऊन राजू केला नाहीं. नारायणजी नाईक वर्तमाम असता मुरारजी नाईकाचा श्राद्धपक्ष कांहीं जनार्दन नाईक याणी घातले नाहीं. मुरारजी नाईक वारल्यावर त्याची बायको येसूबाईनी तीन वर्षे शोक केला सूर्यदर्शन व दीपदर्शन घेतले नाही आणि चौघे बंधु वर्तमान असता येसूबाईने कधी बोलले नाहीं की जनार्दन नाईक माझा लेक हाली बोलते तरी लेक कसा होईल ही सदरहू हकीकत भिकाजी नाईक व बाकुबाई याचे गुजारतीन लेहून दिल्ही आणि ह्यास उभयतास पुसीले तरी याणी सांघीतले की नाईकानी लिहिले याप्रमाणें आम्हास ठाऊक आहे. मिती माघ वद्य १३ शके १६९८ (सन १७७६) दुर्मुख नाम सवत्सरे येणेप्रमाणें हकीकत '.

(४) मदनाजीस सुभेदारांचे पत्र

छ नमस्कार

' नीय कुशल लिहित गेले पाहिजे ......

कलंकी मदनाजी नाईक यानी वतनास भाऊपणाविशि ला .... याचा मजकूर मदनाजी नाईक राजमाचीस हवालदार ठेविले ते समई ...... विली त्यास मुरारजी नाईक याणी जनार्दन नाईक लेक घेऊन सरकारच्या वतनपत्रांत लागोन वतन-पत्रें आपले वडिलानी .... कतानसी वतनपत्र करून दिल्हे त्यांत च्यार ४ भाऊ व जनार्दन मुरारजी नाईक ऐसे लिहिले असता गुदस्ता सिवजी नाईक याजपासाने लहून घेतले कीं मुरारजीनें लेक जनार्दन घेतला हे खरें नाही. ऐसे साधन मदनजीनें लेहून

घेतले ते समई सिवजी नाईक दुखव्याने बहुतच जेर होते त्यास दोही वतनपत्रांत जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक येसे लिहीली असता सिवजी नाईक याणी ठाऊक नाहीं येसे लिहून दिल्हे ते समई दुखण्यानी हैराण फार होत येशा स्थितींत सिवजी याणे लेहून दिले नाही याचा दाखला धरून वतनास .... नाईक यास कलह करावयास संमध नाही येसे असता कलह करितो म्हणोन त्यावरून हें पत्र तुम्हास लिहिले आहे तरी या हवाल्या संघ गुत्यावर व सिवजी नाईक याजजवळून दुखण्यात लेहून घेतले त्यास लेक होता येसे नाही ये विशी त्याजला ताकीद करून वाक. .... या होवोन फिरोन विचार नये ते करावे ५१९ जिल्हेज बहुत काय लिहिणे.

(५) नारायणराव प्रधान यांचे मदनाजीस ताकीद पत्र

.... स्वामी .... व राव नारायण प्रधान नम .... येथील कुशल जाणोन स्व की .... विशेष .... जर याणी .... मदनाजी वाणी वतनास भाऊपणा .... लई आरंभिला त्यास मदनाजी नाईक .... ये हवाल्यावरी ठेविले ते समई .... विली मुरारजी नाईक याणी जनार्दन नाईक .... (पुत्र) घेऊन पूर्वीच सरकारचे वतन पत्र .... लान वतनपत्रें आमचे वडिलांनीं करून घेतली .... आहे असे असता गुदस्ता शिवजी नाईका-पासून लिहून घेतले कीं, मुरारजीनें लेक जनार्दन घेतला आहे हें आम्हास ठाऊक नाहीं साधन मदनजीने लेहून घेतले ते समई सिवजी नाईक दुखण्यानें बहुत जेर होते असे असोन मदनाजी नाईक वतनासी कजिया करिते येविशीं तरतूद जाहाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हें पत्र लिह .... तरी वतनपत्रांत जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक ऐसे लिहिले असता सिवजी नाईक याने ठाऊक नाही म्हणोन लिहून दिल्हे होते. .... समई दु .... र होते येथास्थित लिहून दिले नाही सबब त्याचा दाखला धरून वतनासी मदनाजी नाईक कलह करावयास संबंध नाहीं. येविशी ताकीद करून जनार्दन नाईक यासी व .... या करून देणे येविशी फिरोन तुम्ही .... ते करणे जाणीजे छ २ सफर सु॥ सलासिन मया अलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.

(६) गंगाधरपंत ह्यास गोविंद कालेकराचे पत्र

चिरंजीव राजश्री गंगाधरपंत यास गोविंदराम कारलेकर आशीर्वाद उपरी येथील कुशल आ चईत्र शुद्ध १३ पावेतो सुखरूप असो विशेष मदनाजी नाईक आणजोरकर याचा व अणजूरकराचा वाटणीचा **कजिया** लागला आहे त्याजविशी श्रीमंत सर सुभेदार याचे पत्र आणिले होत की सिवजी नाईक यास साक्षी .... नर याणे त्याजवरून साक्षी पु. हो. नाईकांनीं पत्र लेहून धरीले (दिले ?) आहे.

येसुबाईचे पत्रावरून दिसते कीं व त्याला पाठपुरावा दुसरी पत्रें देसान की मदनाजी नाईक हा श्रीवर्धनला व राजमाचीला गंगाजीनें हवालदार म्हणून नोकर ठेविला होता आरंभीचे मदनाजीचे पत्र सांगते कीं मदनाजी नाईक हा नाईकांचा नोकर होता त्यांच्या संसारास पुरेसा आधार नाही म्हणून मोरोबा नाईकांनीं त्याला दुसर दोन मुड्याचीं शेते देऊन एकूण सहा मुड्याची त्याची शेती केली त्याने हा उपद्व्याप करणे म्हणजे कृतघ्नपणा आहे. हे दोन मुडे जास्त मिळविण्यास त्याला मोरोबा नाईकाकडे जावें लागले हें पुढचें पत्र सांगते हे आमचे 'घरांतील कजीये' पेशव्याकडे जाऊन आले आहेत.

मोरोबाची आजारपणा

विज्ञापना मदनाजी नाईकास घेऊन अणजूरास गेलो होतो आज्ञेप्रमाणें काम करावें त्यास मोरोबा नाईक यासी समाधान फार नाहीं तेव्हां सर्वांनी निश्चय केला की आज रोज .... त्या होतील आम्ही .... चवास येऊन गुंता दुर करितो ह्याप्रमाणें निश्चयात्मक बोलणे होऊन मदनाजी नाईक यांचे सेतास ग्वाही दिली होती ते कलावयास रजा दिली. आज रोजी मदनाजी नाईकास पुण्यास जाऊ देऊ नये हे विज्ञापना.

शामजीना ६ मुड्याचे शेते

धारा माफ अशीं ६ मुड्यांची शेते गंगाजी आदी भावानी शामजीला दिली होती त्याशिवाय शामजीला इनाम हक्कातले ७६ रुपये नगद ही दिले होते अशा स्थितींत मदनाजी नाईकानीं आपल्याच भाऊबंदावर उठावे ही विचित्र कालगती दिसते पण तसे झाले हे सत्य. जरी जनार्दन हा मुरारजीचा मुलगा न ठरता तर तो हिस्सा चौघा भावाना मिळाला असता. तो हिस्सा हसबनीसाला किंवा मदनाजीला मिळाला नसता अर्थात 'ते कोन जानीमेह' ह्याप्रमाणे मदनाजी याचे वर्णन झाले.

हा कजीया इष्टेटीच्या वाटणीबद्दल मदनाजी नाईकाने उत्पन्न केला होता पण आता एक पत्र देतो त्यावरून दिसून येईल की युद्धविरामानंतर सर्वत्र भांडणे व यादवी चालली होती हे पत्र आबाजी खंडेरावास विठोजी नाईक यानीं पाठविले आहे.

(७) आबाजी खंडेरावास विठोजीचे पत्र

श्री

"राजश्री आबाजी खंडेराव मुक्काम पुणें गोसावी यांसी

छ अखंडीत लक्षी अलंकृत राजमान्ये श्री विठोजी नाईक अणजूरकर सरपाटील राम राम विनंति विशेष तुम्हास जाते वेळेस सांगावयाचे ते सांगितलेच आहे त्याप्रमाणें


तुम्ही करालच यानंतरी चिरंजीव मोरोबाची म॥ बालाजी केशव यास लिहिला आहे हे पत्र चि. राजश्री बालाजी नाईक यास दाखवून तुमचे विचारे पत्र यास द्यावे आणी बाळाजी नाईकांचे वडिलाचे विचारे ठरल्यास करावे की बालाजी बाबास सांगून युक्तीने याजपासुन श्रीमंत राजश्री आणास समजाऊन माहालकरी यास पत्र द्यावे कीं सरपाटील यांचा आमचा घरोबा नाही विठोबा नाईक वडील त्यांचे आज्ञेत भाऊबंद वर्तन नाहीं लहानधाकल तुम्हाजवळ सांगतात तें ऐकूं नये. कोणी आल्यास त्यास सांगावे कीं तुमचे वडील घरी आहेत त्यास सांगावे असे पत्र तुमचे उभयतांचे विचारास आले तरी बाळाजी बाबा याचे हाथून युक्तीने पो असे पत्र आले तरी याचा चालवेल मोड नाही तरी हे फारच **चढून** गेले आहेत कळावे बहुत काय लिहिणे असो लोभ करावा ही विनंति.

रणसंग्राम सरला राज्य सोडविले गेले वतने मिळाली व स्वस्थता मिळाली व त्याचा दुष्परिणाम हा झाला कीं मदनाजी नाईक क्रिया विसरून गेला व त्याने भाऊबंदकी सुरु केली. त्याने बिछान्यावर पडलेल्या पाचा भावाचे शेवटी राहिलेल्या निंव नाईकाच्या छाव्यास फसवून (शिवजीस) त्याच्याकडून दत्तकविधानासंबंधाने खोटेच पत्र घेऊन ते पेशव्याचेकडे पाठविले पण येसुबाईने सांगितल्याप्रमाणे सत्य ते सत्य ठरले. मनुष्य स्वार्थाने अंध झाला म्हणजे किती विवेकशून्य होतो व तो कसा आपल्या अन्नदात्यावर उलटतो हे ह्या मदनाजीचे वर्तनावरून प्रत्ययास येते तीच यादवी थोड्याशा निराळ्या स्वरूपांत चालत राहिली हे विठोबाचे वरील पत्र दाखविते. यादवी निरनिराळ्या स्वरूपांत चालूच होती त्याचे दुष्परिणाम व्हावयाचे ते होतच होते.

ही यादवी वंशपरंपरेने चालू : परमेश्वराने ' आपआपसांतली यादवी ' हा मनुष्य मात्रास दिलेला क्रूर शाप आहे. महाराष्ट्रांत तर ह्या यादवीनें अनेकदां भीषण प्रसंग प्राप्त केले आहेत. महाराष्ट्राचे हजारबाराशे वर्षांचा इतिहास हेंच सिद्ध करीत आहे मोठ्या शर्थीने मिळविलेले स्वराज्य व साम्राज्य अगदीं आता आता पूर्ण लयास ह्याच यादवीमुळें गेले प्रथमचे आरंभीचे मित्र तेच कालांतरानें कट्टर शत्रू झालेले दिसतात. गंगाजी नाईकाआदि पाच भावानीं एकीची शर्थ करून राजकारण केले, संघटना उत्पन्न केली, टिकविली व त्या संघटणेंतून साष्टी वसई प्रांतात पेशव्याचे हस्तें विलोभनीय असे स्वराज्य निर्माण केले पण अगदी जवळच्या कालांत ह्या पांचवीरांचे मरणोत्तर त्याच्या वंशजांत यादवी उत्पन्न झाली. एकोबा भंगला. लहानसहान गोष्टीतून उत्पात निर्माण होऊ लागले ह्या अशा प्रसंगीं मुरारजी नाईकाचे पत्नीने केलेला उपदेश मागें दिला आहे त्यावरून यादवीचे स्वरूप व ती विझविण्याचे प्रयत्न यांची ओळख वाचकाना होई. प्रथम प्रथम ही गाऱ्हाणी पेशवपर्यंत जात व तिथें मिटली जात. एका पुजाऱ्याबद्दलचे

प्रकरण असेंच रंगले होते. पेशव्याची राजसत्ता उलथून पडल्यावर मग ही यादवी मिटविण्याचा मार्ग नाहीसा झाल्यामुळें ती आंत धुमसे व त्याचे रूपांतर आपआपसांत वर्दळीवर येणे आपआपसांत गटागटानें मारामाऱ्या करणें, शेतकऱ्याच्या मदतीनें भांडणे तंटे करून चालविणे वगैरे गोष्टीत झाले. ही भांडणे इतक्या विकट स्वरूपास गेली कीं, ह्या इनामदारात अनेक गट झाले व तितके तट पडले त्यांचे प्रतिबिंब गावातल्या जनतेवर पडले ह्यामुळे गांवाचे हिताचे व फायद्याची कामे होणे दुष्कर झाले व जीवन अगदी कष्टमय झाले हें होता होता १९०५ साल उजाडले. ह्या भांडणांमुळें लहान मुलांचेही तसेच तट पडले होते. अशा अगदी विस्कळीत प्रसंगांत त्यावेळच्या तरूण मंडळींनीं ह्यावर तोड म्हणून त्यांची संघटना उत्पन्न केली व श्री गणेश मंडळ नावाची संस्था १९०६ साली प्रादुर्भूत करून १९०८ साली तिचे नामकरणे केले.

नाईकांचे मृत्यूचे सन : वर उल्लेखलेली शिवजी नाईकाची जबानी शके १६९८ मधली आहे व येसूबाईचे पत्रही त्याच सालांतले आहे. शके १६९८ म्हणजे सन १७७६ होय. अर्थात येसूबाई व शिवजी नाईक हे दोघेही १७७६ पर्यंत जिवंत होते. बुबाजी नाईक १७४६ च्या सुमारास वारले असें आपण शिवजीच्या पत्राधारे ठरविले आहे. १७४६ च्या नंतर गंगाजीचे काशीस गेले असेहीं मानावे लागते कारण १७७६ च्या सभापत्रांत शिवाजी नाईक, गंगाजी नाईक, नारायणजी नाईक यांचाच उल्लेख आहे त्यानंतरचा उल्लेख दिसत नाहीं. पुढील एका सभापत्रांत गंगाजीचा उल्लेख नाहीं ते पत्र नारायणजी नाईकास उद्देशून लिहिलेले आहे. पत्रव्यवहारांत नारायणजीची तीन पत्रे आहेत त्यावरून ते १७४६ पर्यंत नक्कीच होते त्यानंतर केव्हां ते मरण पावले हे उलगडत नाहीं.




श्री गणेश मंडळ, अणजूर १९०८



कै. निळाजी मोरोबा नाईक




सतीचे वृंदावन, कौपनेश्वर मंदीराचे आवार, ठाणें



इनामदारांची पुरातन माडी व दोन खांब, अणजूर





भाग सहावा

यादवीवर तोडगा

श्रीगणेश मंडळाची स्थापना : आपआपसांतली दुही व भाऊबंदकी अगदी कळसास पोहोचली होती. त्यामुळें गावांतले इतरेजण त्या भांडणाचा फायदा घेण्यास टपलेले असत. बहुतेक इनाम हिस्से विकले गेले होते. मोठ्या प्रमाणांत हे इनामदार बाहेर ठिकाणीं–ठाणें, कल्याण, मुंबई–राहण्यास जात होते. एकेका घराचा घराणा होत होता. ठाकूर, कोतवाल, वरचे आळीतले नाईक गांव सोडून इतरत्र राहण्यास गेले होते. वाढत्या लोकसंख्येचा एक प्रश्न उभा होताच अणजूरास वाढत्या संख्येला उपजीविकेचीं साधनें नव्हती. त्यामुळें लोकांना स्थलांतराविना गतीच नव्हती. पण तोपर्यंत अणजूरचे आकर्षण अगदीं नाहीसें झाले नव्हते. बहुतेक घराण्यांतली मंडळी अणजूरास येत असत. मुळींच येत नसत अशी अगदीं थोडी कुटुंबे होती. त्यामुळें रविवारी गांव भरगच्च भरलेला असे. श्रीगणेशचतुर्थी, श्रीरामनवमी, श्रीकृष्णाष्टमी, श्रीहनुमान जयंती, दिवाळी इत्यादिप्रसंगीं बाहेर गेलेली मंडळी आठवणीनें अणजूरास येत असत.

ही दुही फार झालेली होती तरी तरुणांची मनें काहीं उपाय शोधीत होतीच वडीलांचे, वडील भावांचे, चुलत्यांचे आपापसांत वैर चालत होते तरी त्यावेळीं इनामदार

तरुण मुलांनीं तो दुहीचा वारसा पत्करण्याचे नाकारले, त्यानीं एकी स्थापन करण्याचें ठरविले त्याकरितां खल करून त्या तरुणानीं एक मंडळ स्थापण्याचे ठरविले. १९०५–१९०६ पासून ह्या नवीन विचारांचा प्रादुर्भाव त्या तरुणांत झाला. त्यानीं १९०८ मध्यें रीतसर श्रीगणेश मंडळ स्थापन केले. त्या मंडळाचा पहिला नियम कीं, कोणत्याही सभासदानें मद्यास शिवता कामा नये. दुसरा नियम प्रत्येकानें दर रविवारीं अणजूरास जमावयाचे. तिसरा नियम म्हणजे देवस्थानांचे उत्सव कोणाकडे कां असेतना सर्वांनीं त्या त्या उत्सवाप्रसंगीं हजर राहवयाचे. गावांत भजन मंडळ सुरु केलें. रात्रीची शाळा सुरु केली व गावच्या उत्सवाव्यतिरिक्त शिवजयन्ति, श्रीदासनवमी हे उत्सव सुरु केले. श्रीगणरायाचे चतुर्थीला सर्वांनीं आलेच पाहिजे हा दंडक सुरू केला. इनामदार गांवच्या हक्कावद्दल अगदी बेफीकीर झाले होते. त्या हक्काचा तपास करून सार्वजनिक इस्टेटी सोडवावयाचेही ठरले होते. सर्व देवस्थानाचा एक ट्रस्ट करण्याचेही ठरविले गेले. पण कांहीं गोष्टी वडील घाऱ्यांच्या सहकार्यावर अवलंबून असल्यामुळें ह्या मंडळास त्या करित आल्या नाहींत.

महत्वाची गोष्ट म्हणजे मंडळाच्या सभासदानीं एकत्र येऊन सर्वत्र आजूबाजूस मंडळाच्या सहली करण्यास सुरवात केली. तरुणांत एकी झाली. पण पूर्वग्रहदूषीत वडीलधारी माणसें ह्या मंडळाबरोबर सहकार्य करण्यास तयार झाली नाहींत.

श्री. शिवजयन्ति उत्सव, श्रीरामदासनवमी हे दोन उत्सव नेमानें होऊ लागले. श्रीरामनवमीच्या यात्रेचे व पालकीचे वेळीं सर्वजण जमू लागले. त्यामुळें गावांत दबदबा वाढूं लागला. एका साली खारीचे लोकांनीं पालखीला विघ्न करण्याचे ठरविले पण श्रीगणेश मंडळाचे सभासदानीं मोठ्या शर्थीनें तो प्रसंग बचावला. त्यावेळीं वडील माणसानीं त्या तरुणांना शाबासकी दिली.

१९१० साली गणेश मंडळाचे कांहीं सभासदांनीं 'माथेखारी' प्रकरण हाताद घेतले व निळाजी मोरोबाचे नांवानें मोतीलाल हरगोविंददास याजवर फिर्याद केली. शेवटी माथेखारी जिंकली. आज त्या माथेखारीचे उत्पन्न सर्वांना मिळते.

कल्याणची जमीन व ठाण्याची जमीन ही दोन प्रकरणें हातात घेतली परंतु त्यापैकीं कल्याणचे जागेचे प्रकरणाचे कागद न मिळाल्यामुळें आज ती सर्व जमीन म्यु. पालिटी कल्याण व खाजगी लोकांनीं फुकट आत्मसात केली. व ठाण्याची जमीनही म्यु. पालिटीनें घेतली.

पेन्शन ॲक्टाप्रमाणें रेतीमातीचा दावा हायकोर्टानें काढून टाकला होता व पुन्हा इनामदारानीं फिर्याद दिली नव्हती. परंतु मागे म्हटल्याप्रमाणें १९२० सालीं एक

निराळीच संधी आली होती. जमनादास मेहता हे त्यावेळी कॅबिनेट मध्यें मंत्री होत. पण दुर्दैवाची गोष्ट ही की, कोणीही मला सहाय्य दिले नाही व कागदपत्र, सनदा वगैरेही दिल्या नाहींत.

पुण्याचे हसबनीसांनीं गुमास्ता न देतां सहावा हिस्सा बळकावला होता. पहिल्या दाव्याचे पैसे त्याने इनामाचे पैसे परस्परे भिवंडी कचेरींतून होते त्यांतून जप्त करून वसूल केले पण पुनः पुढच्या पैशाकरिता त्यानी दावा दिला असताना तो फैलावर आल्यावेळी वडीलधाऱ्या इनामदारानी गणेश मंडळास पुढें जाऊ दिले नाही व स्वतःही काहीं केले नाहीं व एक्स पार्टी निकाल होऊन हसबनीस इनामदाराचा सहावा हिस्सेदार शेवटपर्यंत राहिला.

घराण्याचे नांव पुढें आलेच पाहिजे हा श्रीगणेश मंडळाच्या सभासदाचा निश्चय झाला होता. त्याप्रमाणें घराण्याची वंशावळ गणेश मंडळाने छापली. त्यांत तीन चुका राहून गेल्या त्या चुका दुरुस्त केलेली वंशावळ ह्या इतिहासात छापलेली आहे. ही वंशावळ कै. कमळाकर जगन्नाथ नाईक गणेश मंडळाचे सभासद ह्यांनी प्रकाशित केली होती.

माझा एक निबंध १९१५ मध्यें मी प्रकाशित केला आहे. त्यांत ' अणजूरकर घराण्याचा साद्यंत इतिहास लवकरच तयार होत आहे अशी जाहीरात दिलेली आहे. हेही एक कार्य श्रीगणेश मंडळाने अंगीकारले होते ते कार्य आज ४७ वर्षानंतर मी पुरें करीत आहे.

गंगाजी नाईकांचे चरित्र श्रीगणेश मंडळाचे विद्यमाने १९३९ साली छापून चिंतामण मुकुंद नाईक यानीं प्रकाशित केले आहे.

मुरारजीची पहिली पुण्यतिथी : अणजूर येथें इ. स. १९२५ साली मुरारजी नाईक याची पुण्यतिथी श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे याचे अध्यक्षतेखालीं केली. त्यावेळीं मधल्या चौकास ' मुरारजी चौक ' असे नामाविधान दिले आहे.

राष्ट्रदेवो भव

विनंती पत्रक

सोळा शतें दशक सा वरी एक आहे ।

सिद्धार्थ वत्सर तया प्रती नाम पाहे ॥

वैशाख वद्य द्वितीयेसह भानुवारीं ।
शाहू निशाण चढलें वसई दुपारीं ॥१॥
(१६६१ वैशाख वद्य २)

१७३९ चें साल ' कोंकण 'च्या इतिहासांत फार महत्वाचे ठरलेले आहे, ह्या सालाच्या इतिहासांत पुष्कळ घराणीं महत्वास चढलीं आहेत. त्यापैकींच ' अणजूर ' तालुके भिवंडी येथील नाईक यांचे घराणें एक होय. ह्या घराण्यांतील संख्या पांच भावांनीं वसईच्या मोहिमेंत फार मोठा महत्वाचा भाग घेतला होता. पेशव्यांना ह्या प्रांतांत आणण्यास पाठारे क्षत्रीय नाईक यांचे घराणें हेंच मुख्यतां कारणीभूत झालेले आहे. त्या नाईक घराण्यांतील पांच भावांपैकीं चवघे भाऊ मुरारजी नाईक हे वसई मुक्कामीं किल्ल्यांत धारातीर्थी पडले. त्यांची पुण्यतिथी वैशाख वद्य २ ह्या तिथींस येते. त्या दिवशीं अणजूर येथें रविवार ता. १० मे १९२५ रोजीं सार्वजनिक रीतीनें ती तिथी साजरी करण्याचे ठरविलें आहे. ह्या समारंभास रा. रा. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बी. ए. ह्यांनीं अध्यक्षस्थान स्विकारण्याचें कबूल केले आहे, तरी त्यावेळीं आपण हजर राहून समारंभ पार पाडण्यास मदत करावी अशी विनंती आहे, कळावें, लो. अ. हे विनंती.

आपले नम्र,

ता. ७-५-२५
मुक्काम अणजूर,
ता. भिवंडी.

रामकृष्ण यशवंत नाईक
मोरेश्वर रामचंद्र नाईक
मोरेश्वर दाजीबा नाईक
गजानन गोविंद नाईक
(उत्सव कमिटी)

मकरन्द छापखाना, दादर.

मुरारजी नाईकांची पुण्यतिथी

वसईच्या मोहिमेंतील ' पांच नाईक बंधु ' पैकीं वसईच्या किल्ल्यांत धारातीर्थी पतन पावलेल्या मुरारजी नाईकांची पुण्यतिथि रविवार १० मे १९२५ रोजीं श्री. भगवंतराव जनार्दन म्हात्रे, बी. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं अणजूर येथें मोठ्या थाटानें ' श्रीगणेश मंडळ, अणजूर ' ह्या संस्थेनें केली. ह्यावेळीं ठिकठिकाणचे ज्ञातिबंधु, बरेच

अणजूरकर नाईक बंधु हजर होते. त्यासमर्थीं सुमारें १०० शेतकरी बंधुही आले होते. मोठा उत्साह सर्वत्र भरलेला होता. श्री. ग. गो. नाईक यानीं पाचा भावांचे शौर्य, राजकारण, निष्ठा, त्याग, कर्तबगारी व धर्मदेशप्रेम इत्यादि सद्‌गुणांचे मोठे सरस वर्णन केले. त्याचे भरतीस श्री. शांताराम जनार्दन पाठारे यांनी ' अशा प्रकारच्या समारंभाचें महत्व व आवश्यकता ' ह्या विषयावर सुंदर व उपयुक्त भाषण केले. श्री. भगवंतराव ह्यानीं तर मोठ्या बहारीने त्या विषयाचे विवरण करून श्रोत्यांचे पुढें संग्रामच उभा केला.

सन १९२६ सालीं हीच पाचा भावांची पुण्यतिथी श्री. अणजूर गणेश मंडळाने मोठ्या थाटानें अणजूर येथेंच साजरी केली.

ह्या उत्सवाची राष्ट्रीय बाजू ओळखून ही पुण्यतिथी राष्ट्रीय उत्सव म्हणून सर्व महाराष्ट्राने साजरी करावी असें आपले मत कै. दे. नारायणराव सावरकर ह्यानीं प्रदर्शित केले. लोकमान्य पत्राचे त्यावेळेचे संपादक हरी महादेव घाणेकर यांनी ह्या पुण्यतिथीचा आपल्या पत्रांतून पाठपुरावा करण्याचे निश्चित करून त्याप्रमाणें पत्रांतून प्रचारही चालू केला. ह्यावेळीं सन १९३५ उजाडले. हा वसई विजयदिनोत्सव सन १९३५ पासून वसईस सुरु करून त्यांची सांगता द्विशतसांवत्सरीक समारंभांत १९३९ सालीं करण्याची मोहीम जनतेने आदरिली व निष्ठावंत पुढारी त्या कार्यास लागले. इ. स. १९३५ सालीं त्या महोत्सवाचा भाग म्हणून ही मुरारजी वगैरे पाच भावांची पुण्यतिथी वसई येथे सुतार आळीत कै. सदाशिवराव केळकर ह्यांचे अध्यक्षतेखालीं साजरी केली गेली.

ही पुण्यतिथी म्हणजे वसई विजयदिनाची प्रतिकृती आहे. ह्या उत्सवाचे महत्व आंतरराष्ट्रीय व जागतीक मोलाचें आहे असे सन १९६४ च्या उत्सवाचे वेळीं व्याख्याते पंडित टीकेकर म्हणाले. हा उत्सव म्हणजे पौर्वात्यानी आपल्या तुटपुंज्या शस्त्रानिशी त्यावेळच्या महान बलाढ्य व उत्तम शस्त्रे असलेल्या पोर्तुगालचा पराभव केला आहे. हा महाराष्ट्राचा मोठा अभिमान आहे.

कैलासवासी वीररत्न मुरारजी नाईक यांचा पोवाडा

लेखक : देवजी जनार्दन राऊत १९२६

पोर्तुगीजानी दुर्गम करुनी वसईचा किल्ला ।
सत्र मांडिले बाटविण्याचे हिंदू जनतेला ॥ १ ॥

सैतानाचे वारे शिरले त्यांच्या अंगांत ।
चोहिकडे मांडिला तयांनीं प्रबळ घातपात ॥ २ ॥

जुलुम जबरदस्तीचा झाला हरहर सीमांत ।
धूमधडाका अन्यायाचा चाले निःभ्रांत ॥ ३ ॥

मूर्तीभंजन करावयाला पुनीत पौराण ।
हिंदु भावना गारद करण्या टपले सैतान ॥ ४ ॥

प्रतिदिवसाला किर्तक करती बाटवुनी भ्रष्ट ।
धर्मावरती हाय ! गुजरले दुर्धर संकष्ट ॥ ५ ॥

अनाथ अबला धरुनी करुनी बाटवुनी भ्रष्ट ।
खचित नेती दिवसाढवळ्या अपुल्या गोटांत ॥ ६ ॥

पतिव्रतांच्या पातिव्रत्यावरी घोर घाला ।
येऊनि पडता चोहिंकडुनी हाहाकार उठला ॥ ७ ॥

अस्थिमांस गाईचे टाकुनि हिंदूंच्या गेहीं ।
विहिरी करिति भ्रष्ट, दुष्ट ते त्याज्य पदार्थाहीं ॥ ८ ॥

धर्मासाठी धडपडणारे धडपडले जीव ।
प्राणविसर्जन केले सोडुनि जीवाची हांव ॥ ९ ॥

अधर्मज्वाला ही जुलुमाची भडके भेसुर ।
फोड फराफर येऊन जनता झाली बेजार ॥ १० ॥

अणजुरकर गंगाजी कळवी पेशव्यास खबर ।
मसलत दाउनि करी तयारी मग तो रणधीर ॥ ११ ॥

मार्ग रोधुनी वेढा दिधला वसई दुर्गाला ।
जोम जुटीचा करिती क्षत्रिय जोराचा हल्ला ॥ १२ ॥

निज रक्ताचा टिळा लावुनि समर श्रीभाला ।
प्राणाचा नजराणा अर्पिति सुखें मायभूला ॥ १३ ॥

जातिवंत सिहांचे छावे जे रणझुंझार ।
वर्के बापुडी काय तयांच्या पुढें मिरवणार ॥ १४ ॥

सळसळल्या रक्ताचे जमवुनि तरुण क्षात्रवीर ।
झुंजत होता मुरार नाईक रणि बेदरकार ॥ १५ ॥

देशरक्षणा धर्मकारणी अर्पुनि सर्वस्व ।
जीवाचा जोहार कराया घेई तो धांव ॥ १६ ॥

देशासाठीं धर्मासाठीं रणीं जीव देणें ।
क्षात्रवृत्तीचें कर्तव्याचें हेंच खरे लेणें ॥ १७ ॥

वीर मुरारजी शीर हातावरि घेऊनिया लढला ।
समरोन्मादे चरचर उडवी अरीशिरकमलाला ॥ १८ ॥

झुंज झगडुनी सैतानाची उडवी धुळधाण ।
शर्थ जाहली शौर्यश्रीची,झाला बेभान ॥ १९ ॥

साज चढवुनी जखमांचा करि भूषित देहाला ।
लढता लढता धारातीर्थी मुरारजी पडला ॥ २० ॥

पडता पडता हर्षें हसला परि दुःखित नच दिसला ।
' किल्ला अजूनी सर नच झाला ' म्हणुनी तळमळला ॥ २१ ॥

तों विजयाचा नाद तयाच्या कर्णावरि पडला ।
किल्ल्यावरि फडफडता झेंडा बघुनि शांत झाला ॥ २२ ॥

जिवाशिवा या कर्तव्याची झाली परिपूर्ती ।
क्षात्रधर्म पाळुनि सुनिद्रा घे धारातीर्थी ॥ २३ ॥

स्वारी जीव ची स्वार होउनि गगनपथें गेली ।
स्वर्गी जाता सुरबालानीं पुष्पवृष्टि केली ॥ २४ ॥

तिज रुधिरानें इतिहासाचे रंगविले पान ।
कुळ कीर्तीला उजळा दिधला मुरार तो धन्य ॥ २५ ॥

ग्वाही देतसे ह्या कार्याची वसईचा किल्ला ।
जगि पाठारे क्षत्रिय ज्ञाती वंश धन्य केला ॥

मुरारजी पुण्यतिथी

अणजूर : १९२५ व १९२६
वसई : १९३५
गांवदेवी येथील ग्रामदेवीच्या देवळांत : १०३६
परळमधली पाखाडी : १९३७
ठाणें कोळीवाडा : १९३७
दादर समर्थ व्यायाम मंदीर : १९३८

त्यानंतर आजपर्यंत विजयदिनाचे समारंभांत ही पुण्यतिथी क्षात्रैक्य समाज साजरी करतो.

क्षात्रैक्य समाज व स्नेह संमेलन : अणजूर येथें क्षात्रैक्य समाजाचे वार्षिक संमेलन झाले त्यावेळीं सर्व व्यवस्था ह्या श्रीगणेश मंडळानेच केली. त्यावेळी गणेश मंडळाच्या सभासदांनी जवळ जवळ ४००/५०० रुपये स्वतःचे खर्च केले. ह्या संमेलनाचा त्रोटक वृत्तांत खाली देत आहो. तो वाचला असताना गणेश मंडळाची कामगिरी दिसून येते.

क्षात्रैक्य समाजाचें संमेलन अणजूर येथें १-२-१९३० रोजीं माडीत भरले होते. हे संमेलन ४४ वें होते. त्याप्रसंगीं स्वागताकरितां खालील पद्यें अणजूरकर गणेश मंडळानें कै. आत्माराम मोरेश्वर पाठारे यांच्याकडून तयार केलेली गायली होती.

पद्य १ लें (मंगलाचरण)

(चाल : त्यजि भक्तासाठी लाज)

निज कार्यारंभी आज ॥ गणराज तो विनवूंया ॥ धृ ॥
बसवुनी निजांकीं ज्या ॥ कुरवाळी हिमनगजा ॥
परि नंदीचीच मजा ॥ आनंदि जो पाहुनिया ॥ १ ॥
नमुं अतां शारदा ती ॥ विद्यामति बलदाती ॥
गुणिजना निजां हाती ॥ मिरवीत जी धरुनिया ॥ २ ॥
त्या कवीश्वरां प्रणती ॥ नमुं संत मालिका ती ॥
या कार्याची महती ॥ नलगे तया सांगाया ॥ ३ ॥

पद्य २ रें (स्वागत)

(चाल : शोभा उपवनिची सखे ग०)

इतिहासी महशूर अशी ही पुण्यभूमि अणजूर ॥ धृ ॥
गंगाजी नाईक चतुर बहु । मुरारजी रणशूर ॥
सहोदरीं मुरारजी रणशूर ॥
ज्यानिं नीच फिरंगी शत्रूचा केला चकनाचूर
स्थली ज्या केला चकनाचूर
अशी ही पुण्यभूमि रणशूर ॥ १ ॥
क्षात्रैक्य-समाजोत्सव-काजा उत्साहें भरपूर
सुकाजा उत्साहें भरपूर ॥
मानुनि आम्हां शिष्ट बंधुनो आला इतक्या दूर ॥

खरोखर आला इतक्या दूर
अशी ही पुण्यभूमि अणजूर ॥ २ ॥

पाहुनि गगनीं नील पयोधर हर्षित होती मयूर ॥
जसे का हर्षित होती मयूर ॥
शिष्टांच्या दर्शनीं ये नयनी आनंदाश्रू पूर ॥
आमच्या आनंदाश्रूपूर ॥
थोरांसन्मुख आम्ही किशोर ॥ ३ ॥

सुदाम दे पोहेच मूठभर कृष्णा तोष अपार
जाहला कृष्णा तोष अपार
रुचो तुम्हा हे अल्प आमुचे स्वागत अपरंपार
रुचों हे स्वागत अपरंपार
करा " श्री गणपति जयजयकार " ॥ ४ ॥
म्हणा त्रिवार– ॥ श्री सिद्धीविनायक महाराज की जय ॥

क्षात्रैक्य समाजाचे अणजूर येथील संस्मरणीय संम्मेलन

शनिवार ता. १ व रविवार ता. २ फेब्रुवारी रोजीं इतिहास प्रसिद्ध अणजूर मुक्कामीं इनामदारांच्या वाड्यांत समाजाचें वार्षिक संम्मेलन साजरे करण्यांत आलें. आधींच श्री. बापूसाहेब (दिवाकर भाई) यांच्या येथील विवाहाचा भव्य मंडप आणखी सुशोभित करण्याची संमेलनाच्या व्यवस्थापकांनीं पराकाष्ठा केल्यामुळें वाड्याचा त्याच-प्रमाणें सभोंवारचा एकंदर देखावा चित्ताकर्षक झाला होता. संमेलन यशस्वी करण्याच्या कळकळीनें रा. भगवंतराव ज. म्हात्रे संमेलनाचे आधल्या दिवशीच अणजूरास मुद्दाम आले होते. त्यांनीं वाड्याच्या समोरील मुरारजी चौकाच्या मध्यभागीं राष्ट्रीय ध्वज उभारण्यांत येऊन त्यांत भगवा झेंडा उभारण्यांत आल्यामुळें तर एकंदर देखावा मागील इतिहासाची आठवण करून देण्याइतका गंभीर दिसत होता. वाड्याच्या आंतील एकंदर व्यवस्था विशेषतः श्री गजाननाचा देव्हारा व भोंवतालचे मखर वगैरे श्रृंगारण्याचे काम बापूसाहेबांनीं स्वतः अतिपरिश्रमपूर्वक केलें होते. दिवा स्टेशनापासून वरचेवर ने आण करणाऱ्या तरींची योजना, तरींतून उतरल्यावर वाड्याच्या दारापर्यंत ठिकठिकाणीं मार्गदर्शक, स्वयंसेवक व किटसनचे दिवे ठेवण्यांत आले होते. अणजूर गणेश मंडळानें स्वयंसेवकाचा खास खादीचा पोषाख संमेलनाकरितां तयार करविला होता. वाड्यात व इतरत्र सर्व ठिकाणीं तर अनेक स्वयंसैनिकहि होते. चिखलाच्या रस्त्यावर रेती टाकून

एकंदर रस्ता सुखकर व सोईस्कर करण्यांत आला होता. पहिल्या गाडीनें समाजाचे अध्यक्ष, चिटणीस वगैरे मंडळी आली. त्या सर्वांचें श्री गजानन गोविंद नाईक व इतर व्यवस्थापकांनीं प्रेमपूर्वक स्वागत केलें. वाड्याच्या प्रवेशद्वारावर रात्रंदिवस सशस्त्र स्वयंसैनिक पहारा करण्यास ठेवण्यांत आले होते. प्रथम वाड्यासमोरच्या मुरारजी चौकांत समाजाचे अध्यक्ष, चिटणीस व्यवस्थापक व इतर पाहुण्यांनीं ध्वजवंदन केलें व रा. भगवंतराव म्हात्रे यांनीं पाहुणे मंडळीपैकीं आपल्या इष्टमित्रांस खादीच्या राष्ट्रीय चिन्हांनीं विभूषित केलें.

मंडळी जमल्यावर रा. दत्तात्रय रामचंद्र नाईक यांचे चिरंजीव वसंत व रा. गजानन गोविंद नाईक यांचे चिरंजीव पुरुषोत्तम यांनीं स्वागतपर पद्यें म्हणून दाखविल्यावर श्री. गजानन गोविंद नाईक यांनीं वसईच्या धर्मयुद्धाचा, नाईकबंधूंचा व अणजूरचा त्रोटक इतिहास सांगून मंडळीचें स्वागत केलें. स्वागत होत असतां बंदूकांची सरबत्ती चालू होती. नंतर अध्यक्षांकडून बांधवांचा परिचय वगैरे होऊन श्री. वसंत पुरुषोत्तम नाईक यांचें हरिकीर्तन झालें. नंतर श्री. गजाननाची पंचारती, मंत्रपुष्प वगैरे होऊन मंडळी व्यवस्थापकांनीं परिश्रमपूर्वक तयार केलेल्या उत्तम पक्वान्नांचा आस्वाद घेण्यास गेली.

भोजनोत्तर श्री. विनायक आत्माराम पाठारे, त्यांचे मित्र प्रसिद्ध नकलाकार कामत श्री. दादरकर व कुर्ल्यांचे श्री. गजानन पाठारे व बालगंधर्व कु. भाऊराव पाठारे यांनीं गायन, वादन, विनोद, नकला इत्यादि मनोरंजनाच्या कार्यक्रमाची इतकी रेलचेल केली कीं, रात्र केव्हां संपली ते कळलें तर नाहींच पण सकाळीं ८ वाजेपर्यंत ते चालूच होतें. ह्या वेळीं अणजूर येथील जो मोठा शेतकरी वर्ग हजर होता त्यांनीं तालावर नाच वगैरे करून कांहीं पोवाडे म्हणून दाखविले. त्या रात्रीं इतकी कडक थंडी पडली होती कीं, तशी मुंबईत किती तरी वर्षांत पडली नव्हती. पण ह्या कार्यक्रमांत ती कोणालाहि जाणवली नाहीं. मात्र दुसऱ्या दिवशींची भोजनाची व्यवस्था थंडीच्या कडाक्यामुळें लवकर होऊ शकली नाही व कांहीं बांधवांची गैरसोय झाली.

संमेलनास शनिवारीं १३६ व रविवारीं १२० बांधव हजर होते.

सूर्योदयाबरोबर मंडळी मुखमार्जनादि प्रातःकर्में करण्याकरितां जिथें तिथें फांकली. कांहीं मंडळी सहल करण्यास गेली, कोणी शिकारीस गेले, कोणी नौकाविहार करण्यास गेले होते तर इतर इतस्ततः फिरून कालक्षेप करीत होते. इतक्यांत वाड्याच्या बाहेर मुरारजी चौकांत असलेल्या बांधवांच्या जमावांत परिषदेसंबंधानें रा. भगवंतराव म्हात्रे व रा. भगवंतराव परळकर व इतर बांधव यांच्यांत राष्ट्रीय ध्वजाभोवतीं निकराची लटकी

लढाई झाली. त्याचप्रमाणें श्री. गजानन गोविंद नाईक यांच्या दिवाणखान्यांत गोपचार संस्थानबद्दलही वादविवाद सुरू होता.


नंतर मल्लविद्याविशारद मोतीराम पाठारे व मनोहर पाठारे ह्या उभयतांचे शक्तीचे प्रेक्षणीय व आश्चर्यकारक प्रयोग झाले. माणसांनीं चिकार भरलेला खटारा छातीवर नेण्याचे काम तर फारच आश्चर्यकारक होय. असे शक्तीचे अद्भुत प्रयोग करणारी माणसें आपणांत आहेत हें ज्ञातीस भूषणावह होय. ह्याशिवाय खास पाचारण करण्यांत आलेल्या दोघा शेतकरी मल्लांच्या कुस्त्याहि झाल्या. श्री. बाबुरावांनीं गोष्टांचेच नव्हे पण असामान्य शक्तीचे प्रयोगहि करून प्रेक्षकांस स्तंभित केलें.

नंतर श्री. दिवाकरभाई नाईक यांनीं तयार केलेले नकाशे वगैरे दाखवून मागील इतिहास सांगण्यास सुरवात केली. पण भोजनास फार उशीर झाल्यामुळें सभेचे काम आवरतें घेण्यांत आले. दोन प्रहरच्या भोजनांत अनेक नवी नवीं पक्वान्नें संमेलनाच्या व्यवस्थापकांनीं केली होती व भोजन एकंदर फारच सुग्रास झाले होते. भोजनोत्तर तुरे वाटल्यावर व परस्पर भेटीनंतर हा स्फूर्तिदायक व गोंडसा समारंभ समाप्त झाला.

ज्ञातिचा इतिहास : "लवकरच अ. ना. घराण्याचा इतिहास प्रसिद्ध होणार आहे. गणेशमंडळाने हें कार्य स्विकारले आहे." इ. स. १९१५ मध्यें ह्या कार्याचा मी असा उच्चार केला. 'आ. करमणुकीचे प्रकार हा माझा क्षा. स. बक्षिस दिलेला निबंध १९१५ मध्यें मी प्रसिद्ध केला त्यांत ही घोषणा मी केली. पुनः तीच घोषणा २८-८-३८ रोजीं हस्तपत्रक काढून चिंतामण रावजी नाईक व कमळाकर जगन्नाथ नाईक ह्या गणेश मंडळाचे सदस्यानी केली. गणेश मंडळाचे सेक्रेटरी चिंतामण मुकुंद यांनीं २८-४-३९ 'सालांत गंगाजीचे चरित्र छापले' तसेंच हल्लीचा वंशवेल ता. १ सप्टेंबर १९२३ रोजी क. ज. नाईक या गणेश मंडळाचे सदस्यांचे सहीनिशी छापण्यांत आला. म्हणजे गणेश मंडळास इतिहास छापण्याचा विचार संमत होताच. हल्ली गणेश मंडळ काम करीत नसले तरी त्या मंडळाचे सभासदांनीं ह्या कार्यास फारच मदत केली आहे.

पत्रक खाली देत आहे.

॥ श्री सिद्धिविनायक प्रसन्न ॥



अणजूरकर नाईक (इनामदार) बंधूंस

नम्र विनंति

आपल्या अणजूरकर नाईक घराण्याचा इतिहास इतका उज्वल आहे कीं, त्याला मराठ्यांच्या इतिहासांत अती उच्च स्थान आहे. आपल्या घराण्यांतील **गंगाजी,**

सुभरजी वगैरे धीरोदत्त नररत्नांनीं १८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत पुढाकार घेऊन वसईच्या मोहिमेची तयारी केली नसती तर साष्टी व आजुबाजूचे प्रांत खिस्तीधर्मानुयायी बनले असते. अशा प्रसंगांतून निसटून आपण आज आपल्या प्याऱ्या हिंदुधर्माच्या छत्राखालीं श्रीगजाननाच्याच कृपेनें सुखसमाधानानें वावरत आहोंत ही आपणाला अभिमानाची गोष्ट होय

अशा आपल्या घराण्याच्या माहितीचें पुस्तक लिहिलें गेल्यास आपल्या भावी पिढ्यांच्या जीवनांत तें भर घालीलच; पण त्यांच्यापुढें आपल्या पूर्वजांच्या उज्वल चरित्राचा आदर्शहि ठेवील. १) आपल्या घराण्याचा त्रोटक वृत्तांत, २) आपलीं वतनें, ३) देवस्थानें व त्यांचीं वतनें, ४) आपली आजची स्थिति वगैरे तऱ्हेची सर्व प्रकारची माहिती मिळवून ती **'अणजूरकर नाईक (इनामदार) घराण्याचा संक्षिप्त इतिहास'** या नांवाच्या पुस्तकरूपानें एखाद्या लायक लेखकाकडून लिहून घेऊन लवकरच प्रसिद्ध करावयाचे आम्ही ठरविलें आहे; तरी आपण आपल्या सुप्रसिद्ध घराण्याच्या अभिमानानें प्रवृत्त होऊन या कामीं आम्हाला आपली सक्रिय सहानुभूति दाखवाल अशी आशा आहे. कळावें, ही विनंति.

गणेश चतुर्थी
मु॥ अणजूर
ता. २८-८-३८

आपले नम्र बंधु,
कमळाकर ज. नाईक
चिंतामण रा. नाईक

वरील मथळ्याखालील विनंतीचा मजकूर वाचून मला समाधान वाटलें. अशा तऱ्हेच्या पवित्र कार्यास माझी पूर्ण सहानुभूति आहे. सदर पुस्तक तयार होतांच मला त्याची एक प्रत पाठविण्याची व्यवस्था व्हावी. प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाच्या किंमती पोटीं म्हणून मी आज खालील पैसे आगाऊ देत आहे, त्याचा स्वीकार व्हावा.

गणेश चतुर्थी,
मु॥ अणजूर
ता. २८-८-३८

आपला,

पॉप्युलर प्रिन्टींग प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई नं. ४.

सोय : श्रीगणेशचतुर्थीला येणारे गृहस्थ कमी होऊं लागले होते कारण त्यावेळीं पाऊस असे व मुख्य कारण हें कीं बाहेरून येणाऱ्या ईसमाची कोठेही राहण्याची सोय नसे त्यामुळें अगदीं कळकळीचे कांहीं गृहस्थ येत व लगेच संध्याकाळीं पावसामुळे परत जात. ही अडचण दूर करण्याचे उद्देशानें त्या दिवशी राहण्याची सोय, उतरण्याची व्यवस्था व प्रसादाची सिद्धता ठेवण्याचे गणेश मंडळानें ठरविले व ज्या सभासदांचे अणजूरास कोणीही नव्हते त्यांचेकरितां व इतर पाहुण्या मंडळीकरिता श्री. गजानन गोविंद नाईक यांच्या घरांत सोय केली जात असे. त्यामुळें दरवर्षी वाढत्या लोकसंख्येने लोक येऊं लागले. राहण्याची सोय होती म्हणून स्त्रिया व मुलेही येऊं लागली जाण्याची घाई नसल्यामुळें तें स्वस्थपणें राहून दुसरें दिवशी जाऊं शकत. १५-२० वर्षे ही सोय चालू ठेवली होती कांहीं मंडळींनी ह्या सोयीला भिशी म्हणून नावें ठेवली परंतु गणेश मंडळानें आपले कार्य चालूच ठेविले. कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांनी ह्या कार्यास गणेश मंडळास फार मदत केली व उत्साह दिला. कोणाजवळून वर्गणी घेतली जात नव्हती. कोणी देणगी दिल्यास तिचा स्विकार केला जाई.

अणजूर गणेश मंडळाचे सभासद : (१) गजानन गोविंद नाईक (२) चिंतामण मुकुंद नाईक, (३) लक्ष्मण रघुनाथ नाईक, (४) कै. मोरेश्वर रामचंद्र नाईक, ५) कै. मोरेश्वर दाजीबा नाईक, ६) कै. रामकृष्ण यशवंत नाईक, ७) कै. कमळाकर जगन्नाथ नाईक, (८) कै. विनायक निळाजी नाईक, (९) कै. खंडेराव वामन नाईक, (१०) कै. कुंडलिक रामचंद्र नाईक, (११) श्री. प्रभाकर जगन्नाथ नाईक, (१२) कै. भास्कर पुरुषोत्तम नाईक, (१३) भगवान निळाजी नाईक, (१४) कै. पांडुरंग नारायण नाईक.

मंडळाचे हितचिंतक : कै. रामचंद्र सखाराम नाईक, कै. दत्तात्रेय रामचंद्र नाईक, कै. हरेश्वर दाजीबा नाईक, कै. दादोबा बाबाजी नाईक हे होते.

श्री सिद्धिविनाक ट्रस्ट-फंड अणजूर

समस्त ईनामदारानीं ह्या फंडाची स्थापना १० सप्टेंबर १९४५ रोजीं अणजूर येथें केली. श्री. गजानन महाराजांच्या पूजेची व्यवस्था नीटपणें लावण्याकरितां हा फंड स्थापन करण्यांत आला. अणजूरकर नाईक घराण्याचे श्री. गजानन महाराज हें मूळ पासूनचे कुलदैवत आहे. महादेव देश ह्याना पुत्र होत नव्हता. श्री. महाराजांच्या अनुष्टानानंतर त्याना पुत्र झाला. अशा ह्या देवताची उपासना करण्याकरितां श्री.

गंगाजी इ. स. १७१८ व मोरेगांवास गेले त्यानीं २१ दिवस निराधार अनुष्ठान केले. ह्या तपानंतर त्याना चिंचवडच्या चिंतामणी देवानें प्रसाद दिला. तो प्रसाद म्हणजे श्री. मोरया गोसावी याचे पुजेंतली श्रीसिद्धिविनायक महाराजांची मूर्ति होय. गंगाजीचे वास्तव्य त्यावेळीं कल्याणास होते. वसईचे युद्ध आटोपल्यावर महाराजाची प्रतिस्थापना इनामदारानीं अणजूरच्या माडींत इ. स. १७४१ मध्यें केली. इ. स. १८८१ सालीं इंग्रज सरकारनें इनामदारांचे अणजूर गावचे इनाम सर्वीस इनाम मानून खालसा करण्याकरितां जप्त केले. पण इनामदारानी हा लढा विलायतेपर्यंत चालविला. राणी सरकारनें हे इनाम जात इनाम ठरविले व जप्ती उठविली. हीं गोष्ट १८८५ त घडली. असें सांगतात कीं, निळाजी मोरोबा याचे मातोश्रीस अणजूर येथें श्री. महाराज, ब्राह्मणाचे रुपानें येऊन त्यांनीं सांगितले कीं, तुमचे काम फत्ते झाले आहे. ह्या लढ्याचे प्रमुख कै. तुकाराम बाप्पाजी यानी ठाणें येथें मनुष्य पाठविला व हे सर्व खरे ठरले. इनामदारानीं त्यावेळीं श्री महाराजाचा उत्सव ७ दिवस अणजूरास केला. नासिक वगैरेचे २००/२५० ब्राह्मण अनुष्ठानास बसविले. यज्ञ केला गेला त्यावेळीं मुंबईतले झाडून सारे प्रमुख ज्ञातिबांधव आले होते. ह्या उत्सवाचे वेळी श्री. महाराजाची मूर्ती ओटीवर आणली होती. अशा ह्या वरदायिनी श्री. महाराजाची पूजा करण्याकरितां ह्या फंडाची स्थापन केली आहे.

सन १९४७ जानेवारी ता. २५-२६ रोजीं सहाय्यक समितीनें स्वतःचे जबाबदारीवर अणजूर येथें समस्त अणजूरकर नाईक बंधुंचे एक स्नेहसंमेलन भरविले व श्री. गणेशजयंति निमित्त श्री. महाराजास अभिषेक करून पूजा केली. ह्यावेळीं ३०० ते ४०० मंडळी हजर होती. ही सहाय्यक समितीच आजपावेतो देणग्या जमवून दरवर्षी श्री गणेशजयंतिचा उत्सव माघ महिन्यांत करीत असते.

श्री. सिद्धिविनायक महाराजांची दैनिक सेवा सहाजिकच श्री. गंगाजी नाईकांच्या प्रमूख शाखेंत चालू राहिली. अडीअडचणीचे प्रसंगी हें काम अणजूर येथील इनामदारांचे उपाध्ये पंडित, हे करीत. त्याबद्दल त्यांना सालिना रु. २५ वेतनादाखल समस्त इनामदारांकडून मिळत. परंतु प्लेग नंतरच्या काळांत म्हणजे सुमारें इसवी सन १९०० पासून पुढें अधिकच अडचणीचे प्रसंग आल्यामुळें श्रीपूजेची जबाबदारी पंडितांवरच जास्त पडूं लागली. पंडितांस स्वताची वृत्ति संभाळून हें काम अंगावर घेणें जड आहे हें जाणून कै. रावजी भाई नाईक, कै. वामन गोविंद नाईक, कै. रामचंद्र सखाराम नाईक मंडळींनी ह्या बाबत स्वतंत्र व्यवस्था व्हावी म्हणून वर्गणीद्वारें प्रयत्न केले. कै रावजी भाई नाईक ह्यांनीं ठरविलेल्या योजनेंत कायम निधी आणि व्यवस्थापक मंडळीची योजना, ह्या गोष्टींचा समावेश केलेला होता. ह्यावेळीं समस्त इनामदारांनीं सुद्धां ठराव

करुन आपल्या अबकारी हक्काच्या रकमेपैकीं रु. २५ पंचवीस पुजेनिमित्त पुजाऱ्यास देण्याचे ठरविले. तेव्हापासून स्वतंत्र ब्राह्मणाकरवी श्रीची यथासांग दैनिक पूजा, नैवेद्य चालू झाला. पुनरपि त्यांतही व्यत्यय आलाच. पुजाऱ्याचे भागेना. तेव्हां दैनिक पूजेच्या ब्राह्मणाचा भार श्री. दिवाकर भाई नाईक यांनीं कांहीं काळ सहन केला. पुढें इ.स.१९२७ च्या धारावाढीनंतर इनाम उत्पन्न वाढले. तेव्हां मूळच्या पंचवीस रुपयांऐवजी इनामदारांनीं सर्वांनुमतें श्रीपूजेप्रीत्यर्थ सालिना रु. १०० शंभर इनामांतून पुजारी ब्राह्मणास मिळावेत अशी व्यवस्था केली. ही व्यवस्था कांहीं काल ठीक चालल्यानंतर महागाई वगैरे अनेक कारणांनी तीसुद्धां रक्कम अपुरी पडूं लागली. तेव्हां कांहीं मंडळी पुढें होऊन त्यांनीं ही तूट भरून काढण्याचा प्रयत्न केला. ह्या मंडळींत श्री. वसंतराव पुरुषोत्तम नाईक व श्री. चिंतामणराव रावजी नाईक ह्यांनीं चांगले काम केलें. परंतु नुकत्याच संपलेल्या जागतिक लढाईच्या काळांत अत्यंत कठीण परिस्थिती निर्माण होऊन हा प्रश्न कायमचा धसास लावणें निकडीचे ठरलें. तेव्हां दिनांक १७ ऑगस्ट १९४५ रोजीं अणजूर येथील स्थानिक मंडळींनीं हल्लीची "श्रीसिद्धिविनायक ट्रस्ट फंड"ची योजना श्री. गजानन गोविंद नाईक यांच्या पूर्वीच्या मुळच्या योजनेबरहुकुम तयार केली; व तीस दिनांक १० सप्टेंबर १९४५ रोजीं श्रीगणेशचतुर्थीचे दिवशीं सर्व इनामदार मंडळींनीं मान्यता देऊन मंजूर केली. ह्या योजनेनुसार, "श्रीसिद्धिविनायक-ट्रस्ट-फंड" स्थापन करण्यांत आला आहे. श्रीसिद्धिविनायक महाराजांच्या पूजेअर्चेनिमित्त लागणाऱ्या खर्चासाठीं देणग्या व इतर साधनांनी किमान रु. १०,००० (दहा हजार) अगर योग्य तो निधी जमवावा व त्याचे फक्त व्याजांतूनच श्रीसेवा चालवावी. हा हेतु तसेंच त्या निधींतून श्रीमहाराजांच्या इतर पूजेअर्चेविषयींही एकंदर व्यवस्था ठेवावी हाच निधीचा मुख्य उद्देश आहे.

संस्थानचे पहिले विश्वस्त मंडळ : (१) चिंतामण मुकुंद नाईक, अध्यक्ष (२) कै. शिवराम पंढरीनाथ नाईक, उपाध्यक्ष (३) कै. हरेश्वर दाजीबा नाईक, खजिनदार (४) चिटणीस, गजानन दिवाकर नाईक (५) कै. मोरेश्वर रामचंद्र नाईक, सभासद (६) कै. चिंतामण रावजी नाईक, हिशेब तपासनीस (७) कै. रामकृष्ण यशवंत नाईक, जोड हिशेब तपासनीस (८) हरिशंकर पंढरीनाथ नाईक, B. A. L. L. B. Soliciter कायद्याचे सल्लागार. **पहिली सहाय्यक समिती :–** (१) वसंतराव पुरुषोत्तम नाईक, अध्यक्ष (२) पुरुषोत्तम गजानन नाईक, चिटणीस (३) सभासद, कै. शामराव

वामनराव नाईक (४) गणपत दिवाकर नाईक, L. L. B. (५) विनायक प्रभाकर नाईक (६) वसंत दत्तात्रय नाईक (७) मधुकर रामकृष्ण नाईक (८) दामोदर भगवंत नाईक (९) शरद लक्ष्मण नाईक (१०) बाबुराव भालचंद्र नाईक (११) आनंदराव वामनराव नाईक.

ह्या फंडातून स्थापनेपासून आजपर्यंत खर्च होत आला आहे. १९६२ सालांत अखेर पर्यंत ४२८ रु. खर्च करण्यांत आला. त्याच सालीं ३३९-७५ इतक्या देणग्या मिळाल्या आहेत. आज इन्व्हेस मेंन्ट अकौन्ट मध्यें ७१०० रुपये व प्राईस बाँड मध्यें ३०-०० इतका कायम फंड आहे.

श्री. कै. शिवराम पंढरीनाथ नाईक ५०० रुपये

श्री. लक्ष्मण रघुनाथ नाईक १-२२ गुंठे शेत जमीन दिली आहे.

भाग सातवा

ऐतिहासिक पत्रव्यवहार

१

इतिहासांतल्या कांहीं महत्त्वाच्या नोंदी

(पुणें येथील श्री. यशवंत न. केळकर यांचे संग्रहांतील)

२२-१०-१७३३ मुरारजी नाईक यांचे तीन शिपाई मुंबईस रवाना केले व त्याना तीन रुपये दिले यावरून अणजूरकर मंडळी पेशव्याच्या नोकरींत दिसतात.

२९-१०-१७३३ रोजीं मुरारजी अणजूरकराला दोन रुपये दिल्याचा उल्लेख बाजीरावाच्या रोजकीर्दींत आहे.

३०-८-१७३३ च्या नोंदीवरून बाजीरावाबरोबर बाळाजी महादेव नावाचा जो वकील संभाजी आंग्र्याकडे पाठविला त्याच्या बरोबर मुरारजी अणजूरकराचे लोक दिल्याचा उल्लेख आहे.

२७-११-१७३४ रोजी खंडोजी माणकराकडून मुरारजी अणजूरकराच्या हशम लोकांना ७५ रुपये देऊन त्यांची समजावीस केल्याचा उल्लेख पेशव्याच्या रोजकीर्दीत आहे.

२५ २-१७३५ रोजीं अणजूरकरानें नवीन लोक ठेवले. सबब त्यांच्या खर्चास २५० रु. दिले.

१२-८-३५ रोजीं मुरारजी अणजूरकराला श्रीवर्धन किल्ल्याची हवालदारी सांगितली व त्यास दरमहा तैनात २० खासा व ७ पोरगा करता असा करार केला हा श्रीवर्धन किल्ला म्हणजे राजमाचींचा एक भाग आहे.

२४-११-१७३५ रोजीं नारायणजी अणजूरकर बारगीर हुजूर पागा याला ५ रु. दिले आहेत. सील सलासिन छ १२ रजब.

२४-१-१७३६ गंगाजी अणजूरकरास नाजूक खर्चाकरितां ३०० रु. दिले. सील सलासीन छ, २९ रमजान

९-४-१७३७ रोजीं बुवाजी नाईक अणजूरकराला नवीन हशम चाकरीस आणावया करितां २०० रुपये दिले आहेत. सबसलासीन

२२-१२-१७४१ रोजीं गंगाजी अणजूरकरास पालखी दिली त्याकरिता वेतन करून दिले.

इतर ठिकाणचा संग्रह

शामजी नाईकाचा मुलगा कृष्णाजी नाईक याला मालाड येथें रामाजी महादेव याजबरोबर ठेवले.

मदनाजी नाईक अणजूरकर याला किल्ले श्रीवर्धन येथें हवालदार नेमिले.

दफाते : लक्ष्मण मायाजी कळवेकर दि॥ गंगाजी नाईक अणजूरकर यासी खंडोजी माणकर याजकडून साष्टी प्रांते शंभर रुपयाचा गांव नेमून दिला. रोजमुरा नेमणुक प्रमाणें देत जाणे म्हणून सनद पेशव्याकडून मिळालेल्या बक्षिसें वेतनांची नोंद छ २७ मोहरम १७-५-१७३७ रुपये खर्च ४३ जखमी धारावीस जाले त्याच्या खर्चास

६	मुरारजी नाईक अणजूरकर	४	दि॥ खंडोजी माणकर
८	दि॥ शिवजी नाईक अणजूरकर	४	
६	दि॥ बुवाजी नाईक अणजूरकर	२	
११	दि॥ गंगाजी नाईक अणजूरकर	३	
१२	दि॥ सोमाजी कुंठ	४	
४३		१७	

१७ माणसे जायबंदी झाली त्यास ४३ रुपये वाटले आहेत.

२८-२-१७३५ १५ सवाल सलासीन

२५० गंगाजी अणजूरकर हशम लोक ठेविले होते त्यास खर्च जाला तो ऐवज दिला. रु॥

ये

२४७ मोहरा १९ दर १३

३ चैन रुप

——

२५०

१७-५-१७३७ सला सलासीन

छ २७ मोहरम खर्च रु. ४३ जखमी धारावीस झाले त्यास खर्चास रु. ६ मुरारजी नाईक अणजूरकर दि॥ खंडोजी.

२

पेशव्यांचे नाईकबंधूस पत्र

[श्री. गजानन गोविंद नाईक यांजकडून पारसनीस यांच्या लेखसंग्रहांतून]

पेशमी गंगाजी नाईक व बुवाजी नाईक व जनार्दन नाईक बिन मुरारजी नाईक व शिवाजी नाईक व नारायणजी नाईक बिन निंबाजी नाईक महिमानराव **कुळी साळोंखी ज्ञात पाठारे** पुरातन वास्तव्य कसबे वानरे तर्फ मरोळ परगणे साष्टी वतनदार मोकादम मौजे अणजूर तर्फ आटगांव परगणे सायवान प्रान्त वसई हे प्रान्त मजकुरीहून तीर्थरूप रा. बाजीराव व तिर्थरूप रा. चिमणाजीपंत आपा यांचे दर्शनास सातारीयाचे मुक्कामी

सन सलास अशरीन मया व अलफामध्यें येऊन आपली हकीकत विदीत केली कीं आपण पुरातन प्रान्त मजकुराचे वतनदार आहों. त्यास वसई प्रान्त फिरंगी याकडे आहे. त्याने देवस्थानें व तीर्थें यांचा व महाराष्ट्रधर्म याचा लोप केला. हिंदु लोक भ्रष्टऊन क्षार केले. आपण पुरातन वतनदार, देशनाडगौडपणाचें वतन होते. त्यास फिरंगी याकडे तो प्रान्त जाहलीयापासून वतन चालों देत नाहीं. यामुळे आपण कुटुंबासह वर्तमान त्या प्रांतातून येऊन कल्याण प्रांती प्रस्तुत राहिलो. वसई प्रांताची हकीकत व आपले वृत्त निवेदन करून त्या प्रांती साहेबी मसलत करून प्रांत मजकूर सर करून देवस्थापना करून स्वधर्मस्थापना होय ते गोष्टी करावी व आपले वतन आपणांस करून घ्यावें. त्या प्रांतीचे कोट किल्ले व जंजीरे वसई व कोट ठाणें या जागांचे लागे, माग व खाडीयांचे उतार व मार्ग वाटांस आपण माहीत आहों. व ठाणें वसई कोटाचे लाग आपले स्वाधीन आहेत म्हणून, त्यावरून अणजोरकर मजकूर यासी तीर्थरूपानीं आज्ञा केली कीं, तुमचे हातलागे असतील ते हाती धरून वसईचा व ठाणे याचा उताराचा लागठोक करणे, त्यावरून अणजूरकर मजकूर याणीं हातलागे त्या प्रांतीचें हातीं घेऊन कोट ठाणें साष्टी येथील लागवतेच खाडीयाचा उतारा व वसईचे आगरचे खाडीचे लाग केले, ते वर्तमान हुजूर येऊन साल दरसाल निवेदन केलें त्याजवरून सनसला सबासीन मया व अलफमध्यें तिर्थरूप रा. आप्पांनी मसलत करून फौजसमागमें देऊन रा. शंकराजी केशव व रा. चिमणाजी भिवराऊ फौजसमेत गंगाजी नाईक व शिवजी नाईक अणजूरकर बराबर देऊन वसईस पुढें रवाना केलें, व रा. खंडोजी माणकर व रा. रामचंद्र हरी यास फौजसमागमें देऊन बुबाजी नाइक व मुरारजी नाईक व नारायणजी नाईक अणजूरकर हे तिघे बंधु बराबर देऊन साष्टीची खाडी पार करून फौज नेऊन ठाणें यांचा कोट हस्तगत तुमचे हातीं लागोन जाला, ती. कैलासवासी रा. आपा खास फौजसुद्धां पाठीवर जाऊन प्रांत मजकुरचे गड कोट किल्ले हस्तगत करून प्रांत मजकूर सोडून **स्वराज्य केलें**; त्यामुळें स्वधर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालते झाले. व अणजूरकर पांच बंधु यांनीं एकनिष्ठपणें जीवाभ्य श्रमसाहास करून सेवाधर्म संपादिला. व **मुरारजी नाईक अणजूरकर जंजीरे वसईचे कोटीस हल्ला जाहली ते समयीं युद्ध प्रस्तांत स्वामीकार्यी खर्च झाले.** अणजूरकर पांचजण बंधु यांजवरी कृपाळु होऊन ती. कैलासवासी यांनीं यासी नूतन वतन करार करून द्यावे ऐसा करार केला. त्याजवरून हल्लीं अणजुरकर मजकूर हुजूर देऊन आपली हकीगत निवेदन केली. त्यावरून तुम्हास नूतन वतन देशनाडगौडी उर्फ सरपाटीवली वतन परगणें साष्टी देखील जकायती व तर्फ आठ गांव देहे २६ सव्वीस परगणें सायवानपैकीं तर्फ मजकूर देखील जकायती जलमार्ग व उभा मार्ग व बंदरे परगणें मजकूर व तर्फ मजकूर वतन सरपाटीलकी करार करून दिले असे.

३

अणजूरकर नाईकांस चिमणाजी बल्लाळ यांचे पत्र

(अणजूरकर नाईक बंधूंनीं वसईच्या लढाईंत केलेल्या मर्दुमकीबद्दल चिमणाजी बल्लाळ यांजकडून आलेले पत्र अस्सल मोडी पत्रावरून) ग. गो. नाईक यांचेकडून.

श्री. चिमणाजी बल्लाळ सु॥ समान सलासीन मया अलफ वसईवरी हला जाहली ते प्रसंगीं तुम्ही मने वाढउन मेहनत केली म्हणोन विदित जाहालें तर तुम्ही मर्द आहा जे लोक जे साहेब कामाविशी मने वाढवितील त्यांचे उर्जित होईल. जे ठार जाहाले आहेत त्यांच्या मुलांमाणसांचे चालविल जाईल जखमी जाले आसतील त्यांची निगा करून बरे करणे ला (लो) कांचे दिलासे करणे जाणीजे छ २८ जमादीलावल आज्ञा प्रमाण (लेखन सीमा)

४

रामाजी महादेवांचे तान पाटील म्हात्रे यांस पत्र

[ग. गो. नाईकांचा संग्रह]

अजस्वारी राजश्री रामाजी महादेव प्रा। साष्टि तान पाटील म्हात्रे मौजे कलवणे ता। मालाड प्रा। मजकूर सुमा आर्बीन मया अलफे (इ. स. १७४३) तुमचे विशीं देशमुख व देशपांडे व नारायेणजी नाईक अणजूरकर सरपाटील यानीं प्रांत मालाडचे मुकामी येऊन अर्ज केला कीं, पाटील म्हात्रे व चाकर मढवी हे वतनदार यांस श्रीमंतानीं धामधुमीचे प्रसंगांत बलुती करार करून दिला. त्याची पत्रें भोगवटीयास करून घ्यावी त्यावरून हुजूरची आज्ञा झाली कीं हा समये धामधुमीचा येव्हां चालता गाडा करून दिल्हा असे पुढें सुरक्षित जाहलियावर खरेखुरे चौकसीने वतनदार होईल ज्यास बलुतीजी घ्यावी ते करार करून देऊ ऐसी आज्ञा आहे तर साहेबी कृपाळु होऊन चौकशी करून घ्यावी म्हणोन त्याजवरून हा रायें अर्ज खातरेस आणुन आबादानीवर नजर देऊन तुम्हास बलुती करार करून दिल्या असेत.

बी तपशील खंडी

·।।· तामेस रमेद शेत नेवीले

·।।· आल म्हात्रा

।= सेतपऱ्याचे खाचर

८= शेत देत्रीचं

—

·।।·

·।।· जीकला लुकरीन पाटील

८४ सेत बावीचे खाचर

·।· सेत पोवेसरी

—

·।।·

·।।· दुम म्हात्रा सेत नेवाले खाचर

·।।· सीवपुरी

·।· सेत हादलई

८४ सेतपाडे खाचरे २

·।।· वालम्हात्रा सेत पोंढ खाचरे =

।।= चाकर गावास

।१ सेतसरवा

।१ सेतजुहासेत

—

।।=

८= इनास पाटील खारीचा मुकादम
सेत आरली सेत्यावरचा वाडा

·।।· आघेल्या

·।· माहाराच्या खाचऱ्या ३

·।· देवीची चीर

—

·।।·

·।· सनवार पुरी मा। बोवा भीकार
सेत वाहाल

—

४।४

एकूण सवाचार खंडी च्यार मण भात बलुती करार केली उपभोग करून गांवची आबादानी करणे जाणीजे छ २१ माहे जिल्हेज. (मोर्तब खुद्द)

५

पेशव्यांचे गंगाजी नाईकांना पत्र

[ग. गो. नाईकांचे दप्तरांतील अस्सल पत्र]

शके १६५८ फाल्गुन शुद्ध १०

पु।। गंगाजी नाईक अणजूरकर गोसावी यांसी—

सु।। सबा सलासीन मया आलफ तुम्ही शिवजी परचितराव याजविशी लिहिले की, हे कामाकाजांत आहेत त्याचे हाथून कित्येक कामें होतील त्यांसही बोलाविले पाहिजे

म्हणून लि॥ त्यास ते पूर्वापारच कामावरच आहेत त्याजवीशीं पूर्वीं तुम्ही वीदीत केले आहे त्यानी कामकाज करून आपले सर्व प्रकारे उर्जित करून घ्यावे व कीतेक त्याचा सरंजाम करणे तोही होईल त्याचें समाधान तुम्ही करणे त्याचे मुदमाफीक सरंजाम होईल सारांश त्याणी मन घालून कामकाज करावे तुम्ही सांगाल त्याप्रमाणें त्याचा सरंजाम होईल तुम्ही त्यास तेथेच ठेवून येणे ते तेथून आणावे तरी कल्याणकर तर्क करितील यास्तव त्यास ठेवणे आणी तुम्हौ येणे समई त्याचेच हाथून काम घ्यावे लागेल जाणीजे छ ९ जीलकाद (लेखन सीमा) राजवाडे खंड ६

६

शिवजी नाईक अणजूरकर यांचे बाळाजी बाजीरावांस पत्र

(गजानन गोविंद नाईक यांचे दप्तरांतून)

श्रीमंत राजश्री—पंत
स्वामीचे सेवेसी—

विनंती सेवक आज्ञाधारक सीवजी ना॥ अणजूरकर सरपाटील सेवेसी विज्ञापना ता॥ छ—शाबान पावेतो स्वामीचे कृपे अवलोकने सेवकाचे व प्रांत मजकुरचे वर्तमान येस्थास्थित असे बहुत दिवस जाले परंतु लेखण आज्ञा करऊन सेवकाचा परामृश न केला राजश्री बुबाजी ना॥ यांसी कैलासवास जाला सेवकाचे समाधान पत्री करावें तेही समर्थांही न केले विशेष गनीमाची बातमी तरी वलंदेजाची दुफरगादे नव आले आहेत च्यार मुंबैचे धाऱ्यावर आहेत पांच माहा समुद्रात नाटी आहेत च्यार बाऱ्यावर आहेत त्याजमध्यें सीपाही भांडायाचे सामान आहे हजार दीड हजार माणुस आहे आणीक च्यालीस गलबते मागे येणार त्यांस पतीमारी रवाना केली आहे मागोन फीरंगीही येणार असी खबर मुंबै दाट आहे. कोन्ही कोन्हाजवळ बोलत नाहीं अंतस्त गुलमुल असे फीरंगी दोघे मुबैस आहेत त्यास खर्च वेच गोव्याहुन येतो. त्यांस मुबैस फीरंगी आहेत त्याणी दोन गुराबा बांधील्या त्याजपैकी येक पान्यात लोटली येक लोटावयाची आहे गोव्यास दोघे विजुरेल आहेत ते उचे रक्ताचे आहेत त्याजवर पातशाचा येखत्यार आहें त्याणी केले ते पातशास प्रमाण आहे सारांश दिसोन येते कीं फीरंग्याचे व वलंदेजाचे येकत्र आहे

जैसीयास दीसते अैसे असोन येथील अमलदार रा रामाजीपंत हुजूर बोलाविले राजश्री रामाजीपंत यांचा नक्षा ढोपीकरावर बरा आहे मौजे मुधें येथील भांडणांत व पाणबुरुजावर फीरंगी आला होता त समईही हेच पुढे होऊन गनीम पराभवीला साष्टीत उतरता सेवकाचे पाठीवर हेच धारीष्ट करून आले म्हणून कार्येसिद्धी जाली नाहीं तरी वसई-सारीखे होते मग उपाये न होता परंतु स्वामीचे प्रतापे करून सर्व सिद्धिते पावले हाली शकट वोढवल आहे ऐसे सेवकास दीसोन येते याजकरिता स्वामीनी रा रामाजीपंतास सरंजाम देऊन फौजेसुद्धां आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत गनीम भाद्रपद आश्वीन या दोहा मासात येणार तरी येईल पुढें नये त्यास राउताचे भये आहे अैसे वर्तमान तेथें आहे स्वामीचा प्रताप भुमंडली भरुन उरला आहे हा सेवकास भरवसा आहे वरकड गनीमाची माव खरीच असे सेवेसी श्रुत होये हे वीज्ञाप्ती.

[वरील पत्र शिवजी नाईकांनीं बाळाजी बाजीराव पेशव्यांना लिंहिलेलें दिसतें. डच लोकांची व फिरंग्याची वसईवर हल्ला करावयाची तयारी चालली आहे असा सदर पत्राचा ध्वनितार्थ आहे. बुबाजी नाईकांच्या मृत्यूचा ह्यांत उल्लेख आहे ह्यावरून वसईच्या लढाईनंतर बऱ्याच काळानें ह्या हल्ल्याचा बेत डच व फिरंग्यांनीं केलेला दिसतो. १७४६ च्या एका सभापत्रांत बुबाजीचा उल्लेख नाहीं म्हणजे याच्या आधीं बुबाजी मरण पावले हे पत्र अर्थात त्या सुमाराचे आहे.

परामृश–परामर्श, विचारपूस

(दु) फरगादे-फरगत, (फ्रीगेट)
(गलबताचा एक प्रकार)

भांडायाचे–१ तोफा २ भांडण्याचें

उचे रक्ताचे–उच्च कुळांतले

नक्षा–जरब

शकट–संकट

राऊत–घोडेस्वार

मुर्बेचे–मूर्ध्याचे

वलंदेज–डच लोक (हालंदेज)

वाऱ्यावर–हद्दीवर

नाटी–दूर नांगरलेलीं

गुराबा–ग्रॅब, (गलबताचा एक प्रकार)

येखत्यार–विश्वास, भरवंसा

ढोपीकर–(टोपीकर) फिरंगी

ओडवल–ओढवलें

माव–लबाडी

७

चिमणाजी बल्लाळ यांचे पत्र

(सन १७३८ तलें)

श्री

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रे॥ चीमणाजी बल्लाळ आशिर्वाद सुमा तीसा सलासीन मया अलफ खासाश्वारी वसईस व्हावी असे होते परंतु प्रयोजन लागले येतनिमित्य पुण्यास जाणे जाले तेथें शंकराजी केशव आहेत त्याजपाशी तुम्ही आहा मा॥ निलेनी ज्यास जेथें ठविले त्या जागा राहून श्रम साहास केलेत सकल वर्तमान मा॥नी लेच्या पत्रावरून विदीत होऊन संतोष जाहला प्रहस्तुत हें पत्र सादर केले असे तरी मा॥ निलेनी सांगतील त्याप्रमाणें अंगेजणी करून जागा मजबूद होई तें करणें तुम्ही इतबारी कामाचे भरंवसीयाचे लोक आहा जागा मजबूद करून नक्ष करणे म्हणजे तुमचे नोकरीचा मजुरा होऊन उर्जीत केले जाईल तीकडील मनसुभा तुम्हा लोकावरी आहे त्याची शरम धरून मानिलेच्या हुकुमाप्रमाणें वर्तणुक करणे जाणीजे छ २८ सफर आज्ञापत्र. (गजानन गोविंद नाईक यांचे दप्तरांतून)

(श्री
राजा शाहू नरपति
हर्षविधान
बाळाजी बाजीराव
मुख्य प्रधान)

(लेखन सीमा)

८

चिमणाजी बल्लाळ यांचे गंगाजी नाईक व शिवजी नाईक यांस पत्र

शके १६५९ भाद्रपद व॥ ३० (१७३७)

श्री

" राजश्री गंगाजी नाईक अणजूरकर व शिवजी नाईक अणजूरकर यांस— "

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ चिमणाजी बल्लाळ आशीर्वाद सु॥ समान सलासीन मया अलफ सांप्रती वसईवरी हल्ला जाहला ते समई कार्य न जाहले म्हणून तुम्ही मनांत दिलगीर न होणे शाबास तुमची कीं तुम्ही मन वाढवून मेहनत उत्तम प्रकारें केली ज्याणी साहेब कामाच्या ठाई मन वाढवून कामकाज केलेले आहे, त्याचें सर्व प्रकारें उर्जित केले जाईल व कोणी साहेब कामावर ठार झाला असेल; त्याचे मागें मुलामाणसांचे चालविले जाईल. कार्य आजी न जाहले तरी पुढें तुमचे हातून घेतले जाईल. तुम्ही आपले समाधान असो देणे जाणिजे छ २८ जमादिलावल. बहुत लिहिणे १ ”

९

गंगाजीस पत्र

श्री

मार्ग व॥ ११ शके १६६३ ता. २२-१२-१७४१

छ म॥ गंगाजी नाईक अणजूरकर यांसी बाळाजी बाजीराऊ प्रधान सरसन इसने आर्बेन मया व अलेफ तुम्ही वसई प्रांताचे मसलतीस श्रम साहास बहुत केले यास्तव तुम्हास कृपाळु होऊन तुम्हास पालखी दिली असे पालखी वागवून बसत जाणे. पालखीस वेतन तुम्हास वतन करून दिल्हे आहे याचें उत्पन्न येईल त्यापैकीं देत जाणे जाणिजे छ २४ सवाल आज्ञाप्रमाण मोर्तब लेखन सीमा भा. इ. स. मंडळ ऐ. पत्रव्यवहार

१०

वसई फत्ते झाल्याचे पत्र

श्री

छ सुपूर स्वारी पंतप्रधान छ २९ रबा सुदगी जमा नी॥ शंकराजी केशव प्रांत वसई, वसई फत्ते जाहाली त्यावरी निशाण चढले त्यास खर्च रु.

२७।=॥। छ १५ पूजेस सामान वगैरे
२।- छ १७ रोां झेंडा करावयासी खाद्या १०
खाद्या रंगाई बद्दल खर्च
२ गेरु वजन पक्के ५
।- तेल वजन पक्के १
———
२।-

११

गंगाजीस गौरवाचे पत्र

श्री १७३९

सेवेसी विनंति रा। गंगाजी नाईक अणजूरकर बंधु सहवर्तमान मेहनत करितात हें स्वामीस विदीत आहे यासी स्वामीनी वतन करून दिले त्याचे कामकाज रयेत निसबतीचे याचे हाथून घ्यावयाची आज्ञा सर्वास करावी जे ठाण्यीत राहतील त्यास व बेलापूरास ज्यास ठेविले असेल त्यास व विठ्ठल विश्वनाथ यासी याचेविशी पत्रें द्यावी म्हणजे याचे विद्यमाने बोलाचाली रयतेची होत जाईल सेवेसी विदीत होय हे विज्ञापना.

१२

बाजीरावांचे सर्वांना अभयपत्र

श्री

शके १६४८ चैत्र (सन १७२६)

' राजा शाहु नरपति हर्ष विधान
बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान "

अभयपत्र समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडीत प्रधान नानोजी देसाई व जिवाजी ठाकूर व बाळकोजीराऊ व गणेशजी कुळकर्णी व अंताजीराऊ ता। फिरंगाण सहून सन सबा अशरीन मया व अलफ तुमचे विशीं रा। गंगाजी याणी तुमचे निष्ठेचा अर्थ कित्येक निवेदन केला त्यावरून कळों आले. तुम्ही कार्यांचे लोक तुमचे सर्व प्रकारें चालवावे हे आवश्यक जाणोन तुम्हास अभयपत्र सादर केले असे तरी तुम्ही कोणेविशीं चित्तात वसवास न धरिता सुखरूप राहणे तुमचे उर्जिताचा अर्थ रा। गंगाजी नाईक याणी निवेदन केला त्यासी आज्ञा मा।।शारनिलेस केली आहे त्यावरून कळेल तुम्ही आपला खातरजमा असो देणे जाणीजे छ सवाल आज्ञाप्रमाणें

(लेखन सीमा) राजवाडे खंड ६

१३

चिमणाजी बल्लाळचे गंगाजीना पत्र

(सन १७३७) शके १६५९ माघ शु।। १

राजश्री गंगाजी नाईक अणजूरकर ना।। यांसी— स्ने।। चिमणाजी बल्लाळ आशिर्वाद. सुमा समान सलासीन मया अलफ तुम्ही विनंति पत्र पाठविले त्यांत मुख्यार्थ हाच कीं—

फिरंगीयांचे आरमार गोव्याहून आले आहे. ठाण्याची मजबुती तीळतुल्य नाही रा. खंडोजी माणकर अर्जुदा आहेत ते म···सु······ ही आपण रा।। रामाजी महादेव यास धारावीस जाऊन वर्तमान सांगितले त्याणीं धारावीची वेहबुद्धी करून ठाण्यास आले येथीलही मजबूती करणे ते करितात खंडोजी माणकरास कष्टी करावयाचे नव्हते म्हणोन लिहिलें ते कळले. रामाजी महादेव याणी धारावी व ठाणें येथील केली मजबुती उत्तम आहे रा. खंडोजी माणकर यास समाधान पत्र पाठविलें असे तेहीं चुकणार नाही १ आपले वतन चालवावे सध्या वतनाचे उत्पन्न होईल ते साहेब कामास लावू म्हणोन लिहिलें ते कळले ऐसास सर्व प्रकारें तुमचे अगत्य. तुम्ही पदरचे आहात. इकडील आमचा गुंता वारला म्हणजे तिकडे येऊं येविशीं आज्ञा कर्तव्य त करूं उर्जीत केले जाईल आपले······ ··· ··तुम्ही······१

ठाणें वसई वगैरे प्रांति जमाव फार जाहला सरकारचा पैकाह मुबलक खर्च होतो. फिरंगीयाची ठिकाणें मजबूत आहेत. सुलतान दव्यानी ×× नी येत नाहीं याकरिता जागा जागा फिरंग्यांचे कोटीचे उरावर गढ्या बांधाव्या फिरंगी कांहीं पैकी करी नव्हे गल्यादाण्याविण सहजच आयास येईल. आपल्यास शिवंदी कम पडेल म्हणोन लिहिलें ते कळले. ऐशाच तुम्ही विचार लिहिला खराच आहे राजश्री वासुदेव जोशी यास लिहिले आहे या उपरी गढ्या बांधावयाचा प्रारंभ केला जाईल. 'मुलुकामध्यें जागा जागा सरकार कमाविसदार आहे तेथ सेवकाचा एक एक माणूस असिल्यानी दोही जागा दाखल आहे म्हणून लिहिले ते कळले ऐशास आम्ही तिकडे आलि-यावर कर्तव्य ते केलें जाईल'

तुम्ही शंकराजी केशव ×× सु चौकशी बरी करून खबरदार रहाणें. फिरंगी हाव भरी जाहला आहे एक वेळ थोंबाडून ठासून राखणें जाणीजे छ २५ रमजान आज्ञाप्रमाण.

(लखन सीमा) राजवाडे खंड ६

१४

मोरोबा नाईकांचे कर्ज

श्री गजानन

पुरा राजेश्री दादोकृष्ण वाडेदकर गोसावी यांस—

सुरु सन् तिसेन मया व अलफ मोरोबा नाईक सरपाटील अणजूरकर याजकडे तुमचे कर्ज आहे. त्याचे फडशास सुभा बाजीपुरा निघोन येणे वाजवी मनास आणून फडशा करविला जाईल. जाणीजे छ साबेन पा हुजूर (मोर्तब खुद)

१५

गणेशजीचे कोटाबाहेरील जागा व घराचें पत्र

छ मो अजम जमीदार शाहार कल्याण मामलेदार मुरंजन यासी नारायण बल्लाळ सुभा सलाल सीतेन मयातेन व अलफ गणेशजी नाईक अणजूरकर सरपाटील प्रांत साष्टी याणी हुजूर विनंति केली कीं आपले घर कसबे मा। कोटाबाहेर आहे. जागा संकोच हाई स्थल असल्यास सोयी होईल त्यास गंजाचे पश्चिमेस आपले घराचे पूर्वेस मलाव्याची जमीन लागली आहे कृपाळू होऊन दिल्ही यास उपयोगी पडेल म्हणून त्यास वतन सदरहू जागेची चौकशी करितां सरकार जागा लागवड होती परंतु याची अडुपत जाणून जागेची मोजणी करविली मोजणी बिघे बिघे

कुल लांबी काठ्या १३ अर्ज रुंदी काठ्या ६

एकूण पांडेच्यार ४ मोजणीस आली तिचा धारा माफ करून याचे स्वाधीन केली असे येविशीं यास सरकारचे पत्र करून दिल्हे आहे. तरी जागा याजकडे चालवित जाणे या पत्राची नकल घेऊन पत्र यास भोगवटी करितां करार ...... ताऊ देणें जाणीजे २॥। छ १५ माहे सफर पाऊ हुजूर

(तीन सह्या आहेत)

१६

आबाजी खंडेरावास विठोजीचे पत्र

राजेश्री आबाजी खंडेराव मु. पुणें गोसावी यांसी—

छ अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्ये राजेश्री विठोजी नाईक अणजूरकर सरपाटील राम राम विनंति व विशेष. तुम्हास जातेवेळेस जें सांगावयाचें तें सांगितलेंच आहे त्या प्रमाणें तुम्ही करालच यानंतरी चिरंजीव मोरोबाजी मार राजेश्री बाळाजी केशव यास लिहिला आहे. हें पत्र चि. राजश्री बालाजी नाईक यास दाखवून त्याचे तुमचे विचारे पत्र यास घ्यावे आणि बालाजी नाईकांचे वडिलांच विचारें ठरल्यास करावे कीं, बालाजी बाबास सांगोन युक्तीनें युक्तीनें याजपासून श्रीमंत राजश्री आपणास समजाऊन महालकरी यास पत्र द्यावें कीं सरपाटील याचा व आमचा घरोबा नाहीं विठोबा नाईक वडील त्याचे आज्ञेंत भाऊबंद वर्तन नाहीं. लहान धाकले तुम्हाजवळ सांगतात तें ऐकूं नये. कोणी आल्यास त्यास सांगावें कीं तुमचे वडील घरी आहेत त्यास सांगावे यैसे पत्र तुमचे उभयतांचे विचारास आले तरी बाळाजी बाबा यांचे हाथून युक्तीने घेऊन पाो अैसे पत्र आले तरी याचा चालविल मोड नाहीं. तरी हे फारच चढून गेले आहेत कळावे बहुत काय लिहिणे. असो लोभ करावा ही विनंति.

१७

शंकराजी केशव याचे पत्र

श्री

२७-३-१७३७

श्रीमंत राजेश्री आप्पा स्वामीचे सेवेसी—

विनंति सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंति तागायत छ ६ जिल्हेज पावेतों मुकाम बाहदुरपूर सुखरुप असो, विशेष राजावळीचे उतारावरी आलो. लागे येऊन भेटले त्यास टोपीकरास लस्कर येत ही आवाई होती त्यामुळें तमामखाडी किनाराचा बंदोबस्त केला. दोनसें माणूस बंदरावर, तीस माणूस राजावलीचे उतारावर होते व बाजे उताराचाहि बंदोबस्त केलाच होता. जाग्रत फार दिसोन आली व लागीयाचे

विचारे झाले की, चौकी मारून यावे, आणि मुख्य स्थलास जावे त्यास शनिवारी आवसीचे प्रहर रात्रीस राजावलीचे उतारावरि आलो सवाधे माणूस लागे याचे. विचारे गलवतावरी घालून, तीस माणूस राजावलीचे उतारावर होते ते मारून टाकिले. ते समयीं बोभाट जाहाला समीप चौकिया होत्या. त्याणी यैकताच खबरदारी केली. आंत अुतरोन जावे तो खाडीस पाणी भरले मग इलाज नाहीं यैसे दिसून आले मग लोकांवर बलात्कार करून दोनशे माणूस हत्यारे समेत खाडींत घातले. ते पार जाहाले परंतु लोकांची हत्यारे कित्येक बुडाली व पांघुरणेही बुडाली परंतु आगरात णये घातला इतकाच अर्थ जाहला. थोरवे कार्य यामुळे न (च ?) जाहालें नाहीं. हेच गोष्टी श्रमे करून साध्य जाहली मेहनत केली ते परस्परे विदित होईलच प्रमाण पुढेंहीं गंगाजी नाईक याचे व लागीयाचे विचारे जाले तरी मुख्य स्थलाचा विचार मनास आणून वरकड हे जागे स्वामीनी पाहिल्यावर पुढें कित्येक जागे सोडवावयाचे त्याची विचारणा करावी लागेल हे विज्ञाप्ती.

पै. द. रु. ३४ पत्र २१

१८

खंडोजींचे पत्र

" यानंतर इकडील वर्तमान आम्ही बातमी करितां माणूस पाठविले होते ते छ २९ साबानी संध्याकाळीं येऊन पोहोचले. त्यासही वर्तमान सांगितले कीं, जूना जराल ठाण्यास होता तो गोव्याहून आरमार फराजत मोठें .... घेऊन आला असे तो येऊन ठाण्यावर कपाळ फोडून मरावें कीं ठाणें उठवून लावावें यैसा निश्चयेतार्थ केला आहे वाईच (वसईची ?) बातमी बावूजी (बुवाजी) नाईक अणजूरकर याजकडील यैसीच आली आहे. "

खंडोजी माणकरांचे पत्र रामचंद्रपंताना पे. द. स. ३४ पत्र १३१

१९

कल्याणचे हकीकतीचे पत्र

" आजी कल्याणास आलो ...... कविला सुद्धा मातवर माणूस गोमांतकास गेले हा परमदुष्ट आहे, हिंदुचे दर्शन कार्यास नये स्वामी आज्ञा करतील तर मुख्य

स्थलाचा कारभार आम्ही आमरावतीहून उरकून येविशीचा ...... अर्थ सांगोन आपणाकडे बुवाजी नाईक रवाना केले आहेत ते विदीत करतील .... वरकड इकडील वर्तमान सविस्तर मशार निले मुखवचनें करून सांगता कळो येईल "

पे. द. समा ३४ पत्र २७

२०

खंडेराव बल्लाळचे आप्पाना पत्र

कृष्णाजी नाईक अणजूरकर याजवर रामाजी महादेव यानें आरोप केलेले आहेत त्याचा इन्कार त्यानें खंडेराव बल्लाळजवळ केला तो इन्कार खंडेराव यांनीं आप्पाना कळविला आहे. झाडे तोडणे वगैरे आरोप रामाजीपंतांनीं केले आहेत हातभट्टी चुना वगैरेची व्यवस्था रामाजी महादेव व कृष्णाजी नाईक यांचेकडे सोपविली होती.

पे. द. स. ३० पत्र २६७

२१

कृष्णाजी नाईक यांचे आप्पास पत्र

छ १४ सफर श्रीमंत राजश्री आप्पासेवेसी सेवेसी.

च्यरणरज कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी महादेव वगैरे सरदार मो॰ ठाणें मालाड स॥ नमस्कार अनुक्रमें दंडवत विनंति उपरी. येथील वर्तमान जाणून ता॥ छ १२ सफर पावेतो या प्रांतीचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आज पहाटेस च्यार घटका रात्रीस गलबते तीन घेऊन गनिमाची स्वारी येरगलचे तारीयावर येऊन लागले. त्यास येथून आम्ही अगोधरच पालथी पाठविले होते. ...... परंतु मुकाबला होऊन आला नाहीं मौजे येरगल गांव तमाम जाळून आलो...... विशेष पोस ठाकूर वरकंदाज शिपाई जर्दाद चाकरीस राहवयासी आला असे. कल्याणास याची वस्ती आहे. शिपाइ खबरदार असे तैनांत करार करावयाचा हुकूम करणार. वडील समर्थ आहेत शिपाई चांगला आहे तैनात रुपये ८ आठ करावयास आज्ञा केली पाहिजे तैनात करार जालेयावर चाकरी मुरारजी नाईक यांचे जमावांत करील सेवेसी विदीत होय. हे विज्ञापन. "

पे. द. स. ३४-३०

२२

मुरारजी नाईकांचे आप्पास पत्र

श्री

श्रीमंत राजाश्री आप्पा स्वामीचे सेवेशीं

" आज्ञाधारक मुरारजी ना॥ अणजूरकर मो॥ देऊळ मोताईचे कृ॥ सा॥ दं॥ ना॥ छ १० माहे जिल्हेज पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सुखरूप असो विशेष सामान प॥ ते पावलं वि.॥। रा॥. कानोज मानकर याचे बरोबर दारू १ केले २ व नारायण गडकरी यांजबरोबर सामान वि.॥ ५ पहारा ४ कुऱ्हाडी २ कुदळी ४ दारू केले १००० गोल्या एकूण १५०० येणे प्रमाणें सामान पोचलं. ...... वेसावे याचे कोटास रवाना केले आहे वेसावे याचे पत्र आले नाहीं परंतु कोट फत्ते जाला यैसा दिसोन येतो. विशेष दारु गोलीचा वेशमी केली पाहिजे तोफा पाठविल्या नाहीत तरी तोफाची मारग लक्षीत आहों ...... हिशेब तोफास अडसेरी देणे म्हणोन पत्र आले परंतु सबंध गांव ओसाड पडले आहे ...... कांहीं भरतीस लोक पाठवावयाची आज्ञा केली प॥ सेवेसी विज्ञापना.

पे. द. रु. ३४ पत्र २०

२३

कृष्णाजी नाईक यांचे आप्पास पत्र

श्री

छ १५ जिल्हेज श्रीमंत राजश्री आप्पासाहेबाचे सेवेशी.

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी माहादेव म॥ मालाड च्यरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार अनुक्रमे दंडवत विनंती विज्ञापना. ता॥ छ १४ जिल्हेज पावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विशेष हुजरून पेरदेल १ रतन पुरो याबरोबर पाठविला तो पावला उद्यापासून भटी रचायधयाचे काम चालीस लावतो आज मजूरदार ५०० जमा जाहाले काम निकडीने चालवित असो. विशेष. लाकडे तोडावयाची ती तोडली याउपरी यास इथें ठेवावयाचे काम नाही. आणखी पाहिजे तर शिपाई लोक तोडतील इतके असोन काबाडीयास नक्त दरमहा रु. ४ व दररोज १॥ तांदूळ प्रमाणें द्यावे लागतात येकूण सरासरी दरमहा दर नंबरी रु. ७। सवासात पडतात

येकूण सदर १९ असामीस दरमहा रु. १३७॥ द्यावे लागतात इतके असोन त्यांच्यानें याउपरी दुसरे कामकाज होत नाहीं.

पे. द. रु. ३४ पान ३०

२४

कृष्णाजी नाईकाचे बुवाजी नाईकास पत्र

श्री

" श्री सकल तीर्थस्वरूप श्री. बुवाजी नाईक मु॥ ठाणें वडिलांचे सेवेशी "

अपत्यासमाने कृष्णाजी नाईक मु॥ मालाड चर्णावर मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणून आपले क्षेम लिहित गेले पाहिजे विशेष धारावी-कडे बातमी आणावयासी माणूस रा। केले होते त्याणे येथून सांगितले कीं धारावीस फिरंगेयाचे माणूस पांचशे आहे. दोन बंदरामध्ये दोन मचवा तरत्या आहेत... माहीमास माणुस पाठविला तो जुना जेराल होता तो कोरलेचे किल्येवर बंदोखान्यात... बाहेर आरमार फिरते ते संभाजी आंगरे व हबशाचे वडिलास लिहिले असे बहुत काय लिहिणें कृपा असो हे दीजे हे विनंति "

२५

पुरवणी पत्र

श्री

चिरंजीव नारायेणजी नाईक चिरजीव कृष्णाजी नाईक याचा कागद बातमीचा जात असे तो मनास आणणे संभाजी आंगरे याचा आरमार दर्यांत फिरत आहे त्याची (त्याणी ?) च्यार तारवे धरून नेली २ सीधीयाचे २ फिरंग्याची संभाजी आंगरे याचे सख्यत्व असते तर मोठासा मनसुबा होता परंतु खावंद आपले कोटून आईकणार आणि मानिलेयास हाती धरून आपले कार्य करून घ्यावे आक्षेकर इकडून गेला त्यास आम्ही पूर्वीच येत्न केला होता. परंतु अंताजी पलशायाने त्यास पोटीसी घातला आहे हुजुर

पाठविला आहे त्यास तुमच्याने जितेके त्याचे परिपत्य करवेल त्यास कधी चुको नये... मुंबईसी तारवे येतात जातात त्याचा हक्क आम्हांस येत नाही दिवाणातही येत नाही ”

पे. द. रु. ३४ पत्र ८२

२६

कृष्णाजी नाईकाचे आप्पास पत्र

श्री

श्रीमंत राजश्री आप्पासाहेबाचे सेवेसी.

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी महादेव मु॥ मालाड चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार अनुक्रमें दंडवत विज्ञापना. ता छ १४ जिल्हेज पावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विशेष मजूरदार आठगांव ता॥ पैकी पंचावन आले त्याबरोबर लोखंड वजन पके २॥ मण पेंढ व ३ तीन मण येणेप्रमाणे पाठविली येणेप्रमाणे सोला मण जिनस पावला पेदरेल लवकर पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत रा. गोपाळराव कानडा याचे जमावास रोजमुरा पावला नाही घ्यावयासी आज्ञा केली पाहिजे हुजरून तीस चालीस रु. देवावे हे विज्ञापना ११

पे. द. रु. ३४ पत्र १०३ सन २३-३-१७३८

२७

मदनाजी नाईकाचे आप्पास पत्र

श्री

श्रीमंत राजश्री आप्पासाहेब साहेबाचे सेवेसी

“ विनंति सेवक मदनाजी अणजूरकर हवालदार किल्ले श्रीवर्धनगड सेवेसीं दंडवत विज्ञापना ता. छ १० माहे रावेलावर पावेतो किल्ले मजकूरचे व आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष किल्ले मजकूरचे भरतीविशे पूर्वी सेवेसी एक दोन विनंती-

पत्रें पाठविली. परंतु किलेयाची भरती होऊन आली नाही तर हल्ली किले मजकुरी लोक भरतीस माणूस ५० आहे किले मजकुरी तेल व तुप व भात तंबाखू किले मजकुरी सामान येक सेर नाहीं परसोजी सरनोवत १ केले मजकूर यास दिवट्या देऊन सा पाठविली त्यास तेलाची रु. १॥ दिला नाही तर साहेबी कृपाळू होऊन सरनोबत याचे दिवटीस तेल द्यावयाची रु. १॥ पाठवावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत सेवेसी विदीत होय हें विज्ञापना.

पे. द. रु. ३४ पत्र १२२

२८

कांहीं किरकोळ पत्रें

पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी आजी कल्याणाहून पत्रें आली फिरंगी फिरंगाण प्रांतांत साष्टींत जितके हिंदु माणुस आहे तितकीयांची टीप, देखील पाचा वर्षांचे मुलापासून वृद्ध माणूस कुली टीपलेहून घेतली येक माणूस कोठें फिरवू देत नाही. जागा जागा चौक्या ठेविल्या आहेत गलबते लहानथोर सेंदीडसे जमा करून जागा जागा ठेवली आहेत. हिंदू माणूस तेथून बाटवणार म्हणून लौकिक आहे. याकरितां त्या प्रान्ती घोर आकांत जाहला आहे वर्तमान आपणास कळावे याकरितां लिहिलें असें. बहुत काय लिहिणें लोभ करित गेले पाहिजे हे विनंति १

पे. द. रु. १६ पत्र ११

२९

' सेवेसी विनंति आजी राजश्री बुवाजी नाईक अणजूरकर यानी रा. गंगाजी नाईक अणजूरकर यास पत्र पाठविले कीं ' स्वामी बुवाजी नाईकास येक दोन वेळा बोलिले कीं, तुमच्या माणसा समागमें शंकराजीपंत यास पत्र पाठविले त्याचे उत्तर अद्याप आले नाहीं ' त्यास तेच पत्र गंगाजी नाईक याणी आम्हास दाखविले त्यास स्वामीनीं तों " पत्राचें उत्तर राहिले " म्हणून लिहिले नाही. बुवाजी नाईकानें लिहिलें.

पे. द. रु. १६ पत्र १९

३०

(क)र्णाजी शिंदे शिवजी नाईक अणजूरकर या समागमें पन्नास माणूस देऊन फिरंगणांत स्वारी करून फिरंगणाची दोन कुल उदमी धरून आणिले ऐसे सांगितले.

पे. द. रु. १६ पत्र २३

३१

' त्यास स्वामिनी आज्ञा केली कीं, कल्याणास जाऊन राजकारण ठीक करून रा।। अंताजीपंत, गंगाजी नाईक व भिकाजी नाईक या त्रिवर्गास पाठवावे... दहिवली येथे भिकाजी नाईक भेटले... नेरळावरी अंताजीपंत भेटले... गंगाजी नाईक कल्याणास होते त्यास रातोरात आणून बोली मनास आणून अंताजीपंत व भिकाजी नाईक यास स्वामीकडे पाठविले... गंगाजी नाईकास कल्याणास नेले यासही दो चौ दिवसा पाठवितो. ''

पे. द. रु. १६ पत्र ३४ सन १७३७

३२

" आम्ही येथून गंगाजी नाईकाचा जावई गणोजी नाईक (१) व खलोजी जासूद व खंडोजी धुडे यास पाठविले त्यास हे तिथें गेले. कपितानची भेटी जाहाली... सोईरे-धाइऱ्याचे बोलावरून समर्थास वचन दिले त्याप्रमाणें आपण सिद्धच असो... जो दिवस नेमला त्यास अंतर न करितां ते दिवशीं यावे... मायेत असतील त्यास सांगणें ते सांगितले आहे परंतु पैका पाहिजे.

पे. द. रु. ३४ पत्र ६

३३

विनंती, उपरी गंगाजी नाईक अणजूरकर यास— जाऊन आजी पंधरा सोला दिवस जाहाले. अद्याप कांहीं कळत नाहीं. जरी कार्य करणे असेल तरी अशा प्रसंगांत कसें करावे प्रस्तुत जनराल ठाण्याहून वसईस जाणार आहेत. अशा मध्यें कार्य करावे.

पे द. रु ३४ पत्र ३८

३४

नारायणजींचे पंतांना पत्र

(ग. गो. नाईकांचे दप्तरांतून) २६।१०।१७४४

श्री

श्री राजश्री...... पंत

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक आज्ञाधारक नारायणजी ना. अणजूरकर सरपाटील चरणावर मस्तक ठेवून सा. दंडवत विनंति ता. छ २१ सवाल पावेतों स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र आले कीं गनीमांचे बातमीचे वर्तमान वरचेवर आणऊन लिहित जाणे. आज्ञेप्रमाणें गोव्याकडील वर्तमान आणविलें आहे. सेवेसी श्रुत होये. गोव्या समीप मुरुमगांव म्हणून आहे तेथे पुरुतकालाहून पातशाही रक्ताचा मातबर फिरंगी येवोन राहिला आहे त्याजबरोबर फौज ढोणे (परकी खलाशी) सुद्धा सा हजार आहे (६०००) मागोन दुसरी साहुकार गोप येणार (गोप : जहाजाचा प्रकार) त्यामध्यें चार हजार ढोणे येणार आहेत. त्यांचा मार्ग लक्षित राहिला असे. रेढीकरासी व गोवेंकरासी युध्यें लागले आहे; परंतु तो पुरुतकालाहून फिरंगी आला आहे; त्याणे कांहीं गोवेकरांची मजत केली नाहीं; सवासे माणुस मात्र दिल्हे होते तितक्यानीच रेढीकरावर इतका उपद्रव केला व मुंबैस ज्याव देसोजफरास फिरंगी आहे त्याणी दोन गुरावा तयार करून आणीक धाकट्या गलबतांचे सज सरंज्यामामध्यें आहे माणकोजी प्रभू मुंबैकर त्यास ज्याव देसोज फिरंगी याणें राजश्री आगरे याजकडे पाठविला होता त्यासी बोली केली आहे कीं, तुम्ही आमचे साहित्य करावे आमचे कार्य जाल्यानंतर रेवदंडे तुम्हास देऊन ऐसी बोली करून मुंबैस आला मुंबैहून ज्याव देसोज मजकूर याणी गोव्यास माणकौजी परभू मजकूरास फत्तेमारी देऊन रवाना केला आहे. तो अद्याप आला नाही हे वर्तमान तेथें आहे. गोव्याकडील वर्तमान तरी स्वामीस तिकडून येतच असेल. ऐसे असोन राजश्री रामाजीपंत येथील अंमलदार यांसी बहुत दिवस लागले कां जर पाण्यांतील गनीम केव्हां काय होईल हे न कळे परंतु भरवंसा समर्थ सेवकास आहे कीं, स्वामीचे तेज्यापुढें कोन्हाचे कांहीं चालणार नाहीं हाच दृढ विश्वास धरून चित्ताचे समाधान करून खुशाल आहों. प्रांत मजकूरचे वर्तमान येंदा हस्तीचा पर्जन्य येकंदर पडला नाहीं, तेणे करून पिके दगावली रयेत तो नातवान (?) तजावजा जाली आहे. हे जागे जंजिरे येथील रयेत तेच स्वामीचे धन येदर्थी विस्तारें सेवकानीं काय लिहावे। रयतेचे प्राक्तन कमी म्हणून स्वामीचे पायें या प्रान्ती लागत

नाहीं. येक वेळ या प्रान्ती पाय लागल्याविणा रयतेचे बरें होत नाहीं. फिरंग्याचा धारा कठीण होता. कुलव्यास निमे दाणा राहात नाहीं. जे होईल ते न्यावे. पुन्हा खाया खर्चास घ्यावे ऐसे करोन सारे फिरंग्याचेच घरी जात असे. ह्या सान्या गोष्टी श्रीमंत कैलासवासी याहीं ध्यानास आणून अभय दिलें होते कीं फिरोन आल्यावर नवाच धारा बांधोन देतो. कुलव्यास दोन भाग राहते आणी सरकारात येक भाग होई, ऐसे अभये होते. ते गोष्टी तैशीच राहिली ऐसे असोन यंदा पाण्यानें दगावले आहे त्यास हुजूरून येक कारकून येऊन पिकें मनास आणोन कांहीं उस्तवारी रयतेची करणार स्वामी समर्थ आहेत. नाहीं तरी यंदा रयतेचा कठीण काल आहे सेवेसी श्रुत होये. चकोर चंद्राप्रती लक्षीतात तद्वत स्वामीची वाट बहुत जन पाहतात हे विज्ञाप्ती.

२५

नारायण नाईकांचे स्वामीस पत्र

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून) ८-११-१७४४

स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक नारायेणजी नाईक अणजूरकर सरपाटील प्रांत साष्टी व तर्पे आटगांव दंडवत विनंति. ता. छ ५ जिल्हाद पावेतों स्वामीचे कृपावलेकनें करून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्तित असे. विशेष गनीमाचे बातमीचे वर्तमान गोव्यास फिरंगीयाचा जमाव १९००० एकोणीस हजार माणूस जमा जाले आहे त्याज-पैकीं रेढीवर कांहीं गेले. कांहीं गोव्यात आहेत. ज्याव देसोज फरास फिरंगी मागाहून मुंबैस ठेवलाच आहे तो सज सरंजाम मध्यें आहे. गोव्याहून चहुं लक्ष्याचा दारूगोळा त्याजजवळ आला मुंबैस येऊन दाखल जाहाला फरसेस व फिरगी येक हातीं आहेत फरसेसासी व फिरंगीचा पातशासी सोईरीक जाली. फरसेसाची बेटी पुरुतकालचे पातशास दिल्ही (Thir Rcems to be the danghlir donis XV of Frawel 17-5-1744) फरसेसानीं आंदणबेटीस मुंबै सोडऊन घ्यावी म्हणून संकल्प केला आहे. फरसेसासी व इंग्रजासी कांहीं वैर समंध होता म्हणून इंग्रेजानी मदरास (Madras was Capuired by Laboun donnasin on the is he actober 1746) त्याजवळ माणूस चोवीस हजार बरकंदाज आहेत. मदरास घेऊन तालचिठीवर (?) गेला आहे तालचिठी सोडऊन मुंबै-यावे. मुंबैस द्यावी आणि फिरंग्यास आपण घ्यावे येसी दाट खबर आहे. मुंबैस हवेल्या व झाड कोटाजवळ

होती ती तोड फोड करतात. काम तडक लागले आहे इंग्रजहि भयातीत आहे तो कांहीं भेट घेऊन स्वामीजवळ मदत मागायासी येसा मनसबा केला आहे. परंतु ते गोष्ट लटकी गनीमाची माव आहे. मद्रास घेतली खरीच; परंतु अंतस्ते समजले कीं, फिरंगी, फरसेस व इंग्रज एकत्र होऊन प्रांत मजकूरचे विचारावर आहेत बाहेर नानाप्रकारच्या कावा दावितात अंतस्तै येक जाले आहेत गोव्याहून मुंबैस ज्याव देसोज याजवळ रुपये पाठविले कीं, दोन हजार मुडे भात फासेसाठी घेऊन ठेवणें. रुपये मुंबैस आले. इंग्रजांची गुराब राजश्री तुळाजी आंगरे याणी धरली होती. ती येक वरीस त्याजकडे होती. ती माणकोजी परभू पाठऊन सोडविली. ज्यांव देसोज मजकूर यासी दरम्यान घालून यैक्य केले. फिरंग्याची मदत अंतस्ते करावी सावंताचा किल्ला नि हटगड व आणीक येक किल्ला घाटमाथा आहे तो व प्रांत मजकूरचे उरण यैसी तीन ठिकाणे मशारनिलेसना घ्यावी यैसा करार जाहला आहे. जनीमाची नेमणूक येणेप्रमाणें जाली आहे. दोन हजार माणूस व तीन फरगादे येसवंतगडास जावे. दोन हजार माणूस उरणावर, व दोन हजार माणूस बेलापूरावर व ठाण्यावर येता मौजे कानझूर येथें फौज उतरून तीही चहू ठिकाणीं येकदाच येलगार करावा. मुंबैस तीन कोट आहेत त्यासमध्यें कोट आहे त्यांत रणगाड चालवावयाचे करतात तेथ कोन्हास जाऊ देत नाहींत हें वर्तमान खरे आहे व फिरंग्याचे हव्ये कांहीं सुरतेस गेले आहे. तेथें जमाव होत आहे. फिरंग्याचा जमाव येकोणीस हजार व फरसेसाचा जमाव चोवीस हजार येकूण च्यालीस बेतालीस हजार बरकंदाज; अग्नीचा पूर त्याचा मोदली कोन्ह घेईसा आहे हे वर्तमान मुंबैकराचे आमचे इस्त मैत्र येऊन सांगतात कीं नाईक तुम्ही सावद होणे. श्रीमंत स्वामीस ईश्वरानें फार दिल्हे आहे. परंतु तुमचे घर बुडते आणि केले कर्म व्यर्थ जाते म्हणून आप्तविषयीं आहेत ते येऊन सागतात्त. सातान्याचे वर्तमान घडीघडीनें जे होते ते त्यास दाखल होते यैसी बातमी मुंबैकरानी राखिली आहे. आम्हीही त्याजकडील बातमी वरचेवर आणवितो आणी धन्यास लिहितो या पत्रा सुद्धां तीन पत्रे बातमीशी सेवेसी रवाना जाली आतां सेवकाचे लिहिले खरें वाटत नसेल या गोष्टीचे सेवकानें काय करावे ? स्वामीनें सेवकाचे वचनावर सामर्थ वेचोन सेवक खरा केला तो सेवक आज चिंतेचे पुरी पडला असे हे जागे धन्याचे तपोबले करून हातीं चढले; यांची बंदोबस्ती न करितां दगा आहे. मग ब्राह्मणाचा उपाय नाहीं स्वामी येसच्या किल्ल्यासारखे समजत असतील तरी तैसा विचार नाहीं. हे केवळ चक्रव्यूह टोपीकरास सर्व कुलुप्त (बल्क्या) आहेत. मुसकील हेंच कीं, पान्यांतील गनीम केव्हां काय होईल ते न कळे ज्याव देसोज मजकूर याजवळ कौल देखील रयेतीस आले कीं ज्याचा श्वधर्म त्याणी चालवावा फिरंग्याचे वेळेचे जे जे लोक आहेत ते त्यास इच्छित आहेत. सेवेसी श्रुत होई ही विज्ञाप्ति. (१७४८)

३६

पुरवणी पत्र

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना. आज्ञापत्र सादर जाले. सिरसा वंदीले राजश्री वजारतमाण याजवळ तुम्ही नसावेत यैसे वजारतमाण यांचे चित्तात नसेलच. तुम्ही तेथे राहून हुजूर यावयाचे न करितां सर्वहि करीत जाणे. म्हणून कृपाळु होऊन आज्ञा केली येशास राजश्री वजारतमाण साहेब धणी खावंद आहेत कैलासवासीने सेवक (लोक पदरी बाळगिले व स्वामी समर्थाचे सेवेसी (से)वक लोकांची निष्ठा रुपास येत गेली आहे. त्या लोकांचा संग्रह करावा हाच मनोदये मनःपूर्वक वजरातमाण साहेबांचा आहे व याचप्रमाणें आज्ञाधारकाचा सांभाळ करून स्वामी खांवदाचे आज्ञेप्रमाणें कैलासवासी जवळ सांगत व बोलत आलो होतो. विश्वास मानूनी वर्तन आले. स्वामीचे कृपेस पात्र जाहालो होते त्याच रीतीनें वजारतमाण विश्वास मानून स्वामी कार्याची पैरवी करितच आहेत मजला सनिध बाळगिले आहे. तथापि स्वामी समर्थाचे जागे जंजिरे पदरी आहेत. सवसार वोढीस पडला असे. धणी सरंजाम करितात. यातच न्यूनपूर्ण करून जागे जंजिरे याचे संरक्षण करावे मोहीम प्राप्त जाहाली आहे येथे सेवाचाकरी करून दाखवावी. कामीनी कामी माणूस पाहून कामी असेल ते चाकरीस उमेदवार करून शामलाचे पारी-पत्याचे कार्यामुळें कार्याच्या माणसास आधी देणे, सरस पाहून देणे, मागाहून देणे त्यास मागाहून घ्यावे. कैलासवासी वर्तमान असता मोठीमोठी कामें करीत आले. त्यामागें शामलाचे गलबत धरून आणले ते आणावे म्हणून धणी स्वामीची आज्ञा येतच आहे. त्या गोष्टी रुपास येत जाव्या म्हणोन आपआपले जागा धणी आमचे खावंद यजमान आम्हास चाकरीस बोलतील. आम्ही चाकर व्यंगे असेल ती यजमानास विनंति करून स्वामीनी आज्ञा सवरून केली आहे त्याप्रमाणें वर्तणुक करू जाता येजमानाजीची आज्ञा सेवकास, सेवकांची विनंति येजमानजीस होतच आहे. अविवेकी लौकिक करतील कीं, सावंदाचे चाकरीचे ठीक नाही यैसा लौकी महाराजाचे सेवेसी जाईल म्हणून विनंती लिहीली होती आज्ञेप्रमाणें निर्भयपणें वर्तणूक करीतच आहे हे विज्ञापना.

भाग आठवा

अंतर्गत व्यवस्थेचीं पत्रें

१

केरु वरलीकराचे पत्र

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

राजश्रीया वीराजीत राजमान्य राजश्री जगन्नाथ नाईक व आबाजी नाईक सरपाटील मुकाम अणजूर स्वामी गोसावी यांच्या सेवेसी.

सेवक केरु लाडकोजी वरलीकर वास्तव्य हल्लीं मुंबई गिरगांव कृतानेक साष्टांग दंडवत विनंति येथील क्षेम जाणून श्वसंतोष लेखणाज्ञा करीत असीले पाहिजे विशेष मज गरीबावर कृपा करोण आपण आपले पत्राचा लाभ घडवोण आणिला तेन्हे करोण फार आल्हादीत जाहलो पत्रान्वयान्हें सेवेस सादरत्वाविसी मजला फार उद्दीतता केली आहे. परंतु मजपासोण ईश्वर काये मीळवोण आणन्हार असेल तीच ईश्वर सत्तेने

घडी येईल. परंतु येसाच्च सांभाळ आपण सदैव करत गेल्यास थोर लाभ माणीला जाईल तर पत्राज्ञाकरिता अनमाण न करावा राजश्री बाळाजी नाईक व भास्कर नाईक येथोन घरी गेल्यावर × × × याची कागदपत्रें काय जी आम्हावर सोपोन गेले होते ती तयार करोण ठेविली आहेत. त्याचा मार्ग जनराल साहेब मुंबईत होते तेव्हां लक्षीतच होतो त्यांचे आज्ञेप्रमाणें त्याजवर साहेब सुरतेस गेले आणी राजश्री बाळाजी नाईकास गुंता पडला तों आपले पत्र आले त्यांत कळो आला असो जनराल साहेब सुरतेहून येद्यापि मुंबईस आले नाहीच आपले लिहिणें आहे कीं, आठा दाहा दीवसावर आवणीचे दिवस आले तर हें प्रसीद्धच आहे त्यास सांप्रत लौकरच यावे अैसी अगत्ये दिसत नाहीं लावणी सुखरूप होवो त्याचेनंतर येण्याविशीं आक्षोप योजावा जीतक्यांत आम्हास लौकर प्रयोजन दिसले तर सेवेस पत्र पाठवो बहुत काय लिहिणें ही विनंती. मिती आषाढ शुद द्वितीया भौमे

छ राजश्री बाळाजी नाईक व भास्कर नाईक व बाबाजी नाईक व सर्व आप्त मंडळी यास माझे दंडवत व कर जोडोन श्रुत व्हावे लोभवृद्धी करीत जावी हें विनंती.

राजश्री जर्नादन हीराजी दंडवत विनंती लिहविली असे.

२

करारनामा

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

यादी करारनामा अणजूरकर सरपाटील सु॥ सबा सयानीन मया अलर्फ मौजे अणजूर ता॥ आटगाव येथील जमा वसुल बाकीचा कारभार आजपावेतो पाचजण करून समागीत खर्च करीत होता परंतु सार्‍याचा निशा न पडे, सबब हाली हेरंभ नाईक यासी सार्‍यानी मिळोन कारभार सांगितला आहे तरी त्याणी सार्‍यास तक्षीमा येथा विभागे नक्ता व भात वसुली येईल त्याच्या तक्षीमा वाटून घ्याव्या सेवसबजी वगैरे पडले पान येथाविभागें सर्वांस वाटून घ्यावे येणेप्रमाणें करार करून गावाचा बंदोबस्त हेरंभ नाईक याजकडे करार करून दिल्हा असे तरी आपण गावांत परभारे भाताचे दान्यास व नक्तास सीवणार नाहीं. गावची जमाबंदी व खर्च करणे तो सर्वांविचारें करावा. कुलास कोणी तसदी केल्यास त्याचे सुतीचा जाब करावा सदरहू प्रमाणें करार करून

दिल्हा असे. यासी कोणी अंतर करून वाकडा चालेल त्यास देवाब्राह्मणाची शपथ असे मिती मार्गसीर शुा। ५ सके १७०८.

सही

सही बापूजी गणेश नाईक

सही मोरोबा नाईक

सही आबाजी नाईक

सही बाळाजी नाईक

सही वीठोजी नाईक

सही जगन्नाथ नाईक

सही

सही हेरंभ गंगाधर नाईक

सदरहू प्रमाणे आपणास मान्य असे कारभारसमध्ये तुम्हा चौघासी अंतर करु तरी आपणास हीच शपथ असे कोणे गोष्टी वीसीं तफावत होणार नाही

सही

बी।। बाळाजी नारायेण जोसी

३

पाचांचा तहनामा

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री गजानन

तहनामा समस्त सरपाटील पाचं भाऊ मौजे अणजूर ता. आटगांव सु।। इहिदे तीसेन मया व अलफा शके १७१२ साधारण नाम संवसर माहे माघ शु।। ७.

मौ।। मजकुरचे खाड्याचे बंदिस्ती मोठी खाडी फुटेल त्याची बंदिस्ती करणे तरी च्यारे गावचे कुलबी मेलवून बांधावी कलम १

खडपाचे खाडीची बंधीस्ती साला बाज करतात त्याप्रमाणें चहुगावानीं करावी. कलम १

खाडीचे देणे पाग आसु व मस्ताफ खाडी उत्पन्नावरहुकुम तक्षीमा पाच कराव्या. कलम १

श्रीगणपतीचे उछावास वगैरे साल समधी खरच पडेल तो पाचानी द्यावा. कलम १

श्री ठाकुरद्वार व मारुती व श्री विठ्ठल व श्री सीवालय यांचे वर्षासन आहे ते सर्वांनी घ्यावे. कलम १

१-१० श्री गणपतीचे नीवेद्यास भात गोडे सर्वांनी घ्यावे. कलम १

१५ नैवेद्यास

२० मोहछाव गोसावी

धर्मदाय येनर्जनसी व नस्तीवा याद सर्वांनी घ्यावी. कलम १

सदावर्तास भात गोडे सर्वांनी येकाचे स्वाधीन करावे. कलम १

नांव लौकिकाकरतां अतीत अभ्या गत व हरिदास व ख्याल तमाशा येईल त्यास सर्वांनी बिदाई करावी. कलम १

वर्षासने नेमणुकी आहे ती सर्वांनी चालवावी. कलम १

ताडाची मस्त पाहाणी करून हली लागवड असतील त्याचा आकार जो होईल तो येथाविभागे चहु गावांचा. हली उमेदवार झाडे व तर कपानीपुढें व पुढें लागवड होईल तीचा आकार येथाविभागे सर्वांनी हसे लावून घ्यावा. कलम १

खारी जिनस सेव सबजी ता॥ मजकूरची जी येईल ती पाचानीं वाटून घ्यावी. कलम १

माहे तर्फा येणेप्रमाणें

(१) दुकान वाणी पणाची
(२) सोनार (५)
(३) तेली (६)
(४) न्हावी (७) चांभार

याचा आकार होईल तो सर्वांनीं घ्यावा. कलम १

सेत खारे गोडे मौजे अणजूर पाखाड्यासमेत पाचा वाटण्यास कमी जास्त जाहाल्यास ज्याचे वाटणीस जास्त कमं होईल ते घ्यावे द्यावे. कलम १

पुरातन पुजी पाटीलकी समधे तुम्हास खारे आदमण व गोडें आदमण साल दरसाल समाईक येक जागा उगऊन पाच तक्षीमा आपल्या पाच व साहावी तक्षीमा येकूण नांव बाबू ×× ता॥ येकूण साह तक्षीमा येथाविभागे वाटून घ्यावे. कलम १

४

(नकल)

अलीमघर अणजूरचा पाडा

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

राजश्री सरपाटील अणजूरकर गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्री. मालजी पाटील बीन चांग पाटील व चांगो पाटील बीन हाल पाटील कान पाटील बीन उदर पाटील व नागो पाटील बीन

रामजी पाटील मजरे आलीमघर मौजे अणजूर ता. आठगाव रामराम विनंति विशेष मजरे आलीमघर हा पाडा प्राचीन अणजूरचा असता आपला भाऊ घार पाटील बीन बाम पाटील यासी व राजश्री मोरोबा नाईक यासी भाताची उडवी घारपाटील याची झोडून नेली त्याजवरून सालगुदस्ता कटकट होऊन आपस्याचे मुकामीं घार पाटील याणी लेहून दिल्हे कीं, आलीमघर गाव वेगळा आहे सरकारात लेहून दिल्हे परंतु आलीमघर अणजूरचा पाडा प्राचीन खरा घारपाटील याणें अदावतीनें वेगळा गांव म्हणोन लिहून दिल्हे तें खोटे येवीसी सरकारातोन ही मनास आणोन पाहता प्राचीन पाडा आलीमघर अणजूरचा.

५

जामीनकदमा

(श्री. ग. गो. नाईक यांच दप्तरांतून)

श्री

राजश्री मोरोबा नाईक सरपाटील अणजूरकर याजकडे

जामीन कदमा बो काना म्हणेरा अणजूरकर सुमा आर्बातीसने मया अलफा कारणें लेहून दिल्हे ऐसीजे कृष्णा कान पाटील आलीमघरकर हा मजरे मारीहून मौजे चाहिंदे येथें परागदा जाहाला होता त्यास तुम्ही येच गावीं आणीला त्यास आपण यैकास हजीर जामीन असो वैशाख आखेर पावेतो ज्यावेळेस तुम्ही बोलवाल त्यावेळेस आपण हजीर करून देऊ दीमत धरणार नाहीं हें लेहून दिल्हे सही शके १७१६

साक्ष

लि॥ प्रो. बाबूराव घाटगे — नी॥ नागर =

नी॥ रामराव अनंत १ — बी॥ बापुजी खंडेराव

६

(नकल)

जुना इनाम तक्ता

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

...... सिवजी नाईक अंणजूरकर याजकडे ता. आठगांव येथील सरपाटीलकीचे

वतन मौजे अणजूर हा गांव सरकारातून इनाम आहे त्याचा आकार बद्दल अजमास

प   नस खातीस ने

४२८॥ हक सरपाटीलकीचा

१७।= नक्त

४११८= यैन जीनस

३३४८= भात गोडे केली

२१॥= आकार खंडीसी १६ प्र.

भात सर केली ५॥ पैकीं

आकार खंडी रु. ॥ १२ प्रमाणें

४११८=

४४२०॥ इनाम गांव मौजे अणजूरकर तक्षीमा २

एकूण आकार   रुपये

२२५८= नक्त   रुपये

४१९४।= यैन जीनसी भात

ये ता. रुपये

२६६३॥= भात गोडे केली

१६६/४॥।

दरखंडी ता. ०६

१५ ३०॥ भात सेर केली खंडी

१२७॥१।०॥ दर खंडी रु. १२ गोडे

४४२०॥   ४१९४।=

४८४९

तपशील

८०८ ८=॥ साहावी तक्षीमा नी॥

नारायणराव हसबनीस

४०४०॥।-॥ नी॥ अणजूरकर सरपाटील

७

बावल्याचे खोपरे माफी इस्तावा

(श्री. ग. गो. नाईक यांचे दप्तरांतून)

श्री

श्री. पांडुरंग विठोजी नाईक सरपाटील वो······ ······ता. भिवंडी ता. माहादु बाल पाटील व हेद्रया गंध्या पाटील व दुंद्या गोवच्या भोईर बेंड्या आबा पाटील वस्ती मजरे दिवे मौजे अणजूर सु।। आर्बा खलासेन मया ते व आन्व कारणें तुम्ही वळून आम्हीही येवून अर्ज केला कीं सेत बावल्याचे खोपरे रा। २० खार वीस मणाचे आहे ते तुमचे आबादाणीवर नजर ठेऊन त्याचा ठराव उक्ता ढेप खार साले येणेप्रमाणें सदरहु साले नव त्याप्रमाणे माफी साले ६ व विस्तावे साले ३ तीन

शके १७७५ ते ७६ तागाईत शके १७८० पर्यंत

येसी साले ६ वईस्ता वा साले ३

७ शके १७८१	७ शके १७८३
७ शके १७८२	० लग
१४	७

२१

सदरहु तुमची साले माफीची पुरी जाहाल्यावर आमची विस्ताव्यामधील साले तीन मिलोन भात फेर दरसाल मण ७ सात मिलोन तीन साले पर्यंत फेर २१ देऊ. तुमचे इस्ताव्याची साले पुरी जाहाल्यावर तुमचे सेत सालाचे स्वाध्यात करून देऊ सेत आमचे हगगईमुळे अस्तावस्त जाले असता कांहीं येक हरकत न सांगता दुरुस्त करून यासी कांहीं येक हरकत सांगणार नाहीं. साहावे साली बंदिस्त चांगली करून जसा खाडीचा वेढ असेल त्याप्रमाणें याचा वेढ करून तुमचे स्वाधीन करूं.

ह्या करारावरून व माथेखारी खाडीवरून उघड होत आहे की, खाड्या नीट बंदस्त होत नसल्यामुळें अशा स्थितींत त्या खाड्या माफी ईस्ताव्याचे पद्धतीने करार करून दिल्या जात असत हे खोपरे दिवे खाडींत आहे.

पत्रांचा खुलासा

शिवजी नाईक यानी १७४६ च्या सुमारास बाळाजी बाजीराव ह्यांस पत्र लिहून साष्टीतली हालहवाल व इंग्रजाचे हालचाल त्या पत्रानें कळविले आहे. रामाजी महादेव याना साष्टीतच ठेवण्याची सूचना त्यानी केली आहे. हे पत्र मागे दिले आहेच.

१

आतां इ. स. १७८३ च्या सुमारास केरु लाडकोजी वरळीकर ह्यानी जगन्नाथ नाईकास इंग्रज जनरलची सुरतेची वारी कळविली आहे व जनरल नसल्यामुळें कागदपत्र पोहोचविता न आल्याचेही त्यांत त्यांनी कळविले आहे.

मागील व ह्या अशा २ पत्रावरून दिसून येते कीं, पेशव्याचे बरोबर इनामदाराचे संबंध चांगले होते पण १७८३ च्या सुमारास हे संबंध दुरावून इंग्रजांचे बरोबर संबंध सुरु झाले. सालप्याचा तह इंग्रज व पेशवे यांच्यात इ. स. १७८२ त झाला. त्या तहान्वयें साष्टी ही इंग्रजाना मिळाली आधी १७७४ त इंग्रजानी ठाण्याचा किल्ला सर केला त्यावेळीं आनंदराव रामाजी पेशव्याचे ठाण्याचे सुभेदार होते. त्याचवेळीं म्हणजे इ. स. १७७४।१७७५ मध्यें इंग्रजानीं ठाणें येथें दरबार भरवला त्यास साष्टीचे सरपाटील हजर राहिल्यामुळें पेशव्यांनीं त्यांच्याजवळून ह्या गुन्ह्याबद्दल ७००० रुपय दंड घेतला. केरुचे पत्रावरून दिसते कीं, १७८२ पासून इंग्रज सरकार बरोबर, व शिवजीचे पत्रावरून दिसते कीं, १७४६ चे सालापासून १७८२ पर्यंत; पेशव्याबरोबर इनामदार राजकारण करीत होते.

२

इ. स. १७८६ मध्यें समस्त इनामदारानीं गावाचे वसुलीकरिता करारनामा लिहून हेरंभ नाईक ह्याना कुल अखत्यारी दिली. त्यानी एकट्यानी सर्व गावाची वसुली करावी व तक्षीमा वाटाव्या. सरकारांत एक तक्षीमा घ्यावी व २ तक्षीमा इनामदारांत वाटाव्या.

ह्यावरून दिसते कीं, इनाम गांव मिळतांच अणजूरचे हे पाच भाऊ आपापल्या गावांत वसुली करीत व प्रत्येक जण सरकारची १ तक्षीम पुरी करीत व आपापल्या तक्षीमातून हसबनीसाचा हिस्सा काढीत पण हे तितके जुळत नाहीं असा अनुभव आल्यानंतर त्यानी वरील करारान्वयें सर्व अधिकार हेरंभ नाईक याना दिला. हीच व्यवस्था

पुढें चालत राहिली असे दिसते. ह्या कराराचे तत्त्वाला अनुसरून गावांस मुखत्यार नेमण्याची प्रथा पडली. १८६१ साली ठाणेचे कलेक्टर बरोबर इनामदार यानी करार करून वसुलीकरितां व पुढील व्यवस्थेकरितां मुखत्यार दिलेला दिसतो. इ. स. १९०५ मध्यें सरकारने गांव जप्त केल्यानंतर हा मुखत्यार बंद झाला व सरकारी तलाटी चालू झाला.

३

इ. स. १७९० मध्यें पाचा भावांनी तहनामा करून ठरविलें त्याप्रमाणें देवस्थानें व इतर खर्चांची व्यवस्था करण्याचे त्यांत त्यानी नमूद केले आहे. उत्पन्नाची व्यवस्था त्यांत दाखविली आहे. ह्या तहनाम्याप्रमाणें पुढें इनाम तक्त्यांत सर्व तरतूद केलेली दिसते.

४

अलीमघर अथवा अलीवघर हा अणजूरचा पाडा आहे. वेगळा गांव नाहीं हें अलीमघरच्या लोकानी लिहून दिले.

५

इनामदारांना फौजदारी हक्क कसे होते हें ह्या पत्रावरून दिसून येते. परांगदा होऊन पळालेल्या इसमास अणजूरास आणल्यानंतर त्याचा जामीनकदमा इनामदारानी लिहून घेऊन त्यास जामीनकीवर सोडले.

६

इनाम उत्पन्नाची वाटणीचा जुना तक्ता शिवजी नाईकाचे नांवें केला होता त्याचा तपशील त्यांत आहे ह्यावेळी सरकार तक्षीम सोडून सर्व उत्पन्न ४८४९ होते. ही रकम इनामदाराच्या $\frac{२}{३}$ तक्षीमांची आहे.

७

बावल्याचे खोपरे माफी इस्तांव्याने दिले होते. त्यावेळी खाड्याचे बाहेरील बांध बांधले जाण्यास हाच एक विश्वसनीय मार्ग होता. माथीखारीचे प्रकरणावरून हें आपल्या लक्षांत आले असेल.

भाग ९ वा

परिशिष्टें

परिशिष्ट १ ले

श्री

पेशवे दप्तरींतील ताळेबंदाचा उतारा

ताळेबंद ता. आठगांव प्रांत साष्टी नीसवत रामचंद्र सदाशिव सुमासीत समानीन मया व अलफ ई।। अवलसाल ता. अखैर साल जमा बा। हीशेब रुपये यांत खर्चाचे पोटी खेरीज मुशाहिरा सदरात.

२२६८=इनामखर्च मौजे अणजूरनी।। सीवजी बिन निंबाजी नाईक सरपाटील मजकूर यास मौजे अणजूरपैकीं इनाम तक्षीमा दोन व सरकार तक्षीम येक येकूण दरोबस्त गांवचा आकार.

२२३	घरपट्टी
९१।।	ताडा बा।।
८।।	कोली डोली
१६।	मोहोतर्फ
८४८=	तंबाखुपटी दरोबस्त सरकारांत
४२३।=	पैकीं

पैकीं वजा सरकार तक्षीमे बा॥ वगैरे १९७।- रुपये बाकी इनाम दरोबस्त गावपैकीं तक्षीमा दोन येकूण आकार

बेरीज

नक्त २२६।८= खर्च गलाकोली ३१८/४८= खंडी

पैकीं वजा गला यैन जीनसी तालेबंदीपैकी खंडी ३१८/४८= बाकी नक्त रु.

श्री

पेशवे दप्तरातील ताळेबंदाचा उतारा

ताळेबंद ता. आठगांव प्रांत सास्टीनी॥ रामचंद्र सदाशिव सुमासीत समानीन मया व अलफे ई॥ अवल साल ता॥ अखेर साल जमा बा॥ हीसेब गला कोली बरुले साडेतीसरी मांपे

खंडी यात खर्चाचे पोटी खंडी

हुजूर विल्हे ३१८।४८=

शिवजी बिन निबांजी नाईक सरपाटील याजकडे मौजे अणजुर ता. मा. दरोबस्त गावच्या तक्षीमा तीनपैकीं सरकार वसुली तक्षीम येक व ईनाम तक्षीमा दोन येकूण आकार

खंडी

४४४।= यैन दस्त जमाबंदी समेत वृत्ति शिळोत्रे सुद्धां ४६४।= खंडी पैकीं वजा वृत्ती सीलोत्रे सालाबादप्रम णें आलाहिदा मु॥ सबब नउ (९) बाकी २० खंडी

३६॥।= खेरीज दस्त खंडी

३३।१॥ कसरभाडे यैन दस्त खंडी

४४४।=

३८३॥= दर खंडीस केलीप्रमाणें ८१॥

कौलीवर्तांला सरकार वसुली तक्षीमेवर गला केली १६२।३।

खंडी पंचवीसी मुडे १२९॥।४॥ दरमुडा केली ८॥ प्रा॥

३६॥.।=

४८०॥।=।= पैकी वजा सरकार तक्षीम १ एकूण आकार खंडी

१४८८=।१ येनहस्त

१४८३॥।१। खेरीज दस्त

११८८=॥ कसरभाडे दरखंडीस ८१॥ प्रमाणें

३८३॥= कौलीवर्तांळा तिजाई वसुलावर दरमुडा केली ८॥ प्रमाणे

१६२=।३ं७

बाकी ईनाम तक्षीमा दोन ये॥ आकार वा॥।

नेमणूक . खंडी

२९६।४॥= येनदस्त

१५७८=१ भादगोडे

१३९८४।१ भातखारे

२९६८४। =

२२८४॥ खेरीज दस्तकसर भाडे दर खंडीस ८१॥ प्रमाणे

११॥।·॥ भातगोडे

१०।४ भातखारे

२२८४॥

३१८।४८२ तपशील जिनस

१६८॥।-॥।१ भादगोडे

१४९॥३।१ भातखारे

३१८।४८=

हे दोन्ही उतारे सन १७८६ मधले आहत. सिवजी नाईक तोपर्यंत जिवंत होते. हे उतारे पेशव्याच्या दफ्तरांतील कागदातून १८८१ चे अर्जाकरितां तुकाराम बाप्पाजी इनामदार यांनी घेतलेले आहेत. हे तालेबंदीचे उतारे आहेत. पूर्वी अशा पद्धतीने हिशेब ठेवले जात.

परिशिष्ट २ रें

श्री. यशवंत नरसिंह केळकर यांच्याकडून आलेलीं पत्रें

वाई येथें वैद्यांचें दफ्तर चाळतांना मिळालेलीं पत्रें

॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री श्री आबास्वामीचे सेवेशीं ...

श्रीमंत आबा ह्यास शंकराजी केशवाचे अणजुराहून पत्र : विनंति सेवक शंकराजी सुदर (१) शेडे (१) कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ४ जमा दिलारवर पावेतो मुकाम अणजूर येथें स्वामीचे आसीरवादें करून

सुखरूप असे विशेष पेशजी रा. दादा वैद्य यांजबरोबर पत्रें पाठविली ती व हीसह पावलेच असतील सालमजकुरीं इकडे पर्जन्यामुळें पिकें पिकलीं नाहीत. जुजबी पीक मर्तिक दाणा जुजबी यामुळें सरकारच्या पहाण्या होऊन सुक व पोच आकार केले ते जमाबंदीत वजा करून बाकी ठराव त्यांत कांहीं वसुल कांहीं बाकी याप्रमाणें वइवाट वसई प्रांतांत जाहली. त्याप्रमाणें ता. आठगांव येथें ठराव ठरला परंतु पीक दावा बहुत कमी कोठें निमाई, कोठें चवथाई, कोठें अधविसावो तक्षीम, कोठें अजीच सुकले याप्रमाणें सर्वत्र बहुतेक जाहाले तेव्हा वतनदार कुलेली पराग पासून त्याच्या निवडण्या आणि ठराव होत होते त्याचे त्याणी आम्हास न कळविता श्रावण मासीच वाटण्या ठीक करून ठेविल्या असे समजण्यांत येत होंते परंतु तेच भाऊबंद येक येक फिरत तेव्हां मागती सई ऐसे दिवस लोटत आजपर्यंत आले ज्याचे तक्षीमेची वेटीची कुले त्याच्या लगामी थोडीबहुत कुलासही आशा कीं येक धणी जाहल्यास त्यास कांहींतरी दर्द तोटा न यामुळें बरें होईल तेही दिसत नाहीं. वसुल मोघम घेतात तिजाईवाल्याची सक्ती अवकाशानुरुप सरपाटलाकडून तिजाईबाबत न होई तेव्हां आम्हास तगादेकरून वसुल मागतील अर्थही नाहीं यामुळें कुले येणेप्रमाणें थकली.

१५ मोरडी (भरोडी) ३४ पैकीं. १५ अलीमघरें २५ पैकीं.१३, दिवेघरें ३६ पैकीं. अणजूर ४० घरें १२७ पैकी ७३ ये...... ज्याहात्तर.

कांहीं आसपास आहेत याप्रो हकीकत अस्तासरपाटील याचा येकोसा होऊन विचार पक्केपणें घडत नाहीं येकायेकाच्या कुलीसीही आहेत पुढें कसें करावें बंदोबस्त करून व कालपर्यंत कुले यावी ऐसे करीत आहे. घडेल ते खरे सेवेसीश्रुत होय हे विज्ञापना.

श्रीमंत आबा ह्यास शंकराजी केशवाचें अणजूराहुन पत्र : सदरहू पत्र शंकराजी यांनीं अणजूराहून ' आबा ' ह्यांना पाठविलें आहे. पत्रांत अवषर्णाचा उल्लेख आहे. त्याप्रसंगी उत्पन्न वीसपटीपर्यंत कमी होईल असें दिसतें. अणजूरातली ७३ कुले थकली आहेत सर्व इनामदार एकत्र न बसतां अलाहिदा प्रत्येक वसूल करितो त्यामुळें उत्पन्नांत येकोसा (येकोवा) नाहीं ह्या पत्रावरून दिसत आहे कीं, १७३९ नंतर महाराष्ट्राच्या सर्व भागांत कोणत्या ना कोणत्या मार्गानें अणजूरकर कार्य करितच होते. दुसऱ्या एका पत्रावरून दिसतें कीं, ही सर्व पत्रें शके १६९९ म्हणजे १७७७ मधली आहेत. ग्रंथात इतरत्र छापलेल्या पत्रावरूनही हेच सिद्ध होते.

टीप : सदरहू पत्रें वाईच्या वैद्य यांचे दप्तरांतील आहेत शंकराजी केशव ह्यांनी ही पत्रे अणजूराहून लिहिलेली आहेत ह्या पत्रांत अणजूरच्या संबंधानें बराचसा मजकूर आहे ह्यावरून म्हणता येते कीं अणजूरकर चौफेर राजकारणांत गर्क होते. इ. स. १९१२ मध्यें माझा भाऊ जनार्दन हा वारला अर्थात त्याचाआधी केव्हां १९०७ किंवा १९०९

मध्यें खालील हकीकत घडली आहे मी ठाण्यास राहत होतो माझा भाऊ ठाण्यात राहत होता तो त्यावेळीं ठाणें येथें एक्झीक्युटीव इंजिनीअरचे हापीसात ड्राफ्समन होता. एका दिवसी भर दुपारी एक उंच गृहस्थ घाईनें माझ्या भावाला हापीसांत भेटले त्यांनीं त्यावेळीं सांगितलें कीं ते गृहस्थ बडोद्याहून आलेले आहेत व त्यांना अणजूर येथें जावयाचे आहे. त्यांनीं खुलासा केला कीं ते बडोद्यास कांहीं ऐतिहासिक कागद पहातांना त्या पत्रांत त्यांना अणजूरकर नाईकांच्याबद्दल कांहीं माहिती मिळाली. ते तडक ठाणें येथें येऊन माझ्या भावाला हाफीसांत गाठले. त्यांनी निकरानें सांगितले कीं कालपासून पोटात अन्नाचा कण गेला नाही व अणजूरास गेल्याविना विश्रांति घेणार नाहीं व अन्नासही शिवणार नाहीं त्यामुळें माझ्या भावाने मला त्याच्या बरोबर अणजूरास पाठविले मी व ते अणजूरास गेलो माझे वडिलांना त्यांना भेटविले त्यांनी स्वतःची ओळख करून दिली की ते इतिहास संशोधक विश्वनाथ काशिनाथ राजवाडे होत. त्यांनीं जुने कागदपत्राची मागणी केली. दोन पोती कागद भरलेले होते ते त्यांना पहावयास दिले त्यांनी आधाशीपणाने त्या पोत्याचा समाचार घेण्यास आरंभ केला ७।८ पत्रे शोधून काढली इतक्यांत आमचे एक प्रतिष्ठित इनामदार तेथें आले. त्यांनी कागदपत्र दाखविण्यास मनाई केली. राजवाडे विमनस्क स्थितीत ती ७।८ पत्रें घेऊन गेलें त्यांनी पुढें ती पत्रे आपल्या खंडातून प्रसिद्ध केली हा समय १९०९ च्या आधींचा असावा कारण १९०९ मध्यें माझे वडील वारले, माझे वय लहान होते मनाला खेद झाला परंतु इलाज नव्हता. कांहीं काळानंतर ही दोन्हीं पोती दर्यागर्क झाली ह्यावेळच्या ह्या घडणीमुळें अणजूरकरांचा इतिहास कायमचा पंगु राहिला.

राजवाड्यांना बडोद्यास कागदपत्रांत कांहीं माहिती मिळाली ह्यावरून ही गोष्ट सिद्ध होत आहे कीं अणजूरकर नाईक बंधु त्यावेळेस राजकारणांत चौफेर होते.

कै. रामचंद्र सखाराम नाईक ह्यांनी गंगाजीची रोजनिशी रामचंद्र हरजी ह्यांना दिली, ती पुनः परत न आल्यामुळें इतिहासाचा उत्कृष्ट पुरावा नाहीसा झाला. अशी ही इतिहासाची हानी अजाणतपणामुळें होत असते.

सदाशिव गणेश फडके यांचे एक पत्र वसईहून वाईस गेलेले आहे त्या पत्रांत खालील मजकूर आहे कीं, "राजेश्री हेरंबा नाईक व बाळाजी नाईक अणजूरकर सरपाटील पौष शु॥ प्रतिपदेस आपले वाडियात विराजत आहे. बाबू पाटील देखील त्यांतच आहेत स्वामीस विदीत असावें" त्यानंतर बापट याच्या वसुलासंबंधीच उल्लेख आहे. हे पत्रही हेंच दाखविते कीं १७४० नंतर पेशव्याच्या व सरदारांच्या सर्व राजकारणांत इनामदार भाग घेत असत कांहींचें म्हणणे असें कीं १७४० नंतर इनामदार अणजूरकर यांनीं आपला गांव धरला व दुसरे सर्व सोडोन दिले हें खरें

नव्हे. ह्या पत्रांतले सर्व फडके शंकराजी केशव फडके ऊर्फ हसबनीस, ह्यांचे भाऊबंद होते ह्या फडक्यांचे व अणजूरकर इनामदाराचे भाऊबंदाचे नाते होते हे विश्रुतच आहे त्याचे हे कोणी आप्त दिसतात.

परिशिष्ट ३ रें

हशबनीसाचा दावा

शंकराजी केशव फडके ऊर्फ हशबनीस ह्याला इ.स. १७४१ मध्यें इनामदारानीं सनद लिहून दिलेली आहे त्या अन्वयें हशबनिस यांनीं अणजूर इनाम गांव सरपाटीलकीचा हक्क वसुल करावा व सर्व हिशेब ठेवावा व त्याबद्दल फडके यांनीं $\frac{३}{३}$ तक्षीमेतून $\frac{१}{६}$ हिस्सा गुमास्तागिरीचा मुशाहिरा म्हणून घ्यावा. पुढें फडके यानीं गुमास्ता देण्याचें बंद केलें. त्यामुळें इनामदारानाच सर्व वसूल करावा लागला त्याकरितां इनामदारारांनीं फडके यांना $\frac{१}{६}$ हिस्सा देण्याचें बंद केलें. त्यावेळीं २६ माहे आगस्ट १८३९ रोजीं बापूजी गोविंद बापट यानी हशबनिसांचे कुलमुखत्यारी म्हणून कलेक्टरकडे अर्ज करून दावा दिला कलेक्टर यानें दोन वर्षांचे नंतर इनामदाराचे विरुद्ध निकाल ता. २० माहे जून १८४१ रोजीं निवाडा दिला. निकालपत्र दिलें आहे कीं फडके यांचे खातीं दरवर्षीं $\frac{१}{६}$, हिस्सा खर्ची पडत आहें तेव्हां त्या फडकेना सदर हिस्सा घेण्याचा हक्क वदिवाटीनें राहतो. त्याकरितां त्यानें गुमास्तागिरी केलीच पाहिजे असा सबळ पुरावा इनामदारांनी पुढें आणलेला नाहीं. असें ऐकीवांत आहे कीं, ज्याचे जवळ ही सनद होती त्या इनामदारानें कोर्टांत ती हजर न केल्यामुळें इनामदार जन्माचे तेवढ्या रकमेस मुकले.

वैद्याचे पत्रव्यवहारांतहि बापट, फडके, हशबनिस, जोशी वैद्य ही नांवें पहावयास मिळतात.

परिशिष्ट ४ थें

मौजे अंजूर तालुके भिवंडी जि. ठाणें येथील इनामदार सो. यांचे $\frac{२}{३}$ इनाम हीश्याचा वसूल तारीख १ एप्रील सन १९४३ ते ३१ मार्च सन १९४४ अखेर पर्यंत होऊन तालुकेस भरणा झाली त्या रकमेचा वांटणीतक्ता सरकार ठराव नंबर ४७७६ तारीख १०-५-१९३७ रेव्हीन्यू डिपार्टमेंटचा झाल्याप्रमाणें.

जमा रुपये

५०६-३-१ पूर्वीचे वांटणी तक्त्यांतील शिल्लक असून इनामदारांस आदा होणेंचे राहिले आहेत तें खालील प्रो.

६४-४-९

लक्ष्मीबाई कोम नानाभाई पालेकर

३१-४-२	३१ ३-२४
३३-०-७	३१-३-२५
६४-४-९	

३२०-५-६

विनायक गणेश हसबनीस

१७८- ९-५	३१-३-३८
१४१-१२-१	३१-३-३९
३२०- ५-६	

१७-७-५

मोतीराम गोपीनाथ नाईक

२-१३-१०	३१ ३/३८
३-८-११	३१ ३/४०
४-२-१	३१ ३/४१
६-१४-७	३१ ३/४२
१७-७-५	

४-१-५

मोरेश्वर दाजीबा नाईक

४-१-५ ३१-३-४२

१००-०-०

गजानन बाळकृष्ण नाईक

१००-०-० ३१-३-४३

नांवे रुपये

६६-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे मार्च १९४३ च

पगार	४०-०-०
कांटीजन्सी	२-०-०
लिव्हसाजरी	५-०-०
पेन्शन कॉ.	५-१०-०
स्पेशल पे	५-०-०
महागाई	९-०-०
	६६-१०-०

६६-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे एप्रिल १९४३ चा पगार वरील प्रमाणे

६६-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे मे १९४३ चा पगार वरीलप्रमाणे

६८-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे जून १९४३ चा पगार.

पगार	४०-०४-०
कांटीजन्सी	२-००-०
लिव्हसाजरी	५-००-०
पेन्शन कॉ.	५-१०-०
स्पेशल पे	५-००-०
महागाई	१०-९०-०
मे चा राहिलेला	
डि. ए.	१-००-०
	६८-१०-०

६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे जुलई १९४३ चा पगार.

४२७७-१-१ तारीख १-४-४३ ते ३१-७-४३ अखेर इनामदारांचा ⅔ हिश्याचा वसूल फाजील रकमें सुद्धां
२१२७-५-१ तारीख १-८ ४३ ते ३१-३-४४ अखेर इनामदारांचा ⅔ हिश्याचा वसूल सरकार ज्यूडी ८२६-११-१ वजा जातां.
१०००-०-० सरकारी ⅓ हिश्याचा वसूल करणेसाठीं शिल्लक.

७९११.३-३

६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे आगष्ट १९४३ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे सप्टेंबर १९४३ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे ऑक्टोबर १९४३ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे नोव्हेंबर १९४३ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे डिसेंबर १९४३ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे जानेवारी १९४४ चा पगार
६७-१०-० मि. पेणकर तलाठी यांचा माहे फेब्रुवारी १९४४ चा पगार.
८०९-०८-० तारीख १ मार्च १९४४ अखेर खर्च.
७१०१-११-३ तारीख ३१-३-४३ अखेर लेजरला जमा असलेली रकम.

७९११-३-३

७१०१-११-३	अंजून लेजरांस ता. ३१-३-४४ अखेर दिवसांची शिल्लक.
१०००-००-०	वजा $\frac{१}{३}$ सरकारी रक्कम तालुका नमुना नंबर १ ला जमा करणेची.
६१०१-११-३	
५०६-०३-१	पूर्वीचेपैकीं वांटणी तत्त्यांत सामील असून इनामदारास आदा होणेची
५५९५-०८-२	राहिली ती.
३२२-०२-१	इनामदारांस आदा. तीपैकीं वजा पोट इनामदार रु. ८१-३-१० व समाईक धर्मदाय रु. २४०-१४-३ ची वजा.
५२७३-०६-१	इनामदार यांना वाटून देणेची रक्कम.

इनामांतील हिस्सा	इनामदाराचे नांव	हिशेरस्सी प्राप्त येणारी रक्कम	वजा पृथक धर्मदाय	आदा होणेची रक्कम
$१०\frac{२}{३}$	रामचंद्र नरहर जोगळेकर	२९२-१५-०७	०५-१२-००	२८७-०३-७
$५\frac{१}{३}$	रामचंद्र नरहर जोगळेकर	१४६-०७-०९	०२-१४-०१	१४३-०९-९
४	पार्वतीबाई भ्र. दिवाकर नाईक	१०९-१३-१०	०२-०२-०६	१०७-११-४
४	केशव श्रीधर कर्वे	१०९-१३-१०	०२-०२-०६	१०७-११-४
४	विनायक सिताराम वेसावर	१०९-१३-१०	०२-०२-०६	१०७-११-४
४	कांतीलाल नगीनदास	१०९-१३-१०	०२-०२-०६	१०७-११-४
$\frac{४}{५}$	आत्माराम भास्कर नाईक	०२१-१५-०७	००-०६-०७	०२१-०९-०
$\frac{४}{५}$	केशव पांडुरंग नाईक	०२१-१५-०४	००-०६-०७	०२१-०८-९
$\frac{४}{५}$	मुकुंद भाई वेसावकर	०२१-१५-०४	००-०६-०७	०२१-०८-९
$\frac{४}{५}$	मुक्ताबाई पांडुरंग नाईक	०२१-१५-०४	००-०६-०७	०२१-०८-९
$१\frac{३}{५}$	शिवराम पंढरीनाथ नाईक	०४३-१५-०२	००-१३-०१	०४३-०२-१
$१\frac{३}{५}$	वामन रणछोड नाईक	०४३-१५-०३	००-१३-०१	०४३-०२-२
$४\frac{४}{५}$	केशव श्रीधर कर्वे	१३१-१३-०८	०२-०७-०२	१२९-०६-६
$४\frac{४}{५}$	केशव श्रीधर कर्वे	१३१-१३-०८	०२-०७-०२	१२९-०६-६
$\frac{४}{६}$	प्रेमानंद यशवंत नाईक	०१२-०३-०४	००-०३-०८	०११-१५-८
$\frac{४}{६}$	कृष्णराव परशराम नाईक	०१२-०३-०४	००-०३-०८	०११-१५-९
$\frac{४}{६}$	मोतीराम गोपीनाथ नाईक	०१२-०३-०४	००-०३-०७	०११-०५-९
$१\frac{१}{३}$	सोकाजी माधवराव नाईक	०३६-०९-११	००-१०-११	०३५-१५-०
$१\frac{१}{३}$	अनंत हिरामण नाईक	०३६-०९-११	००-१०-११	०३५-१५-०
$१\frac{१}{३}$	खंडेराव हरिश्चंद्र नाईक	०३६-०९-११	००-१०-११	०३५-१५-०
$१\frac{७}{६}$	वसंत पुरुषोत्तम नाईक	०४८-१३-०३	००-१४-०७	०४७-१४-८

१ ७/९	दत्तात्रय रामचंद्र नाईक	०४८-१३-०३	००-१४-०६	०४७-१४-९
१ ७/९	भगवंत निळाजी नाईक	०४८-१३-०३	००-१४-०६	०४७-१४-९
१ ७/९	दिवाकर भाई नाईक	०४८-१३-०३	०१-०७-०२	०४७-०६-१
३ ५/९	पार्वती भ्र. दिवाकर	०९७-१०-०७	०२-१४-०२	०९४-१२-५
५ १/३	गजानन बाळकृष्ण नाईक	१४६-०७-१०	०२-११-०७	१४३-१२-३
५ १/३	केशव श्रीधर कर्वे	१४६-०७-०९	०४-०५-०४	१४२-०२-५
५ १/३	दत्तात्रय रामचंद्र नाईक	१४६-०७-०९	०४-०५-०४	१४२-०२-५
२ २/३	रामकृष्ण यशवंत नाईक	०७३-०३-११	०२-०२-०८	०७१-०१-३
२ २/३	मोरेश्वर दाजिबा नाईक	०७३-०३-११	०२-०२-०८	०७१-०१-३
२ २/३	हरेश्वर दाजिबा नाईक	०७३-०३-११	०२-०२-०८	०७१-०१-३
८	रामचंद्र नरहर जोगळेकर	२१९-११-०७	०६-०८-००	२१३-०३-७
१६	परागजी भगवानजी	४३९-०७-०४	३४-००-११	४०५-०६-५
४	रामचंद्र विश्वनाथ कर्वे	१०९-१३-११	०८-०८-०३	१०१-०५-७
४	केशव श्रीधर कर्वे	१०९-१३-११	०८-०८-०२	१०१-०५-९
८	परागजी भगवानजी देसाई	२१९-११-०७	१७-००-०५	२०२-११-२
३२	चिंतामण मुकुंद नाईक	४७८-१३-०१	८८-१३-०८	३८९-१५-५
	केशव श्रीधर कर्वे	४००-००-००	....	४००-००-०

रे. मु. नं. १९८/१९३४ ता. ३०-९-१४ हु. नामा

१७ ३/४	नारायण शंकर हसबनीस	४८७-०८-००	०२५-०८-३	४६१-१५-९
९ १/२	सिताराम विनायक हसबनीस	२६०-१४-०९	१३-१०-०६	२४७-०४-३
४ ३/४	गणेश हरी व विष्णु हरी काणे	१३०-०७-०७	०६-१३-०३	१२३-१०-४
		५२७३-०६-०१	२६२-८-९	५०१०-१३-४

पोट इनामदार	...	...	...
हरेश्वर दाजीबा नाईक	०२४-०१-००	...	०२४-०१-०
भास्कर पुरुषोत्तम नाईक	०१४-१३-०२	...	०१४-१३-२
हरेश्वर दाजीबा नाईक	०१३-०५-०२	...	०१३-०५-२
गणपत शंकर न्हावी	०१३-१५-००	...	०१३-१५-०
पांडुरंग परशराम प्रधान	०१५-०१-०६	...	०१५-०१-६
	०८१-०३-१०	...	०८१-०३-१०

३०-८-० समाईक धर्मादाय ... ...

गजानन नारायण पंडीत ०३०-०८-०० ... ०३०-०८-००

२०-०-० देवीचे पाठाबद्दल

०३-०-० पंचांग सांगणेबद्दल

०७-८-० श्रीशंकराचे अभिषेकाबद्दल

३०-८-०

१००-०-० विठ्ठल विनायक देवधर १००-०-० १००-०-०

श्रीगजानन महाराजांचे पूजेबद्दल

५०-०-० वसंत पुरुषोत्तम नाईक ५०-०-० ५०-०-०

गांवचे चिल्लरखर्चाबद्दल

६०-६-३ चिंतामण मुकुंद नाईक ६०-६-३ ६०-६-३

२०-६-३ श्रीगजानन महाराजांचे शेतीसाऱ्याबद्दल

२५-०-० श्रीगजानन महाराजांचे पुजेचे साहित्याबद्दल

१५-०-० श्रीरामजीचे पालखीचे खर्चाबद्दल

२४०-१४-३ २४०-१४-३

पृथक धर्मदाय २६२-०८-९ २६२-०८-९

६०-०-० श्री रामजीचे व श्री मारुतीचे उत्साहाचे कीर्तनाबद्दल.

५०-०-० श्री विठोबाचे उत्सावाबद्दल.

४०-०-० हरीदास बुवाची बिदागी.

१०-०-० किरकोळ खर्चाबद्दल.

१२-०-० श्री शंकाराचे शिवरात्रीचे उत्साहाबद्दल.

१०-०-० श्री शंकराचे सांजवातीबद्दल.

१३०-८-९ श्री. रामदेव यांचे शेतसाऱ्याबद्दल.

२६२-८-९ — २६२-८-९

५,५९५-८-२ — ५,५९५-८-२

एकूण पांच हजार पांचशे पंचाण्णव रुपये आठ आणे दोन पै इनामदारांस आदा होणे करितां तक्ता मंजूर होणे आहे.

तलाठी अंजूर.

परिशिष्ट ५ वे

फिर्यादी निवाडे वगैरे

१) इनाम कमिशननें १८८१ त आपले इनाम, वतन म्हणून जप्त केले. भारतांत आपण दावा हरतच गेलो पण लंडन प्रिव्ही कौंसिलला केलेल्या अर्जाचा सरकारनें विचार करून हें जातइनाम ठरविले, सन १८८५ त हें घडलें. त्यानंतर इंग्रज सरकारनें नवीन सनद दिली. ह्यावेळीं तुकाराम बाप्पाजी यानें इनामदाराची ही फिर्याद पुढाकारानें चालविली.

२) माथेखार ही इनामदारांची समागीत खार कै. मोतीलाल हरगोविंद गिळंकृत करण्याच्या बेतांत आला असतांना इनामदारानी कै. निळाजी मोरोबा यांचें नावें मोतीलालवर चार फिर्यादी गुदरील्या व दावा जिंकला व खारीही मिळविली पहिली फिर्याद सन १९१० त दिली.

३) इनामदारानीं १८९१ मध्यें सरकारवर रेतीमातीच्या उत्पन्नाची फिर्याद कै. मुकुंद पांडुरंग नाईक यांचे नांवें दिली हायकोर्टांत ही फिर्याद पेन्शन अक्टान्वये काढून टाकली. पण इनामजप्तीप्रमाणें हायकोर्टाच्या निकालावर प्रिव्ही कौन्सीलकडे अपील इनामदारानीं न केल्यामुळें ही फिर्याद व रेतीमातीचा कर घेण्याचा हक्क गमावून इनामदार बसले. निवाडा सन १८९७ त झाला.

४) ठाण्याच्या जमीनीवरचा व वाड्यावरचा हक्क इनामदारानीं हळूहळू कसा घालविला हें समजावयास मार्ग नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें ठाणें म्युनिसिपालटी कलेक्टरच्या कंपांडाचे समोरील उघड्या जागेचे भाडे इनामदाराना देत असे हें भाडे ठाण्यास त्यावेळीं राहणारे बाळकृष्ण तुकाराम घेत असत पुढें त्याच्यानंतर गजाननने किती वर्षे घेतले माहीत नाहीं. गजानन ठाण्यांतून गेल्यानंतर ते भाडे बंद झालेले दिसते कै. चिंतामण रावजी ह्यानी प्रयत्न करूनही त्या संबंधाचे कागद म्युनिसिपालटीकडून त्यांना मिळाले नाहींत.

५) शिवजीचे वंशज कै. जनार्दन भाई हें कल्याणच्या जमीनचे भाडे म्युनिसीपालटीकडून घेत असत तसेच एका खाजगी इसमाकडूनही भाडे ते घेत. त्यांच्या मृत्युनंतर दिनानाथ शिवराम यानी पुढें किती वर्षे भाडे घेतले हे ठाऊक नसले तरी त्या बाबतचे दिनानाथला म्यु.कडून आलेले एक कार्ड मी पाहिले होते दिनानाथ इथून गेल्यापासून ते भाडे बंद झाले.

६) हशबनीसानें इनाम गांवच्या उत्पन्नांतले ६ हिश्शाची फिर्याद समस्त इनामदारावर केली त्यावेळीं निवाडा त्याचे बाजूचा झाला त्यामुळें इंनामदार एवढ्या हिश्शास मुकले.

७) अबकारीं हक्काबद्दल सरकारनें प्रतिवर्षी इनामदाराना ४२ रुपये इनाम विलीन होईपर्यंत दिले.

८) सरपाटीलकीचे हक्काबद्दल सरकारनें प्रतीवर्षी इनामदाराना रुपये २१८ इनाम विलीन होंईपर्यंत दिले.

परिशिष्ट ६ वे

भारत इतिहास संशोधक मंडळ

नोंद : भारत इतिहास संशोधक मंडळाच्या २५ व्या वाढदिवसाकरितां श्री. ग. गो. नाईक हे पुण्यास गेले होते. त्यावेळीं नाईक, मंडळाचे ' साधारण सभासद ' होते त्यावेळीं मंडळाचे वाढदिवसाचे कार्यक्रमांत श्री. नाईक यांनीं ' नाईक घराण्याचे पूर्ववृत्त ' हा निबंध वाचला श्रीयुत नाईक पुणेस भरलेल्या अखिल भारतीय आधुनिक इतिहास परिषदेचे पहिले अधिवेशनास गोपचारचे प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. अधिवेशनांत शेवटचे दिवशीं श्री. नाईक ह्यांनीं Epic of Gangaji हा निबंध वाचला हे अधिवेशन सर शफतखान ह्यांचे अध्यक्षतेखालीं ८ जून १९३५ रोजीं सरपरशराम कॉलेजच्या सभागृहांत भरले होते.

पुनश्च ग. गो. नाईक ह्यांनीं पा. क्ष. ज्ञातीच्या इतिहासाचे पहिल्या खंडाचे हस्तलिखित ऑक्टोबर १९५९ रोजीं भारत इतिहास संशोधक मंडळाचेकडे पाठविले त्यावेळीं मंडळाचे पाक्षिक सभेत कै. आवळसकर यांचे अध्यक्षतेखालीं ते लिखित चर्चेस निघाले त्यावेळीं श्री. ग. ह. खरे व श्री. शं. ना. जोशी हे दोघे इतिहास धुरंधर हजर होते. चर्चेनंतरचा आपला अहवाल मंडळाचे दप्तरी ठेवला आहे. त्यांत " बिंबराज्याच्या इतिहासाची संगति लावणेमध्यें श्री. नाईक यांना यश आले आहे, त्याकामीं शक, सवंत यांचा झालेला एका ठिकाणचा गोंधळ दूर करून त्यांनीं संगति तपशीलवार कशी लावली हें त्यांनीं चर्चेचे वेळीं तपशीलवार सांगितले. " हें वृत्त अहवालांत नमूद आहे.

परिशिष्ट ७ वे

अणजूरास इ. संशोधकाच्या व श्रेष्ठ सद्गृहस्थाच्या भेटी.

कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इ. स. १९०७ किंवा १९०८ मध्य अणजूरास भेट दिली. आवासचे कै. रामजी लक्ष्मण घरत महर्षि ह्यांनी अट्टाहासानें अणजूरच्या पावन तीर्थास येण्यास आग्रह धरल्यामुळें मी त्याना अणजूरास आणून देव-मंदीर व माडी दाखविली व कागद पत्रांचा सांठा दाखविला अणजूरचे धारातीर्थ पाहून त्यांनी उद्गार काढले की "मी आज पावनतीर्थांत पावन झालो."

वसईची मोहिम ह्या ग्रंथाचे कर्ते श्री. य. न. केळकर एप्रील१९३६ मध्यें अणजूरास आले होते त्यांनी माझी साष्टीची बखर वाचली होती व वसईची मोहीम हा ग्रंथ लिहिण्याची सुरवात केली होती. त्यांनी अणजूर, कांबे भिवंडी वगैरेस्थळे पाहिल्या-वर माझ्या पडावानें ते, मी व दुसरे इतिहास संशोधक शं. नारायण जोशी असे मोहिमेतलीं सर्व ठिकाणे पहात पहात वसईस गेलो. किल्ला पाहिला नंतर गायमूख, धारावी ही पाहिली. त्यानंतर होडीचा प्रवास सोडून माहिम, अर्नाळा, शिरगांव वगैरे किल्ले पाहिल्यावर ते पुण्यास गेले.

कै. भावळसकर सन १९५९ मध्यें पोर्तुगीजांची माहिती मिळविण्याकरितां अणजूरास माझेकडे आले होते त्यावेळी मी अणजूरकर घराण्याचा इतिहास व ज्ञातीच्या इतिहासाचा पहिला खंड लिहित होतो. त्यावेळीं त्यानीं मला बराच सल्ला दिला. त्यानीं आंग्रेकालीन अष्टागार ह्या पुस्तकांत, आपल्या इतिहासास उपयुक्त अशा बऱ्याच नोंदी छापल्या आहेत. ते हल्लीं वारले. त्याच्या मुलाजवळ तशा अनेक नोंदीचा संग्रह आहे. कोणीतरी त्या मिळवून प्रसिद्ध केल्यास आपल्या इतिहासास मदत होणार आहे.

परिशिष्ट २ऱ्या टीपेंत वर्णन केलें आहे त्यावरून दिसून येतें कीं; कै. राजवाडे हे अणजूरास भेट देणारे पहिले इतिहास लेखक संशोधक होत.

सन १९४० मध्यें माझी नेमणूक ठाणें जिल्हाचे अध्यक्षपदी झाली त्यावेळीं कै. नानासाहेब दामले, श्री. ना. गो. चाफेकर, श्री. दादासाहेब दांडेकर श्री. देवानंद जेठा राजा वगैरे मंडळी अणजूरास आली होती.

सन १९४८ मध्यें माझ्या ६१व्या वाढदिवसानिमित्त जमलेल्यांत श्री. गणेश कृष्ण फडके, श्री. दौलतराव झुंझारराव, प्रबोधनकार ठाकरे ही मंडळी होती.

श्री. ठाकरे ह्यानीं २-४ वेळां अणजूरास भेट दिली. त्यांनीं घर बांधण्याकरितां घेतलेला प्लॉट आज अणजूरास आहे.

परिशिष्ट ८ वे

Epic Of Gangaji Naik Or the Crusade Of Bassein 1739

The History of Portuguese rapacity in Maharashtra has not yet been completely written and the Students of history are not yet in possession of all the facts relating to the great immemorable and unparallel crusade carried on to eradicate the Portuguese from Maharastra and especially from Salssette the chronical of Salsette or 'Sashtichi Bakkar' published by Kavya Itihas Sangraha (collection of Poetry and History) dose not give a complete and full idea of the crusade of Bassein. The Bakkar which the present writer has published with the help of Worli Gopchar and Bhoye Sanstan reveals to the reader in its entirety genesis of the most momentous crusade fought for Maharastra Religion (Arya culture) and takes the reader through the period of about two centuries. The authenticity and genuineness of this Bakkar is proved by the historical writings of eminent historians of Maharashtra such as Serdesai and by the identity of time, place, and persons mentioned in the Bakkar with the contemporary events and happenings as chronicled by various historians of Maharashtra history including Serdesai. The Bakkar published by the present writer is rightly called the epic of Gangaji Naik as the present Bakkar and the opinion of Serdesai and others of his school of thinking proves it. Gangaji Naik, his four brothers and his other trusted faithful soldiers from the Pathare Kshatriya caste sacrificed their all for the cause of Maharashtra Religion. The present Bakkar throws a great light on the crusade of Bassein, where Chimaji Appa was victorious with his sincere and loyal band of Maharashtra. This victory is unparalled not only in the annals of the Maharashtra history but the History of India and even Asia. The siege of Bassien was one of the greatest naval and land sieges in the world as it was in this seige for the first time in the history of India and Asia that a Western white army was defeated by the coloured, an Indian army.

परिशिष्ट ७ वें

श्री. चिंतामण मुकुंद नाईक यांच्याकडून आलेली माहिती खाली देण्यांत येत आहे.

" सन १८६२ ते सन १८७५ ह्या दीर्घ कालांत कोणत्या एका साली श्री सितादेवीची प्रतिस्थापना कै. मुकुंद पांडुरंग नाईक यानी श्रीराम मंदिरांत मोठ्या समारंभानें केली. तीच मूर्ती १४ मे १९६३ रोजी मंगळवारी (वैशाख वद्य पंचमी शके १८८५) १॥ वाजतां दुपारी अकस्मात जागेवरून ढळली व पडली. पुजारी श्री. श्रीपाद वासुदेव देसाई यानीं दुसऱ्या दिवशी श्री. चिंतामण मुकुंद नाईक याना तशी वर्दी दिली. श्री. चिंतामण नाईक यानी मोठ्या समारंभानें सवाद्य (चौघडा) पुनश्च दुसऱ्या नवीन मूर्तीची स्थापना सं मवार दिनांक ३, माहे जून, सन १९६३ रोजी (जेष्ठ शुक्ल एकादशी शके १८८५) शास्त्रोक्त विधीपूर्वक त्या मंदिरांत केली.

विधि रविवार दिनांक २ रोजी सुरु केला व दि. ३ रोजी सर्व विधि पूर्ण झाला. समारंभास ठाणें येथील खालील पुरोहित उपस्थित होते.

(१) अमृत चिंतामण जोशी, (२) विश्वनाथ भाई जोशी, (३) निळकंठ नारायण जोशी, (४) छोटु विश्वनाथ जोशी.

समारंभानिमित्त ब्राह्मण भोजन घातले. श्री. चिंतामण नाईक ह्यांनी मूर्ती खरेदी केली. मूर्तीचा व एकंदर समारंभाचा सर्व खर्च त्यानीच स्वतःच्या पदरचा केला. समारंभास गावांतील खालील प्रतिष्ठित सद्‌गृहस्थ व अनेक इनामदार हजर होते.

गजानन गोविंद नाईक, वसंतराव पुरुषोत्तम नाईक, गजानन दिवाकर नाईक, वसंत दत्तात्रय नाईक, गणपती दिवाकर नाईक, मंगलमूर्ती दिवाकर नाईक, विनायक प्रभाकर नाईक, बाबुराव भालचंद्र नाईक, वसंत भालचंद्र नाईक, वामन गजानन नाईक, जगन्नाथ माधवराव नाईक, भगवंतराव नारायण दादरकर, वसंत बाळाराम साहानी, अनंत वसंत साने, चंद्रकांत बाळाराम पाटील, कृष्णराव काशिनाथ साने, केसरीनाथ काशिनाथ साने, छोटाभाई चिंतामण नाईक, रमेश चिंतामण नाईक, सुरेश चिंतामण नाईक, अशोक चिंतामण नाईक, जगन्नाथ शिवराम ठाकूर, डॉ. विद्ध्वंस, जोशी मास्तर, रामराव अनंत पंडीत.

परिशिष्ट ८ वें

श्री. गजानन दिवाकर नाईक यांनी "दिवाकर संग्रहांतून संकलीत केलेली माहिती" ह्या परिशिष्टांत देण्यांत येत आहे.

---

१. श्रीसंत गणपतिबुवा यांनीं अणजूर येथें केलेला यज्ञ

कै. सखाराम गणेश जोशी उर्फ गणपतिबुवा इस्लामपूरकर, हे मूळचे राहणार धरणाचे रेठरे, जि. सातारा, ता. वाळवें, ठाणें, इस्लामपूर. ह्या गणेशभक्तानें कीर्तन-काराचा पेशा पत्करून गणेशाची भक्ती जागृत ठेवण्याची कामगिरी गेल्या शतकाच्या अखेरच्या चरणापासून आमरण निष्ठेनें केली. त्यांचे वास्तव्य श्रीक्षेत्र मोरगांव आणि चिंचवड येथें नेहमीं असे. ठाणें मुंबई येथील गणेशमंदिरांत त्यांचीं कीर्तनें चालत. त्यांनीं इ. स. १८९५ सालीं "गणेशपंचपदी समूह" म्हणून ग्रंथ प्रसिद्ध केला. गणेशभक्तीपर पदें व आरत्या वगैरे, मोरया गोसावी व त्यांचे वंशज यानीं केलेल्या, त्यांत समावेशित असून त्याच्या प्रस्तावनेंत त्यांनीं मोरगांव येथील बखरींतील जो वृत्तांत दिलेला आहे त्यांत गंगाधर उर्फ गंगाजी नाईक यांनीं गणेशप्रसाद मिळवून वसईविजय मिळविल्याचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं स्वतःचें आत्मचरित्र-लेखनही अखेरपर्यंत चालू ठेविले होतें. वे. भू. गणपतिबुवा यांनीं आपले हयातींत गणेश-अर्चा ऊर्जितावस्थेस आणण्या-करितां बरीच मेहनत घतली. त्यांनीं स्वतः गणेशयज्ञ करण्याचे व्रत घेऊन एकंदर आयुष्यांत मोरगांव, चिंचवड, पुणें, मुंबई सारख्या ठिकाणीं मिळून त्यांनीं एकेचाळीस यज्ञ केले. आणि वयाच्या सुमारें ६५ पांसष्टाव्या वर्षीं अखेरचा बेचाळिसावा यज्ञ श्रीप्ररणेनुसार त्यांनीं अणजूरास केला.

अणजूरांतील श्रीराम नवमीचा उत्सव त्यासालीं त्यांनींच केला. त्यानंतर यज्ञ-कार्यास सुरवात केली स्वतःची प्रकृति क्षीण झाल्याकारणानें यज्ञाचे मुख्याधिकार त्यांचे चिरंजीव धुंडिराज सखाराम उर्फ भानु महागणपतिपीठार्चक यांजकडे सोंपऊन अनुष्ठानास सुरुवात चैत्र व. चतुर्थीस केली. आणि त्या यज्ञात आपल्या आयुष्यांतील अखेरची आहुती दि. २५ एप्रिल १९२३ या दिवशीं देऊन देह ठेविला. पुढें यज्ञाची पूर्णाहुती वगर सांगता पूर्वी ठरविल्याप्रमाणें दुसरें ब्राह्मण वे. मू. गजाबा चिंतामण ढेरे प्रमुख, क्षेत्र मोरगांव येथून येऊन त्यांनीं पार पाडिली. त्याप्रसंगास मोठ्या उत्सवाचें स्वरूप आल होते. पूर्णाहुतीनंतर देव वाजतगाजत पालखींतून अवभृथ स्नानाकरितां आलिमघर येथील कडप याठिकाणीं मोठ्या जमावानिशीं व दिंड्यपताकानिशीं गेले होते. मुख्यध्वज वडील घराण्याचे वयोवृद्ध प्रतिनिधि निळाजी मोरोबा यांनीं चालविला होता. परत

येऊन देव स्थानापन्न होऊन पूजा, नैवेद्य वगैरे झाल्यानंतर अन्नदान झाले. बरेच वर्षांत असा उत्सव अणजूरांत पहावयास मिळाला नव्हता.

उत्सवास खर्च नाईक मंडळी व इतरांच्या वर्गणीनें झाला. त्यांत जनार्दन भाई, दिवाकर भाई, चिंतामण मुकुंद यांनीं उत्सव पार पाडणेंस मेहनत घेतली.

---

२. इतिहास संशोधक व इतर माननीय व्यक्ती वगैरे यांच्या अणजूरास भेटी

अलीकडील काळांत इतिहासविषयक जागृति होऊं लागले पासून आपले घराण्या-संबंधी माहिती बाहेरील जगास होऊं लागली. त्याचा महत्त्वपूर्ण प्रथम उल्लेख सन १९२५ सालीं .... गोविंद सखाराम तथा रियासतकार सरदेसाई यांनीं आपल्या मराठी रियासत मध्यविभाग एक, पान २२९ वर " वसई युद्धाचा उत्पादक गंगाजी नाईक, अणजूरकर होय ", असा केला आहे. अनेक समकालीन लेखकांशीं प. वा. दिवाकरभाई यांच्या झालेल्या पत्रव्यवहारामुळें ऐतिहासिक कादंबरी लेखक वि. वा. हडप " पश्चिम दिग्विजय " प्रसिद्ध होणेपूर्वी येथें येऊन व प्रत्यक्ष इतर स्थळेंही पाहून गेले. त्याच स. १९२८-२९ सालीं मुंबई येथील सेंट झेविअर कॉलेजमधील ऐतिहासिक संशोधन संस्थेच्या विद्यमानें संशोधक पाद्रीसदस्य व इतर यांनीं भेट दिली. तव्हां पोर्तुगीजांचा " फोर्ट सॅन्ताक्रूस " तीच माडी होय अशी त्यांची खातरी झाली.

सन १९२९ सालीं दुसरे इतिहास लेखक परशुराम हरी थत्ते, नासिक, यांनीं अणजूरास भेट दिली. त्यांनींही आपल्या (अप्रसिद्ध) कादंबरींत गंगाजीकडे नायकाची भूमिका दिली. त्यावर्षीच्या डिसेंबरांत ह. भ. प. त राशिनकर बुवा यांनीं कीर्तन आणि संतचरित्रकार व इति. लेखक लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनीं प्रवचन करून रात्र जागविली.

स. १९३५ सालीं सह्याद्रींत, का. न. केळकर यांनीं आपले " साष्टींतील प्रवास " लिहिण्याअगोदर भेट दिली.

सन १९३६ च्या डिसेंबर अखेर उपरिनिर्देशित रियासतकार नानासाहेब सरदेसाई, वंग इतिहासकार व शिवचरित्र लेखक सर यदुनाथ सरकार, कोकणांतील पोर्तुगीज-इतिहास तज्ञ श्री. अ. का. प्रियोळकर, हेमाद्रि चरित्रकार केशव अप्पा पाध्ये व संतचरित्र लेखक ल. वि. परळकर यांनीं एकत्रित भेट देऊन आपले समाधान करून घेतलें.

अलीकडील काळांत अनेक राष्ट्रीय पुढारी कारणपरत्वें येथें येऊन गेले. त्यांत गोविंद धर्माजी वर्तक, बाळ गंगाधर खेर–मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असतां व नंतर भूदानवितरण समारंभानिमित्त (१९५५) नानासाहेब कुंटे, हरिभाऊ गो. वर्तक, श्री. चव्हाण, गुलाम मुस्तफा फकी साहेब व शेतकी मंत्री शामराव पाटील यांचीं नावें येतात.

नानासाहेब चाफेकर–बदलापूर, ज्ञानेश्वरी भक्त सबनीस, आप्पासाहेब पटवर्धन व आचार्य भिसे या ऋषितुल्य विद्वानांनीही भेटी देऊन गांवास उपकृत केलें आहे.

महाराष्ट्र सरकार पुराण वस्तु खात्याच्या विद्यमानें श्री. विद्वांस व श्री. मिश्रा (१९५९) व श्री. दुर्गादास अमलाडी (१९६० मे) मध्यें पहाणी करून गेले आहेत. श्री. अमलाडी यांनीं गांवकऱ्यांचे मदतीनें येथील "झोटींग" हा वीरगल पुनरपि व्यवस्थित केला.

याशिवाय गणेश उपासक वरचेवर येतच असतात. स. १९४१ चे सुमारास सरदार आबासाहेब मुजुमदार हे एका संकष्टीस दर्शनार्थ आले होते. वे. मू. पाल्येशास्त्री स. १९५० नंतर गणेशयज्ञानिमित्त आले होते. अन्य गणेशसेवक दर्शनार्थ येणारे यांची संख्या वाढतच आहे.

---

३. विठोबा–उत्सव आणि क्रमः

अणजूर येथील मोठे मंदिरांत दक्षीण अंगास विठ्ठलाचा गाभारा आहे. त्यांत मध्यवर्ती श्री. विठ्ठलाची, कृष्णवर्णाची, दोन हात कटीवर असलेली मूर्ती आहे. येथील ही विठोबाची पुरातन मूर्ती भंग पावल्यामुळें आज असलेली मूर्ती जेष्ठ शुक्ल एकादशी शके १८८२, सोमवार ता. ६ जून १९६० रोजीं विधीपूर्वक स्थापन केली आहे.

जुन्या मूर्तीचें शिल्प प्राचीन तसेंच सुंदर होतें. मूर्तीचें रूप आकर्षक असून त्यावर मोहक हास्य होतें. फक्त डावा हात कटीवर ठेऊन उभी असलेल्या या मूर्तीचा उजवा हात दर्शनी उघडा होता. कानांत कुंडलें होतीं आणि डावे हातावरून व गुडघ्यांपुढून उजवे हातावर जाणारा हार त्यामागें विसावला होता. व डोकीवर उभ्या आकाराचा नक्षीदार किरीट होता. एकंदर सुमारें ४॥ फूट उंचीची ही मूर्ती पूर्णविकसित कमल-पुष्पावर उभी होती. अशी ही मूर्ती काळसर हिरवट रंगाच्या पाषाणांतून कोरिलेले होती. नवीन मूर्तीची स्थापना समारंभपूर्वक झाल्यानंतर पुराणमूर्ती सांभवज उर्फ उल्हास नदींत विसर्जित केली.

समारंभप्रसंगाकरितां पंडित पद्मनाभशास्त्री पालये यांस पाचारण केलें होतें. नूतन मूर्तीस आवाहन, सवाद्य मिरवणुकीनें मंदिरांत आणणें, दहिभातानें ओवाळणी, अष्ट-सुवासिनीकडून आणिलेल्या जलानें अभिषेक व नंतर अवगाहन, स्नान, होम-हवन वगैरे यथाक्रम झाल्यानंतर स्थापना करणेंत आली. नंतर महापूजा, नैवेद्य व आरती असा सर्व क्रम भाविकतेच्या वातावरणांत पार पडला.

होमादिकार्यांत वे. मू नारायण त्रिंबक पुरोहित–मुंबई, अनंत भिकाजी पालये–भिवंडी, मधुसूदन गोविंद पालये, डोणे ता. कल्याण, वासुदेव लक्ष्मण ठाकूर, वडाळा-मुंबई, गंगाधर मार्तंड मुळें, चिंचघर ता. वाडे, वगैरे ब्रह्मवृंदांनीं यज्ञकर्मातील आचार्य आदींची कामें केलीं.


मंदिरांत दरसाल होणाऱ्या विठोबाच्या उत्सवप्रसंगांची व्यवस्था व कामगिरीची योजना नाईक घराण्यापैकीं शिवजी शाखेकडून होत आलेली असले कारणानें सदर स्थापना–उत्सवाचा खर्च व इतर कामें त्याच शाखेकडून व्हावीत असें ठरल्यावरून मूर्ती आणणें आणि स्थापनासमारंभ पार पाडणेकरितां सदर शाखीयांनीं वर्गणीरूपानें निधि उभारला. त्यांत स्व. रामकृष्ण यशवंत, दत्तात्रेय रामचंद्र शाखीयांनीं व प्रभाकर जगन्नाथ आणि चिरंजीव यांनीं तत्परतेनें रकम जमऊन व इतरानीं अंगमेहनत घेऊन सर्व कार्य केलें. त्यांत श्री. वसंत दत्तात्रेय यांनीं पुढाकार घेतला.

या प्रसंगानिमित्त श्रीदेवाचे पूर्वीचे दागिने नवीन मूर्तीस साजेसे व कांहीं नवीन करणेंत आले.

श्रीविठोबाच्या पूर्वीच्या मूर्तीच्या दोन्ही आंगास राई व रखुमाईच्या मूर्ती आहेत. त्यांची प्रतिस्थापना मि. माघ शु. १३, शके १८३२, इ. स. १९११ शनिवार रोजीं झालेली आहे, ती " पूर्वीच्या मूर्ती भंगल्या असल्याकारणानें " झाली. त्या कार्यास आरंभ शु. ११ स गुरुवारीं वे. शा. सं. रा. रा. अनंत वासुदेव देव यांच्या विद्यमानें रा. रामचंद्र सखाराम नाईक यांनीं केला. सदर कृत्यास खालीलप्रमाणें ब्राह्मणांनीं कामें केलीं. वे. शा. सं. सखाराम परशुराम शास्त्री आचार्य; अनंत वासुदेव देव उपाचार्य; गंगाधर त्र्यंबक जोशी–ब्रह्मा; गणेश रघुनाथ धर्माधिकारी–गाणपत्य; जगन्नाथ सखाराम जावळे–गाणपत्य; पद्माकर मोरेश्वर पाठक–सादस्य; परशुराम नारायण नांदगांवकर–ऋत्विज; दामोदर लक्ष्मण धर्माधिकारी, महादेव गोविंद आचार्य, कृष्णाजी अमृत आचार्य, नारायण रावजी पंडित, धर्मदास मोहनदास शुक्ल–सिधपुर, अनंत शिवभट गोपी-अश्वलायन क्षेत्र गोकर्ण, वासुदेव नारायण गोखले–ऋग्वेदी.

सदरहू समारंभास वर्तमानपत्रीं प्रसिद्धी देणेंत आली, ती येणेंप्रमाणें : इंदुप्रकाश दिनांक १५।२।११ बुधवार; मुंबई वैभव दि. १६।२।११ गुरुवार; ज्ञानप्रकाश दिनांक १७।२।११ शुक्रवार; सयाजी विजय दि. १८-२-११ शनिवार.

वर म्हटल्याप्रमाणें या दैवताचे उत्सव करण्याचा मान शिवजी शास्त्रीयांकडे असून त्यानीं तो आजवर परंपरेनें सांभाळलेला आहे. या शाखेस इ. सन १८०० च्या सुमारास आबा व बाळाजी अशा दोन प्रशाखा होत्या. पुढील ७५ वर्षांच्या कालांत झालेल्या विस्तारापैकीं गणपत व गोपाळ; आणि सखाराम, आत्माराम व भाई अशा पांच सन १८६१ च्या सुमारास राहिल्या. त्यांनीं हे उत्सव प्रतिवर्षीं पाळीपाळीनें चालू ठेविले. आज मितीस सन १९६४ सालीं विस्तार आणखी पुढें गेला असुन पृथक् उपशाखांचे मिळून २८ अठ्ठावीस वंशज विद्यमान आहेत. तरीही त्याचे मूळ पांच उपशाखांस धरून त्यांचे वंशज क्रमानें व आनंदानें उत्सव साजरे करीत असतात.



या वंशभागापैकीं अखेरचे इ. सन १८४८ ते १८६१ चे सुमाराम हयात असतां ज्या पांच पाळ्या चालू होत्या त्यासच धरून आज मितीस त्यांचे वंशज आपसांत क्रमानें उत्सवाचे कार्य चालवितात. अर्थात् हा क्रम १-३-२-४-१-५ असा येत असतो यावरून पाहतां आबा-शाखेपैकीं कोणतेही विशिष्ट शाखेकडे दर पांचवे वर्षीं व त्याचप्रमाणें बाळाजी-शाखेपैकीं विशिष्ट शाखेकडे दर सहावे वर्षीं येत असतो हें उघड आहे. आणि पुढें दिलेल्या तीस / पसतीस वर्षांच्या निरीक्षणानेंही हें खरें ठरतें.

हा उत्सव श्रावण कृ. ६ षष्ठीस सुरू होऊन ५ पांच दिवस चालविला जाई. कालाष्टमीचें कीर्तन रोहिणी नक्षत्रावर दिवसा होई. तोच मुख्य दिवस आजही मानला जातो. त्यानंतर तीर्थप्रसादाचें समाप्तीचें कीर्तन होत असे. शेवटीं ब्राह्मण भोजन व ग्रामभोजन घालण्याची प्रथा होती.

हा सर्व खर्च इनामदार मंडळी करीत असत. त्याचखर्चासाठीं दरसाल इनाम रकमेंतून रु. ५० मिळणेची व्यवस्था होती. ही रकम घेऊन उत्सव-चालकांनीं उत्सव साजरा करावा असे होतें. व त्याप्रमाणें प्रतिवर्षीं ही मंडळी आनंदानें उत्सव साजरा करीत. परंतु सन १५५४ सालीं इनाम रकम बंद झालेकारणानें अलीकडील वाढत्या महागाईत व गेले जागतिक युद्धापासून सुरू झालेल्या दुर्मिळतेमुळें उत्सवादी धर्मक्रिया सांभाळणें चालकांस जड जाऊं लागले आहे. आतां हा प्रश्न एकत्रित व संघटन सामर्थ्य वाढऊन विचार विनिमयानें यशस्वीरीत्या सोडविणें जरूर आहे.

शिवजी शाखीयांनीं गेले कांहीं वर्षांत राखिलेला

उत्सव–क्रम

सन	उपशाखा प्रमुख	उत्सव-चालक
१९३४	भाई शिवराम	दिवाकर भाई
१९३५	दाजीबा गणपत	हरेश्वर दाजीबा
१९३६	आत्माराम शिवराम	कमळाकर जगन्नाथ
१९३७	पुतळाजी गोपाळ	पांडुरंग पुतळाजी
१९३८	सखाराम शिवराम	दत्तात्रेय रामचंद्र
१९३९	दाजीबा गणपत	मोरेश्वर दाजीबा
१९४०	भाई शिवराम	दिवाकर भाई
१९४१	पुतळाजी गोपाळ	पांडुरंग पुतळाजी
१९४२	आत्माराम शिवराम	कमळाकर जगन्नाथ
१९४३	दाजीबा गणपत	रामकृष्ण यशवंत
१९४४	सखाराम शिवराम	दत्तात्रेय रामचंद्र
१९४५	पुतळाजी गोपाळ	रंगनाथ सदानंद
१९४६	भाई शिवराम	दिवाकर भाई
१९४७	दाजीबा गणपत	हरेश्वर दाजीबा

१९४८	आत्माराम शिवराम	कमळाकर जगन्नाथ
१९४९	पुतळाजी गोपाळ	बाळाराम सदानंद
१९५०	सखाराम शिवराम	दत्तात्रेय रामचंद्र
१९५१	दाजीबा गणपत	दत्तात्रेय मोरेश्वर
१९५२	भाई शिवराम	गजानन दिवाकर
१९५३	पुतळाजी गोपाळ	बाळाराम सदानंद
१९५४	आत्माराम शिवराम	कमळाकर जगन्नाथ
१९५५	दाजीबा गणपत	रामकृष्ण यशवंत
१९५६	सखाराम शिवराम	दत्तात्रेय रामचंद्र
१९५७	पुतळाजी गोपाळ	दत्तात्रेय सुधाकर रंगनाथ
१९५८	भाई शिवराम	गणपति दिवाकर
१९५९	दाजीबा गणपत	हरेश्वर दाजिबा
१९६०	आत्माराम शिवराम	गजानन कमळाकर
१९६१	पुतळाजी गोपाळ	दत्तात्रेय व सुधाकर रंगनाथ
१९६२	सखाराम शिवराम	वसंत दत्तात्रेय
१९६३	दाजीबा गणपत	दत्तात्रेय व अनंत मोरेश्वर
१९६४	भाई शिवराम	

याच क्रमानें पुढें येणारे

१९६५	पुतळाजी गोपाळ
१९६६	आत्माराम शिवराम
१९६७	दाजिबा गणपत
१९६८	सखाराम शिवराम
१९६९	पुतळाजी गोपाळ
१९७०	भाई शिवराम

काकांचा प्रकाशित साहित्य संसार

(१) करमणुकीचे प्रकार १९१५; क्षा. स. व. दिलेला निबंध; (२) अव्यापारेषु व्यापार १९१८; (३) पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाचे दिग्दर्शन व समालोचन; (४) साष्टीची बखर अर्थात वसईचा दुर्धर संग्राम १९३५; (५) पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या इतिहासाची रुपरेखा १९३५; (६) पुण्यश्लोक वीर गंगाजी नाईकांचे चरित्र १९३८; (७) वसईच्या धर्मयुद्धाची पार्श्वभूमी व त्यांत पाठारे क्षत्रिय ज्ञातीचे स्थान १९३८; (८) ठाणें जिल्हा लोकलबोर्डाचा इतिहास-१९४०; (९) पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास खंड पहिला १९६०; (१०) पाठारे क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास खंड दुसरा १९६३, (११) वसई विजय दिनाचा वृत्तांत. (प्रकाशित व कांहीं अप्रकाशित)

काकांचे अप्रकाशित साहित्य

(१) माझ्या कारावासांतील आठवणी व अनुभव; (२) ठाण्यांतील श्री दासनवमी उत्सवाचा पन्नास वर्षांचा इतिहास; (३) खाऱ्या गोड्या जमिनीच्या बंदिस्तीच्या प्रश्नासंबंधी लिहिलेल्या लेखाचा संग्रह; (४) ज्ञातीचें नांव; (५) राजा बिंब, बिंबाख्यान बखरी, (६) अतिप्राचीन बिंब बखर, (७) क्षात्रैक्य समाजाच्या तीस वर्षांच्या कार्यांचे समालोचन व पुढील दिशा (क्षा. स. ब. दिलेला निबंध), (८) ज्ञातीचा ५० वर्षांचा इतिहास (क्षा. स. ब. दिलेला निबंध), (९) कै. जनार्दन राघोबा वनमाळी यांचे चरित्र (क्षा. स. ब. दिलेला निबंध), (१०) सा. बखरीवरील अभिप्रायांचा संग्रह, (११) दोन निबंध (अ) बखरींतला महाराष्ट्र धर्म, (आ) कै. राजवाडे यांचे महिकावती बखरीचे संशोधन.

थोडे इकडे तिकडे

(१) निंबाजी नाईकांच्या प्रथम पत्नीचे नांव 'बाकुबाई' हे आहे. शिवजी नाईकाच्या जबानीवरून सिद्ध होत आहे.

(२) निंबाजी नाईकाच्या द्वितीय पत्नीचे नांव देवकुबाई हे आहे. साष्टीचे बखरीवरून हे सिद्ध होत आहे.

(३) शामजीला तीन मुलगे होते. मदनाजी, कृष्णाजी व भिकाजी ही नांवे येसूबाईचे पत्र, शिवजीची जबानी व पेशवे दफ्तरातील पत्रावरून सिद्ध होत आहे.

(४) गंगाजीना दीपावती नावाची बहीण होती हें रूढ कथेवरून आलेल्या परंपरेवरून सिद्ध होत आहे.

(५) शामजी नाईक १७३० पर्यंत जिवंत होते ही गोष्ट "दिक्षीतांनी दिलेल्या राजिनाम्याची नक्कल" ह्या पत्रावरून सिद्ध होते. त्या पत्रावर शामजीची सही व गंगाजीची सही आहे.

मदन पाटील

मदन दादाजी हे अणजूरचे पोलीस पाटील कांही काळ होते. त्यावेळीं एकदां भिवंडी फौजदारानें गावात येवून एका मनुष्यास अटक करून त्यास समज दिली ही गोष्ट मदन यास कळताच ते तिथें गेले. त्यानीं फौजदारास बजाविले कीं हा इनाम गाव आहे. मी पोलीस पाटील म्हणून आपणास बजावतों कीं आपण त्या इसमास अटक करू शकत नाहीं. आपणांस ह्या इनाम गावांत इनामदारांची परवानगी घेतल्याविना तपास करितां येत नाहीं. मदन पाटलानें त्या फौजदारास जाण्यास सांगितले. फौजदार परत गेला. पुष्कळ दिवस ह्या बाबतींत कांहीं झाले नाही पण ह्या घटनेनंतर पोलीस किंवा शिपाई, बेलीफ वगैरे प्रथमतः मदन पाटील यांना भेटत व त्यानंतर आपली कामगिरी ते बजावीत असत. इनामदारांचे स्वायत्ततेचा हा पुरावाच नव्हे काय?

दोन साष्टी

कोकणाचे किनाऱ्यालगत दोन साष्टी नावाचे प्रांत आहेत. उत्तर भागांत वसई साष्टी व दक्षिण भागांत बारदेश साष्टी हे ते प्रान्त होत. दोन्हीं ठिकाणी पोर्तुगीज राजवट होती. संभाजी छत्रपतीनीं केलेले हल्ले, राणांची बंडे व घोरपडे यांनीं केलेल्या लढाया ह्यांनी बारदेश साष्टी प्रान्त फिरंग्याचे अमलाखालून मुक्त झाला नाहीं. वसई साष्टींत पेशव्यांनी ३–३॥ वर्षांत दोन प्रखर हल्ले करून पोर्तुगीजांचे राज्य नाहीसे केले. हा फरक कां? वसई साष्टींत गंगाजी नाईक यांनीं जनतेचा उठाव केला होता हे फरकाचे एक कारण व गंगाजीनी पेशव्याना ह्या समराची सतत आठवण ठेवण्यास भाग पाडले हें दुसरे कारण होय.


परिशिष्ट ९ वे वंशावळी

निंबनाईकाना मुलगे ६ व १ मुलगी होती. निंबनाईकांना दोन पत्नी होत्या. पहिले पत्नीचा एकच मुलगा शामजी हा होय. दुसऱ्या पत्नीस पांच मुलगे व एक मुलगी अशी अपत्ये होती. मुलांची नांवें अनुक्रमानें १ गंगाजी, २ बुवाजी, ३ मुरारजी, ४ शिवजी, ५ नारायणजी हीं होत. मुलीचे नांव दिपावती होय. शामजी हा प्रथमपासून विभक्त होता. प्रथम अणजूरास व नंतर कल्याण-लोनाडास तो राहत असे. शामजी सर्व भावंडाचें आधीं मृत्यु पावला असें येसूबाईचे पत्रावरून सिद्ध होत आहे. शामजी यानें पांच भावांचे राजकारणात भाग घेतलेला दिसत नाहीं त्याला कारण त्याचा अकालीं झालेला मृत्यु होय. शामजीला मुलगे तीन होते. १ मदनाजी, २ भिकाजी, ३ कृष्णाजी ही त्याची नांवें. येसूबाईचें पत्रावरून व इतर पत्रावरून सिद्ध होते कीं शामजीला तीन मुलगे होते. कै. भास्कर पुरुषोत्तम याचे वंशावळींत दोन नांवें आहेत पण ती चूक आहे. शामजीची सलग वंशावळ मिळत नाहीं म्हणून खालील तीन वंशावळी दिल्या आहेत. जरी शामजीनें राजकारणांत भाग घेतला नव्हता तरी पांच भावानी त्या मुलाना ६ मुडेचे शेत बक्षिस दिले होतें. तसेंच इनामांतूनहीं ७६ रुपये नक्त रक्कम ह्या भावांचे वंशजानां पाच भावांनीं दरवर्षी ईनाम विलीन होई पर्यंत दरसाल दिली आहे. शामजीचे तीनही मुलगे पेशव्याचे पदरी नोकरीस होते.


ता. १ सप्टेंबर १९२३ रोजी एक वंशावळ पाच भावांची छापलेली आहे त्यांत तीन चुका झालेल्या आहेत. त्या चुका दुरुस्त करुन त्यांच्या पांच वंशावळी खालीं प्रसिद्ध करीत आहे. पहिली चूक गंगाजीचा मोठा मुलगा हेरंभ हा आहे. व गणेश हा दुसरा आहे. दुसरी चूक; बुवाजीला जगन्नाथ हा एकच मुलगा होता हरबाजी आदी पुढील भाऊ ह जगन्नाथ याचे मुलगे होत भाऊ नव्हेत. तिसरी चूक : निबांजी नाईकाचा तिसरा मुलगा मुरारजी हा होय. शिवजी चवथा होय जुन्या वंशावळींत उलट आहे.

विशिष्ट माहिती

१) वर्ण : सूर्यवंशीक क्षत्रीय. २) ज्ञात : पाठारे क्षत्रिय. ३) गोत्र : वशिष्ठ. ४) देवी : हरवाई मढ येथील ५) प्रवरः त्रिप्रवरः (अ) अंगीरस (आ) वृद्धरस (ई) भगीरथ ६) मूळ ठिकाण : सौराष्ट्र ७) हल्लीचे पहिले स्थान, वांद्रे राजणपारवाडी दुसरें स्थान. अणजूर.



वंशावळ २ ड : दा



ी:

बाप्पाजी जगन्नाथ यांची